**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. भास्कर जाधव )**

**पृ.शी.**: वाढत्या शहरीकरणामुळे कच-याची विल्हेवाट लावण्याचा उग्र होत असलेला प्रश्न

**मु.शी.**: वाढत्या शहरीकरणामुळे कच-याची विल्हेवाट लावण्याचा उग्र होत असलेला प्रश्न या विषयावर सर्वश्री. मुझफ्फर हुसेन, सुधीर सावंत, भास्कर जाधव, राजन तेली, श्रीमती सुधा जोशी, श्रीमती मंदा म्हात्रे व श्री. संजय दत्त, वि.प.स. यांचा प्रस्ताव

(चर्चा पुढे सुरु...)

श्रीमती मंदा म्हात्रे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, या सभागृहाचे सन्माननीय सदस्य श्री. मुझफ्फर हुसेन यांनी वाढत्या शहरीकरणामुळे घनकच-याच्या व्यवस्थापनाचा निर्माण होत असलेला प्रश्न या संदर्भात या ठिकाणी चर्चा उपस्थित केली असून सदर चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी मी उभी आहे.

सन्माननीय सदस्य श्री. मुझफ्फर हुसेन यांनी राज्यातील शहरांच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा आणि जिव्हाळ्याचा विषय सभागृहामध्ये उपस्थित केलेला आहे. या विषयावर अनेक सन्माननीय सदस्यांनी आपले मौलिक विचार मांडले. घनकच-याच्या व्यवस्थापनाच्या दृष्टीने शासनाने कोणकाणती कामे केलेली आहेत आणि आणखी कोण कोणती कामे करावयास पाहिजेत यावर सन्माननीय सदस्य श्री. मुझफ्फर हुसेन यांनी प्रकाशझोत टाकलेला आहे. या सभागृहाचे नेते माननीय उपमुख्यमंत्री श्री. आर.आर.पाटील हे जेव्हा ग्रामविकास मंत्री होते त्यावेळी त्यांनी शहराच्या ग्रामीण भागामध्येच नव्हेतर शहरी भागातूनही संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान आणि संत गाडगेबाब नागरी स्वच्छता अभियान चांगल्या प्रकारे राबविले. या अभियानांतर्गत आपल्या राज्यातील अनेक ग्राम पंचायतींनी केन्द्र शासनाची पारितोषिकेही पटकावलेली आहेत. घनकच-याच्या व्यवस्थापनाच्या संदर्भात या ठिकाणी अनेक सन्माननीय सदस्यांनी आपले विचार

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्रीमती मंदा म्हात्रे...)

मांडले. या घनकच-याची नेमकी कशा पध्दतीने विल्हेवाट लावयला पाहिजे यादृष्टीने काही उपययोजना सुचविणे आवश्यक आहे. या घनकच-याचे नेमके काय केले पाहिजे, हाच एक विचार या ठिकाणी अनेक सन्माननीय सदस्यांच्या भाषणातून व्यक्त झालेला आहे. संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानांतर्गत ग्रामीण भागातील गावक-यांनी पुढाकार घेऊन खेड्यापाड्यातून स्वच्छतेची मोहीम फार चांगल्या त-हेने राबविली. संत गाडगेबाब ग्राम स्वच्छता अभियानाप्रमाणे संत गाडगेबाब नागरी स्वच्छता अभियान देखील सुरु केलेले आहे. हे अभियान शहरामधून चांगल्या प्रकारे राबविले गेले तर प्रदुषणापासून पर्यावरणाला जो मोठा धोका निर्माण झालेला आहे तो निश्चितच कमी होण्यास मदत होईल. मुंबई, ठाणे, नवी मुंबई, कल्याण, डोंबिवली, पुणे, नागपूर या शहरांतून लोकसंख्येची वाढ झपाटयाने होत आहे. मर्यादित भौगोलिक क्षेत्र, शहराची वाढत जाणारी लोकसंख्या आणि लोकांची वाढती उपभोगवादी प्रवृत्ती यामुळे आज न भूतो न भविष्यती अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे, परिणामी घनकचरा मोठ्या प्रमाणावर निर्माण झालेला आहे. या घनकच-याचे व्यवस्थापन करण्याच्या बाबतीत महानगरपालिका, नगरपालिका यांना अपयश आलेले आहे. या घनकच-याच्या व्यवस्थापनाच्या दृष्टीने राज्य शासनाने अनेक उपाययोजना केलेल्या आहेत. परंतु त्यांचा फालो अप चांगल्या प्रकारे झालेला नाही. काल सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी या विषयावर आपले विचार मांडले. त्यांनी मुंबईतील समस्येकडे शासनाचे लक्ष वेधले. मी या निमित्ताने सांगू इच्छिते की, मुंबई महानगरपालिका ही गेली अनेक वर्षे शिवसेना पक्षाच्या ताब्यात आहे.

....नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती मंदा म्हात्रे........

मुंबई शहर व उपनगरामध्ये 26 जुलै, 2005 रोजी अतिवृष्टीमुळे जी नैसर्गिक आपत्ती ओढवली त्या मागचे नेमके कारण काय आहे? अतिवृष्टी झाल्याने संपूर्ण महाराष्ट्राला पुराने वेढले. परंतु मुंबई शहर व उपनगरामध्ये प्रामुख्याने प्लॅस्टिकच्या पिशव्यांमुळे पुराची परिस्थिती निर्माण झाली. मुंबई शहर व उपनगराची दैना उडाली होती. सरकारने या प्लॅस्टिक पिशव्यांवर बंदी आणली होती. कालांतराने ही बंदी उठविण्यात आली. या प्लॅस्टिकच्या पिशव्या ड्रेनेजमध्ये ज्या जाळ्या बसविलेल्या असतात त्या जाळ्यांमध्ये जाऊन अडकतात परिणामी पाण्याचा निचरा होत नाही. त्यामुळे अतिवृष्टी झाल्यास पूरसदृश परिस्थिती निर्माण व्हायला वेळ लागत नाही. 26 जुलै, 2005 रोजी कल्याण-डोंबिवली शहरामध्ये देखील पूर परिस्थितीमुळे हजारो म्हशी दगावल्या. या मृत म्हशींची विल्हेवाट लावण्यासाठी डम्पिंग ग्राऊंडची समस्या निर्माण झाली होती. सध्या राज्यात निर्माण होणाऱ्या कचऱ्याच्या समस्येवर वारंवार बोलले जाईल, विल्हेवाट कशी लावावी याविषयी चर्चा केली जाईल परंतु शासनाने या प्रश्नावर सांगोपांग विचार करुन ठोस निर्णय घेण्याची वेळ आलेली आहे. नवी मुंबई परिसरात मी ज्याठिकाणी राहते त्या भागात 1994-95 साली फार मोठ्या प्रमाणात कमरेएवढे पाणी साचले होते. पाणी का साचले याची तेथील नागरिकांना कल्पना नव्हती. ज्यावेळी महानगरपालिकेकडून साफसफाई कामगारांना ड्रेनेजची सफाई करण्यासाठी आतमध्ये उतरविण्यात आले त्यावेळी हजारो प्लॅस्टिक पिशव्या ड्रेनेज लाईनमध्ये अडकून पडल्याचे दिसून आले. या प्लॅस्टिकच्या पिशव्या काढल्यामुळे सीबीडी परिसरात साचलेले पाणी ताबडतोब ओसरले. प्लॅस्टिकच्या पिशव्यांपासून निर्माण होणारा धोका टाळण्यासाठी या प्लॅस्टिक पिशव्यांवर सरसकट बंदी आणावी अशी मी शासनाला सूचना करते.

सभापती महोदय, ओला व सुका कचरा वेगळा केला आणि प्लॅस्टिकचा कचरा वेगळा केला तरी देखील समस्येची काही प्रमाणात उकल होईल. अशा प्रकारे निर्माण होणारा ओला व सुका वेगवेगळा करुन तो वाहून नेण्यासाठी सेवाभावी संस्थांना प्रोत्साहन दिले किंवा जाहिरात देऊन असा वेगवेगळा कचरा शहराबाहेर नेण्याची व्यवस्था केली तर मोठया प्रमाणात ही समस्या दूर होण्यास मदत होणार आहे. आज ठाणे जिल्हयामध्ये मोठया प्रमाणात मोकळी जमीन उपलब्ध आहे. अशा मोकळ्या जमिनीवर मुंबई, नवी मुंबई व ठाणे परिसरात निर्माण होणारा ओला, सुका व प्लॅस्टिकचा कचरा वाहून नेण्यासाठी सेवाभावी संस्थांना प्रोत्साहन देऊन त्यांना काही प्रमाणात

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती मंदा म्हात्रे........

कचरा वाहून नेण्यासाठी आर्थिक मदत केली तर खूप मोठया प्रमाणात महानगरपालिकांची आर्थिकदृष्टया बचत देखील होणार आहे. सेवाभावी संस्थांच्या पुढाकाराने या कचऱ्यापासून खत प्रकल्प, ऊर्जा निर्मिती प्रकल्प उभा राहू शकतो.

सभापती महोदय, दोन दिवसांपूर्वी नवी मुंबई महानगरपालिकेने त्यांच्या कार्यक्षेत्रातील कचरा वाहून नेण्यासाठी 11 कोटी रुपयांचे टेंडर काढले आहे. राज्यातील सर्व महानगरपालिकांनी जर एकत्रितपणे शासनाकडे निधी वर्ग करावा आणि शासनाने सामुहिकरित्या सर्व महानगरपालिकांच्या माध्यमातून या कचऱ्यापासून खत प्रकल्प, ऊर्जा निर्मिती प्रकल्प उभा करण्याचा प्रयत्न करावा अशी माझी सूचना आहे. केवळ शहरातील कचरा उचलून नेण्यासाठी 11 कोटी रुपयांचा खर्च नवी मुंबई महानगरपालिकेला करावा लागत आहे. हेच काम जर सेवाभावी संस्थांना प्रोत्साहन देऊन त्यांच्यामार्फत करण्यात आले तर त्या संस्थांना देखील आर्थिक मदत होईल आणि महानगरपालिकेची देखील आर्थिकदृष्टया बचत होऊ शकेल. ठाणे जिल्हयामध्ये मोठया स्वरुपात कचऱ्यापासून खत प्रकल्प उभा राहू शकतो. आज निर्माण होणाऱ्या कच-यामुळे हवेमध्ये होणारे दुष्परिणाम, पर्यावरणाला निर्माण झालेला धोका अशा अनेक समस्या आपल्यासमोर आ वासून उभ्या आहेत. कचऱ्यापासून ऊर्जा निर्मिती करता आली तर आजच्या विजेचे भारनियमन देखील काही प्रमाणात कमी होऊ शकेल. मी आजच सकाळी सन्माननीय ऊर्जामंत्री श्री.दिलीप वळसे पाटील यांच्याशी या कचऱ्याच्या समस्येविषयी बोलले व या कचऱ्यापासून ऊर्जा निर्मिती करता येऊ शकते, त्यासाठी शासनाने प्रयत्न करावा अशी मी त्यांना विनंती केली आहे. मध्यंतरी कोलकाता येथील एका कंपनीने नवी मुंबई शहरात निर्माण होणारा कचरा विल्हेवाट लावण्यासाठी आम्हाला जागा उपलब्ध करुन दिली तर आम्ही ऊर्जा निर्मिती करु शकतो असे नवी मुंबई महानगरपालिकेला कळविले होते. आज महाराष्ट्र राज्य अंध:कारात चाचपडत आहे. याच कारणामुळे मी ऊर्जामंत्री श्री.दिलीप वळसे पाटील यांची भेट घेतली.

(नंतर श्री.जुन्नरे....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती मंदा म्हात्रे ...

प्रत्येक महानगर पालिकेने यासंदर्भात शासनाला मदत केली तर विजेच्या संदर्भातील परिस्थिती व्यवस्थित होऊ शकेल. आम्हाला खाजगी कंपन्यांनी सांगितले होते की, आम्ही वीज निर्मितीचे प्रकल्प सुरु करण्यासाठी तयार आहोत. नवी मुंबई महापालिकेने वीज निर्मितीसाठी 500 कोटी रुपयांची गुंतवणूक केली तर त्यांना वीज विकून त्यांना पैसे परत मिळू शकतात. परंतु यासंदर्भात त्यांच्याकडून रिप्लाय आला नाही असे माननीय ऊर्जा मंत्र्यांनी सांगितले आहे. यासंदर्भात नव्या मुंबईच्या आयुक्तांना पत्र देऊन त्यांच्याशी चर्चा करणे आवश्यक आहे. ठाणे जिल्हयात वीज प्रकल्प निर्माण करावयाचे असेल तर पालिकेच्या अधिका-यांसोबत तसेच स्थानिक आमदारांसोबत माननीय ऊर्जा मंत्र्यांनी बैठक घेऊन निर्णय घेणे आवश्यक आहे. राज्य शासनाने विजेच्या संदर्भात अशा प्रकारे पाऊल उचलणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. मुझफ्फर हुसेन यांनी मोकाट कुत्र्यांच्या संदर्भात फार चांगले विचार या ठिकाणी व्यक्त केलेले आहेत. मुंबईमध्ये सुध्दा मोकाट कुत्र्यांची संख्या फार मोठया प्रमाणात आहे. नव्या मुंबईत सुध्दा मोकाट कुत्र्यांची संख्या 42 हजार असून त्यापैकी 830 कुत्र्यांचे निर्बीजीकरण करण्यात आलेले आहे अशा प्रकारची माहिती सन्माननीय सदस्यांनी दिलेली आहे. या विषयाच्या संदर्भात मी गेल्याच महिन्यात नवी मुंबईच्या पालिका आयुक्तांशी चर्चा केलेली आहे. आज नवी मुंबई येथे माणसांपेक्षा कुत्र्यांचीच संख्या जास्त झालेली आहे अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. मुलांना शाळेत सोडण्यासाठी महिला गेट वर आल्या तर 10-12 कुत्र्यांची झुंबड अंगावर येत असते. त्यामुळे येथील जनतेची एकच मागणी आहे की, आम्हाला तुम्ही कुत्र्यांपासून संरक्षण द्या, कुत्र्यांपासून आमची सुटका केली तर आम्ही तुम्हाला मते देऊ. सभापती महोदय, मोकाट कुत्र्यांचा प्रश्न आज गंभीर झालेला आहे. कुत्र्यांच्या संदर्भात केंद्रशासनाने कायदा बनवला असला तरी कुत्र्यांपासून जनतेचे संरक्षण करण्यासाठी राज्य शासनाने ठोस उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे, त्यावर काही तरी दुसरा मार्ग काढण्याची आवश्यकता आहे. यासंदर्भात केवळ केंद्रशासनाचे नाव घेऊन हातावर हात घरून राज्य शासनाला बसता येणार नाही. मोकाट कुत्र्यांचा प्रश्न आज सर्व शहरांना भेडसावत आहे. कुत्र्यांच्या अंगावर जखम झाली तर ते

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती मंदा म्हात्रे ...

जिभेने चाटून ती जखम बरी करतात परंतु जर कुत्र्याच्या डोक्यावर जखम झाली तर त्याला ती जखम चाटता येत नाही. ही जखम बरी न झाल्यामुळे कुत्रे वेडेपिसे होतात आणि समोर येईल त्याला चावत सुटतात. मोकाट कुत्रे चावल्यामुळे आतापर्यंत किती माणसे दगावली आहेत याची सुध्दा माहिती या सभागृहाला मिळण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, आपल्याकडे काही परदेशी कंपन्यांनी 3 मे.वॅ. वीज निर्माण करण्याच्या संदर्भात प्रस्ताव दिलेले आहेत. त्यामुळे यासंदर्भात चर्चा होऊन निर्णय होण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे यासंदर्भात माननीय ऊर्जा मंत्र्यांनी संबधित कंपन्याशी चर्चा केली आणि हे प्रकल्प निर्माण होऊ शकले तर सध्या महाराष्ट्रात जो वीज लोड शेडींगचा प्रश्न आहे तो काही तरी प्रमाणात कमी होऊ शकेल.

सभापती महोदय, ठाणे जिल्हयामध्ये फार मोठया प्रमाणात जागा उपलब्ध आहे. या ठिकाणच्या पडिक जमिनीचा वापर शासनाने करुन घेतला नाही तर ते योग्य होणार नाही. त्यामुळे ठाणे जिल्हयातील पडिक जमिनीवर वीज प्रकल्प तसेच खतांचे प्रकल्प ऊभे करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, कचरा, डम्पिंग ग्राऊंड, मोकाट कुत्र्यांच्य संदर्भात प्रत्येक महानगरपालिकेच्या आयुक्तांशी माननीय मंत्री महोदयांनी बैठक लावावी व त्या बैठकीत स्थानिक आमदारांना बोलवावे व यासंदर्भात योग्य तोडगा काढावा अशी माझी माननीय मंत्री महोदयांना विनंती आहे. आज मुंबईतील कचरा नव्या मुंबईत येत आहे त्यामुळे नव्या मुंबईला "नको ती व्यथा" अशी परिस्थिती आहे. यासंदर्भात ज्या ज्या सन्माननीय सदस्यांचे प्रश्न असतील त्यासंदर्भात माननीय मंत्री महोदयांनी चर्चा करुन निर्णय घेणे आवश्यक आहे.

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती मंदा म्हात्रे .........

संत गाडगेबाबा स्वच्छता अभियान ग्रामीण भागात सुरु आहे त्यामुळे काही गावांत स्वच्छता आहे. आमच्या नवी मुंबई महानगरपालिकेतील काही नगरसेवकांनी त्यांच्या वॉर्डामध्ये चांगली स्वच्छता ठेवली म्हणून त्यांना पारितोषिके मिळालेली आहेत. तेव्हा शासनाने अशा गोष्टींना प्रोत्साहन दिले पाहिजे.

सभापती महोदय, ठाणे येथे कचऱ्यापासून खत निर्मितीचा प्रकल्प उभा करणार का ? ज्या सेवाभावी संस्था आहेत त्यांना खत निर्मितीचे काम देणार काय ? प्लास्टिक पिशव्यांच्या अतिवापरामुळ मुंबई आणि संपूर्ण महाराष्ट्रात मागील दोन वर्षे महापूर आला होता. तेव्हा प्लास्टिक पिशव्यांवर बंदी आणणार का ? या माझ्या प्रश्नांची उत्तरे माननीय मंत्रिहोदयांनी त्यांच्या उत्तराच्या भाषणात द्यावीत. आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपले आभार मानून माझे भाषण पूर्ण करते.

----------------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण ( मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, सन्मानीय सदस्य श्री.मुझफ्फर हुसेन यांनी याठिकाणी अतिशय महत्वाचा प्रस्ताव उपस्थित केलेला आहे त्याबद्दल मी प्रथम त्यांचे अभिनंदन करतो. याठिकाणी सन्माननीय राज्यमंत्री श्री.राजेश टोपे उपस्थित आहेत. सन्माननीय सदस्यांनी मांडलेल्या कोणत्याही चर्चेची ते नोंद घेतात अशी त्यांची ख्याती आहे.

सभापती महोदय, या प्रस्तावाच्या निमित्ताने मी एक गोष्ट सभागृहाच्या लक्षात आणून देऊ इच्छितो की, महाराष्ट्रामध्ये सर्वात जास्त शहरीकरण होत आहे. JNURM च्या अहवालात सुरुवातीलाच सांगितले आहे की, "According to the 2001 census, India has a population of 1027 million with approximately 28 percent or 285 million people living in urban areas. As a result of the liberalization policies adopted by the Government of India it is expected to increase the share of the urban population to about 40 percent of total population by the year 2021. महाराष्ट्राच्या प्रगतीचा जो अहवाल दिलेला आहे त्यामध्ये म्हटले आहे की, 4 कोटी 98 लाख इतके लोक शहरात राहतात. भारतातील इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रामध्ये सर्वात जास्त शहरीकरण झालेले आहे. याठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. मुझफ्फर हुसेन आणि सन्माननीय सदस्या श्रीमती मंदा म्हात्रे यांनी मुंबईतील तसेच नवीन मुंबईतील समस्या अतिशय प्रभावीपणे मांडलेल्या आहेत. मी आणखी पुढे सांगू इच्छितो की, आज महाराष्ट्रातील सर्वच शहरे बकाल झालेली आहेत. अनेक ठिकाणी कचऱ्यांची विल्हेवाट लावण्यासाठी जागा उपलब्ध नाही. आज मुंबईत जमिनीच्या किंमती गगनाला भिडलेल्या आहेत. त्यामुळे कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी किती जमीन संपादित केली जाते ? तेव्हा कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी आयुक्त, चीफ ऑफीसर यांची बैठक बोलावून यावर तोडगा काढला पाहिजे. आज राज्यात मोठ्या प्रमाणावर शहरीकरण होत चालले आहे, लोकसंख्या वाढत आहे आणि त्याप्रमाणात कचऱ्यामध्येही वाढ होत आहे. या कचऱ्याची विल्हेवाट कशी लावायची हा यक्षप्रश्न आपल्यासमोर आहे. भविष्यात हा प्रश्न आपल्याला मोठ्या प्रमाणावर भेडसावणार आहे. तेव्हा याबाबत आतापासूनच गांभीर्याने विचार केला पाहिजे.

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण...........

आज महाराष्ट्रातील सर्व शहरे मग ते सोलापूर असो, कोल्हापूर असो वा इतर कोणतेही असो, या सर्व शहरांमध्ये मोठ्या प्रमाणावर बकालपणा वाढत आहे.  फक्त एक-दोन शहरे यास अपवाद आहेत. उदाहरण सांगावयाचे झाले तर नागपूर शहर. या सर्व शहरांमध्ये कचऱ्यांची विल्हेवाट कशी लावावी, कचरा कुठे टाकावा, सांडपाणी व्यवस्था इत्यादींची योग्य व्यवस्था झालेली नाही. पावसाळ्यात मागील दोन वर्षे मुंबई आणि संपूर्ण महाराष्ट्रात महापुराची परिस्थिती निर्माण झाली होती. मुंबईत महापुराचे संकट हे प्लास्टीकच्या अतिवापरामुळे झाले होते असे लक्षात आल्यानंतर प्लास्टीकच्या पिशव्यांवर बंदी आणण्यात आली. शासन जनतेच्या हितासाठी कायदा करते. त्याप्रमाणे याही बाबतीत कायदा करण्यात आला. परंतु मूठभर धनिकांच्या दबावापुढे प्लास्टीकची जाडी अमूक अमूक इतकी असावी अशी सुधारणा करण्यात आली. कन्व्हेन्स डीडचे विधेयक येथे चर्चेस येऊ नये काही धनदांडगे आजुबाजूला फिरत आहेत. आजही आपणास समुद्र किनारी, नदीच्या किनारी, खाडीच्या किनारी मोठ्या प्रमाणावर प्लास्टीकच्या पिशव्यांचे ढीग आढळतात. तेव्हा या पुन्हा एकदा गांभीर्याने विचार होण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, सर्वात महत्वाचा मुद्दा म्हणजे इलेक्ट्रानिक्स गुडस वेस्ट यांचे भविष्यात काय करणार आहात ? कारण आज घरातील प्रत्येक व्यक्तीजवळ मोबाईल असतो, प्रत्येक घरात सी.डी.प्लेअर आणि टी.व्ही.असतो. तेव्हा या इलेक्ट्रनिक्स गुडस वेस्टची विल्हेवाट कशी लावणार आहात ?

यानंतर श्री.पुरी..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण...

याचा कोणी गांभीर्याने विचार केला आहे का ? महाराष्ट्रात व भारतात प्रगती झाल्याचे आपण दाखवतो. एखाद्या मोबाईल कंपनीच्या मोबाईची जाहिरात करताना दाखविण्यात येते की, पानपट्टी लावताना कोणतरी मोबाईल करीत आहे, मासे विकणारी आमची कोळीण भगिनी खाली उभी राहून वरच्या माळयावर फोन लावून पापलेट, हलवा, झिंगा, सरंगा घेण्यासंबंधी विचारीत आहे. परंतु नंतर तो माबाईल, वॉकीटॉकी किंवा टी.व्ही.सेट खराब झाल्यानंतर त्याचे आपण काय करणार आहात ? आज कॉलेजचे प्रत्येक विद्यार्थी रस्त्याने चालताना असे वाटते की, जणूकाही पागलच झालेले आहेत की काय ? कारण, ते मोबाईलवर गाणे ऐकत आपल्याच धुंदीत चाललेले असतात. त्यामुळे यातून जे वेस्ट तयार होईल ते आपण कुठे टाकणार आहात ? आज इलेक्ट्रॉनिक गुडस्ची विल्हेवाट लावण्याचे तंत्रज्ञान जगामध्ये निघालेले आहे. त्यामुळे याबाबत शासनाने विचार करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, दुसरी गोष्ट अशी की, कचऱ्यासंबंधी असे बोलले जाते की, हजार डीग्रीने कचरा जाळला तर त्यातून निघणाऱ्या वाफेमधून जवळपास 1-2 मे.वॅ. वीज तयार होऊ शकते. मी त्यातला तज्ज्ञ नाही. परंतु त्यातून वीज निर्माण होते. त्यामुळे याबाबतही माननीय मंत्री महोदयांनी विचार करावा. कारण, आपली आता दोनच वर्षे राहिलेली आहेत. तीन वर्षात आपण काहीच केलेले नाही. साधे महामंडळाचे अध्यक्षही आपण नेमलेले नाहीत. तीन वर्षात आपण तुला किती आणि मला किती यातच वेळ घालवलेला आहे. याठिकाणी अतिशय चांगल्या प्रकारचा नागरी जीवनावर परिणाम करणारा प्रस्ताव चर्चेला आलेला आहे. या प्रस्तावावरील चर्चेतून 5-6 महिन्यातून शहरात राहणाऱ्या जनतेला काहीतरी मिळेल, यादृष्टीने पहावे. नाहीतर येथे फक्त अरुण्यरुदन होईल किंवा वांझोटे बोलणेच होईल. या प्रस्तावावर आम्ही काय बोललो त्याचे प्रोसेडींग आम्हाला मिळेल, माननीय मंत्री महोदयांचे उत्तर मिळेल व हा प्रस्ताव मांडला म्हणून सन्माननीय सदस्यांना फक्त मानसिक समाधान मिळेल, त्यापलिकडे काहीही मिळणार नाही. या प्रस्तावावर अनेक वक्ते या प्रस्तावावर विस्तृतपणे बोलले आहेत. म्हणून माझी पुन्हा एकदा विनंती आहे की, महाराष्ट्राचे शहरीकरण फार मोठयाप्रमाणात होत आहे. या शहरीकरणामध्ये सर्वात मोठा प्रश्न कचऱ्याचा निर्माण होणार असून त्याची विल्हेवाट, त्याची व्यवस्था ही आपण जर आधुनिक तंत्राचा उपयोग करुन केली नाहीतर कालांतराने ही सर्व शहरे नरक होतील,

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण....

गावांपेक्षाही घाणेरडी शहरे होतील. त्यामुळे माझी माननीय मंत्री महोदयांना विनंती आहे की, आपण सगळया अधिकाऱ्यांना महिनाभरात बोलवावे व त्यांची एक बैठक घ्यावी आणि या शहरातील कचऱ्याची विल्हेवाट कशाप्रकारे लावता येईल त्याबाबत विचार करावा.

सभापती महोदय, कुत्र्यांचा मुद्दा काल काही सन्माननीय सदस्यांनी मांडला, त्यावेळी सभागृहातील काही सन्माननीय सदस्य हसत होते. कचऱ्यामुळेच कुत्र्यांचा प्रश्न निर्माण झालेला आहे. फाईव्ह स्टारमध्ये बसलेल्या मानवतावादी लोकांना सामान्य माणसांच्या सुखदु:खाची काहीही माहिती नसते, सर्वसामान्यांना दैनंदिन जीवनामध्ये होणाऱ्या त्रासाबद्दल त्यांना काहीही माहिती नसते. त्यांना कुठलेतरी पुस्तकी ज्ञान असते व जगातील कुठलातरी कार्यक्रम ते टी.व्ही.वर पहात असतात व ते भारतात नांदवायला पहात असतात. परंतु याठिकाणी कुत्र्यांची विल्हेवाट लावलीच पाहिजे. "जीवोजीवस्य जीवनम्" असा डार्विनचा सिध्दांत आहे. हा निसर्गानेच मान्य केलेला असून तो आपल्याला देखील मान्य करावाच लागेल. कारण, आपण माणसाला महत्व देणार की कुत्र्यांना ? आपण परमेश्वर नाही. निसर्गाच्या नियमाप्रमाणे झाडावर पिकलेले पान हे दुसऱ्या पानाच्या निर्मितीसाठी गळून पडत असते. जर एखाद्या गोष्टीचा त्रास होत असेल तर त्या गोष्टीची विल्हेवाट कशी लावायची याबाबत आपण व्यवहाराचा आधार घेऊन हे सर्व केले पाहिजे. त्यामुळे माननीय मंत्री महोदयांनी या चर्चेला फक्त उत्तर देऊन थांबू नये तर याबाबतीत काहीतरी उपाययोजना करावी. याठिकाणी अतिशय महत्वाचा प्रस्ताव सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेला आहे. तसेच, इलेक्ट्रॉनिक गुडस्‌मुळे शहरात डोकेदुखी वाढणार असून त्याची विल्हेवाट आपण कशी लावणार आहात, याबाबतही माननीय मंत्री महोदयांनी विचार करावा. एवढे बोलून मी माझे भाषण थांबवितो.

धन्यवाद !

-------

..3.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र. पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.मुझफ्फर हुसेन यांनी जो नियम 260 अन्वये प्रस्ताव याठिकाणी चर्चेला आणलेला आहे, त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, शहरीकरणाबाबत जी छोटी शहरे होतात, त्याचे नियोजन राज्य शासनाकडून पाहिजे तसे होत नाही. त्याठिकाणी डम्पिंग ग्राऊंडचा प्रामुख्याने प्रश्न आहे. छोटया शहरांमध्ये व छोटया नगरपालिकांमध्ये त्याठिकाणच्या जवळच्या वस्तीमध्ये जवळपास डम्पिंग ग्राऊंडची मर्यादा 10 किलोमीटरची राज्य शासनाने घालून दिलेली आहे. त्यापुढे जाऊन नगरपालिकेने डम्पिंग ग्राऊंड केले तर त्यास राज्य शासन परवानगी देत नाही. त्यामुळे तातडीने राज्य शासनाची शासकीय जागा डम्पिंग ग्राऊंडसाठी देणे आवश्यक आहे. नगरपालिकेच्या आजुबाजूला जी वस्ती होत आहेत, त्यामध्ये प्रामुख्याने ग्रामपंचायती ज्या होत आहेत, त्या नगरपालिकेवर बर्डन होऊन बसलेल्या आहेत.

कु.गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र. पाटील सुरु..

यामुळे बर्डन निर्माण झालेला आहे. त्या ठिकाणी जी शहरे वसलेली आहेत , तेथील ज्या ग्रामपंचायती आहेत त्यांच्या क्षेत्रातील कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी त्यांच्याकडे फंड नाही. नगरपालिकांकडून डंम्पिंग ग्राउंड मध्ये कचरा टाकण्याचे काम सुरु आहे. हे काम स्थानिक स्वराज्य संस्थांकडेसुध्दा देण्यात आलेले आहे. परंतु या संस्थांना हे काम करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या निधीची कमतरता भासत असते. म्हणून रोजगार हमी योजनेतील काही पैसे शासनाने या कचरा उचलण्याच्या कामासाठी दिले पाहिजे. त्यासाठी वेगळया तरतुदी कराव्या लागतील, रोजगार हमी योजनेचे नियम बदलावे लागतील. रोजगार हमी योजने अंतर्गत काम करणारे जे मजूर आहेत त्यांना त्यांची मजूरी कॉंट्रेक्ट पध्दतीने मिळू शकेल असे प्रयोजन राज्य सरकारने केले पाहिजे. अनेक नगरपालिकांमध्ये पंडीत जवाहरलाल नेहरू रोजगार हमी योजनेचा पैसा पडून राहिलेला आहे . तो निधी कचरा उचलण्याच्या कामासाठी आपल्याला वापरता येऊ शकतो. हा शिल्लक असलेला निधी या कामासाठी वळवला तर आपली सर्व शहरे स्वच्छ आणि सुंदर होतील. मी ज्या ठिकाणी राहतो त्या अलिबाग नगरपालिकेचे क्षेत्र 300 एकर एवढे आहे. त्या 300 एकरमध्ये अलिबाग हे शहर वसलेले आहे. हे शहर पूर्णपणे कसे स्वच्छ राहील यादृष्टीने मी प्रयत्न करीत आहे.

सभापती महोदय, कचरा उचलण्याची सध्याची जी वेळ आहे ती सुध्दा बदलणे आवश्यक आहे. हा कचरा सकाळी उचलला जातो त्या ऐवजी तो रात्री 2 नंतर 5 वाजेपर्यंत उचलला गेला पाहिजे. सभापती महोदय आपण देखील आमदारांसाठी आयोजित केलेल्या परदेश दौऱ्यामध्ये सहभागी होता. त्या वेळेस आपण अनेक देश बघितले. तेथील कचरा नियोजनाच्या पध्दती पाहिल्या. मी ज्या वेळी परदेशी जातो त्या वेळी रात्री उठून तेंथील व्यवस्था बघतो. या ठिकाणी पूर्वी कचरा होता का असा विचार करावा लागेल अशी तेथील परिास्थिती आहे. त्या ठिकाणी कचरा उचलण्याचे काम रात्रीच केले जाते. अशी यंत्रणा आपल्याकडे निर्माण करता येईल का ? आपल्याकडे मॅनपॉवर भरपूर आहे, जागा विपूल आहे. परंतु कोणतेही नियोजन नाही. मी पूर्वी नॉव्हे या देशात गेलो होतो. मला भारतीय जेवणच आवडते. भारतीय जेवणात बोंबील, सुकट हे मला जास्त आवडते म्हणून मी तेथे बाजारात भाजी खरेदी करण्यासाठी संध्याकाळी गेलो होतो.

श्री. जयंत प्र. पाटील...

मी कोठेही गेलो तर सोबत प्रेशर कुकर नेत असतो. त्या ठिकाणी संध्याकाळी बाजारात काही शेतकरी भाजी विकण्यासाठी आपला टेम्पो घेऊन आले होते. त्यानंतर थोडया वेळाने मी तेथे फिरावयास गेलो त्यावेळी तेथे अनेक लोक आरामात फिरत होते, तेथे बसलेले होते. त्या ठिकाणश विकलेल्या भाजीच्या कचऱ्याचा कोणताही मागमूस नव्हता. असे नियोजन आपल्या राज्यात करता येईल का ? मी माननीय मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, C.E.O. ला दिले जाणारे इन्क्रिमेंट हे त्याच्या कामाचा परफॉर्मन्स पाहूनच दिले जावे. आताच सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी चिपळूण शहराच्या संदर्भात सांगितले की, त्या शहरामध्ये कोणतेही नियोजन नाही. तेथे प्लॉटींग केले जाते परंतु त्याप्रमाणे टाऊन प्लानिंग होत नाही. त्या शहरात ड्रेनेजची सोय नाही . त्यामुळे तेथे तयार होणारे सांडपाणी कोठे सोडावयाचे असा प्रश्न निर्माण होतो.

या नंतर श्री. रोझेकर....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

12-04-2007 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही ) G-1

SRR/ MHM/ KGS/ प्रथम कुमारी धनश्री........... 11:00

श्री.जयंत प्र.पाटील.........

नगरपालिकांमध्ये कचरा विल्हेवाटीचे कसलेही नियोजन नाही.

सभापती महोदय, काल आपण तारांकित प्रश्नाच्या माध्यमातून अतिशय चांगला विषय उपस्थित केला होता परंतु प्रश्न शेवटी आल्यामुळे आपल्याला वेळ मिळाला नाही. डंपिंग ग्राऊंडची जागा विकत घेण्यासाठी प्रचंड भ्रष्टाचार या राज्यामध्ये झाला. म्हणून डंपिंग ग्राऊंडचे अंतर 2/5 किलोमीटरने वाढले तरी चालेल पण सरकारी जागा यासाठी मिळाली तर ती घेतली पाहिजे तरच यामधील भ्रष्टाचार थांबेल. कचरा कसा उचलला जाईल, त्याची विल्हेवाट कशी लागेल, या दृष्टीकोनातून शासनाने गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. या क्षेत्रात स्वयंसेवी संघटना कमी आहेत, असे जे सन्माननीय सदस्या, श्रीमती मंदा म्हात्रे यांनी सांगितले, ते बरोबर आहे. पण शासनाने जर चांगले नियोजन केले तर स्वयंसेवी संघटना निश्चितपणे पुढाकार घेतील. राज्यातील महानगरपालिका, 'अ' वर्ग नगरपालिका व 'ब' वर्ग नगरपालिका कचरा निर्मूलनाचे व्यवस्थापन करु शकतात. परंतु, 'क' वर्ग नगरपालिकांसाठी वेगळे सूत्र आखले पाहिजे. शेवटी सन्माननीय सदस्य, श्री.मुझफ्फर हुसेन यांनी नियम 260 अन्वये अतिशय महत्वाच्या प्रश्नावर प्रस्ताव या सभागृहात चर्चेला आणला आणि अतिशय महत्वपूर्ण चर्चा घडवून आणली त्याबद्दल मी मनापासून त्यांना धन्यवाद देतो आणि माझे दोन शब्द पूर्ण करतो.

--------------

यानंतर कुमारी जयश्री..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

JPK/ KGS/ MHM/ 11:05

श्रीमती फौजिया खान (नाम-नियुक्त) : सभापति महोदय, माननीय सदस्य मुझफ्फर हुसेन ने महाराष्ट्र विधान परिषद के नियम 260 के अन्तर्गत घनकचरा के बारे में जो प्रस्ताव रखा है, उसके ऊपर अपने विचार प्रकट करने के लिए मैं खड़ी हूॅं.

सभापति महोदय, हम जिस देश में रहते हैं, उस देश के बारे में डॉ. इकबाल का शेर आपके सामने पेश करती हूॅं :

"सारे जहाँ से अच्छा हिन्दोस्तां हमारा,
हम बुलबुले हैं इसकी, ये गुलिस्तां हमारा."

सभापति महोदय, जिस देश को गुलिस्तां कहा गया है, उसी देश में आज जो शहरीकरण हो रहा है, उसके कारण क्रॉंक्रीट के जंगल बन रहे हैं. इस परिस्थिति के बारे में कवि "मीर" ने कहा है :

"दिल खुलता है वहीं सोहबतें रिंदाना जहाँ हो,
मैं खुश हूॅं उसी शहर में मयखाना जहाँ हो,
इन उजड़ी हुई बस्तियों में जी नहीं लगता,
है दिल में वहीं जा बसें वीराना जहाँ हो."

सभापति महोदय, जहां सांस लेना दुश्वार हो, हर सांस के साथ हम विष पी रहे हैं, हर पानी के घूंट के साथ जहर निगल रहे हैं, शोर और आवाज के प्रदूषण से हमारे हृदय और कान भन्ना रहे हैं, सड़ी हुई नालियां जहां दुर्गन्ध फैला रही हैं, कचरे के ढेर पर मक्खियां भिनभिना रही हैं, ग्लोबल वार्मिंग के परिणामों के कारण बढ़ते हुए तापमान से निपटने की कोशिश कर रहे हैं, बाढ़ और सूखे के प्रकोप से परेशान हो रहे हैं, नई नई बीमारियों का सामना करना पड़ रहा है, हम इन सारी चीजों से परेशान हो रहे हैं तो क्या ऐसी बस्तियों से हम खुश है, क्या ऐसी बस्तियों पर हम नाज कर रहे हैं, क्या हम ऐसे देश पर गर्व कर रहे हैं ? यह प्रश्न हम सभी लोगों के लिए विचारणीय है.

सभापति महोदय, माननीय सदस्य मुजफ्फर हुसेन ने यहां पर कहा सरकार की तरफ से हर प्रकार के कदम उठाए जा रहे हैं, इसके लिए कायदे-कानून बनाए गए हैं, इसके लिए जी.आर. और ऑर्डिनेन्स भी निकाले गए हैं. इस कार्य के लिए निधि भी बराबर दी जा रही है, उनको सारी सुविधाएं दी जा रही है, फिर भी अगर हम अपने देश का चित्र देखते हैं और जैसा

. . . H 2

12-04-2007 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही ) H-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती फौजिया खान . . .

कि माननीय सदस्य श्री. जयंत पाटील ने कहा कि जब हम दूसरे देशों में जाकर, अमेरिका और यूरोप में जाकर, जापान और चाइना में जाकर और यहां तक कि मिडिल ईस्ट के देशों के शहरों को देखते हैं तो हमें एक अलग ही चित्र दिखाई पड़ता है. मिडिल ईस्ट के देशों में जहां वालवंट है, वहां पर हर शहर के अन्दर पेड़ लगे हुए हैं, दूर दूर तक लॉन्स फैले हुए हैं और थोड़ी सी भी जगह खाली नहीं है. जो अरब सागर हमारे पास है, वही अरब सागर उनके पास भी है, लेकिन वहां पर सफाई, स्वच्छता और सुंदरता इतनी है कि हमारे फिल्म वाले लोग वहां जाकर सूटिंग करते हैं. वहां पर समुद्र के किनारे एकदम साफ रहते हैं और कचरा ढूंढने से भी नहीं मिलता. जबकि हमारे यहां पर समुद्र के किनारे के क्या हालात है, यह बात हम सभी जानते हैं. इसमें आश्चर्य की बात यह है कि जब हम भारतीय लोग वहां जाकर रहते हैं तो हमारे वहां के बर्ताव में और यहां के बर्ताव में जमीन आसमान का फर्क होता है. हमें मालूम है कि अगर हम वहां सड़क पर थूक देंगे तो दंड होगा, लेकिन जब हम अपने देश में आते हैं तो हमें एक आजादी और खुशी का अहसास होता है और हम कचरा कहीं भी फेंक देते हैं, क्योंकि हमें मालूम है कि अगर हम कुछ भी करेंगे तो भी हमें कोई बोलने वाला नहीं है. इसलिए हमें अपने देश के लोगों की मानसिकता पर विचार करने की आवश्यकता है, क्योंकि हम आम नागरिक जिस प्रकार से बर्ताव करते हैं और इस बारे में जब हम दूसरे देशों को देखते हैं तो वहां की साफ सफाई में शासन का प्रयास 25 प्रतिशत भी नहीं है. दूसरे देशों की सड़के साफ सुथरी नजर आती हैं, वहां पर हमें कहीं पर भी गंदगी नजर नहीं आती है. इस बात का हमारी मानसिकता के साथ संबंध है. हम केवल देश प्रेम की बातें करते है, लेकिन जब तक हमें अपने मोहल्ला, पब्लिक प्लेस और अपने देश के साथ "सायकलोजीकल लव" की फीलिंग नहीं होगी, तब तक इस स्थिति में सुधार नहीं होगा. आज हमारे देश में सड़के साफ नहीं रहती और नालियों से सड़ी हुई दुर्गन्ध आती है तो क्या यह नागरिकों की जिम्मेदारी नहीं है ? लेकिन हम पब्लिक प्लेस को अपना नहीं समझते, पब्लिक प्रॉपर्टी को अपना मानने की फीलिंग हमारे अन्दर नहीं है. हम केवल अपना घर ही अपना समझते हैं और अपने घर का कचरा बाजू में डाल देते हैं. घर और परिवार तक ही हम लोग सीमित हैं. मेरा मोहल्ला, मेरा समाज, मेरा राज्य, मेरा देश, जब इस प्रकार की भावना हमारे मन में आएगी तो हम जिस तरह से अपना घर साफ करते हैं, उसी तरह से पब्लिक प्लेस को साफ रखने की भावना हम लाएंगे तो हमें कहीं भी गंदगी नजर नहीं आएगी. . . .H 3

 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही ) 



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती फौजिया खान . . .

सभापति महोदय, हमारे प्रदेश में 75 साल पहले संत गाडगे महाराज हुए थे और आज हम उनके नाम पर स्वच्छता अभियान चला रहे हैं, यह हमारे लिए एक शोकांतिका है. जब हम उनके नाम पर जागरुकता अभियान चलाते हैं तो उसके परिणामों के बारे में भी चर्चा होती है. आज हमारे कायदे-कानून इस प्रकार के हैं कि स्वच्छता की जिम्मेदारी कचरा उठाने वाले को दी गई है, कचरा डालने वाले के ऊपर इस बात की जिम्मेदारी नहीं दी गई है. दूसरे देशों में इस प्रकार का कायदा है कि स्वच्छता की जिम्मेदारी कचरा डालने वाले के ऊपर निश्चित की गई है. क्या शासन इस प्रकार का कायदा बनाएगा कि स्वच्छता की जिम्मेदारी कचरा डालने वाले के ऊपर निश्चित की जाए ? सच बात तो यह है कि हमारे पास न तो भीती है और न ही भक्ति है. हमारे मन में किसी कानून का डर नहीं है. अमेरिका में अगर आप सड़क पर जा रहे हैं तो केले का छिलका सड़क पर नहीं फेंक सकते, पुलिस आपके ऊपर 400 डॉलर फाइन कर देगी. हमारे यहां पर कोई भी व्यक्ति सड़क पर कुछ भी फेंक सकता है. इसलिए शासन को इस प्रकार का कायदा बनाना चाहिए कि कचरा फेंकने वाले के ऊपर जिम्मेदारी निश्चित की जाए. इस बात की नितांत आवश्यकता है.

सभापति महोदय, इन्फ्रास्ट्रक्चर को मोबिलाइज करने के लिए अवेयरनेस प्रोग्राम की बहुत महत्वपूर्ण भूमिका है. इसके लिए हमें पोस्टर्स, बॅनर्स लगाने के साथ साथ "स्लोगन कॉन्टेस्ट" भी आयोजित करने चाहिए. स्वच्छता अभियान के बारे में विज्ञापन कितने प्रभावी हैं ? स्वच्छता अभियान को चलाने के लिए एस.एम.एस. किए जा सकते हैं और जगह जगह पर पोस्टर्स और बॅनर्स लगाए जा सकते हैं. स्लोगन का कितना महत्व होता है, यह मैं आपको बताना चाहती हूँ कि "यह दिल मांगे मोर", इस स्लोगन के लिए एक महिला को 4 करोड़ रुपए दिए गए. यह न्यूज इंडियन एक्सप्रेस की हेड लाइन थी. इस एक लाइन के स्लोगन से पेप्सी की बिक्री में कितनी मदद हुई होगी कि उसने 4 करोड़ रुपए खर्च किए. इस तरह का जागरुकता अभियान शासन क्यों नहीं कर रहा है ? टी.वी. प्रोग्राम्स पर विज्ञापन देकर और एस.एम.एस. के जरिए जागरुकता पैदा करने की बात क्यों नहीं की जा रही है.

सभापति महोदय, सारा प्रदूषण पेड़ों से संबंधित है. ओएसिस पहले हम डेजर्ट में ढूंढते थे, अब हम अपने शहरों में ढूंढ रहे हैं. हमें हर जगह झाड़ लगाकर हरियाली पैदा करने की आवश्यकता है. इसके लिए लोगों में जागरुकता पैदा करनी चाहिए. . . . H 4



श्रीमती फौजिया खान . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापति महोदय, कई माननीय सदस्यों ने यहां पर कचरे से इलेक्ट्रिकसिटी जनरेशन के बारे में कहा है. हर जिले में अगर कचरे से इलेक्ट्रिकसिटी बनाने का प्रोजक्ट लगाया जाए तो 20 मेगावाट इलेक्ट्रिकसिटी जनरेट हो सकती है. इसके ऊपर लगभग 900 करोड़ रुपए का "वन टाइम इन्वेस्टमेंट है" और इसके लिए रिकरिंग एक्सपेंडीचर कुछ नहीं है. इसलिए इसके बारे में शासन को सोचना चाहिए.

. . . भाषण जारी, नंतर तालेवार.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती फौजीया खान .........

हर जिले में बिजली निर्माण के लिए छोटे छोटे प्लाण्ट स्थापित करने की आवश्यकता है. इस दिशा में शासन की ओर से वन टाईम इनवेस्टमेंट किए जाने की आवश्यकता है.

सभापति महोदय, मैं अंत में एक महत्वपूर्ण मुद्दे की ओर सरकार का ध्यान खींचना चाहूंगी. यह मुद्दा इम्पलीमेंटेशन संबंधी है. शासन की जितनी भी योजनाएं है, उनका प्रभावी ढंग से इम्पलीमेंटेशन होना जरुरी है. मैं इस संबंध में एक मुद्दे की तरफ आपका ध्यान खींचना चाहती हूं. औरंगाबाद में एमआयडीसी के पीछे फूड टॅक्नॉलॉजी इन्स्टीट्यूट में वाटर टेस्टिंग की जाती है. वाटर टेस्टिंग करने पर यह पता चलता है कि वाटर में कितना सॉलिड कम्पानेंट है. औरंगाबाद में नागरिकों को जो जलपूर्ति की जा रही है, उस जल का जब टेस्टिंग किया गया तो यह पता चला कि उसमें 100 टाईम पीपीएम है, जब कि वह वन टाईम पीपीएम होना चाहिए. औरंगाबाद में जो जल पूर्ति की जा रही है, वह जल ग्रीन कलर का है. इस जल से पेड़-पौधे नष्ट हो रहे हैं. मैं बताना यह चाहती हूं कि औरंगाबाद में जो दूषित पानी सप्लाय किया जा रहा है, उस तरफ कोई अधिकारी देखने के लिए तैयार नहीं है. कोई नागरिक शिकायत नहीं कर रहा है. संबंधित विभाग में शिकायत करने के लिए जब जाते हैं तो वहां उपस्थित कर्मचारी कहते हैं कि साहब नहीं है. चूंकि यह देखने की जिम्मेदारी शासकीय एजेंसी की है. इसलिए शासकीय एजेंसी को यह देखना चाहिए कि नागरिकों को दूषित जलपूर्ति न हो. लेकिन इस ओर शासकीय एजेंसी ध्यान नहीं दे रही है. इसलिए मेरा शासन से अनुरोध है कि इस समस्या की ओर जल्द से जल्द ध्यान दिया जाए.

सभापति महोदय, इन सारी समस्याओं के बावजूद हमें अपने देश को गुलिस्ताँ बनाना है. इन समस्याओं को दूर करना नामुमकिन नहीं है, यह मुमकिन है.

कहीं आसमाँ को जमीन पर उतार लाऊ
मुश्किल नहीं है कुछ भी, अगर ठान लीजिए

सभापति महोदय, इतना कहते हुए मैं अपना भाषण समाप्त करती हूं.

.......

इसके बाद श्री केळकर का भाषण

12-04-2007 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही ) I-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** : आपल्याला या प्रस्तावावरील चर्चा 11 वाजून 15 मिनिटांनी थांबवावयाची आहे आणि त्यानंतर माननीय मंत्री महोदयांच्या उत्तरासाठी 30 मिनिटांचा वेळ द्यावयाचा आहे. आता सन्माननीय सदस्य श्री.संजय केळकर बोलतील. त्यानंतर सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार बोलतील.

श्रीमती उषाताई दराडे : सभापती महोदय, या प्रस्तावावर बोलण्यासाठी मी माझे नाव कालच दिले होते.

**तालिका सभापती** : माझ्याकडे आपले नाव आलेले नाही. आता सन्माननीय सदस्य श्री.संजय केळकर यांनी दोन मिनिटामध्ये आपले मुद्दे मांडावेत.

श्री.संजय केळकर (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी दोन मिनिटामध्ये माझे मुद्दे मांडण्याचा प्रयत्न करतो. सन्माननीय सदस्य श्री.मुझफ्फर हुसेन यांनी अतिशय गंभीर आणि चांगल्या विषयावर प्रस्ताव मांडलेला आहे. सभापती महोदय, आम्हाला प्रत्येक वेळी बोलण्यासाठी वेळ कमी मिळतो. त्यामुळे आम्हाला जे मुद्दे मांडावयाचे असतात ते विस्तृतपणे मांडता येत नाहीत. भाषण न करता मी फक्त मुद्दे मांडणार आहे. सन्माननीय सदस्य श्री.मुझफ्फर हुसेन यांनी त्यांच्या भाषणामध्ये असे सांगितले की, महाराष्ट्र राज्यामध्ये एकूण 22 महानगरपालिका, 222 नगरपालिका आणि 27,946 ग्रामपंचायती आहेत. घनकच-याच्या नियोजनासंदर्भात सन्माननीय सदस्य श्री.मुझफ्फर हुसेन यांनी प्रस्ताव मांडलेला आहे. खरे म्हणजे इतर जिल्हयांपेक्षा ठाणे जिल्हयामध्ये सर्वात जास्त महानगरपालिका आहेत. मी ठाणे जिल्हयाचे प्रतिनिधीत्व करतो. ठाणे जिल्हयामध्ये 6 महानगरपालिका आहेत. ठाणे जिल्हयामध्ये 7 वी महानगरपालिका होऊ घातलेली आहे आणि 8 वी महानगरपालिका होण्याची शक्यता आहे.

(यानंतर श्री.गागरे ........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर .....

अशा प्रकारे महानगरपालिकेला अतिशय भेडसावणारा हा विषय आहे. मला सन्माननीय सदस्य श्री.मुझफ्फर हुसेन यांनी माहिती दिली आहे की, कचऱ्याच्या विल्हेवाटीचे प्रशिक्षण घेण्याकरिता 10 अधिकाऱ्यांना अमेरिकेला पाठविले, तसेच घनकचऱ्याच्या नियोजनासाठी 18 चिफ ऑफीसर ट्रेनिंगसाठी श्रीलंका येथे पाठविले. यासाठी वर्कशॉप आयोजित केले होते. कचऱ्याच्या विल्हेवाटीसाठी केंद्र शासन महाराष्ट्र सरकारला दरवर्षी 108 कोटी रुपये देत आहे. सर्व काही उपलब्ध असताना, अधिकाऱ्यांना ट्रेनिंग दिलेले असतानाही कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावली जात नाही. याबाबत सन्माननीय सदस्यांनी बाकीच्या देशात कचरा विल्हेवाटीच्या नियोजनाची उदाहरणे दिलेली आहेत. आपल्या अधिकाऱ्यांना ट्रेनिंग मिळूनसुध्दा या घनकचऱ्याच्या संदर्भातील प्रश्न वेळोवेळी उपस्थित केला जात आहे.

सभापती महोदय, मी माझ्या भाषणात याबाबत काही मुद्दे मांडणार आहे. कचरा जमा करणे, टान्सपोर्ट करुन डंपींग ग्राऊंडमध्ये आणणे, ओला-सुका कचरा वेगवेगळा करणे, अशा प्रकारे विल्हेवाट लावण्याच्या विशिष्ट पध्दती आहेत. ठाणे व कल्याण येथे डंपींग ग्राऊंड उपलब्ध नाही शासनाचे मी या बाबीकडे लक्ष वेधू इच्छितो. शासन या बाबीवर गंभीर आहे असे दाखविते परंतु तसे नसते. ठाणे शहरात डंपींग ग्राऊंडची कमतरता आहे, कचरा वाहतुक करण्यासाठी डंपींग ग्राऊंडकडे जाणाऱ्या रस्त्यास तेथील जिल्हाधिकाऱ्यांकडून परवानगी देखील मिळालेली नाही. दुसरे असे की, कचरा निर्माण झाल्यानंतर हा कचरा साठविण्यासाठी तेथे ग्राऊंडचा पर्याय राहिलेला नाही. कल्याणमध्ये डंपींग गाऊंड उपलब्ध आहे, पण तेथेही अशीच परिस्थिती आहे.

(वेळ संपल्याची घंटी वाजविण्यात येते )

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्या श्रीमती उषाताई दराडे यांनी भाषण सुरु करावे.

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, मला अत्यंत गंभीर विषयावर मुद्दे मांडावयाचे आहेत. कचऱ्याच्या प्रश्नाचीही वाईट अवस्था आहे. सभागृहाने हा विषय समजून घेतला पाहिजे व मला बोलण्यासाठी वेळ दिला पाहिजे. सभापती महोदय, सूचना आहे की, सुप्रीम कोर्टाने कचऱ्याच्या विल्हेवाटीसाठी विशिष्ट आदेश दिलेले आहेत. शासनाने यासंबंधी दंडात्मक कार्यवाही अवलंबली पाहिजे. जे अधिकारी कच-याच्या प्रश्नाबाबत योग्य पध्दतीने काम करीत नाही, त्यांच्यावर कारवाई केली पाहिजे.

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर .....

दुसरे असे की, सरकारने घनकचऱ्यासंबंधी असलेल्या कृती कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यासाठी समिती नेमून समितीने त्याद्वारे प्रभावीपणे काम करावे. ही समिती नेमणे गरजेचे आहे, असे मला वाटते. लोकशिक्षण द्यावयास पाहिजे, परंतु योग्य पध्दतीने शिक्षण दिले जात नाही. याबाबत लोकांमध्ये अवेअरनेस आणला गेला पाहिजे. या बाबीची कठोर अंमलबजावणी केली तर महाराष्ट्र व मुंबई शहरातील कचरा विल्हेवाटीचे प्रश्न सोडविण्यास मदत होईल. याबाबतच्या सूचनांची कठोर अंमलबजावणी सरकारने करावी, अशी मी विनंती करतो व माझे भाषण संपवितो.

-------

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उषाताई दराडे (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, महाराष्ट्रातील घनकचरा या विषयाबाबत सन्माननीय सदस्य श्री.मुझफ्फर हुसेन यांनी चर्चा उपस्थित केली आहे, त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करते.

सभापती महोदय, आपल्याकडे महिलांना आदिशक्ती मानले जाते. घरातील बऱ्याच बाबींचे नियोजन महिलांकडे आहे, महिला घर व आंगण स्वच्छ राखते, महिलेमुळे खऱ्या अर्थाने घर स्वच्छ असते. महिलांनी स्वच्छ घासलेल्या भांडयामध्ये आरशासारखे प्रतिबिंब दिसते. याबाबत माझी विनंती आहे की, कचरा विल्हेवाटीचे नियोजन महिलांकडे देण्यात यावे.

सन्माननीय मंत्री महोदय श्री.राजेश टोपे सभागृहात उपस्थित आहेत. मी त्यांच्या माध्यमातून गंभीरपणे शासनाला सांगू इच्छिते की, कचरा विल्हेवाटीसाठी महाराष्ट्र शासन व केंद्र शासनाच्या सूचना आहेत. कचरा गोळा करणे, सडविणे व त्यातून गांडूळखत निर्माण करणे, वीजनिर्मितीचे काम महिलांमार्फत नियोजनपूर्वक केले पाहिजे. काल-परवा निर्माल्याची आठवण केली. निर्माल्याचा प्रश्न सोडविताना महिलांना नवीन उद्योग मिळेल या दृष्टीने शासनाने नियोजन करावे. सन्माननीय सदस्य श्री.मुझफ्फर हुसेन यांनी चांगला प्रश्न उपस्थित केलेला आहे. महाराष्ट्रातील सर्व जिल्हयातील बचत गटाच्या माध्यमातून मी आपल्याला विनंती करते की, हा प्रस्ताव पुन्हा शासनासमोर आणावा.

नंतर श्री.सुंबरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती दराडे ....

की, या घनकचऱ्याचे नियोजन करण्याचे 100 टक्के काम आपण महिलांकडे द्या. निश्चितपणे महिला हे काम चांगल्या प्रकारे पार पाडतील तेव्हा महिलांच्या बचतगटाकडे हे काम आपण दिले तर माझी खात्री आहे की, यामुळे तुमचे नाव झाल्याशिवाय राहणार नाही.

दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे प्रत्येक गावामध्ये जे गाजर गवत आहे त्याचे निर्मूलन तसेच हागणदारी मुक्त गाव करणे, इतकेच नव्हे तर घरकचऱ्यापासून वीज निर्मिती इत्यादी कामे आपण महिला बचतगटांकडे सोपविली तरी महिला ही कामे चांगल्या प्रकारे करतील. तरी त्यादृष्टीने आपण नियोजन करावे. तसेच मुंबईमध्ये प्लास्टिक पिशव्यांमुळे महापूराला तोंड द्यावे लागले असल्याने यासंबंधात सन्माननीय सदस्या श्रीमती मंदाताई म्हात्रे यांनी मांडलेल्या मुद्याशी मी देखील सहमत आहे. सभापती महोदय, अहिल्याबाई होळकरांनी महाराष्ट्रात चांगले घाट निर्माण केले आहेत, त्यांनी अनेक चांगली कामे केली आहेत. त्याप्रमाणे महिलांकडे आपण ही कामे सोपविली तर महिला देखील चांगल्या प्रकारे काम करून दाखवतील याची मला खात्री आहे. तरी त्या दृष्टीने आपण धोरण आखून जाहीर करावे अशी सूचना करते आणि आपण मला दिलेल्या अडीच मिनिटांमध्ये मी भाषण संपविते आहे.

***

...... के 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.मुझफ्फर हुसेन यांना मी प्रथमत: धन्यवाद देतो की, त्यांनी अतिशय चांगल्या विषयाला येथे वाचा फोडली आहे. त्यांनी यासंबंधात अतिशय अभ्यासपूर्ण असे भाषणही केले आणि संपूर्ण महाराष्ट्राचे चित्र येथे उभे केले. या संबंधात मला व्यथा एवढीच येथे व्यक्त करावयाची आहे की, महाराष्ट्रातील सर्व शहरांचा प्रश्न आपण येथे मांडलात, परंतु महाराष्ट्राच्या ग्रामीण भागामध्ये, खेड्यापाड्यातून आज काय जीवन आहे त्याचे चित्र मात्र आपण येथे मांडलेले नाही. आज शहरांमध्ये डंपिंग ग्राऊंडस् नाहीत ही वस्तुस्थिती आहे. पण जेथे माणसांना राहण्यासाठी जागा नाही तेथे डंपिंग ग्राऊंडस्साठी जागा कोठून आणि कोण देणार ? हा प्रश्न आहेच. त्यामुळेच नवी मुंबई, ठाणे या सारख्या मोठ्या सगळ्याच शहरांमध्ये या दृष्टीने चांगली व्यवस्था होण्याची गरज आहे. तसेच शहरातील सांडपाणी वाहून जाण्याची क्षमता, विशेषकरून मुंबई, ठाण्याची क्षमता ही सगळी संपलेली आहे तेव्हा त्या दृष्टीने देखील योग्य ती व्यवस्था व्हायला पाहिजे. पण त्याकडे प्राधान्याने लक्ष देऊन व्यवस्था होत नाही त्यामुळे शहरांतील घाण वाढलेली आहे. त्याचबरोबर प्राण्यांची संख्याही माणसांच्या संख्येबरोबर वाढलेली आहे. मुंबई शहरातील गोठे-तबेले मुंबई बाहेर हटविले जावेत म्हणून 1971-72 साली मुंबई बाहेर जागा घेतली गेली परंतु मुंबईतील गोठे-तबेले हटविण्याचे काम पूर्ण केले गेले नाही. स्व. शंकरराव चव्हाण मुख्यमंत्री होते तेव्हा त्यांनी सांगितले होते की, आणीबाणीमध्ये सहा महिन्यात मुंबईतील हे गोठे-तबेले हटविले जातील. पण तरीही ते हटविले गेले नाहीत. मुंबईतील रस्त्यांची परिस्थिती देखील भयानक आहे. अगदी रस्त्यांवर देखील मोठ्या प्रमाणात झोपड्या होत आहेत, वाढत आहेत. त्यामुळे रस्त्यावरून वाहने चालविण्याची सोय राहिलेली नाही. त्यांची व्यवस्था आपण कशी करणार आहात हाही प्रश्न येथे महत्त्वाचा आहे. सभापती महोदय, मुंबइतील भटक्या कुत्र्यांचे निर्बिजीकरण करावयाचे की त्यांची हत्या करावयाची हाही मुंबईसारख्या शहरातील एक मोठा प्रश्न आहे. खरे तर मुंबईतील कुत्र्यांची संख्या वाढते याला माणसेच कारणीभूत आहेत. त्यांना खाण्याची उपलब्धता वाढते त्याप्रमाणात त्यांची संख्या वाढते या नियमानुसार पाहू गेल्यास मुंबईत मूळ शहरामध्ये पाहिल्यास कुत्र्यांची संख्या आपल्याला जास्त दिसणार नाही कारण येथे त्यांना कोणी खायला देत नाही. मात्र मुंबईच्या उपनगरामध्ये मात्र अशा कुत्र्यांना खायला देणाऱ्यांची संख्या वाढत चालली आहे परिणामी भटक्या कुत्र्यांची संख्या

....... के 3 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सरपोतदार .....

देखील वाढत चालली आहे. या शहराबद्दल ज्यांना प्रेम नाही अशा लोकांचे लोंढे येथे वाढत चालले आहेत आणि म्हणूनच त्यांच्या श्वानप्रेमामुळे शहरातील कुत्र्यांची संख्या वाढत चालली आहे. त्यावर अशा प्राण्यांना मारण्याचा उपाय केला तरी अशा माणसांचे, माणसांच्या लोकसंख्या वाढीच्या बाबतीत आपण काय करणार आहात ? हाही एक मोठा ज्वलंत प्रश्न आहे. स्वातंत्र्यानंतर मुंबईमध्ये, महाराष्ट्रात लोकसंख्या किती होती आणि आज ती किती आहे आणि त्यामध्ये कोणाची किती लोकसंख्या वाढली आहे हेही यामध्ये लक्षात घेणे आवश्यक आहे. कारण जेव्हा आपण कुटुंब नियोजन करावे असे विचार मांडले तर त्याचे पालन करण्याची जबाबदारी समाजातील सर्वच घटकांची आहे पण त्याकडे काही समाज लक्ष देत नाहीत, त्यांच्याबाबतीत आपण काय करणार आहात ? कुटुंब नियोजनाचे पालन माणसे करीत नसतील तर त्यांच्यावर कुत्र्यांप्रमाणे इलाज करायचा काय हा महत्त्वाचा प्रश्न आहे. त्यानंतर मुंबईतील प्रतिदिन वाढणारे माणसांचे लोंढे लक्षात घेऊन आपण त्याबाबत काही उपाय योजना करणे आवश्यक आहे. ....

( यानंतर श्री. सरफरे ..... एल 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार...

सन्माननीय मुख्यमंत्री सांगतात की, आम्ही येणाऱ्यांचे स्वागत करु. आपण येणाऱ्यांचे जरुर स्वागत करा. परंतु येथील घरांची साईज आपण तपासून पहा. एकेका घरामध्ये किती माणसे रहातात ते बघा. त्याप्रमाणे हा प्रश्न सोडविण्यासाठी आपण प्रयत्न करा. एवढे मुद्दे मी याठिकाणी मांडतो. आणि माननीय सदस्य श्री. मुझफ्फर हुसेन यांनी एक चांगला प्रस्ताव सभागृहामध्ये मांडला आहे त्याबद्दल त्यांना धन्यवाद देतो. आणि या प्रश्नाच्या बाबतीत शासनाने काळजीपूर्वक लक्ष द्यावे अशी विनंती करुन माझे भाषण संपवितो.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. मुझफ्फर हुसेन यांनी मांडलेल्या प्रस्तावाचे समर्थन करीत असतांना मी फक्त तीनच महत्वाचे मुद्दे याठिकाणी मांडणार आहे. मुंबईमध्ये दिवसें दिवस कचऱ्याचे प्रमाण वाढत असतांना तो टाकण्याकरिता डंम्पिग ग्राऊंडचा प्रश्न निर्माण झालेला आहे. या ठरावामध्ये एक चांगले वाक्य आहे ते असे की, "सतत पडत असणारा कचरा उचलला न गेल्याने" या वाक्याला जोडून असे म्हटले पाहिजे की, "सतत पडणारा कचरा उचलल्यानंतर तो उचललेला कचरा रस्त्यामध्ये सांडत जाणे" . आज मुंबईमध्ये कचरा गोळा करणाऱ्या गाडया एकदा कचरा उचलल्यानंतर तो पुन्हा रस्त्यावर सांडत जात असतात. याकरिता रस्त्यावरील कचरा उचलण्याची वेळ रात्रीची ठेवणे आवश्यक आहे. सकाळच्या वेळी कामावर जाणारे कर्मचारी आणि शाळेमध्ये जाणाऱ्या मुलांसमोर ही घाण पसरविली जाते. दुसरी गोष्ट अशी की, आपण कचऱ्याचे डंम्पिग स्टोअरेज करतो. त्याऐवजी आपण घंटा गाडी सुरु केली तर दिवसभरामध्ये एका ठराविक वेळी ती गाडी येईल आणि लोकांकडील कचरा घेऊन जाईल. त्यामुळे रस्त्यावर सतत पडणाऱ्या कचऱ्याचा त्रास होणार नाही. कुत्र्यांचा देखील त्रास होणार नाही. आज आपण रस्त्याच्या कोपऱ्यावर कचऱ्याचे डबे तयार केले आहेत. त्याठिकाणी व्यवस्थितरित्या कचरा टाकण्यात येत नाही, काहीजण तो दुरुन फेकतात. या गोष्टी आपण बंद केल्या पाहिजेत. आपण कचऱ्याचे व्यवस्थापन करुन गोळा होणाऱ्या कचऱ्यापासून खत तयार केले पाहिजे. अशारितीने तीन प्रकारे आपण कचऱ्याचे व्यवस्थापन केले पाहिजे. सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. मुझफ्फर हुसेन यांनी चांगला विषय मांडल्याबद्दल आणि आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपणास धन्यवाद देऊन माझे भाषण संपवितो.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. वसंत पवार (नाशिक स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. मुझफ्फर हुसेन यांनी एका चांगल्या विषयावर सभागृहामध्ये चर्चा उपस्थित केली आहे त्याबद्दल मी त्यांना सुरुवातीलाच धन्यवाद देतो. आज कोणत्याही महानगरपालिकेमध्ये घनकचऱ्यापासून गांडूळ खत प्रकल्प यशस्वी झालेला नाही. नाशिक महानगरपालिकेमध्ये सुध्दा तो अयशस्वी झाला आहे. हा प्रकल्प अयशस्वी कां? झाला याबाबत मंत्रिमहोदयांनी खास चौकशी करावी अशी माझी त्यांना विनंती आहे.

सभापती महोदय, नाशिक महानगरपालिकेच्या क्षेत्रामध्ये घंटा गाडीचा प्रकल्प अत्यंत चांगल्याप्रकारे राबविला जात आहे. त्यामुळे लोकांनाही त्याची संवय झालेली आहे. एखाद दिवशी घंटा गाडी आली नाही तर नगरेसवकांकडे तक्रारी केल्या जातात. तेव्हा घंटा गाडी प्रकल्प राबविण्यासाठी शासनाने महानगरपालिकेला सबसिडी देण्याची गरज आहे. सभापती महोदय, मिठी नदीच्या पात्रामध्ये अतिक्रमण करण्यात आल्यामुळे मागील वर्षी मुंबईकरांना महापूराचा त्रास सहन करावा लागला. यादृष्टीने मला असे सुचवावयाचे आहे की, महाराष्ट्रामध्ये असलेल्या नद्यांचे पावित्र्य चांगल्याप्रकारे ठेवणे आवश्यक आहे. त्या नद्यांचे पात्र स्वच्छ ठेवून त्यामधून गावोगावी जल वहातूक सुरु करता येऊ शकेल. त्यादृष्टीने आपल्याला नद्यांचा जास्तीत जास्त उपयोग होईल. सभापती महोदय, मी डॉक्टर असल्यामुळे बायो मेडिकल वेस्टचा प्रश्न अत्यंत महत्वाचा वाटतो. यामधून जास्तीत जास्त रोगराई पसरण्याचा धोका असतो. सर्व महानगरपालिकांमध्ये बायो मेडिकल इन्सिमिनेटरची व्यवस्था उभी करण्याकरिता शासनाने जास्तीत जास्त दक्षता घेतली पाहिजे. त्याचप्रमाणे महानगरपालिकेने सुध्दा स्वत:च्या मालकीचे इन्सिमिनेटर उभे करण्याची आवश्यकता आहे. आज बायो मेडिकल वेस्टमध्ये इंजक्शन, नीडल्स, सिरिंज, प्लास्टर, ड्रेसिंग व काढलेले अवयव इत्यादी कचऱ्याकरिता प्रत्येक बेडमागे डॉक्टर्सकडून किलोच्या प्रमाणामध्ये चार्जेस घेतले जातात. याऐवजी सर्व महानगरपालिकांनी त्यांची जबाबदारी ओळखून माफक दरामध्ये हे बायो मेडिकल वेस्ट गोळा करुन ते नष्ट करावेत. त्यासंबंधी योग्य प्रकारचे नियोजन करावे. त्याकरिता शासनाने सर्व महानगरपालिकांना आदेश देण्यात यावेत. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. मुझफ्फर हुसेन यांनी सभागृहामध्ये मांडलेला प्रस्ताव अतिशय महत्वाचा आहे. यामध्ये दोन महत्वाच्या गोष्टी आहेत. एक म्हणजे सॉलिड वेस्ट, बायो मेडिकल वेस्टची फारशी समस्या नाही. शहरामध्ये सर्वत्र कचरा पसरलेला असतो त्याचे ॲक्युम्यूलेशन करणे. ॲक्युम्यूलेशन केल्यानंतर सर्व प्रकारचा कचरा एकत्र असल्यामुळे त्याचे सेग्रिगेशन करणे या दोन गोष्टी महत्वाच्या आहेत. त्यादृष्टीने सरकारने धोरण आखण्याची गरज आहे. सभापती महोदय, शहरामध्ये मुख्य अडचण डंम्पिंग ग्राऊंडची आहे.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ SBT/ MHM/ MHM/ पूर्वी श्री.सरफरे... 11:30

श्री.विनोद तावडे (पुढे सुरू........

मुंबईमध्ये डम्पींग ग्राऊंडची सोय करणे शक्य होणार नाही. कचरा गोळा करून त्यावर डिसेंट्रलाईज लेवललाच प्रक्रिया केली तर कायमस्वरूपात मार्ग निघू शकेल. पाश्चात्य देशामध्ये आपल्यापेक्षा जास्त कचरा साठतो परंतु त्या कचऱ्याची डिसेंट्रलाईज पध्दतीने विल्हेवाट लावली जाते, त्यांच्याकडे डम्पींग ग्राऊंड नाहीत. अशाप्रकारची आपल्याकडे प्रक्रिया करणारी केंद्रे उभी केली तर ते सोईचे होईल. मुंबईमध्ये चार-पाच एन्ट्री पॉईन्ट आहेत, त्या ठिकाणी अशापध्दतीने प्रक्रिया केंद्रे उभी केली तर एकाच ठिकाणी गर्दी होणार नाही. सेग्रीगेशनच्या मुद्याच्या संबंधाने कडक कायदा केला पाहिजे. सोसायटयातील रहिवाशांनी काही केले नाही तर महानगरपालिकेला ते करावे लागेल. विशेषत: झोपडपट्टयांमध्ये सुका कचरा वेगळा आणि ओला कचरा वेगळा करण्याचा प्रयोग यशस्वी झालेला आहे. सोसायटयांमध्ये त्याची अंमलबजावणी सुरू केली पाहिजे. मला वाटत, वेस्ट मॅनेजमेंट सहकारी संस्था स्थानिक स्तरावर निर्माण केल्या तर कचऱ्यापासून जे उत्पन्न मिळते ते सहकारी संस्थांना शेअर करता येईल. यामध्ये झोपडपट्यांमधील, सोसायट्टयांमधील, गावांमधील लोक सहभागी होऊ शकतील. वेस्ट मॅनेजमेंटसाठी एक मोठी मॅनपावर तयार होऊ शकते. रॅक पिकर्सच्या माध्यमातून मुले कचरा उचलण्याचे काम करतात. आपल्याकडे बाल मजुरांचा कायदा आहे पण तरीसुध्दा ही मुले काम करतात. दुर्दैवाने मुलांना काम करावे लागते. त्यांना एनजीओच्या माध्यमातून प्रशिक्षण देणे शक्य आहे. त्यांच्या आरोग्याची काळजी घेणे महत्वाचे आहे. आज हजारोंच्या संख्येरने रॅक पिकर्स आहेत त्यांना काही प्रशिक्षण देता आले तर ते द्यावे. काही विषयामध्ये सरकार म्हणून काम करता येणार नाही. परंतु एनजीओच्या मार्फत अशी व्यवस्था करता आली तर ती करावी. त्याचबरोबर याला सपोर्ट म्हणून वेस्ट मॅनेजमेंट सहकारी संस्था उभ्या करता आल्या तर ते सोईचे होईल. अशी मॅनपावर उपलब्ध करण्याबाबत प्रयत्न केला पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री.सरपोतदार यांनी कुत्र्यांच्या संबंधाने उल्लेख केला की, एका लहान बालकाला कुत्र्यांनी खेचून आणले. या संदर्भाने ठोस अशी योजना सरकारने घोषित केली पाहिजे. एवढे बोलून माझे दोन शब्द संपवितो.

---

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय,मला दोन मिनिटे बोलू द्यावे.

**तालिका सभापती** (श्री.भास्कर जाधव) : सन्मानीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी आपले मुद्दे मंत्री महोदयांना लिहून द्यावेत. मंत्री महोदय, आपल्या भाषणामध्ये त्याचा उल्लेख करतील.

12-04-2007 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) M-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ SBT/ MHM/ MHM/

श्री.राजेश टोपे (नगरविकास राज्यमंत्री) : सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांचे मुद्दे मला माहिती आहेत.

सभापती महोदय, काल अत्यंत महत्वाच्या विषयावर सभागृहामध्ये नियम 260 अन्वये माननीय सदस्य श्री.मुझफ्फर हुसेन यांनी चर्चा उपस्थित केली. या चर्चेमध्ये सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते, श्रीमती सुधा जोशी, श्रीमती मंदा म्हात्रे, श्री.मधुकर चव्हाण,श्री.जयंत प्र. पाटील, प्रा. फौजिया खान, श्री.संजय केळकर, श्रीमती उषाताई दराडे, श्री.मधुकर सरपोतदार, श्री.अरविंद सावंत, डॉ.वसंत पवार, श्री.विनोद तावडे, डॉ.दीपक सावंत यांनी भाग घेऊन शसनाला देखील अत्यंत महत्वाच्या आणि उग्र होत असलेल्या या प्रश्नावर मार्गदर्शन करणारे मुद्दे उपस्थित केलेले आहेत, त्याबद्दल मी त्यांचा मनापासून आभारी आहे.

यानंतर श्री.बरवड...

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे ....

सभापती महोदय, सभागृहाचे नियमित कामकाज सुरु होण्यास 25 मिनिटे उरलेली आहेत. मी सुरुवातीलाच विनंती करतो की, या ठिकाणी अनेक सन्माननीय सदस्यांनी आपली भाष्ये केलेली असल्यामुळे माझीही सगळ्या मुद्यांच्या बाबतीत सविस्तर उत्तर देण्याची मनापासून इच्छा आहे. सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या प्रत्येक प्रश्नाचे उत्तर माझ्या भाषणातून मिळावे अशी माझ ी स्वत:ची इच्छा आहे. जर सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेले सगळे मुद्दे माझ्या भाषणामध्ये येऊ शकले नाहीत तर प्रश्नोत्तराच्या स्वरुपामध्ये चर्चा करण्यासाठी पाच दहा मिनिटे संधी द्यावी अशी मी विनंती करतो. यादृष्टीकोनातून कोणाच्याही मनामध्ये संभ्रम राहू नये किंवा एखादा प्रश्न अनुत्तरित राहिला असे होऊ नये यादृष्टीने माझी तशी इच्छा आहे. मी सुरुवातीला कायद्याच्या संदर्भात दोन मिनिटे सांगू इच्छितो. अनेक सन्माननीय सदस्यांनी मुद्दे रिपिट केलेले आहेत त्यामुळे सगळ्या मुद्यांच्या बाबतीत एकत्रित उत्तर देऊ इच्छितो. केंद्र सरकारकडून नागरी घनकचरा व्यवस्थापन आणि हाताळणी नियम, 2000 करण्यात आलेला आहे. या कायद्यातील सगळ्यात महत्वाची गोष्ट म्हणजे जुन्या काळामध्ये कचराकुंड्यांच्या माध्यमातून कचरा साठवण्याची व्यवस्था व्हावयाची आणि त्या कचराकुंड्या रिकाम्या करुन महापालिका तो कचरा घेऊन जात होती त्यामध्ये बदल करण्यात आलेला आहे. ज्या ठिकाणी कचरा निर्माण होतो किंवा ज्या ठिकाणी स्त्रोत आहे त्या ठिकाणाहून थेट कचरा उचलावा असा महत्वाचा नियम केंद्र सरकारने केलेल्या नवीन नियमामध्ये केलेला आहे. यामध्ये कचऱ्याचे वर्गीकरण केले पाहिजे असे बंधन घातलेले आहे. ओला कचरा आणि वाळलेला किंवा सुका कचरा असे वर्गीकरण प्रत्येक सोसायटीमध्ये तसेच "क" वर्ग नगरपालिकेमध्ये, "ब" वर्ग नगरपालिकेमध्ये व्हावयास पाहिजे असे बंधन घातलेले आहे. हे वर्गीकरण घरामध्ये, हॉटेलमध्ये व्हावे किंवा ज्या ठिकाणी कचऱ्याचा स्त्रोत आहे त्या ठिकाणी व्हावे आणि त्याची साठवणूक वेगवेगळ्या पध्दतीने व्हावी असे बंधन घातलेले आहे. सन 2000 पासून केंद्र शासनाने हा नियम केलेला आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांकडून असे उत्तर नको. अंमलबजावणी न करणाऱ्यांवर काय कारवाई केली हे मंत्रिमहोदयांनी सांगावे. सन्माननीय सदस्य श्री. मुझफ्फर हुसेन यांना हा प्रस्ताव का आणावा लागला याबाबत मंत्रिमहोदयांनी सांगावे.

...2..

RDB/ MHM/ SBT

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, शासनाने कोणता कायदा केलेला आहे हे मी सांगत आहे. शासनाने काय केलेले आहे हेही सांगणार आहे. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेबांनी सविस्तर उत्तर ऐकून घेतले तर उत्तर देण्याच्या दृष्टीकोनातून ते योग्य होईल. सभापती महोदय, कचऱ्याचे वर्गीकरण करणे, त्याची साठवणूक करणे त्याचबरोबर संकलन करणे, बंद गाडीमध्ये त्याची वाहतूक करणे आणि बंद गाडीमधून घेऊन गेलेल्या कचऱ्यावर शास्त्रीय पध्दतीने प्रक्रिया करणे या आवश्यक बाबी आहेत. यामध्ये प्रक्रिया करण्याच्या दोन पध्दती आहेत. त्याबाबत सभागृहाच्या सर्व सन्माननीय सदस्यांनी माहिती घेण्याची आवश्यकता आहे. एक म्हणजे कंपोस्टींग करणे. ज्याला आपण डिग्रेडेबल वेस्ट म्हणतो, ज्या कचऱ्याचे डिग्रेडेशन होऊ शकत नाही अशा पध्दतीचे जे वेस्ट असते त्याचे डिग्रेडेशन दोन पध्दतीने करता येते. एक म्हणजे गांडूळ खताच्या माध्यमातून डिग्रेडेशन करता येते आणि दुसरे म्हणजे केमिकल पध्दतीने कल्चर टाकून डिग्रेडेशन करणे शक्य आहे. जे नॉन डिग्रेडेबल वेस्ट आहे ते लँड फिल साईटमध्ये टाकणे बंधनकारक केलेले आहे. मला सभागृहाला सांगावेसे वाटते की, डिसेंट्रलाईज पध्दत अवलंबिण्याच्या दृष्टीकोनातून बंधन घालण्यात आलेले आहे. ज्या ठिकाणी सोसायट्या असतील, हॉटेल्स असतील त्या ठिकाणी सुध्दा गांडूळ खत प्रकल्प व्हावा अशी खात्याची आणि स्थानिक स्वराज्य संस्थांची भूमिका आहे. त्याला सुध्दा प्रोत्साहन देण्याचे काम महापालिका आणि नगरपालिकेच्या वतीने केले जात आहे.

यानंतर श्री. शिगम ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मुझफ्फर हुसेन : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांना उत्तर देण्यासाठी वेळ कमी आहे. प्रस्तावावरील चर्चा पाहता माननीय मंत्री महोदयांचे उत्तर हे वेगळया दिशेने चालले आहे. मी चर्चेच्या सुरुवातीलाच अशी विनंती केली होती की, या प्रस्तावावरील चर्चेला मानीय मंत्री महोदयांनी प्रोसिजरल उत्तर देऊ नये.

**तालिका सभापती** : उत्तरासाठी माननीय मंत्री महोदयांना पुरेसा वेळ दिला जाईल.

श्री. राजेश टोपे : सन्माननीय सदस्य श्री. मुझफ्फर हुसेन यांनी या विषयाच्या संदर्भात आणि कायद्यातील तरतुदींच्या संदर्भात अभ्यास केलेला आहे. परंतु सर्वच सन्माननीय सदस्यांना कायद्यातील तरतुदी माहीत असतीलच असे नाही. म्हणून कायद्यातील तरतुदीसंबंधी देखील माहिती या सभागृहाला देणे जरुरीचे आहे असे मला वाटते. सन्माननीय सदस्यांना केवळ "Yes" आणि "No" एवढेच उत्तर अपेक्षित असेल तर त्यालाही माझी काही हरकत नाही. सन्माननीय सदस्य श्री. मुझफ्फर हुसेन यांनी या विषयाचा सखोल अभ्यास केलेला असल्यामुळे मी त्यांचे जरुर अभिनंदन करतो.

श्री. दिवाकर रावते : डिग्रेडेशन म्हणजे काय, हे देखील आम्हाला समजले पाहिजे.

**तालिका सभापती** : सन्माननीय मंत्री महोदयांनी आपले भाषण सुरु ठेवावे.

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, या घनकच-या पासून वीज निर्मिती करावी अशा सूचना सन्माननीय सदस्यांची केल्या. ही गोष्ट प्रक्रियेच्या माध्यमातून शक्य होऊ शकते. ही प्रक्रिया कशा पध्दतीने केली जाते हे मी सांगण्याचा प्रयत्न केलेला आहे. घनकचरा व्यवस्थापनाच्या संदर्भात केन्द्र शासनाचे जेवढे म्हणून नियम आहेत त्या नियमांच्या अनुषंगाने आपण ॲक्शन प्लॅन केलेला आहे. या गंभीर समस्येला तोंड देत असताना राज्य शासनाने काय केले हेही मला या निमित्ताने सांगणे महत्वाचे वाटते. केन्द्राच्या नियमांचे ॲक्शन प्लॅनमध्ये रुपांतर करण्याचे काम राज्य शासनाने केलेले आहे. ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ लोकलसेल्फ गव्हर्नमेंटसाठी राज्य शासनाने आय.ए.एस. अधिका-यांची नेमणूक केलेली आहे. अनेक सन्मानीय सदस्यांनी अधिकारी आणि कर्मचारी यांना प्रशिक्षण देण्याची आवश्यकता असल्याचे सांगितले. सन्माननीय सदस्य श्रीमती फौजीया खान यांनी लोकांची मेण्टॅलिटी बदलण्याची आवश्यकता आहे असे सांगितले. या सर्व

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ SBT/ MHM/ (पूर्वी श्री. बरवड) 11:40

(श्री. राजेश टोपे ...)

गोष्टी महत्वाच्या असून त्यानुषंगाने अंमलबजावणी होणे आवश्यक असल्याचे सन्मासानीय सदस्यांनी सांगितले. प्रशिक्षणाच्या संदर्भात सांगावयाचे झाले तर नगरापालिका आणि महानगरपालिकांना या विषयाचे प्रशिक्षण देण्याचे काम राज्य शासनाच्यावतीने शंभर टक्के झालेले आहे. दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे या सर्व गोष्टींसाठी पुरेसा निधी उपलब्ध करुन देण्याचे काम देखील राज्य शासनाने केलेले आहे. 12व्या वित्त आयोगाच्या माध्यमातून केन्द्र आणि राज्य शासनाच्या वतीने नगरपालिकांना लोकसंख्येच्या प्रमाणात जो निधी वितरित केला जातो त्या निधीतील 56.50 टक्के निधी घनकच-याच्या व्यवस्थापनावर खर्च केला जावा अशा पध्दतीने फायनान्शियल सपोर्ट देखील राज्य शासनाच्या वतीने देण्यात आलेला आहे. डम्पिंग ग्राऊंड खरेदी करण्यासाठी आर्थिक तरतूद करावी अशी सूचना सन्माननीय सदस्यांनी केली. डम्पिंग ग्राऊंडसाठी नगरपालिकांना जमिनी हंस्तांतरित करण्याचे, प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार एका सर्क्युलर द्वारे जिल्हाधिका-यांना दिलेले आहेत. छोट्या नगरपालिकांना डम्पिंग ग्राऊंड उपलब्ध हाव्हे ही त्या मागची भूमिका आहे. तालिका सभापती महोदय, आपल्या चिपळूण नगरपालिकेचे उदाहरण आहे. नगरपालिकांना शासकीय जमीन उपलब्ध होत नाही .....

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ MHM/ SBT/ 11:45

श्री.राजेश टोपे.........

तेथे जमीन खरेदी करण्यासाठी सुध्दा युडी-6 किंवा 12 व्या वित्त आयोगाच्या माध्यमातून निधी दिला जातो. सभापती महोदय, चिपळूण नगरपालिकेने त्या माध्यमातून जमीन खरेदी केली आहे. युडी-6 हा एक निधीचा स्त्रोत आहे. ही राज्यस्तरीय योजना असून त्यानुसार डीपीडीसीचा प्लॅन असतो त्यामध्ये नगरपालिकांची आरक्षणे विकसित करण्यासाठी पैशाची तरतूद केलेली असते. या स्त्रोताचा उपयोग या कामासाठी करता येऊ शकतो.

सभापती महोदय, या चर्चेच्या माध्यमातून मी राज्यातील जनतेसाठी आणि सभागृहाच्या माहितीसाठी महत्वाचे निर्णय सांगू इच्छितो. ही वस्तुस्थिती आहे की, एखादी गोष्ट करावयाची असेल तर त्यासाठी निधीची उपलब्धता करुन देणे ही सगळ्यात महत्वाची बाब आहे. केंद्र शासनाकडून 12 व्या वित्त आयोगाच्या माध्यमातून पैसा मिळतो. युडी-6 ही राज्यस्तरीय योजना असून हाच एकमेव स्त्रोत असेल आणि त्या माध्यमातून निधी कमी पडत असेल तर शासन निश्चितपणे याविषयी गंभीर आहे. कोणत्याही परिस्थितीत राज्य शासनाकडून येत्या पावसाळी अधिवेशनामध्ये या कामासाठी वेगळे अकाऊंट हेड तयार करण्यात येईल व राज्य शासनाच्या वतीने यासाठी भरीव तरतूद केली जाईल. जेणेकरुन ज्या भागात डम्पिंग ग्राऊंड नाही, सायंटिफिक पध्दतीने विकसित केलेले नाही, घंटागाडी उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता आहे आणि या संदर्भातील नियमावलीचे पालन करण्यासाठी जे जे करणे आवश्यक आहे ते करण्यासाठी लागणारा निधी 12 व्या वित्त आयोगाच्या माध्यमातून 56.50 टक्के एवढा स्त्रोत उपलब्ध असला तरी युडी-6 ही राज्यस्तरीय वेगळी योजना आहे, त्यात विशेष बाब म्हणून येत्या पावसाळी अधिवेशनात वेगळे अकाऊंट हेड निर्माण करुन दिले जाईल. जेणेकरुन निधीची कमतरता पडणार नाही ही खबरदारी राज्य शासनाच्या वतीने घेण्यात येईल. निधीच्या संदर्भात आणि प्रशिक्षणाच्या संदर्भात मी सांगितले आहे. जिल्हाधिकाऱ्यांना घनकचरा प्रकल्प राबविण्याच्या दृष्टीकोनातून सर्व पध्दतीचे अधिकार दिले आहेत. जेणेकरुन लालफितीमध्ये हे प्रकल्प अडणार नाहीत. अधिकाराचे विकेंद्रीकरण करुन खालच्या पातळीवर अधिकार दिले जावेत यादृष्टीने राज्य शासनाने निर्णय घेतला आहे. धोरणात्मक जे निर्णय घेतले आहेत ते मी सांगू इच्छितो. महानगरपालिकांच्या संदर्भात बोलत असताना मुंबई महानगरपालिकेच्या संदर्भात काही महत्वाच्या बाबी सन्माननीय सदस्य श्री.मुझफ्फर हुसेन आणि मुंबईतील सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केल्या, त्याबद्दल याठिकाणी शासनाच्या

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ MHM/ SBT/ 11:45

श्री.राजेश टोपे.........

वतीने मी सांगू इच्छितो की, मुंबईच्या उपनगरामध्ये गोराई, मुलुंड व देवनार या तीन ठिकाणी डम्पिंग ग्राऊंड अस्तित्वात आहेत. या तीनही डम्पिंग ग्राऊंडच्या माध्यमातून कचऱ्याची विल्हेवाट लावली जाते. गोराई येथील डम्पिंग ग्राऊंडच्या संदर्भात सांगण्यात आले की, हायकोर्टाने निर्णय दिला असून 31 डिसेंबर, 2007 पासून हे डम्पिंग ग्राऊंड बंद करावयाचे आहे. या डम्पिंग ग्राऊंडचे आयुष्य संपले आहे. ते शास्त्रीय पध्दतीने बंद करावयाचे आहे. 31 डिसेंबर, 2007 पासून ते बंद करुन त्याठिकाणी सुशोभिकरण करण्याचे काम केले जाईल. मुलुंड व देवनार या परिसरात नागरी वस्ती असून मोठ्या प्रमाणात दुर्गंधी पसरते असा अनेक सन्माननीय सदस्यांनी उल्लेख केला. सभापती महोदय, जवळजवळ 850 कोटी रुपये मुंबई महानगरपालिकेला घनकचरा व्यवस्थापनावर खर्च करावे लागतात. त्यामध्ये प्रामुख्याने मुलुंड व देवनार येथे वृक्ष लागवड करणे, डिओडरन्टची फवारणी करणे, अंतर्गत रस्ते, धूळ उडू नये म्हणून पाणी फवारणे, मिथेन वायू पसरतो त्यासाठी पाईप निर्माण करण्याचे काम केले जाते. एअर क्वॉलिटीचे वेळोवेळी मॉनिटरिंग करण्याचे काम महाराष्ट्र शासन आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या वतीने केले जाईल. कांजूरमार्ग येथे नवीन डम्पिंग ग्राऊंड निर्माण करुन घेत आहोत. ज्याकरिता केंद्र शासन व राज्य शासनाच्या वतीने 141 हेक्टर जमीन लॅण्डफिल आणि कंपोस्टिंगकरिता घेण्यात आली आहे. मला हेही सांगितले पाहिजे की, आय.एल.ॲण्ड एफ.एस.या संस्थेची सल्लागार म्हणून नेमणूक केली आहे. कोणता कचरा उत्पन्न होतो, त्यावर कोणती प्रक्रिया करणे आवश्यक आहे, तंत्रज्ञान कोणते आवश्यक आहे.............

(नंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

12-04-2007 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही ) Q-1

SGJ/ SBT/ MHM/ प्रथम श्री. भोगले... 11:50

श्री. राजेश टोपे...

यासंदर्भात सर्व टेंडर कन्लटंटच्या माध्यमातून करण्यात आलेले आहेत. देवनार येथे 2000 मे.टन.कच-यापासून, कांजूरमार्ग येथे 4000 मे.टन कच-यापासून खत बनविण्याचा प्रकल्प मुंबई महानगरपालिकेच्या वतीने करण्यात येणार आहे. या ठिकाणी अनेक सन्माननीय सदस्यांनी कच-या पासून वीज निर्मिती करावी यासंदर्भात विचार व्यक्त केलेले आहेत. ज्या ठिकाणी 500 मे.टन पेक्षा जास्त कचरा निर्माण होतो अशा ठिकाणी वीज प्रकल्प केला तर ते व्हायबल होऊ शकते. ज्या ठिकाणी 500 मे.टन पेक्षा कमी कचरा निर्माण होतो त्या ठिकाणी कच-यापासून वीज निर्माण करण्याचा प्रकल्प निर्माण होऊ शकत नाही. मुलुंडमध्ये मोठया प्रमाणात कचरा निर्माण होतो त्यामुळे या ठिकाणी कच-या पासून वीज निर्मिती करण्याच्या संदर्भात कन्लोडेटच्या करण्याचा मनोदय आहे. कच-यावर प्रक्रिया करण्याच्या संदर्भात काही नवीन पध्दती आहेत त्या नवीन पध्दती अमलात आणल्या जाणार आहेत. पुणे, मुंबई, पिंपरी-चिंचवड, ठाणे या ठिकाणी जागेला फार महत्व आहे. या ठिकाणी कच-यावर प्रक्रिया कशी करुन घ्यावयाची यासंदर्भात जे नवीन तंत्रज्ञान आहे ते नवीन तंत्रज्ञान त्या त्या महानगरपालिकेने वापरणे आवश्यक आहे. यामध्ये जे नवीन तंत्रज्ञान आहे ते नवीन तंत्रज्ञान महापालिकांना उपलब्ध करुन देण्यात येईल.

सभापती महोदय, या ठिकाणी अनेक सन्माननीय सदस्यांनी सांगितले आहे की, कचरा निर्माण करणारा हा खरा गुन्हेगार आहे. मुंबई महानरपालिकेने क्लिनअप लिटरेचरची नियमावली तयार केलेली आहे. कचरा टाकणा-यावर किती फाईन होऊ शकते यासंदर्भातील माहिती त्यामध्ये दिलेली आहे. या सगळया गोष्टींचा प्रचार आणि प्रसार चांगल्या सेलिब्रेटीजच्या माध्यमातून केला जात आहे. कच-यापासून काय दुष्परिणाम होतात यासंदर्भातील माहिती देण्याचे काम महानगरपालिका करीत असते. कचरा निर्माण करणारे जे उपद्रवी लोक आहेत त्यांच्यावर कशा प्रकारे दंडात्मक कारवाई करावी यासंदर्भात नियम तयार करण्यात आलेले आहेत. यासंदर्भात महानगरपालिका कशा प्रकारे काळजी घेत आहे याची माहिती मी सांगितलेली आहे. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी शौचालयाचा मुद्दा उपस्थित केलेला आहे. मोठया प्रमाणात लोक शौचालयास उघडयावर जात असतात. मुंबईमध्ये राहणा-या लोकांची संख्या 68 लक्ष आहे. शौचालयाच्या संदर्भात 1.38 लक्ष शौचालय भांडे उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत.

....2

श्री. राजेश टोपे...

यासंदर्भात अजूनही पुरेसे काम होणे बाकी आहे. यासंदर्भात अजूनही 61 हजार अतिरिक्त शौचालय भांडे उपलब्ध करुन देणे बाकी आहे. बाकी राहिलेले अतिरिक्त सीट जागतिक बँकेच्या सहाय्याने उपलब्ध करुन दिले जाणार आहेत. मुंबई ही हगणदारी मुक्त करण्याचा राज्य शासनाचा प्रयत्न चालला आहे. झोपडपट्टीत मोठया प्रमाणात घनकचरा निर्माण होत असतो.

**तालिका सभापती** : सन्माननीय मंत्रीमहोदयांना उत्तराचे भाषण पूर्ण करण्यास अजून किमान 15 ते 20 मिनिटे लागणार आहेत. आता 11वाजून 50 मिनिटे झालेली आहेत. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 12.00 वाजता सुरु होणार आहे. त्यामुळे मला वाटते आपण ही चर्चा येथेच थांबवू या. दुपारी 12.00 वाजता रेग्युलर कामकाजाला सुरुवात करावी असे माननीय सभापती महोदयांनी आदेश दिलेले असल्यामुळे मंत्री महोदयांचे उर्वरीत उत्तर नंतर होईल.

श्री. राजेश टोपे :सभापती महोदय, रिप्लाय देण्यासाठी मला अजून 20 मिनिटे तरी वेळ लागेल. आताच थोडासा वेळ वाढून मी माझे रिप्लायचे भाषण पूर्ण करुन घेतो.

**तालिका सभापती** : आपण म्हणता त्या प्रमाणे मी प्रयत्न केला होता.

श्री. राजेश टोपे : अनेक सन्माननीय सदस्यांनी या महत्वाच्या प्रश्नाच्या संदर्भात विचार मांडलेले असल्यामुळे सर्व मुद्यांना उत्तरे देणे आवश्यक आहे.

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** ( श्री.भास्कर जाधव ) : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, माननीय मंत्रिमहोदयांचे उत्तर अजून पूर्ण झालेले नाही. परंतु आपल्या सभागृहाची नियमित बैठक दुपारी 12.00 वाजता सुरु होणार आहे. म्हणून मी माननीय मंत्रिमहोदयांचे भाषण येथेच थांबवित आहे.

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, माझी आपणास विनंती आहे की, आपण सभागृहाची मान्यता घेऊन प्रश्नोत्तराचा तास 15-20 मिनिटे पुढे ढकलावा.

**तालिका सभापती** : माझा सुध्दा तोच प्रयत्न आहे, परंतु माननीय सभापतींच्या निदेश पाळणे माझे कर्तव्य आहे.

मी आता सभागृहाची बैठक स्थगित करीत आहे. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 12.00 वाजता सुरु होईल.

( सभागृहाची बैठक सकाळी 11.55 ते दुपारी 12.00 पर्यंत स्थगित झाली )

यानंतर श्री.पुरी........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**स्थगितीनंतर**

**( सभापतीस्थानी माननीय सभापती )**

**बाभळी बंधाऱ्याच्या कामांसंदर्भात आंध्रप्रदेशच्या माननीय मुख्यमंत्र्यांनी महाराष्ट्राला उद्देशून अर्वाच्च भाषेत केलेली शिवीगाळ.**

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, बाभळी धरणाच्या कामांसंदर्भात आंध्रप्रदेशच्या माननीय मुख्यमंत्र्यांनी महाराष्ट्राला व महाराष्ट्राच्या माननीय मुख्यमंत्र्यांना उद्देशून अर्वाच्छ भाषेत शिवीगाळ केलेली आहे, त्यासंर्भात शासन आज निवेदन करणार होते, त्याचे काय झाले ? यासंदर्भात आम्ही काल बर्हिगमणही केले होते. सदरचे निवेदन शासनाच्या वतीने केव्हा केले जाणार आहे ? याबाबत माननीय सभापती महोदयांनी आम्हाला संरक्षण द्यावे.

**सभापती** : काल याठिकाणी सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी महाराष्ट्राच्या स्वाभिमानाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा मुद्दा उपस्थित केला होता. आंध्रप्रदेशच्या मुख्यमंत्र्यांनी महाराष्ट्राच्या अनुषंगाने व महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांच्या बाबतीत ज्या पध्दतीने वक्तव्ये केले याबाबतचा निषेध व धिक्कार करण्याच्या बाबतीत दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी माझ्यासमोर विचार मांडले. दरम्यानच्या काळात याबाबत शासनाचे काय म्हणणे आहे यासाठी सदनाचे कामकाज तहकूब करावे लागले. त्यानंतर असे ठरले की, यासंदर्भातील संपूर्ण माहिती शासनाने उपलब्ध करुन घ्यावी व अशापध्दतीचे वक्तव्ये जर आंध्रप्रदेशच्या मुख्यमंत्र्यांनी केले असेल तर शासनच याबाबतीत पुढाकार घेऊन शासनातर्फे ठराव मांडेल, अशी काल चर्चा झाली होती. त्यानंतर याबाबतची माहिती सदनाला अजून समजू शकलेली नाही. याठिकाणी माननीय मंत्री महोदय, श्री.अजित पवार, डॉ.पतंगराव कदम व श्री.हर्षवर्धन पाटील उपस्थित आहेत. महाराष्ट्राच्या स्वाभिमानाच्या दृष्टीने, मुख्यमंत्र्यांच्या प्रतिष्ठेच्या अनुषंगाने व या सार्वभौम सभागृहाच्या प्रतिष्ठेच्या दृष्टीने यासंदर्भातील माहिती उपलब्ध झाल्यानंतर ती सभागृहाला अवगत करण्यात येईल, असे सांगण्यात आले होते, ती माहिती उपलब्ध झाली का ?

..2.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार : आजचे सभागृहाचे कामकाज संपण्याच्या आधी या संदर्भातील वस्तुस्थितीचे निवेदन सभागृहात करण्यात येईल. काल माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले आहे की, खरोखरच वक्तव्ये केले आहे किंवा नाही याबाबत तपासून पाहण्यात येईल व जर खरोखरच असे वक्तव्ये केले असेल तर शासनाच्या वतीनेच अशाप्रकारचा प्रस्ताव सभागृहात मांडण्यात येईल. त्यामुळे यासंदर्भातील माहिती आपण मागविली असून यासंदर्भात आजचे सभागृहाचे कामकाज संपण्याच्या आत सभागृहाला वस्तुस्थिती कळविली जाईल.

**सभापती** : यासंदर्भातील वस्तुस्थिती आजच्या आज लवकरात लवकर सभागृहाला कळवावी.

श्री.अजित पवार : सभापती महोदय, होय.

------

..3.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: तोंडी उत्तरे.

**संपूर्ण ग्रामीण रोजगार योजनेतील कामांवर चणेरा ग्रामपंचायत (ता. रोहा जि. रायगड) मध्ये झालेल्या भ्रष्टाचाराबाबत**

**(१) * २४४३० श्री. जयंत पाटील , प्रा. शरद पाटील :** सन्माननीय **रोजगार हमी योजनामंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संपूर्ण ग्रामीण रोजगार योजनेतील कामावर १ मृत व्यक्ती व जिल्हा परिषदेचे शिक्षक असल्याचे दाखवून गैरव्यवहार करुन रोहा तालुक्यातील चणेरा ग्रामपंचायतीचे तत्कालीन ग्रामसेवक, सरपंच यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करण्याचे आदेश मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रायगड यांनी गट विकास अधिकारी, पंचायत समिती, रोहा यांना दिले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणाची नेमकी वस्तुस्थिती काय आहे,

(३) याबाबत उक्त आदेशानुसार कोणती कारवाई करण्यात आली आहे अथवा येत आहे ?

**श्री.बाळासाहेब थोरात श्री.हर्षवर्धन पाटील यांच्याकरिता :** (१) होय,

(२) व (३) संबंधित ग्रामसेवक व सरपंच यांनी खोटे हजेरीपत्रक तयार केल्याने त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करण्याची परवानगी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रायगड यांनी गट विकास अधिकारी, पंचायत समिती, रोहा यांना दिली होती. तथापि, या प्रकरणी ग्रामस्थांनी यापूर्वीच फौजदारी गुन्हा दाखल केलेला असल्यामुळे, एकाच कारणासाठी दुसरा गुन्हा दाखल करता येणार नाही, असा अभिप्राय कायदेशीर सल्लागार यांनी दिलेला आहे. दरम्यान, संबंधित ग्रामसेवकाची एक वेतनवाढ रोखण्याची कार्यवाही करण्यात आलेली आहे.

श्री.जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, लेखी उत्तराने माझे समाधान झाले आहे.

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, याप्रकरणी भ्रष्टाचार झाला असून त्याबाबतीत माननीय मंत्री महोदयांनी कोणती कारवाई केली ? श्री.गोविंद रामजी ओळंबे, राहणार बिटवाडी, ता.रोहा यांना रोजगार हमी योजनेच्या कोणत्या कामावर मजूर म्हणून दाखविण्यात आले आहे ? तसेच, याप्रकरणी आपण ग्रामसेवक आणि सरपंचावर कोणत्या स्वरुपाची कारवाई केली आहे ?

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, श्री.गोविंद ओळंबे यांनी प्रथम कुठल्याही कामावर काम न केल्याचे प्रतिज्ञापत्र सादर केले होते व नंतर दुस-या प्रतिज्ञापत्राद्वारे त्यांनी सांगितले आहे की, मी काम केलेले आहे. त्यामुळे याबाबतीत आपण श्री.जितेंद्र मधुकर जोशी यांच्यावर पोलीस केस केलेली आहे. याबाबतची चौकशी पोलिसांमार्फत चालू आहे. अशाप्रकारची पोलीस केस करीत असताना ती मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या परवानगीने करावी लागते. तसेच, स्थायी समितीची परवानगीही लागते. परंतु ती न घेता पोलीस केस करण्यात आली. याप्रकरणी चौकशी चालू असून चौकशीमध्ये जे निष्पन्न होईल त्याप्रमाणे कारवाई करण्यात येईल.

------ (नंतर कु.गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**कुसबळ (ता. पाटोदा, जि. बीड) येथे ऊसतोड**
**मजुरांच्या घरांना आग लागल्याबाबत**

**(२) * २५७२६ श्री. धनाजी साठे , श्री. संजय दत्त , श्री. गोविंदराव आदिक , मेजर सुधीर सावंत :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुसळब (ता. पाटोदा, जि. बीड) येथे ऊसतोड मजुरांच्या घरांना आग लागून चौघांचे संसार जाळून खाक झाल्याची घटना दिनांक ९ जानेवारी, २००७ रोजी वा त्या दरम्यान घडली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या घटनेची चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, या चार मजूरांना जळालेल्या घरांची नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप, कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. राजेंद्र शिंगणे ,डॉ.पतंगराव कदम यांच्या करिता** : (१) होय,
(२) होय,
(३) व (४) या प्रकरणी संबंधितांना निकषानुसार मदत देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

श्री. धनंजय साठे : सभापती महोदय, कुसळब ( ता. पाटोदा, जि.बीड) येथील काही ऊसतोड करणाऱ्या कामगारांच्या घरांना आग लागून त्यांच्या झोपडया जळाल्या आहेत. माननीय मंत्री महोदयांनी उत्तरात असे म्हंटले आहे की, या प्रकरणी संबंधितांना निकषानुसार मदत देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. हे निकष जर आपण पाहिले तर त्या निकषा प्रमाणे मिळणारी रक्कम अल्प आहे. या मजूरांचे घर उभे करण्याच्या दृष्टीकोनातून शासन काही ठोस मदत करणार आहे का ?

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, बीड जिल्हयामधील कुसळब या गावामध्ये चार शेतकऱ्यांच्या घरांना ९ जानेवारी २००७ साली आग लागून जे नुकसान झाले त्याबाबतीत त्या मजूरांना सानुग्रह अनुदान शासनाकडून देण्यात आले.श्री. गोरख दत्तु मोकाशी यांस रुपये २०००, श्री. मच्छिंद्र मोकाशी यांस रुपये ३००० व श्री. दत्तु मोकाशी यांस रुपये ४००० इतके सानुग्रह अनुदान देण्यात आलेले आहे. श्री. मच्छिंद्र मोकाशी हे बाहेरगावी गेलेले असल्यामुळे त्यांना अनुदान देता आले नाही. अशा प्रकारे शासनाचे जे निकष आहेत त्या निकषांप्रमाणे घरांना आग लागल्यानंतर , घरातील जीवनावश्यक वस्तू नष्ट झाल्यानंतर जितके सानुग्रह अनुदान दिले जाते तितकेच अनुदान या ५ व्यक्तींना दिलेले आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. २५७२६......

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, कार्यवाही करण्यात येत आहे, कार्यवाही करण्याकरिता कारवाई प्रस्तावित आहे, चौकशी समिती नेमलेली आहे, अशा पद्धतीची उत्तरे येथे दिली जात आहेत. ज्या तळमळीने सदस्य येथे प्रश्न विचारतात, पाठपुरावा करतात, त्या प्रमाणे अधिकारी उत्तरे देत नाहीत. हे बरोबर नाही. माझाी शासनास विनंती आहे की, या अधिकाऱ्यांना समज द्यावी. ही घटना ९ जानेवारी २००७ रोजी घडली. तेव्हा ज्या गरीब मजूरांचे नुकसान झाले, त्यांना मदत देण्यासाठी शासनास एवढा अवधी लागण्याचे काय कारण आहे ? माझा येथे स्पेसिफिक प्रश्न आहे की, ज्या मजुरांच्या घरांचे नुकसान झाले त्यांना अधिवेशन संपण्यापूर्वी मदत देण्यात येईल का ?

डॉ. राजेंद्र शिंगणे: सभापती महोदय, मी मघाशी सांगितल्याप्रमाणे श्री. मच्छिंद्र मोकाशी बाहेरगावी ऊस तोडणीचे काम करण्यास बाहेर गेल्यामुळे त्यांना मदत देता आली नाही. त्यांना ताबडतोब मदत देण्यात येईल.ऊसतोड मजूरांच्या जळालेल्या घराचे पंचनामे ताबडतोब करण्यात आले होते. आता सर्व लोकांना मदत देण्यात आलेली आहे.

श्री. धोंडीराम राठोड : सभापती महोदय, दोन हजार आणि अडीच हजार इतक्या किरकोळ रकमेमध्ये या मजुरांचे घरे कसे काय चालू शकेल ? या मजुरांना दिलासा मिळाला पाहिजे, आधार मिळाला पाहिजे, त्यांचे घर उभे राहिले पाहिजे, या दृष्टीने त्यांना मदत देण्यात येईल का ?

श्री. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितल्या प्रमाणे घरांना आग लागल्यानंतर घराचे नुकसान झालेले आहे, जीवनावश्यक वस्तू जळालेल्या आहेत, अशा परिस्थितीत ज्या प्रमाणे नुकसान भरपाई देण्याचे शासनाचे निकष आहेत, त्या निकषाप्रमाणे या मजुरांना सानुग्रह अनुदान देण्यात आलेले आहे.

श्री. धोंडीराम राठोड :सभापती महोदय, शेतक-यांचे संपूर्ण घर जळाले आहे, अन्नधान्य, कपडे व पैसे जहालेल्या आहेत. अशा परिस्थितीत त्यांना आणखी मदत देण्यात येईल काय ?

श्री.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, सानुग्रह अनुदान १००० रुपये, अंशत: बाधित झ ाालेले असेल तर २४०० रुपये, पूर्णत: बाधित झालेले असेल तर ४८००रुपये इतकी मदत देण्याचे शासनाचे निकष आहेत. या निकषानुसार मदत करण्यात आली आहे.

...३



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. २५७२६........

**सभापती :** हे ऊस तोड मजूर आहेत,त्यांची घरे जळाली आहेत, ही वस्तुस्थिती आहे. परंतु ही घरे अंशत: जळाली आहेत की, संपूर्ण जळालेली आहेत, हा वेगळा भाग आहे अशा परिस्थितीत त्यांना पुन्हा घरे बांधण्याकरिता काही सवलती किंवा काही रक्कम देण्याबाबत शासनाकडून विचार करण्यात येणार आहे का ?

यानंतर श्री रोझेकर

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.25726 पुढे सुरु**...........

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, या सर्व बाबींचा विचार केला जाईल. ज्या पद्धतीने आपण पूरग्रस्तांना नवीन घरे बांधून देतो त्याच पद्धतीने नाही तरी त्या निकषानुसार गरीब, गरजू लोकांना इंदिरा आवास योजनेच्या मायमातून किंवा इतर घरकूल योजनांच्या मायमातून घरे बांून देण्यासंबंाी शासन निश्चितपणे विचार करील.

श्री.चंद्रकांत रघुवंशी : सभापती महोदय, इंदिरा आवास योजनेअंतर्गत नवीन घरे शासनामार्फत बांधून दिली जातात. अशा अंशतः नुकसान झालेल्यांना घरदुरुस्तीसाठी 10 हजार रुपये व पूर्णतः नुकसान झालेल्यांना नवीन घर बांधून देतो. आग लागून ज्यांचे घर जळाले आहे त्यांना या योजनेअंतर्गत शासन नवीन घर बांधून देईल काय ?

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, सजेशन फॉर ॲक्शन.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, तातडीने मदत देण्याच्या दृष्टीकोनातून नॉर्म्स बदललेले नाहीत. याबाबत मंत्री महोदय खुलासा करतील काय ?

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, ही मदत तातडीने दिली पाहिजे, असा नियम आहे. त्याप्रमाणे संबंधितांना आदेशही दिलेले आहेत. अशी घटना घडली तर ताबडतोबीने पंचनामा करावा व त्यानंतर ताबडतोबीने मदत द्यावी, अशा सूचना संबंाित अधिका-यांना देण्यात आल्या आहेत. पुन्हा शासन स्तरावरुन याबाबतच्या सूचना निर्गमित केल्या जातील व ताबडतोबीने ही मदत मिळावी, यादृष्टीकोनातून प्रयत्न केले जातील.

----------------------

..2..........



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>ता.प्र.क्र.24624</u>**

**(सन्माननीय सदस्य अनुपस्थित)**

-----------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..3.............

**मालवण (जि. सिंधुदुर्ग) येथील दत्तमंदिराच्या मागील बाजूस सडा येथील वाळलेल्या गवताला आग लागल्यामुळे आंबा व काजू बागायतीचे नुकसान झाल्याबाबत**

**(४) * २८५४० श्री. गुरुनाथ कुलकर्णी , श्री.भास्कर जाधव , श्रीमती मंदा म्हात्रे , श्री. जितेंद्र आव्हाड , श्रीमती उषाताई दराडे :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मालवण (जिल्हा सिंधुदूर्ग) येथील दत्तमंदिराच्या मागील बाजूस उसफळा सडा येथील वाळलेल्या गवताला आग लागून आंबा व काजू बागायतीचे १० लाख रुपयांचे नुकसान झाले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त घटनेची चौकशी तसेच पहाणी करण्यात आली आहे काय,
(३) या घटनेतील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना शासनाने कोणती मदत केली वा करण्यात येत आहे ?

**डॉ.राजेंद्र शिंगणे, डॉ. पतंगराव कदम यांच्याकरिता** : (१) नाही.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्रीमती मंदा म्हात्रे : सभापती महोदय, मालवण येथे ऊसफळा सडा येथील वाळलेल्या गवताला आग लागून आंबा व काजू बागायतीचे नुकसान झाले आहे. अधिकारी वर्ग कशा पद्धतीने उत्तर देतात, हे सन्माननीय सदस्य, श्री.संजय दत्त यांनी आताच सांगितले. या प्रश्नाच्या संदर्भात देखील असेच झाले आहे. तारांकित प्रश्नाच्या प्रश्न भाग एक मध्ये असे विचारण्यात आले होते की, "मालवण, जिल्हा सिंधुदूर्ग येथील दत्तमंदिराच्या मागील बाजूस ऊसफळा सडा येथील वाळलेल्या गवताला आग लागून आंबा व काजू बागायतीचे 10 लाख रुपयांचे नुकसान झाले, हे खरे आहे काय ?" या प्रश्नाला दिलेल्या लेखी उत्तरात असे नमूद करण्यात आले आहे की, "नाही, प्रश्न उद्‌भवत नाही." माझा प्रश्न असा आहे की, अधिका-यांनी केलेल्या चौकशीत काय निष्पन्न झाले ?

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, दत्तमंदिराच्या मागील बाजूस आग लागून नुकसान झ ााल्याबाबतचा उल्लेख प्रश्नामध्ये आहे. परंतु, त्या ठिकाणी कोणतीही आग लागलेली नाही. महसूल विभागाच्या सर्व अधिका-यांनी त्या ठिकाणी भेट दिली. अशा पद्धतीने कोणतीही आग लागली नव्हती त्यामुळे नुकसान होण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

..4.........



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.28540 पुढे सुरु...........**

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, झाडे उगवण्याचे व वाढण्याचे फार मोठे वरदान कोकणाला मिळाले आहे. त्या ठिकाणी निसर्गताच झाडे वाढतात व मोठया प्रमाणावर गवत उगवते. उन्हाळयामध्ये एखादी काडी टाकली तरी वणवा मैलोनमैल पसरतो. काही विकृत प्रवृत्ती अशा प्रकारचा वणवा वर्षानवर्षांपासून लावतात. बिडी किंवा सिगारेट पितांना आगपेटीची पेटती काडी टाकतात. अशा लोकांवर कठोर कारवाई होण्यासाठी यासंबंधातील गुन्हा अजामीनपात्र व्हावा या दृष्टीकोनातून शासनाने कोणती कार्यवाही केली आहे, तसेच अशा वणव्यांमध्ये ज्या शेतक-यांच्या झ ाडांचे नुकसान होते त्यांना मदत देण्यासाठी शासनाची कोणती योजना आहे ?

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, अशा पद्धतीने हेतुपुरस्सर आगी लावल्या जात असतील तर अशा समाजकंटकांविरुद्धच्या स्पेसिफिक तक्रारी सन्माननीय सदस्यांनी माझ्याकडे द्याव्यात, त्यांच्यावर निश्चितपणे कारवाई केली जाईल. आगी लागून होणा-या झाडांच्या नुकसानीसाठी नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाचे धोरण नाही.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, हा प्रश्न वाचल्यानंतर व त्या प्रश्नाला दिलेले लेखी उत्तर वाचल्यानंतर हा प्रश्न आलाच कसा ? असा प्रश्न मला पडला. सन्माननीय सदस्यांनी नमूद केलेल्या ठिकाणी आग लागली नसली तरी त्या परिसरात दुसरीकडे कुठे आग लागली होती का ? सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या ठिकाणी आग लागली नाही ना, मग प्रश्न उद्भवत नाही, असे उत्तर देऊन अधिकारी मोकळे होतात. ज्याअर्थी सन्माननीय सदस्य प्रश्न विचारीत आहेत त्याअर्थी आजुबाजूच्या परिसरात कुठे तरी आग लागली असण्याची शक्यता आहे. हा तारांकित प्रश्न सन्माननीय सदस्य, श्री.गुरुनाथ कुलकर्णी, श्री.भास्कर जाधव, श्रीमती मंदा म्हात्रे, श्री.जितेंद्र आव्हाड, श्रीमती उषाताई दराडे यांनी विचारलेला आहे. सन्माननीय सदस्य, श्री.गुरुनाथ कुलकर्णी हे त्याच भागातील आहेत. ते असत्य प्रश्न विचारतील, असे वाटत नाही.

यानंतर कुमारी जयश्री.............

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.... ता.प्र.क्र.28540...

माझा यावर स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, समजा ही जागा चूकली असेल आणि त्या तालुक्यामध्ये दुस-या भागामध्ये आग लागली असेल ते तपासले गेले का ? दुस-या भागामध्ये आग लागली असल्यास, तेथे काही नुकसान झालेले आहे का ?

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.रावते साहेबांनी या सभागृहात जे सांगितले ती वस्तुस्थिती आहे. सदर तारांकित प्रश्नामध्ये विचारलेलया ठिकाणी जरी आग लागली नसली तरी त्या भागामध्ये,तालुक्यामध्ये,जिल्हयामध्ये दिनांक 26 डिसेंबर,2006 ते फेब्रुवारी,2007 पर्यंत जवळपास 17 ठिकाणी अशा पध्दतीच्या आगी लागलेल्या आहेत. त्या गावांची नावे थोडक्यात पुढीलप्रमाणे आहेत. गोळवण, वायंगणी, गोठणे, माळगांव, सुकळवाड, कुसरवे, कांदळगांव, नांदरुख,कुसरेवे,चिंदर,भोगलेवाडी,रेवंडी,खडी,हडी,कातवड अशा प्रकारे इतर अशा एकूण 17 ठिकाणी आगीमुळे नुकसान झालेले आहे, ही वस्तुस्थिती आहे.

कर्नल सुधीर सावंत : सभापती महोदय, आताच मंत्रिमहोदयांनी सांगितल्याप्रमाणे अनेक ठिकाणी अशा पध्दतीच्या आगी लागलेल्या आहेत. कोकणामध्ये दरवर्षी आंबा,फणस,काजू यांच्या बागांना आगी लागण्याचे प्रमाण वाढत चालले आहे, अशा आगींमध्ये नुकसान झालेल्या शेतक-यांना सरकार फार तुटपूंजी मदत येते. आंबा बागायतीमध्ये पिक यावयाला एकूण 10 वर्ष लागतात आणि उत्पन्न वर्षाला फक्त 30,000 रुपये येते आणि तेही शेतक-याला 10 वर्षानंतर मिळते पण त्याकरिता शेतक-याला 10 वर्ष मेहनत करावी लागते. आणि नुकसान भरपाई मात्र एकरी 2,000 रुपये एवढी तुटपूंजी मिळते. सरकारकडून दिली जाणारी ही मदत अत्यंत तुटपूंजी अशी आहे. या सर्व विषयांवर सरकारने विचार करुन मदत देण्याच्या दृष्टीकोनातून इन्शोरंस स्कीम काढावायाचा विचार करणार आहे का ?

डॉ.राजेंद्र शिंगणे : सन्माननीय सदस्य कर्नल सुधीर सावंत यांनी सांगितल्याप्रमाणे निश्चितपणे अशा प्रकारच्या आगी लागल्यानंतर त्यांना कोणत्याही प्रकारची मदत देऊ नये अशा प्रकारचे या सरकारचे धोरण नाही. कोकणामध्ये आगी लागण्याचे प्रमाण वाढत चालले आहे, ही वस्तुस्थिती जी सन्माननीय सदस्यांनी मांडली ती खरी आहे. अनेक वर्षे मेहनतीने उभी केलेली बाग मग ती काजूची,आंब्याची,फणसाची कोणतीही असो ती आगीमध्ये होरपळून खाक होते व त्या शेतक-याचे लाखो रुपयांचे नुकसान होते ही देखील वस्तुस्थिती आहे. मी मगाशी 17 गावांची नावे

V - 2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

वाचून दाखविली तेथील शेतक-यांचे अनुक्रमे 8 व 10 लाख रुपयांचे अशा प्रकारे लाखो रुपयांचे नुकसान झालेले आहे. याबाबत सन्माननीय सदस्य कर्नल सुधीर सावंत यांनी सांगितल्याप्रमाणे शेतक-यांसाठी विमा संरक्षण योजना आणण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे व त्याबाबत शासन विचार करेल.

श्री.विनोद तावडे : माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तर दिले की, शेतक-यांना विमा संरक्षण देण्यासंबंधी योजना आणण्याचा शासन विचार करेल परंतु शेतक-यांना विमा संरक्षण न देता ते विमा संरक्षण आंबा,काजू,फणस यासारख्या बागांना दिले तर जास्त बरे होईल याचा सरकार विचार करेल का ? माझा दुसरा मुद्दा असा आहे की, सन्माननीय सदस्य श्री.भास्कर जाधव यांनी म्हटल्याप्रमाणे कोकणामध्ये वणवे पेटण्याचे प्रकार वाढत चालले आहे मग ते वणवे वैमनस्यातून असोत की, निसर्गत: पेटलेले असो परंतु पोलीस खाते अशा प्रकारच्या वणव्यांचे एफ.आय.आर.केले पाहिजे असा विचार करेल का ? आगीची सखोल चौकशी करुन ताबडतोब कारवाई केली जाईल का ? लागलेली आग हा अपघात आहे की, घातपात आहे ? याचीही चौकशी त्यावेळी होणे अत्यंत गरजेचे आहे. याविषयी शासन कठोर निर्णय घेईल का ? कारण याशिवाय या गोष्टींना आळा बसणार नाही या गोष्टींना आळा बसला पाहिजे अशा प्रकारचा शासन निर्णय आपण करणार का ? वणवा लागल्यानंतर त्याचे ताबडतोब पोलीस खात्यातर्फे एफ.आय.आर.झाले पाहिजे.

डॉ.राजेंद्र शिंगणे : सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी सांगितल्याप्रमाणे निश्चितपणे अशा पध्दतीने आग किंवा वणवे लागत असतील आणि कुठेतरी अशा प्रकारे जाणूबुजून किंवा हेतूपुरस्सर आगी लावण्यात येत असतील. येथून पुढच्या काळामध्ये अशा पध्दतीने पोलीस खात्याला किंवा गृह विभागाशी चर्चा करुन या संदर्भात गुन्हा म्हणून नोंद करुन घेण्याच्या संदर्भात निश्चितप्रकारे शासन आदेश निर्गमित करण्यात येतील.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, सुरुवातीला माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तर देतांना काही माहिती लपवून ठेवण्याचा असा शब्दप्रयोग न करता मी म्हणेन की, काही माहिती सभागृहासमोर न आणण्याचा पुरेपूर प्रयत्न केला परंतु नंतर हळूहळू माननीय मंत्रिमहोदयांनी अतिशय प्रामाणिकपणे सर्व वस्तुस्थिती सभागृहाच्या समोर आणून त्यावर कोणकोणत्या उपाययोजना शासन करेल हे सांगितले उदा. आगीमुळ नुकसान झालेल्या शेतक-यांना नुकसान भरपाई देण्याची

V - 2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.28540. श्री.भास्कर जाधव....

विमासंरक्षण योजना,अशा प्रकारे लागलेल्या आगींची एफ.आय.आर.नोंदणी करण्यात येईल परंतु माझ ा प्रश्न असा आहे की, आता माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तरामध्ये सांगितलेल्या उपाययोजना लवकरात लवकर किती दिवसांमध्ये पूर्ण करण्यात येतील ?

यानंतर श्री.बोरले......

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.28540** .....

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, शेतक-यांच्या दृष्टीने हा अत्यंत महत्वाचा प्रश्न आहे. कोकणातील वेगवेगळया भागातील सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारलेले आहेत. हा कोकणातील प्रश्न असल्यामुळे या प्रश्नाबाबत कोकणातील सन्माननीय सदस्यांची आस्था असणे स्वाभाविक आहे. विमा पॉलिसीच्या संदर्भातील तक्रारी असतील, नुकसान भरपाई देण्यासंदर्भात किंवा मदत देण्याच्या संदर्भात विविध विभागांशी चर्चा करावी लागणार आहे. गृह विभागाशी चर्चा करावी लागणार आहे. इन्शूरन्सच्या बाबतीत या योजनेशी संबंधित असलेल्या अधिका-यांशी चर्चा करावी लागणार आहे. हे अधिवेशन संपल्यानंतर 15 दिवसाच्या आत संबंधित अधिका-यांची बैठक घेण्यात येईल आणि धोरण ठरविण्यात येईल.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सर्व मुद्दे कव्हर केलेले असले तरी एम.एस.ई.बी.च्या वायरचा मुद्दा शिल्लक राहतो. एम.एस.ई.बी.च्या वायरींमुळे ब-याच वेळा आग लागते. कोकणात मोठया प्रमाणावर हवा असते. त्यामुळे शॉर्ट सर्किट होऊन गवताला आग लागते. शॉर्ट सर्किटमुळे आग लागल्याचे एम.एस.ई.बी. मान्य करीत नाही, असा अनुभव आहे. त्यामुळे एम.एस.ई.बी.ला सुध्दा सूचना देणे आवश्यक आहे. माननीय मंत्री महोदय एम.एस.ई.बी. च्या अधिका-यांना तशा सूचना देतील काय ?

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, हे अधिवेशन संपल्यानंतर 15-20 दिवसांनी संबंधित अधिका-यांची बैठक घेण्यात येणार आहे. त्या बैठकीमध्ये एम.एस.ई.बी.च्या अधिका-यांना बोलावून याबाबतची वस्तुस्थिती त्यांच्या निदर्शनास आणून देण्यात येईल आणि निर्णय घेण्यात येईल.

--------

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**नेवासा (जि. अहमदनगर) तालुक्यातील पूरग्रस्त**
**शेतकऱ्यांना आर्थिक मदत मिळणेबाबत**

**(5) * 24673 श्री. गोविंदराव आदिक , श्री. संजय दत्त , श्री. धनाजी साठे , श्री. रमेश निकोसे : तारांकित प्रश्न क्रमांक 20887 ला दिनांक 5 डिसेंबर, 2006 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** : सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(1) दिनांक 7 ऑगस्ट, ते 9 ऑगस्ट, 2006 या कालावधीत नेवासा (जि. अहमदनगर) तालुक्यातील 13 गावातील 219 शेतकऱ्यांच्या विहिरींची झालेल्या पडझडीची शासनाच्या प्रचलित तरतूदीनुसार विहिरीच्या नुकसानीस मदत अनुज्ञेय नसल्याने मदत देण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, विहिरींच्या नुकसानाची लवकरात लवकर मदत देण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(3) अद्याप, कोणतीच कारवाई केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ.राजेंद्र शिंगणे, डॉ.पतंगराव कदम यांच्याकरिता** : (1) होय,
(2) व (3) शासनाच्या स्थायी आदेशानुसार विहिरींची झालेल्या पडझडीच्या नुकसानी बाबत मदत अनुज्ञेय नसल्यामुळे मदत देण्यात आलेली नाही. शासनाच्या स्थायी आदेशात/निकषात बदल करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन नाही.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, माझा पहिला प्रश्न असा आहे की, दिनांक 7 ऑगस्ट ते 9 ऑगस्ट, 2006 या दोन दिवसांच्या कालावधीत 13 गावातील 219 शेतक-यांच्या विहिरींची मोठया प्रमाणावर पडझड होण्याची कारणे काय आहेत ? हा शेतक-यांच्या जीवन मरणाचा प्रश्न आहे. एकीकडे शेतकरी आत्महत्या करीत आहेत आणि दुसरीकडे संकटामध्ये सापडलेल्या शेतक-यांना शासन मदत करीत नाही. माझा दुसरा प्रश्न असा आहे की, या शेतक-यांना शासन मदत करणार आहे काय ?

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी पहिला प्रश्न विचारला की, दिनांक 7 ऑगस्ट ते 9 ऑगस्ट दरम्यान विहिरींचे नुकसान कशामुळे झाले ? सन्माननीय सदस्यांच्या माहितीकरिता मी सांगू इच्छितो की, मागच्या वेळी ऑगस्ट महिन्यामध्ये मुंबईसह राज्यात अतिवृष्टी आणि महापूर आला होता. त्यावेळी महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील शेतक-यांच्या शेतीतील विहिरी खचल्या होत्या. अतिवृष्टी झाल्यामुळे शेतक-यांच्या विहिरींचे नुसान झ ालेले आहे. सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी विचारलेल्या पहिल्या प्रश्नाचे उत्तर देण्याचा मी प्रयत्न केलेला आहे. मागच्या वर्षी अतिवृष्टी झाली त्यावेळी शासनाने सार्वजनिक विहिरी,

..3.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. 24673** ........

डॉ.राजेंद्र शिंगणे .......

सरकारी विहिरी, ज्या विहिरींच्या माध्यमातून पिण्याच्या पाण्याचा पुरवठा होतो अशा सर्व विहिरींना मदत करण्याचा प्रयत्न केलेला आहे. परंतु शेतक-यांच्या विहिरींना मदत देण्याचे धोरण मागच्या वर्षीच्या अतिवृष्टीमध्ये नव्हते. यासंदर्भात निश्चितपणे विचार करण्यात येईल.

श्री.यशवंतराव गडाख : सभापती महोदय, हा प्रश्न माझ्या तालुक्यातील आहे. दिनांक 7 ऑगस्ट ते 9 ऑगस्ट दरम्यान राज्यात अभुतपूर्व असा पाऊस पडला. मुळा, प्रवरा आणि गोदावरी या तिन्ही नद्यांना मोठया प्रमाणार पूर आले होते. त्यावेळी बॅक वॉटरमुळे नदीच्या किना-यावरील विहिरी खचल्या. माननीय कृषिमंत्री श्री.बाळासाहेब थोरात यांनी या भागाचा दौरा केलेला आहे. अतिवृष्टीमुळे अनेक शेतक-यांचे संसाद उद्ध्वस्त झालेले आहेत, विहिरींची पडझड झालेली आहे. नेवासा तालुक्यातील 219 शेतक-यांच्या विहिरी खचलेल्या आहेत. हे अत्यंत गरीब शेतकरी आहेत. शेतक-यांच्या विहिरींच्या नुकसानीस मदत देणे शासनाच्या निकषात बसत नसले तरी शासनाने खास बाब म्हणून त्या शेतक-यांना मदत दिली पाहिजे.

(यानंतर श्री.गागरे ........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.24673

श्री.यशवंतराव गडाख .....

म्हणून निकषामध्ये बदल करुन खास बाब म्हणून या 219 शेतकऱ्यांना शासन मदत करील का व किती दिवसात मदत करणार ?

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, सभागृहातील जेष्ठ सदस्य श्री.यशवंतराव गडाख यांनी अहमदनगर जिल्हयातील नेवासा तालुक्यातील 219 शेतकऱ्यांच्या विहीरीची पडझड झाल्याचे सांगितले आहे. सभापती महोदय, मी स्पष्ट करु इच्छितो की, हा प्रश्न हा केवळ अहमदनगर जिल्हयातील नेवासे तालुक्यातील नसून अतिवृष्टीमुळे महाराष्ट्रातील ग्रामीण भागामध्ये शेतकऱ्यांच्या विहीरीचे, मोटार पंपाचे, पाईपलाईन इत्यादीचे नुकसान झालेले आहे. सभापती महोदय, मागच्या वर्षी पूरग्रस्तांना मदतीचे धोरण म्हणून शासनाकडून मदत देण्यात आलेली आहे. पण विहीरींची पडझड, पाईपलाईन, मोटार पंप यांना मदत करण्यासंबंधीचे सध्याचे धोरण नसल्यामुळे मदत केली नाही. सन्माननीय सदस्य श्री.यशवंतराव गडाख यांनी मांडलेला प्रश्न हा केवळ 219 शेतकऱ्यांचा नसून संपूर्ण राज्याचा प्रश्न आहे. त्यामुळे जर अहमदनगर जिल्हयातील शेतकऱ्यांना मदत केली तर राज्याच्या इतर ठिकाणाहून मागणी येऊ लागेल व त्यांनासुध्दा मदत करावी लागेल. याबाबत मी सभागृहाला सांगू इच्छितो की, शासनाने याबाबत अजूनपर्यत काही निर्णय घेतलेला नाही पण मी सांगू इच्छितो की, याबाबाबत निश्चितणे पुढील काळात विचार करण्यात येईल.

श्री.यशवंतराव गडाख : सभापती महोदय, ही नैसर्गिक आपत्ती आलेली आहे. अशा वेळेला शासनाने महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना मदत केलीच पाहिजे. परंतु मदत करण्याऐवजी मंत्री महोदय असे सांगत आहेत की, अहमदनगर जिल्हयातील शेतकऱ्यांना मदत केली तर इतरांनाही मदत करावी लागेल आणि म्हणून येथे मदत द्यावयाची नाही, ही भूमिका घेणे उचित नाही. शेतकऱ्यांना मदत करण्यापेक्षा त्यांच्या प्रश्नाला बगल दिली जात आहे, ही शासनाची भूमिका योग्य नाही. शासनाने याबाबत गंभीरपणे विचार करुन या वर्षी ज्या पध्दतीने या विहिरींची संख्या आहे, विहिरींची अतिशय पडझड झाली आहे, बऱ्याच विहिरी वाहून गेल्या आहेत. तेथील शेतकरी अक्षरश: नागवलेला आहे. त्यामुळे आपण शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी शासनाच्या निकषामध्ये बदल करावा. सन्माननीय सहकारमंत्री डॉ.पतंगराव कदम सभागृहात उपस्थित आहेत. सरकार इतके का निष्ठूर झाले आहे, हे मला समजत नाही. सरकारने अशा नैसर्गिक आपत्तीच्या वेळी गरीब शेतकऱ्यांना नक्की मदत केली पाहिजे. सरकारने याबाबत भूमिका स्पष्ट करावी. .....2

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.24673

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, माननीय महसूल राज्यमंत्र्यांनी सांगितले आहे ती वस्तुस्थिती आहे. याबाबत धोरण आखताना शेतकऱ्यांना मदत देण्याबाबत विचार केला जाईल.

श्री.श्रीकांत जोशी : सभापती महोदय, जास्त पाऊस पडला म्हणून विहिरीचे नुकसान झालेले आहे. दिनांक 5 ते 9 ऑगस्ट 2006 या कालावधीत त्या परिसरात किती पाऊस पडला ? त्यामुळे किती विहिरीचे नुकसान झाले ? याची माहिती शासनाने घेतली पाहिजे. शासनाने योग्य वेळी पुराच्या पाण्याचे नियोजन व नियंत्रण केलेले नाही यामध्ये शासनाचा दोष आहे. त्यामुळे शासन या शेतकऱ्यांना मदत करणार का ?

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, या सर्व विहिरी रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून दुरुस्त करण्याचा निर्णय घेण्यात येईल.

श्री.धोंडीराम राठोड : सभापती महोदय, मराठवाडयातील गोदावरी, दुधना व पूर्णा या तीन नद्यांना पूर आल्यामुळे नदीकाठच्या परीसरातील विहिरींचे नुकसान झाले असून तेथील विहिरी पडलेल्या आहेत, वाहून गेल्या आहेत. काल सन्माननीय महसूल राज्यमंत्री डॉ.राजेंद्र शिंगणे यांनी त्यांच्या भाषणात याबाबतची माहिती दिलेली आहे. माझा प्रश्न असा आहे की, ज्या शेतकऱ्यांच्या विहिरीचे नुकसान झालेले आहे, त्यांच्या विहिरी दुरुस्त करण्यासाठी शासन मदत करणार का ?

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, अशा प्रकारे नुकसान झालेल्या सर्व विहिरींचा समावेश प्रस्तावित दुरुस्तीमध्ये केला जाईल.

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

.....3

**ठाणे जिल्ह्यातील सुर्या प्रकल्पामुळे विस्थापित झालेल्या आदिवासींना लाभदायक ठराव्यात अशा योजना राबविण्याबाबत**

**(६) * २८१८४ श्री. रमेश निकोसे , श्री. संजय दत्त , श्री. गोविंदराव आदिक , श्री. चंद्रकांत रघुवंशी , मेजर सुधीर सावंत :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सुर्या प्रकल्पाचे पाणी साठविण्यासाठी कवडास व धामणी ही धरणे बांधून वीस वर्षांचा कालावधी उलटला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकल्पासाठी जव्हार तालुक्यातील काही गावे उठविण्यात आली आणि ती पालघर येथे बसविण्यात आली, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, विस्थापित आदिवासींना कामासाठी वणवण फिरावे लागत आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, विस्थापितांसाठी लाभदायक ठराविक अशा योजना राबविण्याबाबत शासनाचे धोरण काय आहे,
(५) नसल्यास, योजना न राबविण्यामागचे कारण काय आहे,
(६) सदर योजना राबविण्यासाठी शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे ?

**डॉ.राजेंद्र शिंगणे, डॉ.पतंगराव कदम यांच्याकरिता** : (१) व (२) होय,
(३) हे खरे नाही, पुनर्वसीत भूमीहिन प्रकल्पग्रस्त कुटुंबांना प्रत्येकी १ हेक्टर शेतजमिनी वाटप केल्या आहेत. इतरांनी स्वेच्छा पुनर्वसन केले आहे.
(४), (५) व (६) आदिवासींसाठी केंद्र व राज्य शासनाच्या आदिवासी विकास विभागामार्फत ज्या योजना राबविण्यात येतात त्या सर्व योजनांचे फायदे संबंधितांना मिळतात. तसेच आदिवासी प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन प्राधान्याने करणेचे शासनाचे धोरण आहे.

श्री.रमेश निकोसे : सभापती महोदय, यामुळे ठाणे जिल्हयातील सुर्या प्रकल्पाबाबत काही प्रश्न निर्माण झालेले आहेत. ज्या शेतकऱ्यांच्या या प्रकल्पामध्ये जमीनी गेल्या आहेत, त्या सर्व शेतकऱ्यांना त्यांचा फायदा मिळाला आहे काय ? उत्तरात म्हटले आहे की, शासनाने मदत केलेली आहे. दुसरा प्रश्न असा आहे की, पाच एकरपेक्षा जास्त क्षेत्र फक्त 603 शेतकऱ्यांकडे आहे. याचा अर्थ अतिशय गरीब परिस्थितीत तेथे बरेच शेतकरी राहात आहेत. जव्हार, पालघर, डहाणू या तालुक्यातील गावांचा या प्रकल्पामध्ये समावेश आहे. सभापती महोदय, सुर्या प्रकल्पातील पाणी शेतकऱ्यांना वापरण्यासाठी दिले जात नाही ?. शेतकऱ्याच्या शेतामध्ये खड्डे खोदण्यात आले आहे, त्यामुळे शेतक-यांची जमीन खराब झालेली आहे, हे खरे आहे काय ?.

नंतर श्री.सुंबरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.28184 ...

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, खरे म्हणजे सूर्या प्रकल्पामुळे जी धरणे आपण बांधली आहेत त्यामुळे जे विस्थापित झालेले आदिवासी आणि इतर शेतकरी आहेत त्यांच्याबाबतीतील हा प्रश्न आहे. तेव्हा सन्माननीय सदस्यांनी जे प्रश्न आता येथे उपप्रश्नांच्या रूपाने विचारले आहेत त्यातून त्यांचा काही तरी गैरसमज झालेला दिसतो आहे. ते येथे लागू होऊ शकत नाहीत.

कर्नल सुधीर सावंत : सभापती महोदय, 20 वर्षानंतर सूर्या प्रकल्प आता पूर्ण झालेला आहे आणि त्यामुळे जे शेतकरी विस्थापित झाले आहेत त्यांना त्यावेळेस जी काही मदत दिली गेली असली तरी आज मात्र ते सारे देशाधडीला लागले आहेत. तसेच प्रकल्पाच्या कमांड एरियातील जे लाभधारक शेतकरी आहेत, ते सारे चिकू बागायतदार आहेत आणि त्यांनाच केवळ फायदा मिळालेला आहे, बाकी कोणाही छोटे शेतकरी वा आदिवासींना फायदा मिळालेला नाही. या लेखी उत्तरामध्ये माननीय मंत्री महोदयांनी म्हटले आहे की, तेथील आदिवासींसाठी केंद्र व राज्य शासनाच्या आदिवासी विकास विभागाच्या योजना लागू गेल्या आहेत. तेव्हा मी या संदर्भात असे विचारू इच्छितो की, या सर्व प्रकल्पात आदिवासी लाभधारक क्षेत्रातील जे विस्थापित असतील त्यांना कोणत्या योजना आपण लागू केल्या आहेत आणि त्यातून त्यांना किती फायदा झालेला आहे?

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, या प्रकल्पामध्ये जी काही 10 गावे गेली होती त्यातील 1131 व 327 अशा एकूण 1458 कुटुंबांचे पुनर्वसन तेथे गेलेले आहे आणि ती बहुतेक सर्व आदिवासी मंडळी होती. सन्माननीय सदस्यांनी आता उल्लेख केल्याप्रमाणे आदिवासी विभागांच्या माध्यमातून तेथे त्यांच्यासाठी योजना राबविल्या जात आहेत आणि त्याद्वारा त्या लोकांना फायदा मिळवून देण्याचा आपला प्रयत्न राहतो. आदिवासी उपयोजनेतून तेथे आदिवासी मुलांच्या शिक्षणासाठी आश्रमशाळा आपण दिलेल्या आहेत, आदिवासींचे उत्पन्नात वाढ होण्यासाठी त्यांना दुधाळ म्हशी देखील या योजनेतून दिल्या गेल्या आहेत. अशा प्रकारे शासनाच्या विविध योजना तसेच महामंडळांच्या मार्फत रोजगाराच्या, स्वयंरोजगाराच्या योजना देखील आपण तेथे दिलेल्या आहेत त्यापैकी 20 टक्के आरक्षणदेखील आदिवासी आणि इतर सर्वांनाच तेथे दिलेले आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

...... वाय 2 ....

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, या प्रकल्पामुळे एकूण किती कुटुंबे प्रकल्पग्रस्त झाली आहेत आणि पुनर्वसित भूमीहीन प्रकल्पग्रस्त कुटुंबांना प्रत्येकी 1 हेक्टर शेतजमिनीचे वाटप झाले आहे तर त्यांचे पुनर्वसन कोठे आणि केव्हा करण्यात आले आहे ?

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, मी सुरूवातीस सांगितल्याप्रमाणे 1458 कुटुंबांचे पुनर्वसन तेथे केलेले आहे आणि या 10 गावांमध्ये जवळपास 1029 घरे होती आणि 9717 लोकसंख्या होती. सभापती महोदय, 1458 पुनर्वसित कुटुंबांपैकी 367 कुटुंबांचे पुनर्वसन वणई-चंद्रनगर येथे आणि 151 कुटुंबांचे शिगाव-हनुमाननगर येथे पुनर्वसन केलेले आहे आणि इतर कुटुंबांनी स्वेच्छापुनर्वसन केलेले आहे. त्याचप्रमाणे या ठिकाणी नोकरीच्याबाबतीतदेखील मी सांगेन की, 61 व्यक्तींना प्रकल्पग्रस्तांचे प्रमाणपत्र नोकरीसाठी म्हणून दिले असून त्यापैकी 55 जणांना शासनाने नोकरी दिलेली आहे.

श्री. गोपीकिसन बजोरिया : सभापती महोदय, पुनर्वसित भूमीहीन प्रकल्पग्रस्त कुटुंबांना आपण 1 हेक्टर शेतजमीन दिलेली आहे असे या लेखी उत्तरात म्हटले आहे तर ही जमीन वर्ग 1 ची आहे की वर्ग 2 ची आहे ? कारण प्रकल्पग्रस्त म्हणून त्यांना देण्यात आलेली ही जमीन असल्याने त्यांना ती विकता येत नाही आणि बँका त्यावर कर्ज देखील देत नाहीत म्हणून मी हा प्रश्न विचारला आहे.

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, आपण वर्ग 2 म्हणूनच नेहमी जमीन देत असतो.

**सभापती** : मी माननीय राज्यमंत्र्यांना सांगू इच्छितो की, प्रकल्पासाठी आपण प्रकल्पग्रस्तांची नंबर 1 ची जमीन आपण काढून घेतली आहे आणि त्यांना त्यासाठी पर्यायी जमीन म्हणून जी जमीन देता ती कोणाची तरी काढून घेऊन वर्ग 2 ची म्हणून देता. त्यामुळे ती जमीन विकणे त्यांना कठीण जाते. ती जमीन विकण्याची आपण त्यांना परवानगी दिली आणि ती विकली तरी नंतर त्यातून 50 टक्के घेण्याचा विचार करता. तेव्हा तसे न करता त्यांची नंबर 1 ची जमीन घेतल्यानंतर पर्यायी म्हणून नंबर 1 चीच जमीन देण्याची काळजी आपण घेतली पाहिजे. अशा पद्धतीचा सन्माननीय सदस्यांचा प्रश्न आहे. तरी आपण त्याबाबत उत्तर द्यावे.

( यानंतर श्री. सरफरे ..... झेड 1 ...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 28184...

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, वर्ग 2 ची जमीन देतांना शासनाचा उद्देश असा असतो की, त्याला मिळालेली जमीन त्याने विकू नये, त्यांचे उदरनिर्वाहाचे ते साधन असते. परंतु कालांतराने जर त्याला जमीन विकावयाची असेल तर अन्अर्न्ड इन्कम भरुन त्याला विकण्याची परवानगी देतो.

**सभापती** : मंत्रिमहोदय, वर्ग 1 ची जमीन शेतकऱ्याकडून काढून घेतल्यानंतर त्याला पर्यायी वर्ग 2 ची जमीन देतांना त्याने ती जमीन विकू नये असे आपले म्हणणे आहे. परंतु त्याला जमीन विक्रीची परवानगी दिल्यानंतर अन्अर्न्ड इन्कम म्हणून 50 टक्के हिस्सा कापून घेण्याचा सरकारला नैतिक अधिकार नाही. आपण एकदा जमीन विक्रीची परवानगी दिल्यानंतर त्याला मिळालेली संपूर्ण रक्कम तो वापरु शकेल यादृष्टीने आपण काळजी घ्यावी.

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, नियमातील तरतुदीप्रमाणे शासन कारवाई करीत असते. परंतु आपण केलेली सूचना देखील व्यवहार्य आहे. ती निश्चितपणे तपासून घेऊन नियमामध्ये बदल करणे आवश्यक असेल तर त्यादृष्टीने कारवाई केली जाईल.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## ठाणे जिल्ह्यातील विक्रमगड तालुक्यात शेवता-महालपाडा येथे संपूर्ण ग्रामीण योजनेतून आलेल्या मजुरांचे धान्य व पगार मिळाले नसल्याबाबत

**(७) * २५०३२ श्री. मुझफ्फर हुसेन सय्यद , श्री. संजय दत्त , श्री.सय्यद जामा , श्री. गोविंदराव आदिक , श्री. धनाजी साठे :** सन्माननीय **रोजगार हमी योजनामंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील विक्रमगड तालुक्यात शेवता-महालपाडा येथे संपूर्ण ग्रामीण योजनेतून आलेल्या मजुरांचे धान्य व पगार मिळाले नसल्याचे दिनांक १९ जानेवारी, २००७ रोजी वा त्या सुमारास आढळून आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचा तपशील काय आहे व सदर मजुरांना धान्य व पगार तातडीने देण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात** : (१) होय,

(२) होय,

(३) व (४) संबंधित शाखा अभियंता यांची दुसऱ्या जिल्ह्यात बदली झाल्यामुळे विहिरीतील गाळ काढणे व पॉइंटींग या कामाची मजुरी अदा करण्यासाठी विलंब झाला. सदर कामाची मजुरी दिनांक ३१/०१/२००७ रोजी मजुरांना देण्यात आली आहे.

श्री. मुझफ्फर हुसेन : सभापती महोदय, ठाणे जिल्हयातील विक्रमगड तालुक्यातील संपूर्ण ग्रामीण योजनेंतर्गत विहिरीवर काम करणाऱ्या मजुरांचा हा विषय आहे. या मजुरांना २००४-०५ या वर्षीचे धान्य व पगार मिळाला नाही. उत्तरामध्ये म्हटले आहे की, संबंधित शाखा अभियंत्याची दुसऱ्या जिल्हयामध्ये बदली झाल्यामुळे त्यांना धान्य व पगार देण्यात आला नाही. हा पगार त्यांना जानेवारी महिन्यामध्ये देण्यात आला. माझा प्रश्न असा आहे की, जर शाखा अभियंत्याची दुसऱ्या ठिकाणी बदली झाली असेल तर त्या ठिकाणी तहसिलदार नव्हते कां? जर असतील तर त्यांनी त्या मजुरांना वर्षभरामध्ये पगार कां दिला नाही?

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, या विहिरीचे काम १९.१.२००४ ते ३१.३.२००५ दरम्यान करण्यात आले. त्या मजुरांना मार्च महिन्याच्या अखेरीस १३ हजार १७२ रुपये रोख पगार देणे शिल्लक होता, तो दिला गेला नाही ही वस्तुस्थिती आहे. तेथील शाखा अभियंत्याची उप अभियंता म्हणून पदोन्नती झाल्यामुळे ही अक्षम्य दिरंगाई झाली व पगार नंतर दिला गेला.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ MHM/ KGS/

*** २५०३२....**

श्री. बाळासाहेब थोरात...

त्याकरिता मजुरांना आंदोलन करावे लागले. याला शाखा अभियंता जबाबदार आहे. याकरिता महाराष्ट्र नागरी सेवा नियम १० अन्वये त्या शाखा अभियंत्याची चौकशी करुन त्याच्यावर कारवाई करण्यात येईल.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, शेवता-महालपाडा येथील गरीब मजुरांपुरता मर्यादित प्रश्न नसून यासंबंधी अनेक ठिकाणाहून माझ्याकडे तक्रारी आलेल्या आहेत. संपूर्ण ग्रामीण योजनेमधून मजुरांना धान्य व पगार वेळेवर होत नाही. त्यामुळे त्यांच्याकडे सहा महिने ते एक वर्ष पासून कूपन्स पडून आहेत. त्यावर त्यांना धान्य मिळत नाही. या तक्रारीची शासनाने दखल घेऊन किती ठिकाणी धान्याचे वाटप झाले नाही याचा आढावा घेणार काय? आणि जर त्याठिकाणी धान्याचे वाटप वेळेवर झाले नसेल तर संबंधित अधिकाऱ्यांवर आपण कारवाई करणार काय?

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी केलेल्या सूचनेप्रमाणे कारवाई केली जाईल.

श्रीमती मंदा म्हात्रे : सभापती महोदय, विक्रमगड हा ठाणे जिल्हयातील दुष्काळी आदिवासी तालुका आहे. रोजगार हमी योजनेवर काम करणाऱ्या मजुरांचा तालुका आहे. या तालुक्यामध्ये मोठया प्रमाणावर कुपोषण आहे. म्हणून माझा असा प्रश्न आहे की, या विहिरीच्या कामाला सुरुवात केव्हा झाली? आज त्या विहिरीमधून लोकांना पाणी मिळत आहे काय?

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, विहिरीचे काम व्यवस्थितरित्या पूर्ण झाले असून विहिरीमधील पाणी लोक वापरीत आहेत.

-----

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**तारांकित प्रश्न क्रमांक 28454**

(सन्माननीय सदस्य अनुपस्थित)

--

**राज्यातील नागरी सहकारी बँकेतील संचालक मंडळाच्या गैरव्यवहाराबाबत**

(9) * 25379 **श्री. संजय दत्त , श्री. गोविंदराव आदिक , श्री. मुझफ्फर हुसेन सय्यद , श्रीमती सुधा जोशी , श्री. धनाजी साठे , श्री. रमेश निकोसे , प्रा. शरद पाटील , श्री. जयंत पाटील , श्री. सुधाकर गणगणे , श्री. जगन्नाथ शेवाळे , श्री. जितेंद्र आव्हाड** : सन्माननीय **सहकारमंत्री**पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यातील नागरी सहकारी बँकेतील बहुतांश संचालक मंडळाचे गैरव्यवहार, अनियमितता, नियमबाह्य कर्जवाटप, विनातारण कर्जवाटप करणे, ठेवीवर भरमसाट व्याजदर देणे, रिझर्व्ह बँकेने आखून दिलेल्या निकषांची पूर्तता न करणे अशा अनेक समस्यांचा अभ्यास करुन उपाययोजना सुचविण्यासाठी राज्य शासनाने समिती स्थापन केली, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, सदर समिती अंतर्गत राज्य शासनाने नागरी सहकारी बँकांमध्ये सुसुत्रता आणण्यासाठी कोणकोणती उपाययोजना करण्यात आली वा येत आहे,

(3) अद्याप कोणतीच उपाययोजना केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयप्रकाश दांडेगावकर डॉ. पतंगराव कदम यांच्याकरिता** : (1) होय.

(2) नागरी सहकारी बँकांमध्ये सुसुत्रता आणण्याकरीता "स्टेट लेवल टास्क फोर्स" कडून खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहे.

अ) राज्यातील दुर्बल परंतु सक्षम असलेल्या बँकांची परिस्थिती सुधारण्यासाठी कालबध्द कृती कार्यक्रम आखून देणे.

ब) दुर्बल बँकांचे दुसऱ्या मोठ्या नागरी बँकेत विलीनीकरण करण्याचा प्रयत्न करणे.

क) नागरी सहकारी बँकांचे क्षमता वाढविण्यासाठी माहिती तंत्रज्ञान पुरविणे.

ड) नागरी सहकारी बँकांच्या लेखापरीक्षणाबाबत सुधारणा घडवून आणणे.

इ) रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार नागरी बँकांच्या संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी यांची निवड / नियुक्ती करणे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.25379 (पुढे सुरु...

ई) TAFCUB ने केलेल्या शिफारशींच्या अंमलबजावणीसाठी रिझर्व्ह बँकेचे रिजनल डायरेक्टर, निबंधक आणि संबंधित नागरी सहकारी बँक हे एक स्वतंत्र MOU करतील. त्यानुसार एखाद्या नागरी सहकारी बँकेचे लायसन्स रद्द करणे किंवा नाकारणे याबाबत रिझर्व्ह बँक, निबंधकाशी सल्लामसलत करेल.

प) रिझर्व्ह बँकेच्या सूचनांनुसार नागरी बँकांवर निबंधक विनाविलंब कारवाई करतील.

TAFCUB च्या गेल्या दोन महिन्यात तीन बैठका झाल्या असून प्रत्येक बैठकीत अडचणीतील बँकांबाबत चर्चा करण्यात आलेली आहे. यापुढील बैठकीमध्ये पुढील कार्यवाहीची दिशा निश्चित करण्यात येईल.

(3) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, टॅफकब स्तरावर राज्यातील एकाही प्रतिनिधींना नेमण्यात आलेले नाही, हे खरे आहे काय ? गेल्या दोन महिन्यामध्ये टॅफकबच्या 3 बैठका झालेल्या आहेत. त्या बैठकीमध्ये कोणत्या विषयावर चर्चा करण्यात आलेली आहे, याची मंत्री महोदय माहिती देतील काय ?

श्री.जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, यामध्ये आरबीआयचे प्रादेशिक संचालक आहेत, राज्याच्या वतीने सहकार आयुक्त आणि राज्य शासनाचे देखील एक प्रतिनिधी आहेत. नागरी बँक फेडरेशनचे प्रतिनिधी, रिझर्व्ह बँकेच्या नागरी बँक विभागाचे प्रमुख आणि राज्य बँकेच्या फेडरेशनचे प्रतिनिधी असे या समितीमध्ये सदस्य आहेत. आतापर्यन्त या समितीच्या दोन बैठका झालेल्या आहेत. आपण जे व्हीजन डॉक्युमेंट स्वीकारलेले आहे, त्यामध्ये बँकांच्या ज्या अडचणी आहेत त्या दूर करणे, बॅकांचे विलीनीकरण करणे, सक्षमीकरण करणे, या सगळ्या गोष्टींचा विचार करण्यात येतो.

प्रा. शरद पाटील : सभापती महोदय, टॅफकबच्या माध्यमातून बँकांचे सक्षमीकरण करणे हा उद्देश आहे. या अडचणीमध्ये आलेल्या बँकांचे सक्षमीकरण करण्याबाबतचे स्वरूप काय आहे ? दुसरा प्रश्न असा आहे की, काही नागरी बँकांमध्ये गैरव्यवहार उघडकीस आल्यामुळे ठेवीदारांमध्ये सहकारी बँकांसंबंधी संशयाचे वातावरण निर्माण झलेले आहे. त्या बँकांमधील ठेवी मोठयाप्रमाणात काढल्या जात आहेत. त्या बँकांना आर्थिक सहाय्य करून त्या बँका सुरळीत, व्यवस्थित चालतील

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.25379 (पुढे सुरु...

प्रा.शरद पाटील (पुढे सुरू....

यादृष्टीने.. पाहिजे तर त्यांना व्याज आकारा पण त्यांना अर्थ सहाय्य करण्याची भूमिका स्वीकारणार अहात काय ?

श्री.जयप्रकाश दांडेगावकर : राज्यामध्ये साधारणत: 630 बँका आहेत. त्यापैकी अवसायानात गेलेल्या 16 बँका आहेत. कलम 102 खाली नोटीस दिलेल्या 227 बँका आहेत. तसेच ग्रेड 3,ग्रेड 4 च्या बँका 231 आहेत. या सगळ्या बँकांचा विचार करून त्या बँकांचे थकित कर्ज वसूल करणे, वेगळी उपाययोजना करणे, त्या बँकांचे काय करायचे, कोणता मार्ग काढायचा, त्यांचे विलीनीकरण करणे आणि त्यांचे सक्षमीकरण करणे, लोकांच्या ठेवी परत मिळविण्यासाठी मार्ग असेल तर त्या समितीमार्फत उपाययोजना केली जाणार आहे.

श्री.सुधाकर गणगणे : सभापती महोदय, राज्यातील नागरी बँकांची गैरव्यवहाराची प्रकरणे उघडकीस आल्यामुळे त्यांच्याबद्दलची लोकांमध्ये प्रतिमा वाईट झालेली आहे. टॅफकबमार्फत जे काम केले जाणार आहे ते किती कालावधीमध्ये पूर्ण करणार आहात ?

श्री.जयप्रकाश दांडेगावकर : काही बँकांमध्ये गैरव्यवहार झालेले आहेत. त्या संबंधाने शासनाच्या वतीने कलम 83 आणि 88 खाली कार्यवाही चालू आहे. समिती वरचेवर बैठका घेऊन बँकांची आर्थिक परिस्थिती सुधारण्याचे प्रयत्न चालू ठेवेल.

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 25379 ......

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, रिझर्व्ह बँकेच्या नवीन धोरणानुसार एनपीएच्या बाबतीत जे नियम आहेत त्यानुसार राज्यातील नागरी सहकारी बँकांना आपल्या वार्षिक अहवालामध्ये तरतूद करावी लागते. त्या तरतुदीमुळे बऱ्याचशा बँका तोट्यात चाललेल्या आहेत. महाराष्ट्र राज्यामध्ये अतिशय चांगल्या पध्दतीने चाललेल्या नागरी सहकारी बँका रिझर्व्ह बँकेच्या एनपीएच्या नवीन धोरणामुळे तसेच रिझर्व्ह बँकेने वेळावेळी व्याजदर कमी जास्त केल्यामुळे तोट्यात चाललेल्या आहेत. सन्माननीय सदस्य प्रा. शरद पाटील यांनी सांगितल्याप्रमाणे या बँकांना काही मदत करण्याच्या दृष्टीने राज्य शासन प्रयत्न करणार आहे काय ?

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : या बँका अगोदर सुध्दा अडचणीत होत्या. एनपीए केल्याने त्या किती अडचणीत आल्या हे पडताळण्याचे काम चालू आहे. त्यांना राज्य शासनाने मदत करण्यापेक्षा त्यांचे मजबूत बँकेमध्ये विलीनीकरण करुन त्या बँका कशा चालू राहतील, ठेवीदारांचे, सभासदांचे कसे नुकसान होणार नाही याबाबत ही समिती आणि शासन काळजी घेईल.

श्रीमती सुधा जोशी : सभापती महोदय, स्टेट लेव्हल टास्क फोर्स केव्हा स्थापन करण्यात आला आहे ? उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, दुर्बल बँकांचे दुसऱ्या मोठ्या नागरी बँकेत विलीनीकरण करण्याचा प्रयत्न करण्यात येईल. आतापर्यंत अशा दुर्बल बँकांचे विलीनीकरण करण्यात आले आहे काय ? असल्यास किती बँकांचे विलीनीकरण करण्यात आले आहे ?

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, डिसेंबर 2006 मध्ये हा टास्क फोर्स तयार करण्यात आलेला आहे. किती बँकांचे विलीनीकरण झालेले आहे याची माहिती घेऊन ती माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल.

डॉ. वसंत पवार : सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये 630 नागरी सहकारी बँका आहेत. चार वर्षापूर्वी प्रत्येक बँकेमध्ये नफा किती झाला याबाबतीत चढाओढ असावयाची. सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर साहेबांनी जो प्रश्न विचारला त्यासंदर्भात, एनपीएच्या नॉर्म्सच्या संदर्भात माझा प्रश्न आहे. जे कर्जदार शेतकरी आहेत त्यांच्या शेतीच्या पिकाची सायकल पाहिली तर ती 180 दिवसाची सायकल असते. पूर्वी 180 दिवसांचे एनपीएचे नॉर्म्स होते. आता ते नॉर्म्स 90



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 25379 ...... डॉ. वसंत पवार .....

दिवसांवर आणलेले आहेत. 90 दिवसांमध्ये कोणतीही मार्केटिंगची किंवा शेतीची सायकल फिरत नाही. त्यामुळे त्यांचे जे रिपेमेंट व्हावयास पाहिजे ते होत नाही. म्हणून रिझर्व्ह बँकेला महाराष्ट्र शासन एनपीएचे नॉर्म्स 90 दिवसांवरुन 180 दिवसांचे करण्यास सांगणार काय ?

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, तसे पाहिले तर नागरी सहकारी बँकांचा शेतीला पतपुरवठा कमी आहे. तरी सुध्दा 90 दिवसांऐवजी 180 दिवस करण्याबाबत राज्य शासनाने सांगितलेले आहे.

श्री. सुरेशदादा देशमुख : सभापती महोदय, कर्ज थकित झाल्यामुळे रिझर्व्ह बँकेचे निर्बंध आलेले आहेत. जे कर्जदार आहेत त्यांना वन टाईम सेटलमेंट करण्यासाठी प्रशासक नकार देतात. त्यामुळे त्याबाबत शासन प्रशासकांना आदेश देणार काय ? पहिल्यांदा जे कर्ज थकित झालेले आहे त्यामुळे रिझर्व्ह बँकेचे निर्बंध आलेले आहेत. त्यानंतर प्रशासक नेमण्यात आले. प्रशासक नेमल्यानंतर कर्जदार वन टाईम सेटलमेंट करण्यास तयार आहेत. त्याबाबत शासन काही निर्देश देणार आहे काय ?

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : वन टाईम सेटलमेंटची योजना यापूर्वी होती आणि परत तसे काही प्रस्ताव प्रशासकांकडून आले तर ते निकषांवर तपासून पाहून त्यांना परवानगी देण्यात येईल.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले की, शासन बँकांचे एकत्रीकरण करण्याचे धोरण राबवित आहे. ज्या बँकेने एकत्रीकरणाचा ठराव केलेला आहे त्याबाबत शासन शीघ्र गतीने काम करील काय ? ठेवीदारांच्या ठेवी सुरक्षित राहण्याच्या दृष्टीने बँकांचे एकत्रीकरण करण्यासाठी शासन वेगळा विभाग काढून एकत्रीकरणाची गती वाढवून दोन तीन महिन्यात हे काम पूर्ण करील काय ?

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देत असताना मी असे उत्तर दिले की, नागरी सहकारी बँकांना एनपीएमधून वाचविण्याच्या दृष्टीने त्यांचे मोठ्या बँकेमध्ये विलीनीकरण करण्याची योजना राबविण्याचे विचाराधीन आहे किंवा ती योजना राबवावी असा प्रयत्न चालू आहे.

यानंतर श्री. शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(ता.प्र.क्र.25379...

श्री. मधुकर सरपोतदार : मुंबईतील साऊथ इंडियन सहकारी बँक ही 2004 सालामध्ये बंद झाली. हजारो ठेवीदारांचे कोट्यवधी रुपये गेल्या तीन वर्षापासून या बँकेकडे आहेत. या बँकेचे पुष्कळसे ठेवीदार हे निवृत्त झालेले लोक असून ते सफर होत आहेत. त्याबाबतीत राज्य शासन काहीही करत नाही. एका बाजूला बँकाचे विलिनीकरण करु असे शासन सांगते आणि दुस-या बाजूला शासन या बँकांना कोणतीही मदत करीत नाही. तेव्हा साऊथ इंडियन सहकारी बँकेच्या संदर्भात शासनाची काय भूमिका आहे ?

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : शेवटी ज्या बँकेमध्ये विलिनीकरण करावयाचे असते त्या बँकेची सुध्दा त्यासाठी संमती असावी लागते. ज्या बँकेत विलिनीकरण करावयाचे त्या बँकेचा तोटा देखील विलिनीकरणामुळे वाढू शकतो. साऊथ इंडियन सहकारी बँकेच्या बाबतीत एक-दोन बैठका घेण्याचा प्रयत्न केला. आयुक्तांनी देखील बैठका घेण्याचा प्रयत्न केला. यामध्ये अडचण अशी होती की, राज्य सरकार आणि रिझर्व्ह बँके असे दुहेरी नियंत्रण होते. आता टास्क फोर्समुळे बँकेचे प्रतिनिधी, आयुक्तांचे प्रतिनिधी, फेडरेशनचे प्रतिनिधी यांच्या प्रयत्नातून मार्ग काढण्यात मदत होईल.

श्री. श्रीकांत जोशी : सगळया छोटया बँका मोठ्या बँकामध्ये विलीन केल्या जात आहेत. छोट्या बँका नॉनव्हायेबल होत चालल्या आहेत. नागरी सहकारी बँकांची क्षमता वाढविण्यासाठी त्यांना माहिती तंत्रज्ञान पुरविण्यासाठी फायनान्शियल बजेटिंग केलेले आहे काय ? छोट्या बँकांचे लेखा परीक्षण सुधारण्यासाठी त्यांना चांगल्या चार्टर्ड अकौण्टण्टकडून सल्ला देण्याची व्यवस्था केलेली आहे काय ? मोठा मासा ज्या प्रमाणे छोट्या माशाला गिळतो त्याप्रमाणे सरकार क्षेत्रातील छोट्या बँकांचे मोठ्या बँकेत विलिनीकरण न होत्या छोटया बँका जिवंत ठेवण्यासाठी शासन कोणती ठोस स्वरुपाची उपाययोजना करणार आहे ?

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : अडचणीत असलेल्या सहकारी बँकांना कोणत्याही प्रकारे पैसे दिले जात नाहीत. आता कमी जास्त व्याज देण्याच्या स्पर्धामुळे, कर्जाचे अनियमित वाटपामुळे काही बँका अडचणीत आलेल्या आहेत. ठेवीदारांचे नुकसान होऊ नये म्हणून या बँका सक्षम कशा होतील या दृष्टीने राज्य शासनाकडून प्रयत्न होत असतो.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(ता.प्र.क्र.25379...

प्रा. शरद पाटील : नागरी सहकारी बँकांना थकीत कर्जाच्या बाबतीत एक रकमी परत फेड योजनेची मुदत 31.3.2001 पर्यन्त होती. ही मुदत वाढविण्यात येईल काय ? नॅशनलाईज बँका आणि कमर्शियल बँकांच्या बाबतीत थकीत कर्जाची एक रकमी परत फेड योजना कायम स्वरुपी राबविण्यात येते. अशा प्रकारची कायम स्वरुपी परत फेड योजना नागरी सहकारी बँकांच्या बाबतीत राबविण्यात येईल काय ? सध्या राज्यामध्ये मोठ्या बँकांनी छोट्या छोट्या बँका ताब्यात घ्यायला सुरुवात केलेली आहे. छोट्या बँका ह्या स्थानिक आणि गरीब लोकांना कर्ज देण्याचे काम करीत असतात. या छोट्या बँकांचे मोठ्या बँकात विलिनीकरण केले तर गरीब माणसाला कर्ज मिळविणे शक्य होणार नाही. म्हणून या छोट्या बँका सक्षम करण्यासाठी राज्य शासन कोणते प्रयत्न करणार आहे ?

डॉ. पतंगराव कदम : छोट्या बँका मोठ्या बँकामध्ये विलीन करण्याचा कोणताही कार्यक्रम नाही. एकूण 630 नागरी सहकारी बँका आहेत. छोट्या बँका सक्षम व्हाव्यात या दृष्टीने राज्य शासनाकडून प्रयत्न केले जातात.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.25379.......... डॉ.पतंगराव कदम.....

जर त्यांच्या बोर्डाने किंवा जनरल बॉडीच्या सभासदांनी ठराव केला की, आमची बँक थकली आहे, आम्ही हे कार्य करु शकत नाही तर मग ज्याला ही बँक घ्यायची आहे त्यांचा ठराव पाहिजे, ज्या बँकेत विलिन करुन घ्यायची त्यांचा ठराव पाहिजे, त्याला विभागाची आणि रिझर्व्ह बँकेची मान्यता घ्यावी लागते. तरच तो ठराव पास होतो. शासनाला ही भूमिका नाईलाजाने घ्यावी लागते. जी बँक सर्व्हाईव्ह होऊ शकत नाही अशा बँकेतील ठेवीदारांचे हित जपले पाहिजे ही शासनाची भूमिका असते. साधारणपणे 630 पैकी 18 बँकांचा हा प्रश्न आहे. मघाशी सन्माननीय सदस्यांनी विचारले होते त्या संदर्भात सांगू इच्छितो की, रिझर्व्ह बँक त्यांना प्रशिक्षण देण्यामध्ये सर्व प्रकारच्या योजना राबवून तो खर्च तेच करणार आहेत. एन.पी.ए.च्या संदर्भात रिझर्व्ह बँकेची समिती आहे. त्या समितीमध्ये शासनाचे 2 प्रतिनिधी आहेत. फेडरेशनचा एक आणि नॅशनल फेडरेशनचा एक प्रतिनिधी आहे. मी स्वत: रिझर्व्ह बँकेच्या गव्हर्नरांशी बोललो व लेखी पत्र सरकारच्या वतीने दिले आहे. That is under consideration.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, या संदर्भात आपल्या दालनात तीन बैठका झाल्या. आपण स्वत: शेतकऱ्यांचे हित लक्षात घेऊन ओ.टी.एस.साठी प्रयत्न केले होते. परंतु तो निर्णय नंतर झाला नाही. सन्माननीय सदस्य श्री.शरद पाटील यांनी प्रश्न विचारला, 2001 नंतर ओ.टी.एस. योजना लागू केली जात नाही. त्यामुळे शेतकरी आत्महत्या करीत आहेत. सन्माननीय मंत्रीमहोदय म्हणाले की, 15 दिवसात निर्णय घेऊ. या प्रकरणी आपण पुढाकार घेऊन आज दोन वर्षे झाली तरी देखील निर्णय होत नसेल तर कठीण आहे. आपल्या दालनात तीन बैठका झाल्या तरी देखील ओ.टी.एस. 2001 पासून पुढे लागू होत नाही.

श्री.जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, ओ.टी.एस.साठी लघु आणि मध्यम उद्योगांसाठी 2004 पर्यंत मुदत वाढवून दिलेली आहे. यानंतर पुन्हा तसे प्रस्ताव आले तर मुदत वाढविता येईल.

श्री.दिवाकर रावते : मंत्रीमहोदय उद्योगाबाबत बोलत आहेत. शेतकऱ्यांचे काय?

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.25379..........

**सभापती** : सन्माननीय सदस्य सर्वश्री शरद पाटील व दिवाकर रावते यांच्या प्रश्नाचा रोख ओ.टी.एस.च्या अनुषंगाने असा आहे की, जी धोरणे राष्ट्रीयकृत बँकेच्या बाबतीत आहेत त्या पध्दतीचे धोरण नागरी सहकारी बँका, सहकारी बँका किंवा वित्तीय संस्थांबाबत असले पाहिजे. त्यामध्ये शेतकऱ्यांना प्राधान्य असले पाहिजे असे दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांचे मत आहे.

श्री.जयप्रकाश दांडेगावकर : सन्माननीय सदस्य सर्वश्री शरद पाटील व दिवाकर रावते यांच्या प्रश्नाबाबत उत्तर दिले आहे. नागरी बँकांबाबत 2001 पर्यंत सवलत होती, ती 2004 पर्यंत वाढवून दिलेली आहे. पुन्हा परिस्थिती पाहून आवश्यकता भासली तर 2005 पर्यंत किंवा 2006 पर्यंत वाढविण्यास शासनाला कोणतीही अडचण नाही.

श्री.दिवाकर रावते : मंत्रीमहोदयांनी लघु उद्योगांचा उल्लेख केला, शेतकऱ्यांचा उल्लेख केला नाही?

डॉ.पतंगराव कदम : जी लघु उद्योगांना सवलत दिली ती शेतकऱ्यांना चालू राहील. फक्त अर्बन बँका नव्हे तर जिल्हा बँकांना खास बाब म्हणून परवानगी दिलेली आहे.

प्रा.शरद पाटील : दिनांक 31.3.2001 पर्यंत सध्या नागरी बँकांच्या कर्जदारांना परतफेडीची सवलत आहे. ती सवलत 31.3.2004 पर्यंत थकित झालेल्या कर्जदारांना एकरकमी परतफेडीची सवलत मिळेल का?

श्री.जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, मी सांगितले आहे की, लघु आणि मध्यम उद्योगांसाठी ही सवलत वाढवून दिलेली आहे. सन्माननीय सदस्यांचा प्रश्न आहे त्याबाबत सुध्दा जरुर विचार करण्यात येईल.

श्री.मधुकर सरपोतदार : हे आदेश अद्याप बँकांना पोहोचलेले नाहीत?

**सभापती** : सन्माननीय मंत्रीमहोदय, या प्रश्नाबाबत सभागृहातील दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांची भावना अशी आहे की, शेतकरी पाहिजे आणि लघुउद्योगही पाहिजे.

डॉ.पतंगराव कदम : मी सांगितले, शेतकऱ्यांना लागू केली जाईल. ही मुदत पुन्हा दोन वर्षे वाढविली आहे. शासनाचे आदेश जवळ बाळगले जात नाहीत. ते आदेश बँकांना पोहोचतात.

------------------

नंतर श्री.जुन्नरे.....

अशुध्दित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

**कोकणातील खार जमिनीची दुरुस्ती करणेबाबत**

**(10) * 27042 श्री. संजय केळकर , श्री. विनोद तावडे , श्री. रामनाथ मोते** : सन्माननीय **खार जमिनीमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) ठाणे जिल्ह्यासह कोकणातील सर्व जिल्ह्यातील खार जमिनीचे उधाणामुळे होणारे नुकसान व धुप थांबणे यासंदर्भात खारभूमी योजनेअंतर्गत काही निर्णय झाला आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, या संदर्भात कोकणातील प्रत्येक जिल्हावार कशाप्रकारच्या योजना आखल्या आहेत व त्यास किती निधी प्रस्तावित करण्यात आला आहे,

(3) असल्यास, उक्त विकासकामांना कधी सुरुवात करण्यात येणार आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात** : (1) कोकणामधील समुद्र/खाडयांजवळील शेतीलायक खार जमिनीचे उधाणामुळे होणारे नुकसान टाळण्यासाठी महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र खारजमिनी अधिनियम 1979 पारित केलेला आहे.

(2) किनारी नियमन क्षेत्र 1991 मधून सुट मिळालेल्या कोकणातील ठाणे,रायगड, रत्नागिरी, सिंधुदूर्ग या चार जिल्ह्यात एकूण 575 योजना आहेत. यापैकी 357 योजना पूर्ण झालेल्या आहेत. नवीन व नुतनीकरणाच्या एकूण 50 योजनावर सन 2006-2007 मध्ये सुमारे रुपये 1324.02 लक्ष खर्च अपेक्षित आहे. सन 2007-2008 मध्ये 72 योजनांची कामे प्रस्तावित असून त्यास अंदाजे रुपये 1377.35 लक्ष निधी आवश्यक आहे. उर्वरीत 150 योजना भविष्यकालीन आहेत.

2006-2007 हया आर्थिक वर्षाचे जिल्हावार नियोजन :-

| **जिल्हा** | **योजना** | **आर्थिक तरतूद 2006-07 (रु.लक्ष)** |
|---|---|---|
| ठाणे | 9 | 200.65 |
| रायगड | 23 | 932.31 |
| रत्नागिरी | 8 | 49.12 |
| सिंधुदूर्ग | 10 | 141.94 |
| **एकूण** | **50** | **2324.02** |

सन 2007-2008 मध्ये 43 योजना चालू आहेत. व 29 योजना सन 2007-2008 नव्याने चालू करण्याचे नियोजन आहे. उर्वरित योजना हाती घेण्याच्या दृष्टीने सर्वेक्षण व अन्वेषण करुन अंदाजपत्रके तयार करण्याचे प्रस्तावित आहे.

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, मला आपल्या अनुमतीने उत्तरामध्ये थोडी दुरुस्ती करावयाची आहे. दोन नंबरच्या उत्तरामध्ये "... अंदाजे रुपये 1377.35 लक्ष निधी आवश्यक आहे, या ऐवजी "अंदाजे रुपये 1377.37 लक्ष निधी अपेक्षित आहे" असे वाचावे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. : 27042** .........

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, कोकणामध्ये खार जमिनीचे उधाणामुळे मोठया प्रमाणात नुकसान होत असते तसेच धूप थांबविण्याच्या संदर्भात या ठिकाणी जी माहिती दिलेली आहे त्यासंदर्भात मला माननीय मंत्रीमहोदयांच्या निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की, 1324.02 खर्च अपेक्षित आहे अशी उत्तरामध्ये त्यांनी सुधारणा केलेली आहे. परंतु उत्तराच्या खाली 2324.02 अशी एकूण आर्थिक तरतूद करण्यात येणार असल्याची माहिती दिलेली आहे. त्यामुळे 1324.02 ही आकडेवारी बरोबर आहे की, 2324.02 ही आकडेवारी बरोबर आहे.

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, 1324.02 ही माहिती बरोबर आहे.

**सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे.

--------

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी**.: बाभळी बंधा-याच्या कामासंदर्भात आंध्रप्रदेशच्या माननीय मुख्यमंत्र्यांनी महाराष्ट्राला उद्देशून अर्वाच्च भाषेत केलेली शिवीगाळ.

**मु.शी**.: बाभळी बंधा-याच्या कामासंदर्भात आंध्रप्रदेशच्या माननीय मुख्यमंत्र्यांनी महाराष्ट्राला उद्देशून अर्वाच्च भाषेत केलेली शिवीगाळ यासंबंधी माननीय मुख्यमंत्र्यांचे निवेदन.

श्री. विलासराव देशमुख ( मुख्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, बाभळी घटनेच्या संदर्भात आज सभागृहात शासनाकडून निवेदन करण्यात येणार होते......

श्री. विलासराव देशमुख : सभापती महोदय, बाभळी घटनेच्या संदर्भातील निवेदन करण्यासाठी मी उभा आहे. कालच मी या घटनेच्या संदर्भात स्टेटमेंट करण्याची परवानगी मागितली होती.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी निवेदन करण्याच्या आगोदर मी काही गोष्टी आपल्या निदर्शनास आणू इच्छितो. काल बाभळीच्या घटनेच्या संदर्भात माननीय उपमुख्यमंत्र्यांनी टी.व्ही. वर माहिती दिली होती की, आंध्रप्रदेशला पाणीच काय चिमुटभर माती सुध्दा देणार नाही. नांदेडमध्ये बिलोली तालुक्यात यसदा गाव आहे. या गावातून मांजरा नदी वाहत असते. या गावामध्ये आंध्रपदेशच्या सहा गावांना पाणी पुरवठयाच्या योजनांना परवानगी देण्यात आलेली आहे. त्यासाठी या नदीवर आंध्रप्रदेशने जलसिंचनाचे पंप बसलेले आहेत. यसदा हे गाव महाराष्ट्राच्या हद्दीमध्ये असतांनाही या ठिकाणावरुन आंध्रप्रदेशच्या सहा गावांना पाणी पुरवठा होतो आहे, खरे म्हणजे ही आमची व्यथा आहे. या ठिकाणी आंध्रप्रदेशने जलसिंचनाचे जे पंप बसविले आहेत त्याठिकाणी आंध्रप्रदेशच्या सरकारने संरक्षणासाठी काही पोलिसांची नेमणूक केलेली आहे आपल्या राज्याच्या हद्दीत आंध्रप्रदेशने अशा प्रकारे जे संरक्षण दिलेले आहे तो खरा म्हणजे गंभीर

....4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

गुन्हा आहे. त्यामुळे या ठिकाणी असलेल्या आंध्रप्रदेशच्या पोलिसांना त्वरीत अटक झाली पाहिजे. आंध्रप्रदेशला चिमूटभर माती देण्याचे तर सोडून द्या परंतु ते आपल्या हद्दीत येऊन आपले पाणी उचलत असल्यामुळे मांजरा नदी आता ओस पडत चालली आहे. त्यामुळे माननीय मुख्यमंत्र्यांनी या विषयाच्या संदर्भातील खुलासा आपल्या निवेदनात करावा अशी माझी विनंती आहे.

श्री. विलासराव देशमुख : सभापती महोदय, बाभळी घटनेच्या संदर्भातील निवेदन करण्यासाठी मी उभा आहे. कालच मी या घटनेच्या संदर्भात स्टेटमेंट करण्याची परवानगी मागितली होती. काल या सदनामध्ये आंध्रप्रदेशच्या मुख्यमंत्र्यांनी महाराष्ट्राबद्दल काही अपशब्द वापरले असे एका दैनिकात वृत्त छापून आले होते त्यामुळे या सदनाच्या दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांच्या भावना अतिशय तीव्र झाल्या होत्या. त्या संदर्भात सदनाने ठराव करुन आपल्या भावना आंध्रप्रदेश सरकारला कळवाव्यात अशा पध्दतीची चर्चा या ठिकाणी झाली होती. म्हणून त्यासंदर्भात काल मी सदनात सांगितले होते की, वस्तुस्थितीची सर्व माहिती जाणून घेऊ, त्यांनी जर अशा प्रकारचे अपशब्द आपल्या राज्याबद्दल किंवा मुख्यमंत्र्यांबद्दल वापरले असतील तर जो काही प्रस्ताव पारीत करावयाचा तो करु या. त्यासाठी आम्ही आपल्याकडून वेळ मागितला होता. यासंदर्भात मी स्वत: आंध्रप्रदेशच्या माननीय मुख्यमंत्र्यांना टेलिफोनवरून विचारले की, " तुम्ही अशा प्रकारचे अपशब्द वापरले हे येथील एका स्थानिक वृत्तपत्रात छापून आलेले आहे." त्यावेळेस त्यांनी मला सांगितले की, "मी महाराष्ट्राबद्दल किंवा महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांबद्दल कसलेही अनुद्गार काढलेले नाहीत." आंध्रप्रदेशच्या मुख्यमंत्र्यांनी या विषयाच्या संदर्भात एक प्रेस कॉन्फरन्स घेतली होती त्यासंदर्भातील मुलाखत हिंदू दैनिक या वृत्तपत्रातून छापून आलेली आहे.

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विलासराव देशमुख........

तसेच मी "डेक्कन हेराल्ड", "टाईम्स ऑफ इंडिया" या वृत्तपत्राची तसेच आंध प्रदेशातील एक अग्रगण्य दैनिक "इनाडू" या दैनिकांची कात्रणे मागविली. या प्रकरणासंबंधी दैनिक "इनाडू" या तेलगू वृत्तपत्रात आलेल्या बातमीचे भाषांतर करुन आंध्र प्रदेशच्या मुख्यमंत्र्यांनी नेमकी कोणती वक्तव्ये केली आहेत त्याची देखील माहिती घेतली. त्या बातमीमध्ये असा उल्लेख आहे की, माननीय मुख्यमंत्र्यांनी लाठीचार्ज झाला त्याचा निषेध केलेला आहे. पी.टी.आय.च्या बातमीमध्ये सुध्दा पोलिसांनी केलेल्या लाठीचार्जचा निषेध केलेला आहे असा उल्लेख आहे. पुढे असे म्हटलेले आहे की, या प्रकरणी आम्ही माननीय पंतप्रधानांकडे दाद मागणार आहोत. या प्रकरणासंबंधातील इतर वृत्तपत्रात आलेल्या बातम्या देखील मी वाचलेल्या आहेत, त्या बातम्यांमध्ये सुध्दा लाठीचार्ज झ ालेल्या घटनेचा निषेध केलेला आहे. बंधाऱ्याच्या बांधकामाबाबत माननीय पंतप्रधानांकडे दाद मागणार आहोत अशाप्रकारचे वृत्त आहे. या प्रकरणी संपूर्ण तपासणी केल्यानंतर ही बाब पुढे लांबविण्याची आवश्यकता नाही. तेव्हा माझी सदनाला विनंती आहे की, आपण हा विषय येथेच थांबवू या.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय उपमुख्यमंत्र्यांनी सांगितले की, आम्ही चिमूटभर माती सुध्दा देणार नाही त्याबाबत माननीय मुख्यमंत्र्यांनी आम्हाला काहीही सांगितले नाही.

श्री.विलासराव देशमुख : या संदर्भात माननीय उपमुख्यमंत्री निवेदन करतील.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आंध्र प्रदेशचे पोलीस आपल्या हद्दीत येऊन नदीवर बसविलेल्या पंपाचे रक्षण करीत आहेत. तेव्हा त्यांना अटक करणार काय ?

श्री.विलासराव देशमुख : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जो मुद्दा उपस्थित केलेला आहे त्याबाबत चौकशी करण्यात येऊन योग्य ती कार्यवाही केली जाईल.

---------------------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

श्री.धर्मरावबाबा आत्राम ( परिवहन राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचा सन 2004-2005 चा प्रशासन अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : प्रशासन अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आला आहे.

----------

श्री.बाबा सिद्दीकी ( कामगार राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने धातू ( लोखंड व पोलाद वगळून ) आणि दुकाने माथाडी कामगार मंडळाचा सन 1996-97, 1997-98, 1998-99 चा चोविसावा, पंचविसावा व सव्वीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले.

-----------

श्री.बाबा सिद्दीकी : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने माथाडी व असंरक्षित कामगार मंडळाचा ( नागपूर ) सन 1987-88, 1988-89, 1989-90, 1990-91, 1991-92, 1992-93 व 1994-95 चा चौदावा, पंधरावा, सोळावा, सतरावा, अठरावा, एकोणिसावा, विसावा व एकविसावा वार्षिक अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

श्री.प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, कामगार मंडळाचे सन 19987-88, 1988-89 इत्यादी वर्षाचे अहवाल सन 2007 मध्ये म्हणजे 20 वर्षानंतर ठेवण्यात आलेले आहेत. आम्ही 20 वर्षापूर्वीचे अहवाल वाचून त्यावर प्रतिक्रिया द्यायची काय ?

**सभापती** : अहवाल तातडीने सभागृहासमोर येण्याच्या दृष्टीने सन्माननीय मंत्रिमहोदयांनी लक्ष द्यावे.

श्री.बाबा सिद्दीकी : होय.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहेत.

-------------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: लेखी उत्तरे

**मु.शी.**: पूरक मागणी 2006-2007 मधील पुरवणी मागणी बाब क्रमांक 121 च्या संदर्भात अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे

श्री.सुरेश शेट्टी (उच्च तंत्रशिक्षण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने शुक्रवार दिनांक 23 मार्च 2007 रोजी सन 2006-2007 या वर्षाच्या पुरवणी मागण्यांवरील चर्चेदरम्यान उच्च व तंत्र शिक्षण विभागाशी संबंधित बाब क्रमांक 121 च्या संदर्भात दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : आश्वासनाची अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली आहे.

( प्रेस : अधिक माहिती छापावी. )

---------------

यानंतर श्री.पुरी.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: अशासकीय विधेयके व ठराव समितीचे प्रतिवृत्त सादर करणे.

श्री.अरविंद सावंत (समिती सदस्य ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अशासकीय विधेयके व ठराव समितीचे प्रतिवृत्त सादर करतो.

शुक्रवार, दिनांक 13 एप्रिल, 2007 रोजीच्या कामकाजाच्या क्रमात दाखविण्यात येणाऱ्या अशासकीय ठरावांना द्यावयाचा वेळ ठरविण्याकरिता गुरुवार, दिनांक 12 एप्रिल,2007 रोजी समितीची बैठक झाली. अशासकीय कामकाजासाठी एकूण 150 मिनिटांचा वेळ उपलब्ध आहे. सदर वेळ खालीलप्रमाणे ठरावांना देण्यात यावा, अशी शिफारस समितीने केली आहे.

(1) ठराव क्रमांक 96 -- प्रा.फौजिया खान, वि.प.स. 50 मिनिटांपेक्षा जास्त नाही.

(2) ठराव क्रमांक 22 -- श्री.मधुकर चव्हाण, वि.प.स. 50 मिनिटांपेक्षा जास्त नाही.

(3) ठराव क्रमांक 123 - श्री.विक्रम काळे, वि.प.स. 50 मिनिटांपेक्षा जास्त नाही.

यापैकी कोणत्याही ठरावाचा वेळ वाचल्यास तो त्यापुढील क्रमांकाच्या ठरावास देण्यात यावा अशीही शिफारस समितीने केली आहे.

**सभापती** : अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचा अहवाल सभागृहास सादर झाला आहे.

श्री.अरविंद सावंत : महोदय, अशासकीय विधेयके व ठराव समितीचा अहवाल सभागृहाला संमत आहे असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

-----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**औचित्याचे मुद्दे**

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, अतिशय दुर्दैवी मुद्दा मी औचित्याच्या मुद्याच्या माध्यमातून उपस्थित करीत आहे. मी यापूर्वीही हा मुद्दा अर्थसंकल्पीय भाषणाच्यावेळी उपस्थित केला होता. अंधेरी येथील पूर्वेकडील तेलीगल्लीतील "साईसृष्टी" इमारतीत मोहिनी, वय 22 व गौरव, वय 13 अशा दोन अपंग मुले राहतात. ती दोन्हीही मुले विकलांग असून ते शिक्षण घेत आहेत. त्यांना ये-जा करण्याच्या दृष्टीने त्यांच्या आई-वडिलांनी स्वखर्चाने एक रॅम्प बांधला होता. परंतु त्या सोसायटीच्या पदाधिकाऱ्यांनी इमारतीच्या ब्युटीशिअनच्या नावाखाली तो रॅम्प काढून टाकला. मी पूर्वी ज्यावेळी हा मुद्दा मांडला होता, त्यावेळी याबाबत माननीय सामाजिक न्याय मंत्री श्री.चंद्रकांत हंडोरे यांनी तात्काळ दखल घेऊन ॲक्शन घेतली व रॅम्प बांधण्याच्या सूचना दिल्या, त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. परंतु हा जो रॅम्प बांधण्यात आलेला आहे, तो व्यवस्थित बांधलेला नाही. कारण, व्हीलचेअर खाली येण्याच्या दृष्टीने ॲंगल व्यवस्थित बांधलेला नाही. त्यामुळे त्या अपंग मुलांना फारच त्रास होत आहे. त्यांची व्हीलचेअर खाली सरकेल अशाप्रकारे त्याठिकाणी स्लोप बांधला आहे, त्यामुळे आणखी अपघात होण्याचा संभव आहे. त्यामुळे याबाबतीत माझी माननीय मंत्री महोदयांना विनंती आहे की, आपण याबाबत न्याय दिलेला आहे परंतु तो न्याय आणखी व्यवस्थित द्यावा व "साईसृष्टी"च्या मग्रूर पदाधिकाऱ्यांना बोलावून अपंगांच्या नॉर्म्सप्रमाणे नवीन रॅम्प बांधावा, अशा सूचना द्याव्यात, अशी माझी औचित्याच्या मुद्दांमार्फत विनंती आहे.

श्री.चंद्रकांत हंडोरे (सामाजिक न्याय मंत्री) : सभापती महोदय, रॅम्प व्यवस्थित बांधण्याच्या दृष्टीने आयुक्तांना सूचना देण्यात येईल व हे काम लवकरात लवकर करुन घेण्यात येईल.

-----

..3....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश निकोसे : सभापती महोदय, कालच महात्मा जोतिबा फुले यांची जयंती साजरी झ ाली. मिळालेल्या माहितीनुसार महात्मा जोतिबा फुले यांचे स्मारक त्यांच्या गावी बांधण्यात आले. परंतु त्या गावी परिवहन महामंडळाची साधी बसही जात नाही. महात्मा जोतिबा फुले हे क्रांतीवादी होते. त्यांनी बेरोजगारांना हक्क मिळवून देण्यासाठी संघर्ष केला. त्यांचे कार्य लक्षात घेता, त्यांच्या गावामध्ये साधी बसही जात नाही, हे योग्य नाही. आज ते गाव पूर्णपणे अंधारात आहेत. तेथील ग्रामपंचायत फारच तुटपुंजी व्यवस्था करत आहे. आज त्याठिकाणी पाण्याची व विजेची सोय नाही. आज त्याठिकाणी जाण्यासाठी साधा रस्ताही व्यवस्थित नाही. त्यामुळे त्यांच्या स्मारकांकडे लक्ष देऊन शासनाने तेथील समस्यांचीही सोय करावी, ही नम्र विनंती.

श्री.चंद्रकांत हंडोरे : सभापती महोदय, याबाबतची नोंद घेण्यात आली आहे.

---------

नंतर कु. गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, माझा पुढील प्रमाणे औचित्याचा मुद्दा आहे. कोल्हापूर येथील वजनमापे निरिक्षक श्री. कुडाळकर यांनी कोल्हापूरमध्ये भ्रष्टाचाराचा थैमान मांडला असून त्यामुळे व्यापारी वर्गात असंतोष पसरलेला आहे.

वजनमापे निरिक्षक श्री. कुडाळकर हे एजंटामार्फत दुकानदारांच्या काटयाचे प्रामाणिकरण करण्याची सक्ती दुकानदारांवर करतात व त्यात ते रु. 50 ऐवजी रुपये 500 अशी फी घेतात. त्यांच्या विरुध्द व्यापाऱ्यांमध्ये, दुकानदारांमध्ये असंतोष आहे. या संदर्भात तातडीने चौकशी करुन त्यांची त्वरीत बदली करावी व त्यांना निलंबित करण्यात यावे. तसेच त्यांच्या मालमत्तेची देखील चौकशी करण्यात यावी.

श्री. बाळासाहेब थोरात (कृषी मंत्री) : नोंद घेण्यात आली आहे.

................

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, माझा असा औचित्याचा मुद्दा आहे की, अंध अपंग संस्थामध्ये काम करणारे सुमारे 1200 शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आहेत . त्यांच्या विविध मागण्यांच्या संदर्भात काल पासून धरणे आंदोलन सुर करण्यात आले होते.या बाबतीत सन्माननीय मंत्री महोदयांनी जी कारवाई करणे आवश्यक होती. ती कारवाई करण्यात आलेली नाही. या सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी आपल्या मागण्या मांडण्यासाठी आझाद मैदान येथे धरणे आंदोलन सुरु केलेले आहे. सभापती महोदय हे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत कामे करीत आहेत. मी आपल्या माध्यमातून मंत्रीमहोदयांना विनंती करु इच्छितो की, या कर्मचाऱ्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी जे आंदोलन सुरु झालेले आहे त्याबाबत त्यांनी ताबडतोबीने लक्ष द्यावे.

श्री बाळासाहेब थोरात : नोंद घेण्यात आली आहे.

......................



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गोपिकिशन बाजोरिया : सभापती महोदय, मी औचित्याच्या माध्यमातून सभागृहाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ शासन अंगिकृत यांची कंपनी महाराष्ट्र इन्सेक्टीसाईड कंपनी, शिवनी अकोला येथील कारखान्यामध्ये 84 कामगार 23 वर्षापासून काम करीत आहेत. दि. 1.09.2005 पासून कामगारांना कोणत्याही प्रकारची पूर्व सूचना न देता कामावरुन काढून टाकण्यात आले आहे. याबाबत कामगार संघटनेने स्थानिक व्यवस्थापनास तसेच वरिष्ठ व्यवस्थापन कार्यकारी संचालक डॉ. प्रदीपकुमार व्यास यांच्यासोबत अनेक वेळा चर्चा केल्या आहेत. तरी सुध्दा वरील विषयाबाबत कोणत्याही प्रकारचा विचार केला गेला नाही. त्यामुळे येथील कामगार संधटनेने दि 22.03.2007 ला नोटीस देवून दि. 29.03.2007 पासून कारखान्याच्या गेटसमोर पाच कामगारांच्या जोडीने आमरण उपोषणास बसाले लागले असून पाच कामगारांची जोडीने आमरण उपोषणास बसावे लागले असून पाच कामगारांची प्रकृती खालावलयामुळे त्यांना सामान्य रुग्णालयात भरती केले असून त्यांची प्रकृती चिंताजनक आहे व नंतर लगेच दुसरे पाच कामगार आमरण उपोषणाला बसलेअसून आमरण उपोषणाचा आज 15 वा दिवस सुरु आहे. तरी सुध्दा स्थानिक व्यवस्थापनाने व वरिष्ठ व्यवस्थापनाने त्यांच्या मागण्यांवर काहीही विचार केलेला नाही. ही बाब अतिशय चिंताजनक आहे. त्यामुळे कामगारांमध्ये तीव्र रोष व्यक्त होत आहे. त्याकरिता वरील विषयाबाबत तात्काळ निर्णय कामगारांना न्याय मिळवून द्यावा अशी विनंती मी औचित्याच्या मुद्दयाद्वारे माननीय मंत्रीमहोदयांना करीत आहे.

**सभापती** : अंध व अपंग संस्थेमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांबाबत संबंधित मंत्र्यानी लक्ष द्यावे.

श्री. बाळासाहेब थोरात : नोंद घेण्यात आलेली आहे.

.................

यानंता श्री. रोझेकर.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने खालीलप्रमाणे औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे :-

सभापती महोदय, राज्याच्या अंतर्गत संरक्षणाची संपूर्ण जबाबदारी पोलीस खात्यावर आहे. मुंबईच्या पोलिसांची तुलना ही स्कॉटलंड यार्डच्या पोलिसांशी करण्यात येते, ही महत्वाची बाब आहे. असे जरी असले तरी गेल्या तीन वर्षात मुंबई पोलीस दलातील 500 पोलीस कर्मचारी विविध आजारांनी मृत्युमुखी पडले असल्याची खळबळजनक माहिती मुंबईचे सह पोलीस आयुक्त यांनी दिली आहे. सन 2004 मध्ये 166, सन 2005 मध्ये 177, सन 2006 मध्ये 158, सन 2007 च्या तीन महिन्यात 18 लोकांचा मृत्यू ताणतणाव, ह्रदयविकार, विविध आजार, इत्यादिंमुळे झाला असल्याने पोलीस दलात चिंतेचे वातावरण आहे. कामाचा ताण, 8 तासाहून अधिक जवळपास 14 ते 16 तास डयुटी, नियमित साप्ताहिक सुटीचा अभाव, त्यांची वर्किंग कंडिशन, 50 टक्केहून अधिक पोलिसांच्या निवासस्थानाचा प्रश्न इत्यादी कारणांचा देखील विचार करण्याची गरज आहे.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी औचित्याचा मुद्दा थोडक्यात मांडावा. औचित्याचा मुद्दा एक ते दीड मिनिटात मांडला पाहिजे.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, चोरी, दरोडा, खून, मारामारी, दंगली, बॉम्बस्फोट, या घटनांची जबाबदारी पोलिसांवर येते आणि पोलिसांना टीकेचे लक्ष बनविले जाते. पण पोलीस देखील माणूसच आहे. याचा विचार करुन त्यांचे उत्तम आरोग्य कसे राहिल, त्यांच्या निवासस्थानाचा प्रश्न, कामाच्या तासांचा प्रश्न, वेतनवाढीचा प्रश्न यांचा शासनाने प्राधान्याने विचार करण्याची गरज आहे.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांना मी पुन्हा एकदा सांगू इच्छितो की, औचित्याचा मुद्दा मांडण्यासाठी मी त्यांना केवळ दीड मिनिट दिले आहे.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, मी औचित्याच्या मुद्याचा शेवट करतो आहे. पोलीस दल अधिक प्रभावीपणे व कार्यक्षमतेने काम करु शकेल या अत्यंत महत्वाच्या विषयाबाबत मी या औचित्याच्या मुद्याव्दारे मंत्री महोदयांचे लक्ष वेधत आहे. संबंधित खात्याचे सन्माननीय मंत्री सभागृहात उपस्थित आहेत. त्यांनी कृपया या मुद्याची दखल घ्यावी.

..2.........



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : माननीय गृह राज्यमंत्र्यांनी या बाबीची दखल घ्यावी.

श्री.सिद्धाराम म्हेत्रे (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, होय.

-----------------

..3..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: नियम 93 अन्वये सूचना

**सभापती** : माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, जगदीश गुप्ता, वि.प.स.यांनी "अकोला जिल्हा परिषदेमधील प्राथमिक व माध्यमिक अपंग शिक्षकांची भरती खोटी प्रमाणपत्रे देऊन केल्याप्रकरणी संबंधितांविरुध्द अद्यापपावेतो चौकशी वा कारवाई न केल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सर्वश्री जगदीश गुप्ता, नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, वि.प.स.यांनी "मौजे भाईंदर, ता.व जि.ठाणे येथील सर्व्हे नं.103 या जमिनीवरुन हुसकावून लावण्यासाठी सदर जमिनीवरील आदिवासीला जीवे मारण्याची धमकी बिल्डरने दिल्याबाबत जिल्हा पोलीस अधीक्षक यांचेकडे केलेल्या तक्रारीबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर माननीय सदस्य श्री.सुरेश जेथलिया, वि.प.स. यांनी "शासनाच्या कामाचे वाटप करताना मंजूर संस्था व बेरोजगार अभियंते यांना प्रत्येकी 33 टक्के व खुल्या स्पर्धेतून कंत्राटदारांना 34 टक्के असे काम वाटपाचे सूत्र असताना शासनाने कामाचे वाटप मर्जीतील संस्थांना केल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर माननीय सदस्य श्री जयंत प्र.पाटील, प्रा.शरद पाटील, वि.प.स. यांनी "सेव्हन अप, पेप्सी, मिरिंडा, ऑरेंज या शीतपेयांच्या सिलबंद कॅनमध्ये घोषित केलेल्या मापापेक्षा कमी शीतपेय आढळून आल्याने वैधमापन शास्त्र विभागाने रोहा येथील पेप्सीको इंडिया, होल्डिंग इंडिया या कंपनीची विविध प्रकारची 15 लाख 24 हजार रुपयांच ी शीतपेये धाड टाकून जप्त केल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

..4.........



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर माननीय सदस्य सर्वश्री मधुकर चव्हाण, विनोद तावडे, संजय केळकर, वि.प.स. यानी "एलफिस्टन रोड (मुंबई) येथील बाबू गेनू कामगार क्रीडा केंद्राच्या जलतरण तलावाशेजारी बांधण्यात आलेल्या 33 मजली व्यापारी संकुलामुळे कामगार क्रीडा मंडळ व जलतरण तलावाचे आस्तित्व धोक्यात आल्याबाबत"या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे, नितीन गडकरी, मधुकर चव्हाण, रामनाथ मोते, संजय केळकर, वि.प.स. यांनी "दिनांक 5-2-2007 रोजी माटुंगा येथील सेनापती बापट मार्गावरील अखिल भारतीय विद्यार्थी परिषद संघटनेच्या कार्यालयावर सदर परिसरातील दलालांनी गुंडाकरवी सशस्त्र हल्ला केल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

इतर सर्व सूचनांना मी दालनात अनुमती नाकारली आहे.

------------------

यानंतर कुमारी जयश्री..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

JPK/ MHM/ KGS/ प्रथम श्री.रोझेकर..... 13:25

**( सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

**नियम 93 अन्वयेच्या निवेदन क्रमांक 1 बाबत.**

**उपसभापती** : आता आपण नियम 93 अन्वयेच्या निवेदनावर चर्चा करु.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, शालेय शिक्षण मंत्री आणि राज्यमंत्री दोघेही सभागृहामध्ये उपस्थित नाहीत.

श्री.जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, हे निवेदन सभागृहामध्ये तिस-यांदा चर्चेसाठी आले आणि माननीय मंत्रिमहोदय उपस्थित नाहीत.

**उपसभापती** : माननीय मंत्रिमहोदय सभागृहात उपस्थित होईपर्यंत आपण वाट बघू. सबंधित मंत्रिमहोदयांना बोलाविण्यात यावे.

----------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: सोलापूर विणकर सहकारी सूत गिरणी व यशवंत विणकर सहकारी सूत गिरणी अवसायानात निघालेल्या असतांनादेखील दोन्ही सूतगिरण्यांतील कामगारांना देणी न मिळणे.

**मु.शी.**: सोलापूर विणकर सहकारी सूत गिरणी व यशवंत विणकर सहकारी सूत गिरणी अवसायानात निघालेल्या असतांनादेखील दोन्ही सूतगिरण्यांतील कामगारांना देणी न मिळणे याबाबत प्रा.शरद पाटील,श्री.जयंत प्र. पाटील,वि.प.स.यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.जयप्रकाश दांडेगावकर (वस्त्रोद्योग राज्यमंत्री ) : अध्यक्ष महोदय,प्रा.शरद पाटील,श्री.जयंत प्र.पाटील यांनी "सोलापूर विणकर सहकारी सूत गिरणी व यशवंत विणकर सहकारी सूत गिरणी अवसायानात निघालेल्या असतांनादेखील दोन्ही सूतगिरण्यांतील कामगारांना त्यांच्या थकित रकमा न मिळणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून,आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.शरद पाटील : सोलापूर विणकर सहकारी सूत गिरणी व यशवंत विणकर सहकारी सूत गिरणी या दोन सूत गिरण्यांविषयीचा हा प्रश्न आहे. या दोन गिरण्या सन 2000 पासून बंद आहेत,यामुळे जवळपास 3,000 कामगार देशोधडीला लागलेले आहेत. सदर गिरण्या सुरु करण्यासाठी राज्य सहकारी बँकांच्या माध्यमातून प्रयत्न झाला होता, त्यांना अर्थसहाय्यही उपलब्ध करुन देण्यात आले होते, परंतु या गिरण्या फार काळ चालू शकल्या नाहीत. 2006 साली मुख्यमंत्र्यांनी या गिरण्या अवसायानात काढण्यासंबंधीचा आदेश दिलेला असतांना व अवसायानाची प्रक्रिया जवळपास पूर्ण झालेली असतांना देखील अद्यापही त्या अवसायानाच्या प्रक्रियेला शासनाने मान्यता दिलेली नाही, ही मान्यता देण्यासंबंधी विलंब होण्याचे कारण काय आहे? शासन त्वरित अवसायानाच्या प्रक्रियेला मान्यता देऊन कामगारांचे थकलेले पैसे ताबडतोबीने देण्यासंबंधीची व्यवस्था करेल का ?

श्री.जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, उक्त गिरण्यांबाबत अवसायानाची प्रक्रिया चालू आहे. गिरणी विक्रीच्या निविदा मागविल्या व फेरनिविदाही मागाविल्या फेरनिविदेमध्ये असे आढळून आले की, तुलनात्मकदृष्टया दोन्हीही गिरणींची किमंत कमी आलेली आहे. शासनाकडे याबाबत एक प्रस्ताव आलेला आहे, या प्रस्तावाबाबत शासन लवकरात लवकर निर्णय घेऊन कामगारांची देणी देण्याचा नक्की प्रयत्न करेल.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, या ठिकाणी निवेदनात असे म्हटलेले आहे की, 95 कामगारांचा मृत्यू झालेला आहे. 1272 आणि 1660 कामगारांपैकी किती कामगार जिवंत आहेत, याची शासनाने चौकशी केली का ? मृत पावलेले 95 कामगार आत्महत्या करुन मृत पावले की, भूकबळीमुळे त्यांनी प्राण गमावले याची शासनाने चौकशी करावयाला विलंब का लावला ?

श्री.जयप्रकाश दांडेगावकर : याबाबतही शासन लवकरात लवकर चौकशी करेल. अवसायानाची कार्यवाही लवकरात लवकर पूर्ण करुन तसेच, गिरणी विक्रीची प्रक्रिया पूर्ण करुन कामगारांची थकित देणी देण्यात येतील.

प्रा.शरद पाटील : सभापती महोदय, हा तीन हजार कामगारांच्या जीवनमरणाचा प्रश्न आहे.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य आपण निवेदनावर एकच प्रश्न विचारतो आपण दोन - तीन प्रश्न विचारत आहात.

------

JJ - 4

12-04-2007 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही ) JJ - 4

JPK/ MHM/ KGS/ 13:25

**पृ.शी.**: राज्यातील ढासळत चाललेली कायदा व सुव्यवस्था.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मु.शी.**: राज्यातील ढासळत चाललेली कायदा व सुव्यवस्था याबाबत सर्वश्री.श्रीकांत जोशी, वि.प.स. दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे ( गृह राज्यमंत्री ) : अध्यक्ष महोदय, श्री.श्रीकांत जोशी वि.प.स. यांनी राज्यातील ढासळत चाललेली कायदा व सुव्यवस्था या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून,आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना आगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही





श्री.श्रीकांत जोशी : सभापती महोदय, या निवेदनावरुन पोलीसच जनतेची लूट करीत आहेत हे सिध्द झालेले आहे. अशा पध्दतीने ब-याच प्रसंगी पोलीस अधिकारीच जनतेला व उद्योजकांना

लुटण्याचे काम करीत आहेत.  चार पोलीस अधिका-यांनी दिवसाढवळया एका ट्रक चालकाला अडवून त्याच्या खिशातून 6,000 रुपये काढून घेतल्याचा प्रकार घडलेला आहे, तेथील काही नागरिक मदतीला आल्यावर ट्रकचालक अपघात करुन पळाल्याचे खोटे सांगितले गेले होते. मी त्या शहरात जाणारा एक लोकप्रतिनिधी आहे म्हणून मी हे सर्व अत्यंत जबाबदारीने सांगत आहे.  अशा प्रकारे पोलीस अधिका-यांची संख्या वाढत आहे, या घटनेस जबाबदार असलेले वाहतूक पोलीस निरीक्षक काय करीत होते ? या वाहतूक पोलीस निरीक्षकास सरकार निलंबित करणार का ? सदर गुन्हयाच्या तपासाअंतर्गत अटक केलेल्या पोलीस शिपायावर कोणती कारवाई केली जाणार आहे ?

यानंतर श्री.बोरले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.श्रीकांत जोशी .........

पोलीस लोकांना लुटत आहेत, हे सिद्ध झालेले आहे. ज्या पोलीस अधिका-याने निष्काळजीपणा करुन आरोपीला पळून जाण्यास मदत केली, त्या पोलीस अधिका-याला निलंबित करुन औरंगाबादच्या या संपूर्ण प्रकरणाची डी.जी. लेव्हलच्या अधिका-याकडून चौकशी करुन माननीय मंत्री महोदय सभागृहाला अहवाल सादर करतील काय ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, या प्रकरणातील चारही पोलीस कर्मचा-यांना भरतीय संविधानाच्या अनुच्छेद 311 (2) (ब) अन्वये निलंबित करण्यात आले आहे. दोन खाजगी व्यक्तींना अटक करण्यात आली आहे. सर्व आरोपी जेलमध्ये आहेत. जलसंपदा विभागाच्या कर्मचा-याला देखील निलंबित करण्यात आले आहे. सन्माननीय सदस्य श्री.श्रीकांत जोशी यांनी हा प्रकार घडत असतांना वरिष्ठ पोलीस अधिकारी काय करीत होते ? असा प्रश्न विचारला. पोलीस दलामध्ये आणि वाहतूक शाखेमध्ये काय चालते याची उच्च पातळीवरील अधिका-यांकडून चौकशी करण्यात येईल आणि चौकशीचा अहवाल सभागृहाला सादर करण्यात येईल.

---------

..2.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : वालीव ता.वसई, जि.ठाणे येथील दीपक शर्मा या युवकाला डॉक्टरांच्या चुकीच्या उपचारामुळे दृष्टी गमवावी लागणे.

**मु. शी.** : वालीव ता.वसई, जि.ठाणे येथील दीपक शर्मा या युवकाला डॉक्टरांच्या चुकीच्या उपचारामुळे दृष्टी गमवावी लागणे याबाबत डॉ.नीलम गो-हे, श्री.अरविंद सावंत, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.सुरेश शेट्टी (वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गो-हे, सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनी "वालीव ता.वसई, जि.ठाणे येथील दीपक शर्मा या युवकाला डॉक्टरांच्या चुकीच्या उपचारामुळे दृष्टी गमवावी लागणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

--------

..3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, ही अत्यंत गंभीर अशी बाब आहे. 16 वर्षे वयाच्या कुमार दीपक शर्मा याला एका बोगस डॉक्टरच्या इलाजामुळे आपली दृष्टी गमवावी लागली. माझा प्रश्न असा आहे की, त्या डॉक्टरला अटक करुन त्याच्यावर कोणते कलम लावण्यात आले आहे, अभय क्लिनिक बंद करण्यात आले आहे काय आणि तो डॉक्टर आता अटकेमध्ये आहे की, सुटलेला आहे ?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, डॉ.जयनेंद्रबहादूर अभयनारायण सिंग याला दिनांक 22 मार्च, 2007 रोजी अटक करण्यात आली आहे. त्याच्यावर भारतीय दंड विधान संहिता कलम 326 सह महाराष्ट्र मेडिकल प्रॅक्टीशनर्स ॲक्ट 33 व 36 अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्याला कोर्टाने जामीन मंजूर केल्यामुळे तो सुटला होता. त्यानंतर त्याने पुन्हा प्रक्टीस सुरु केली होती. पोलिसांनी त्याला 10 तारखेला पुन्हा अटक केलेली आहे. तो डॉक्टर आता पोलीस कस्टडीमध्ये आहे.

---------

..4........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : खोलखेड, ता.खामगांव, जि.बुलढाणा येथे ऑगस्ट, 2006 मध्ये झ ाालेल्या अतिवृष्टी व पुरातील आपद्ग्रस्तांना मिळालेल्या मदतीत सरपंच आणि त्यांच्या वडीलांनी केलेला गैरव्यवहार.

**मु. शी.** : खोलखेड, ता.खामगांव, जि.बुलढाणा येथे ऑगस्ट, 2006 मध्ये झ ाालेल्या अतिवृष्टी व पुरातील आपद्ग्रस्तांना मिळालेल्या मदतीत सरपंच आणि त्यांच्या वडीलांनी केलेला गैरव्यवहार याबाबत सर्वश्री पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, जगदीश गुप्ता, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे (गृह राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, जगदीश गुप्ता यांनी "खोलखेड, ता.खामगांव, जि.बुलढाणा येथे ऑगस्ट, 2006 मध्ये झालेल्या अतिवृष्टी व पुरातील आपद्ग्रस्तांना मिळालेल्या मदतीत सरपंच आणि त्यांच्या वडीलांनी केलेला गैरव्यवहार" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

--------

..5.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, ऑगस्ट, 2006 मध्ये बुलढाणा जिल्हयातील खामगांव येथे महापूर आणि अतिवृष्टी झाली होती. त्यावेळी अनुदानाचे वाटप करण्यात आले त्यासंदर्भात ही नियम 93 ची सूचना देण्यात आलेली आहे. नियम 93 च्या सूचनेला दिलेल्या निवेदनाच्या शेवटच्या परिच्छेदामध्ये असे म्हटलेले आहे की, "अनुदानाचे वाटप झाल्यानंतर गावात लाभार्थी व सरपंच व त्यांचे वडील यांच्यात पैसे देवाण-घेवाणीचा आपापसातील व्यवहार झालेला आहे....." शासनाने हे मान्य केलेले आहे. घरकुलांसाठी शासनाने लाभार्थ्यांना अनुदान दिले. ग्रामपंचायतीमध्ये लाभार्थ्यांना अनुदानाचे वाटप करण्यात आले होते. मला साहेबांना पार्टी द्यावी लागते, पेट्रोलसाठी खर्च येतो असे सरपंचांनी लाभार्थ्यांना सांगून त्यांच्याकडून प्रत्येकी 100 रुपये घेतले. त्यानंतर सरपंचांच्या वडीलांनी प्रत्येक लाभार्थ्यांकडे 500 रुपयांची मागणी केली, त्यांना दम दिला. महसूल विभागाच्या नायब तहसिलदाराने या प्रकरणाची चौकशी केलेली आहे. लाभार्थ्यांकडे पैशांची मागणी केल्याचे चौकशीमध्ये स्पष्ट झालेले आहे. 18 लाभार्थ्यांनी साक्ष दिलेली आहे. सरपंचांनी पार्टी आणि पेट्रोलसाठी 100 रुपये आणि सरपंचांच्या वडीलांनी 500 रुपये लाभार्थ्यांकडून त्यांना धमकी देऊन घेतलेले आहेत, असा माझ्याकडे अहवाल आहे. महसूल विभागाने त्यांच्यावर कारवाई न करता हे प्रकरण गट विकास अधिका-याकडे पाठवून दिले.

(यानंतर श्री.गागरे .......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर .....

माझी मंत्री महोदयांना विनती आहे की, या प्रकरणी कारवाई करण्यात आल्याचे तुमच्या निवेदनात सांगितले आहे. नायब तहसीलदारांचा रिपोर्ट माझ्या हातात आहे, त्यांनी सदर व्यवहार झाल्याचे मान्य केलेले आहे. आरोपी असलेल्या सरपंचावर कारवाई झालेली नाही. याबाबत शासनाकडे दिनांक 21.8.2006 रोजी अहवाल पाठवून दिला आहे, तेव्हापासून आजपर्यंत शासनाने कार्यवाही केलेली नाही. माझा स्पेसिफिक प्रश्न आहे की, अतिवृष्टी व पुरामुळे खामगाव तालुक्यातील अनेक कुटुंबे निराधार झालेली असताना, त्यांना शासनाकडून देण्यात येणाऱ्या अनुदानातून तेथील सरपंच आणि त्यांच्या वडीलांनी 100-100 रुपये घेऊन वापरले आहेत, पार्टी देण्यासाठी हे पैसे वसूल केले असे सांगण्यात आले. काही केसेसमध्ये सरपंच आणि त्यांच्या वडिलांनी 500-500 रुपये वसूल केले. हे सिध्द झाले असले तरी त्यांच्यावर कोणत्याही प्रकारची कारवाई झालेली नाही.

सभापती महोदय, हा प्रश्न जिल्हा परिषद व पंचायत समितीशी संबंधित आहे. या प्रकरणात तेथील सरपंचांनी आणि त्यांच्या वडीलांनी पैसे घेतले आहेत हा आपल्याच विभागाचा अहवाल आहे. 15 दिवसाच्या आत तेथील सरपंच आणि त्यांच्या वडिलांकडून पैसे वसूल करण्याबाबत पोलिसांच्या माध्यमातून कारवाई करणार का ?

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी सांगितल्याप्रमाणे खामगाव तालुक्यातील खोलखेड गावामध्ये हे प्रकरण घडलेले आहे. अनुदानाच्या वाटपामधील गैरव्यवहाराचे हे प्रकरण आहे. विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी तेथील वस्तुस्थिती सांगितली आहे. अनुदानाचे वाटप झाल्यानंतर गावात लाभार्थी व सरपंच व त्यांचे वडील यांच्या पैसे देवाणघेवाणीचा आपआपसातील व्यवहार झालेला आहे, असे नायब तहसीलदार यांच्या चौकशीत निदर्शनास आले आहे. सदर व्यवहार हा घरकुलाबाबत असल्याने व सदर व्यवहार महसूल विभागाच्या अधिकारी कर्मचारी यांच्याशी संबंधित नसल्याने तहसीलदार, खामगाव यांनी सदर तक्रार अर्ज पुढील कार्यवाहीसाठी गट विकास अधिकारी, पंचायत समिती खामगाव यांच्याकडे पाठविला आहे. या प्रकरणी गट विकास अधिकारी, पंचायत समिती खामगाव यांच्यामार्फत चौकशी करण्यात येत असून चौकशीत जे दोषी आढळतील त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल.

---------

.....2

12-04-2007 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही ) LL-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: मुंबई व महाराष्ट्रात जुलै 2005 मध्ये अतिवृष्टीमुळे निर्माण झालेल्या पूरपरिस्थितीच्या वेळी मदत वाटपात झालेले दुर्लक्ष व गैरप्रकार.

**मु.शी.**: मुंबई व महाराष्ट्रात जुलै 2005 मध्ये अतिवृष्टीमुळे निर्माण झालेल्या पूरपरिस्थितीच्या वेळी मदत वाटपात झालेले दुर्लक्ष व गैरप्रकार याबाबत सर्वश्री विनोद तावडे, मधुकर चव्हाण, गुरुमुख जगवानी, नितीन गडकरी, संजय केळकर, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

डॉ.राजेंद्र शिंगणे (पुनर्वसन व मदतकार्य राज्यमंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री विनोद तावडे, मधुकर चव्हाण, गुरुमुख जगवानी, नितीन गडकरी, संजय केळकर, वि.प.स. यांनी "मुंबई व महाराष्ट्रात जुलै 2005 मध्ये अतिवृष्टीमुळे निर्माण झालेल्या पूरपरिस्थितीच्या वेळी मदत वाटपात झालेले दुर्लक्ष व गैरप्रकार" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, जुलै 2005 च्या अतिवृष्टीमुळे निर्माण झालेल्या पूरपरिस्थितीमध्ये जी मदत वाटप करण्यात आलेली आहे, त्यासबंधी या सभागृहामध्ये खूप चर्चा झालेली आहे व चर्चेच्या वेळी सामाजिक न्याय मंत्री श्री.चंद्रकांत हंडोरे यांनी चौकशी करु असे सांगितले होते, त्याचे पुढे काय झाले ?

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, निवेदनातील प्रश्न व माननीय सदस्यांनी विचारलेले प्रश्न वेगवेगळे आहेत. याबाबत मी सांगू इच्छितो की, मागील वर्षी मुंबईमध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे झालेल्या पूरपरिस्थितीमुळे मोठया प्रमाणावर मदत वाटली आहे. या मदतीमध्ये अनेक गैरप्रकार व भ्रष्टाचार झाला असल्याची तक्रार करण्यात आली आहे. त्यावेळी मी सभागृहात उपस्थित होतो, या प्रकरणाची चौकशी करण्याचे आदेश देण्यात आलेले आहेत, याबाबतचा चौकशी अहवाल प्राप्त झाल्यानंतर सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल.

--------

यानंतर श्री.सुंबरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : शासन सेवेतील अपंगांचा अनुशेष भरणे.

**मु.शी.** : शासन सेवेतील अपंगांचा अनुशेष भरणे याबाबत
डॉ.दीपक सावंत,वि.प.स. यांनी नियम 93 अन्वये दिलेली सूचना.

---

श्री.धर्मरावबाबा आत्राम (सामाजिक न्याय राज्यमंत्री) : अध्य□ महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यां□ ' शासन सेवेतील अपंगांचा अनुशेष भरणे ' विषयावर □ि□म 93 अ□ये जी सूच□ दिली होती, तिला अ□ु□□□, आप□ □ि□ेश दिल्याप्रमा□ मला □ि□ेद□ □रावयाचे आहे. □ि□ेद□च्या प्रती सदस्यां□ अ□ेदरच वितरीत □ेल्या असल्या□ मी हे □ि□ेद□ सभा□ृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेद□सभा□ृहाच्या पटलावर ठेव□ांत आले आहे.

<u>**□ि□ेद□**</u>

( प्रेस : येथे सोबतचे □ि□ेद□छापावे )

....... एमएम 2 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( नियम 93 अन्वये मा.सामाजिक न्याय मंत्र्यांच्या निवेदनानंतर ... )

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, अपंगांच्या बाबतीतील हे अत्यंत महत्त्वाचे असे निवेदन आहे. तेव्हा या संदर्भात माझा पहिला प्रश्न असा आहे की, अपंगांच्या जनगणनेनुसार राज्यामध्ये अपंगांची संख्या किती आहे ? या निवेदनामध्ये ती माहिती दिलेली नाही. परंतु माझ्या माहितीनुसार ही संख्या जवळपास 15 लाख इतकी असावी. परंतु मंत्री महोदयांनी त्याबाबतची निश्चित माहिती येथे द्यावी ही विनंती. तसेच दुसरा प्रश्न असा आहे की, शासकीय सेवेतील अपंगांची अनेक पदे न भरल्यामुळे इतरही अनेक पदे भरली जात नाहीत, भरता येत नव्हती. आता निवेदनामध्ये आपण म्हटले आहे की, राज्या4त विविध प्रशासकीय विभागांतर्गत अपंगांसाठी 9531 पदे आरक्षित आहेत आणि त्यापैकी 7780 पदे भरण्यात आली असून उर्वरित अनुशेष भरण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. तेव्हा जनगणनेनुसार अपंगांची संख्या किती आहे ? तसेच अपंगांसाठी आरक्षित असलेली पदे न भरल्यामुळे त्यातील किती पदे व्यपगत झाली आहेत आणि उर्वरित पदे किती दिवसात आपण भरणार आहात ?

श्री. धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, जनगणनेनुसार अपंगांची लोकसंख्या किती आहे याचा नेमका आकडा आता माझ्याकडे उपलब्ध नसल्याने मी तो सांगू शकत नाही. मात्र सन्माननीय सदस्यांनी ही संख्या 15 हजार असल्याचे जे म्हटले आहे ते मी मान्य करतो. सभापती महोदय, सध्या शासनाच्या विविध प्रशासकीय विभागांतर्गत अपंगांसाठी 9531 पदे आरक्षित असून त्यापैकी 1731 पदे अजून भरावयाची आहेत आणि ती पदे भरण्याबाबत सचिव पातळीवर फॉलोअप चालू आहे. त्यासाठी विविध विभागांना, जिल्हाधिकाऱ्यांना, विविध महामंडळांना देखील ही पदे भरण्याच्याबाबत आपण आदेश दिले असून ही पदे भरण्याचे काम प्रगतीपथावर आहे. येथे सांगितल्याप्रमाणे अपंगांची 7780 पदे गेल्या दोन वर्षात भरण्याचे काम आपण केले असून राहिलेली पदे देखील लवकरच भरण्यात येतील.

डॉ. दीपक सावंत : पण आपण ही पदे न भरल्यामुळे किती पदे व्यपगत झाली आहेत ?

श्री. धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, ही माहिती आता माझ्याकडे उपलब्ध नाही, पण ती माहिती मी नंतर पटलावर ठेवीन.

****

....... एमएम 3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : इयत्ता 10 वीच्या परीक्षेत इतिहास-नागरिकशास्त्र विषयाची प्रश्नपत्रिका सोडविण्यासाठी नियमापेक्षा कमी वेळ दिला जाणे.

**मु.शी.** : इयत्ता 10 वीच्या परीक्षेत इतिहास-नागरिकशास्त्र विषयाची प्रश्नपत्रिका सोडविण्यासाठी नियमापेक्षा कमी वेळ दिला गेल्या-बाबत डॉ.नीलम गोऱ्हे, सर्वश्री जयंत प्र.पाटील व कपिल पाटील, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

----

श्री. हसन मुश्रीफ (शालेय शिक्षण राज्यमंत्री) : अध्य□ महोदय, सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे, सर्वश्री जयंत प्र.पाटील व कपिल पाटील यां□ी "इयत्ता 10 वीच्या परीक्षेत इतिहास-नागरिकशास्त्र विषयाची प्रश्नपत्रिका सोडविण्यासाठी नियमापेक्षा कमी वेळ दिला जाणे " या विषयावर □ियम 93 अ□वये जी सूच□ा दिली होती, तिला अ□ुल□ू□ आप□ □िदेश दिल्याप्रमा□ मला □िवेद□ □रावयाचे आहे. □िवेद□ाच्या प्रती सदस्यां□ा अ□ोदरच वितरीत □ेलेल्या असल्या□ मी हे □िवेद□ सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : □िवेद□ सभागृहाच्या पटलावर ठेव□यांत आले आहे.

**□िवेद□**

( प्रेस : येथे सोबतचे □िवेद□ छापावे )

..... एमएम 4 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( नियम 93 अन्वये मा.शालेय शिक्षण राज्यमंत्र्यांच्या निवेदनानंतर ...)

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, माझा केवळ एकच प्रश्न आहे आणि त्यावर माननीय मंत्री महोदयांकडून मला नेमक्या उत्तराची अपेक्षा आहे. हजारो मुलांच्या दृष्टीने हा महत्त्वाचा प्रश्न आहे. आपण या निवेदनामध्येच इतिहास-नागरिकशास्त्र या विषयाची प्रश्नपत्रिका सोडविण्यासाठी प्रश्नपत्रिकेवर कमी वेळ छापला गेला असल्याचे मान्य केलेले आहे आणि त्यामुळे अनेक परीक्षा केंद्रांवर मुलांना पेपर सोडविण्यासाठी कमी वेळ मिळाला आहे ही वस्तुस्थिती आहे. हे लक्षात घेऊन त्या विद्यार्थ्यांना दिलासा देण्यासाठी तेवढे गुण आपण अधिकचे देणार आहात का ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, 2006-07 च्या या परीक्षेमध्ये आपण 150 गुणांची प्रश्नपत्रिका 100 गुणांची केली. त्यामध्ये इतिहास आणि नागरिकशास्त्र यासाठी 50 गुण ....

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, प्रश्नपत्रिकेवर कमी वेळ छापला गेला आहे हे या उत्तरात आपण मान्य केलेले आहे आणि अनेक केंद्रांमधून विद्यार्थ्यांना त्या कमी वेळातच पेपर सोडवावा लागला आहे. याला तीन महिन्यांचा काळ गेला आहे .... तेव्हा बाकी काही न सांगता नेमके उत्तर माननीय मंत्री महोदयांनी द्यावे ...

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, इतिहास-नागरिकशास्त्र विषयाच्या प्रश्नपत्रिकेवर अडीच तासाऐवजी 2 तासाची वेळ छापली गेली होती हे खरे आहे. परंतु त्यासाठी मुळातच सगळ्यांना मास पब्लिसिटी करून, म्हणजे नोटीस बोर्डावर वेळापत्रक लावणे वगैरे पद्धतीने सर्व विद्यार्थ्यांना कळविले होते की, ही परीक्षा अडीच तासांची आहे. मात्र सदरच्या प्रश्नपत्रिकेवर अडीच तासाऐवजी 2 तास असे छापले गेले होते. असे असले तरी हा 100 गुणांचा पेपर होता आणि विद्यार्थ्यांना मूळ वेळापत्रकानुसारच पेपर सोडविण्यासाठी वेळ दिला गेलेला होता. तेव्हा दोन तास अशी वेळ छापली गेली असली तरी त्याचा परिणाम झालेला नव्हता.

**उपसभापती** : या निवेदनावरील चर्चा मी येथे थांबवित आहे. यानंतर पुढील नियम 93 खालील निवेदन क्र. 8 घेण्यात येईल. परंतु सन्माननीय सदस्य उपस्थित नसल्याने ते नंतर घेण्यात येईल.

***

..... एमएम 5 ..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

<u>**लक्षवेधी सूचनांबाबत** .....</u>

**उपसभापती** : यानंतर लक्षवेधी सूचना चर्चेला घेण्यात येतील.

काही सन्माननीय सदस्य : सभापती महोदय, लक्षवेधी सुचनांवरील निवेदने आम्हाला वितरित करण्यात आलेली नाहीत. तर मग आम्ही यावर चर्चा कशी काय करू शकणार ?

**उपसभापती** : ठीक आहे. सभागृहाची बैठक मी 2.00 वाजेपर्यंत स्थगित करतो. तो पर्यंत सर्व सदस्यांना लक्षवेधी सूचनांवरील निवेदन वितरित करण्यात यावीत.

सभागृहाची बैठक 1.44 वाजता, 2.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)**

**नियम 93 अन्वयेच्या निवेदनाबाबत**

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, लक्षवेधी सूचना घेण्यापूर्वी माननीय सदस्य प्रा. बी.टी. देशमुख यांनी दिलेल्या नियम 93 च्या सूचनेवरील निवेदन प्राप्त झाले असून ते अगोदर चर्चेला घेण्यात यावे अशी माझी विनंती आहे.

**उपसभापती** : ठीक आहे.

**पृ.शी.**: पाटबंधारे विकास क्षेत्रासाठी निधीचे समन्वय वाटप करणारे
माननीय राज्यपालांचे निदेश

**मु.शी.**: पाटबंधारे विकास क्षेत्रासाठी निधीचे समन्वय वाटप करणारे माननीय राज्यपालांचे
निदेश याबाबत सन्माननीय सदस्य सर्वश्री बी.टी. देशमुख, पांडुरंग फुंडकर,
नितीन गडकरी, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. जयंत पाटील (अर्थ मंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री प्रा. बी. टी. देशमुख, पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी यांनी पाटबंधारे विकास क्षेत्रासाठी निधीचे समन्वय वाटप करणारे माननीय राज्यपालांचे निदेश" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. आपल्या अनुमतीने छापील निवेदनामध्ये पुढील वाक्य समाविष्ट करीत आहे "विदर्भ व मराठवाडयातील पाटबंधारे प्रकल्पांकरिता प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार संबंधित पाटबंधारे विकास मंडळांना देण्याचा निर्णय घेण्यात आला असून त्याबाबतचे शासकीय आदेश आज रोजी निगमित करण्यात आले आहेत". निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने वरील दुरुस्तीसह मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी. टी.देशमुख : सभापती महोदय, या सभागृहाचा, माननीय सभापतींचा व माननीय उपसभापतींचा मी मनापासून आभारी आहे. एक अतिशय महत्वाचा प्रश्न निकालात निघाला आहे. त्याबद्दल मी माननीय अर्थमंत्र्यांना धन्यवाद देतो. महाराष्ट्राच्या इतिहासामध्ये अत्यंत खोल अशाप्रकारची जखम आमच्या भागामध्ये गेले कित्येक दिवस जाणवत होती. आपल्यावर हे संकट कसे आले अशी भावना होती. लोकांना मी नेहमी सांगत असतो की, या सभागृहामार्फत अनेक प्रश्न सुटू शकतात. माननीय सभापतींनी याकरिता सभागृहाची बैठक तहकूब करण्याची भूमिका घेतली होती. आणि माननीय अर्थमंत्र्यांनी समाधानकारक असे निवेदन केले असल्यामुळे मला यावर प्रश्न विचारावयाचे नाहीत.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, नियम 93 च्या सूचनेवरील निवेदनामध्ये विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र पाटबंधारे विकास महामंडळाचा उल्लेख आहे. परंतु माननीय अर्थमंत्र्यांनी निवेदनामध्ये दुरुस्ती करीत असमतांना फक्त विदर्भ आणि मराठवाडयाचा उल्लेख केला आहे.त्यामध्ये उर्वरित महाराष्ट्राचा उल्लेख केला नाही. तेव्हा जो जी.आर. निघाला आहे त्यामध्ये उर्वरित महाराष्ट्राचा उल्लेख आहे की नाही?

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, कायद्याशी सुसंगत असे निवेदन केलेले आहे. कायद्यामध्ये जे नाही ते निवेदनामध्ये नाही.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आज खऱ्या अर्थाने बऱ्याच काळापासून सुरु असलेला संघर्ष संपुष्टात आला आहे. विदर्भ आणि मराठवाडयातील जनतेला प्रामाणिकपणे न्याय देण्याचे काम शासनाने केले आहे. या प्रश्नावर या सभागृहामध्ये वर्षानुवर्षे लढाई सुरु होती. विदर्भ, मराठवाडयातील जनतेवर होत असलेला अन्याय दूर करण्यासाठी या सभागृहाने आणि माननीय सभापतींनी सहकार्य दिले त्याबद्दल माननीय सभापतींना धन्यवाद देतो. मात्र मनामध्ये असलेली एक शंका याठिकाणी व्यक्त करावीशी वाटते. मार्च महिन्याच्या शेवटी हे आदेश निर्गमित झाल्यामुळे हा निधी विदर्भ व पाटबंधारे विकास मंडळाच्या माध्यमातून इतरत्र वळविला जाईल की काय अशी शंकेची पाल मनामध्ये चुकचुकते. तेव्हा त्याबाबत शाश्वती देणार आहात काय?

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, विदर्भ व मराठवाडयाचा अनुशेष दूर करण्यासाठी हे शासन कटिबध्द आहे. परवा मार्च महिना संपला आहे. त्यामुळे अशाप्रकारचा कोणताही निधी कोणत्याही भागामध्ये वळविण्यात आलेला नाही. या अगोदर वळविण्यात आला असला तरी हे



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत पाटील...

फायनान्शिअल ॲब्रेशन भरुन काढण्याबाबत माननीय राज्यपालांनी सूचना दिल्या आहेत. त्यांचे तंतोतंत पालन या वर्षी करण्याचे काम झाले आहे.त्यामुळे अशाप्रकारचा निधी वळविण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत पाटील (पुढे सुरू...

विदर्भ आणि मराठवाड्याचा जो अनुशेष आहे, तो लवकर भरून काढावा यासाठी कालच विधानसभेमध्ये जलसंधारण मंत्र्यांनी घोषणा केलेली आहे. बॅकलॉग भरून काढण्याचा आमचा निर्धार आहे. पुढच्या तीन वर्षात अनुशेषाचा कॉन्टम बराच कमी करण्याचा शासनाचा प्रयत्न आहे.

---

**औचित्याचा मुद्दा**

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, आता अर्थमंत्री महोदय येथे उपस्थित आहेत. मागच्यावेळेला नासिक येथील गारपिटीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना मदत करण्याबाबतचा विषय चर्चेला आलेला होता. त्यावेळेला शासनाने या विषयावर निवेदन केलेले होते. नासिकचे पालकमंत्री माननीय श्री.भुजबळ साहेब यांनी या विषयावर शेतकऱ्यांच्या प्रतिनिधींची बैठक घेऊन मदत करण्याचा निर्णय घेतला परंतु अजूनपर्यन्त शेतकऱ्यांपर्यन्त मदत पोहोचलेली नाही. याला शासकीय यंत्रणेकडून उशीर होत आहे. परवा 31 मार्चला शेतकऱ्यांवर बँकांच्या वसुलीचा प्रचंड दबाव होता. शेतकऱ्यांकडे पैसे नाहीत. 100 टक्के श्रीमंत बागायतदारांचे नुकसान झालेले आहे. या संदर्भात त्यांना मदत देण्याचे शासनाने मान्य केलेले आहे. तेव्हा पुढच्या 15-20 दिवसामध्ये ही मदत पोहोचली तर 31 मार्चपर्यन्तची जी सवलत आहे ती त्यांना मिळू शकते. ही मदत त्यांना किती दिवसामध्ये मिळणार आहे ?

श्री.जयंत पाटील : नासिक जिल्ह्याचे पालक मंत्री या संबंधाने सतत पाठपुरावा करत आहेत. त्याबाबतचा प्रस्ताव मंत्रिमंडळापुढे या आठवड्यात येऊन, त्यावर अंतिम निर्णय होईल. ज्या धटकांना मदत पोहोचविण्याचे काम आहे ते काम किमान 20 ते 25 दिवसापर्यन्त व्हावे, अशी अपेक्षा आहे.

--

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## लक्षवेधी सूचनांसंबंधी

श्री.प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, काल कामकाजपत्रिकेमध्ये दुसऱ्या क्रमांकावर व्ही.जे.एन.टी.च्या आरक्षणाच्या संदर्भात लक्षवेधी सूचना होती. काल माननीय सभापतींनी आपल्या दालनामध्ये असे सांगितले होते की, उद्या म्हणजे आज पहिल्या क्रमांकावर ती घेतली जाईल परंतु आजच्या कामकाज पत्रिकेत ही लक्षवेधी सूचनाच दाखविलेली नाही. शासन याबाबतचे उत्तर देण्याच्या मन:स्थितीत नाही असे समजायचे काय ? आता अधिवेशनामधील शेवटचा टप्पा आहे तेव्हा ही लक्षवेधी सूचना केव्हा घेतली जाणार आहे ?

**उपसभापती** : लक्षवेधी सूचनेवर निवेदन करण्यास उशीर झालेला आहे. सरकार निवेदन करण्याच्या मन:स्थितीत नाही असे नाही. हे अधिवेशन संपण्यापूर्वी ही लक्षवेधी सूचना पहिल्या क्रमांकावर येईल. दोन-तीन दिवसामध्ये यासंबंधीचे निवेदन प्राप्त होईल.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

3....

**पृ. शी.** : महाड-पोलादपूर येथील बाजारपेठेत गॅस सिलिंडरचे झालेले स्फोट

**मु. शी.** : महाड-पोलादपूर येथील बाजारपेठेत गॅस सिलिंडरचे झालेले स्फोट यासंबंधी श्री.भास्कर जाधव, प्रा.फौजियाखान ,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.भास्कर जाधव (रायगड तथा रत्नागिरी तथा सिंधुदुर्ग स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय उप मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"दिनांक 15 फेब्रुवारी, 2007 रोजी महाड-पोलादपूर येथील बाजारपेठेत एकामागोमाग एक असे 20 गॅस सिलिंडरचे झालेले स्फोट आणि त्यांनतर उसळलेल्या अग्निप्रलयात व्यापाऱ्यांचे तसेच नागरीकांचे झालेले कोट्यावधी रुपयांचे नुकसान, तेथील रहिवाशी बेघर होऊन त्यांच्या कुटुंबियांवर ओढवलेली उपासमारीची पाळी, परिणामी त्यांच्यात पसरलेला तीव्र असंतोष, अग्निप्रलयात उद्ध्वस्त झालेल्या आपदग्रस्तांना आर्थिक मदत तातडीने मिळण्याबाबत त्यांनी केलेली मागणी, यावर शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना."

श्री.सिध्दाराम म्हेत्रे ( गृह राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो. असे करीत असताना मी आपल्या अनुमतीने निवेदनामध्ये थोडी दुरुस्ती करू इच्छितो. निवेदनाच्या शेवटी "नुकसानग्रस्तांना आज दिनांक 12-4-2007 रोजी मुख्यमंत्री निधीतून 10 लाख रुपये अर्थसहाय्य मंजूर करण्यात आले आहे.", असे वाचावे.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, ही लक्षवेधी सूचना आणण्यामागे माझा हेतू केवळ एखादी सामान्य आग लागल्यानंतर ज्या पध्दतीने सानुग्रह अनुदान देतो किंवा ज्याचे घर जळाले असेल त्यांना जसे 4800 रुपये दिले जातात एवढ्या पुरता किंवा एखाद्या व्यावसायिकाचे नुकसान होते एवढ्यापुरता मर्यादित नाही. त्या ठिकाणी शासनाचा कर नियमतपणे भरणारे व्यापारी पूर्णपणे उद्‌ध्वस्त झालेले आहेत. बाजारपेठ पूर्णपणे जळून खाक झालेली आहे. या निवेदनामध्ये म्हटल्याप्रमाणे 4 कोटी 32 लाख, 69 हजार 300 रुपयांचे प्रचंड नुकसान झालेले आहे. ही सरकारी आकडेवारी आहे. प्रत्यक्षात हे नुकसान साडेआठ ते नऊ कोटीपर्यंत गेलेले आहे. माननीय मंत्रिमहोदयांनी निवेदनामध्ये सुधारणा करुन अधिकची माहिती देताना सांगितले की, मुख्यमंत्री निधीतून व्यापाऱ्यांना 10 लाख रुपये दिले आहेत. यासंदर्भात माझे महत्वाचे दोन प्रश्न आहेत. श्री. सुधारक जवाहर उर्फ काळुराम शेठ आणि संतोष जवाहर उर्फ काळुराम शेठ, ज्यांच्या घरामध्ये सिलेंडर सापडले, ज्यांच्या घरामध्ये स्फोट झाले त्यांना अटकपूर्व जामीन मिळण्याची संधी दिलेली आहे. ते सिलेंडर कोठून आले ? ज्यांनी अशा पध्दतीने बेकायदेशीरपणे सिलेंडर दिले त्यांच्यावर शासनाने काय कारवाई केली ? त्यांची एजन्सी रद्द केली काय ? पोलीस स्टेशनपासून काही पावलांवर असलेली ही बाजारपेठ आहे. वर्षानुवर्षे पोलिसांचे आणि सिलेंडर ठेवणाऱ्या माणसाचे संबंध होते म्हणून त्यांना वाचविण्याकरिता पोलिसांनी त्यांना अटक न करता अटकपूर्व जामीन मिळण्याची संधी दिली. ज्यांची सिलेंडरची एजन्सी आहे त्यांना अटक केली नाही म्हणून संबंधित अधिकाऱ्याला निलंबित करण्याची कारवाई शासन करणार काय ? तेथील जे संबंधित पोलीस अधिकारी आहेत त्यांच्यावर शासन काय कारवाई करणार ? हे कर भरणारे व्यापारी आहेत. एखादा गोठा किंवा घर जळाले तर महसूल विभागाच्या स्थायी आदेशाप्रमाणे त्यांना पैसे देतो. त्याच्या व्यतिरिक्त शासन म्हणून त्यांना दीर्घ मुदतीचे बिनव्याजी कर्ज मिळवून देऊन ही बाजारपेठ उभी करण्याचा प्रयत्न करणार काय ? मुख्यमंत्री निधीतून 10 लाख रुपये दिलेले आहेत. त्यामध्ये आणखी किमान 50 लाख रुपयांची भर घालणार काय ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, या घटनेला जे जबाबदार आहेत, ज्यांच्या घरामध्ये आणि दुकानाच्या बाजूला स्फोट झाले त्या श्री. सुधाकर शेठ आणि संतोष शेठ या दोघांना अटक करण्यात आली होती. हे गॅस सिलेंडर कोठून आणले याबाबत त्यांच्याकडे चौकशी केली असता

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MHM/

श्री. सिध्दाराम म्हेत्रे ....

त्यांनी असे सांगितले की, महाड येथील गॅस एजन्सीचे श्री. कारंगे तसेच महाबळेश्वर येथील गॅस एजन्सीचे श्री. कोमटे, ज्यांच्याकडे हिंदुस्थान पेट्रोलियम कंपनीची एजन्सी आहे, त्यांच्याकडून सिलेंडर आणले. त्या एजन्सीजकडे चौकशी केली असता त्यांनी सांगितले की, हे लोक आमच्याकडून सिलेंडर घेऊन गेलेले नाहीत. त्या दरम्यान या दोघांनी सेशन कोर्टातून जामीन घेतल्यामुळे त्यांना अटक करण्यात आली नाही. नुकसान भरपाईसंबंधी मघाशी सांगितल्याप्रमाणे आजच मुख्यमंत्री निधीतून 10 लाख रुपये मदत देण्यात आली आहे. तेथील सहकारी पतपेढीकडून सहानुभूतीने प्रत्येकी 5 हजार रुपयांची मदत देण्यात आली आहे.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदय सुध्दा त्या गॅस एजन्सीच्या मालकाला सहकार्य करण्याच्या उद्देशाने उत्तर देत आहेत असे म्हणावे लागेल. पोलीस स्टेशनपासून काही पावलांवर ही बाजारपेठ आहे. श्री. शेठ यांना अटक केल्यानंतर त्यांनी दोन एजन्सीकडून सिलेंडर आणल्याचे सांगितले. त्यांना तात्काळ अटक का केली नाही ? त्यांना जामीन मिळण्याची संधी का दिली ? त्यांनी सिलेंडर कोठून आणले याचा तपास का केला नाही ? याचा तपास करणारे तेथील जे संबंधित अधिकारी होते त्यांनी याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केलेले आहे. कारण त्यांचे साटेलोटे आहेत. त्या ठिकाणी हप्तेबाजी चालू आहे. त्या ठिकाणी इन्स्पेक्टरने दबाव आणला असे माझे मत आहे. तेथील अधिकाऱ्याला तात्काळ निलंबित करणार काय ? माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले की, तेथील सहकारी संस्थेने 5 हजार रुपये मदत दिली. हा किरकोळ विषय आहे. त्यांना दीर्घ मुदतीचे बिनव्याजी कर्ज मिळवून देणार काय ? मुख्यमंत्री निधीतून आणखी 50 लाख रुपये देणार काय ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, त्यांना अटकपूर्व जामीन मिळण्याची संधी दिली असे सन्माननीय सदस्यांनी सांगितले. त्या ठिकाणी डी.वाय.एस.पी. दर्जाचे अधिकारी गेले होते. त्यांनी चौकशी केली. तुमच्याकडून सिलेंडर घेऊन गेले काय ? अशी त्या एजन्सीजकडे विचारणा केली. त्यांनी सांगितले की, आमच्याकडून या लोकांनी सिलेंडर घेतले नाहीत. हा तपासाचा भाग आहे. एखाद्या आरोपीने जर असे सांगितले की, आम्ही त्यांच्याकडून सिलेंडर घेतले तर त्यांच्या शब्दावर किती विश्वास ठेवावयाचा हा प्रश्न आहे. ते कोठूनही आणल्याचे सांगू शकतात.

यानंतर श्री. शिगम ....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. सिध्दाराम म्हेत्रे...

तरी सुध्दा सन्माननीय सदस्यांच्या भावना लक्षात घेऊन हे प्रकरण उच्च अधिका-याकडे...

श्री. श्रीकांत जोशी : सिलेंडर्स कोठून आणले ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : या प्रकरणी तपास अजून चालू आहे.

श्री. भास्कर जाधव : हे प्रकरण चौकशीसाठी सी.आय.डी.कडे सोपविण्यात येईल काय ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सन्माननीय सदस्यांनी विचारणा केल्याप्रमाणे या प्रकरणी व्यवस्थित तपास व्हावा म्हणून हे प्रकरण सी.आय.डी.कडे देण्यात येईल. तसेच संबंधित अधिका-यांनी कामात कुचराई केली असेल तर त्याही बाबतीत विभागीय चौकशी करण्यात येईल आणि त्यामध्ये ते दोषी आढळले तर त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल. ज्या गॅस एजन्सीकडून सिलेंडर्स् घेतले असतील त्यांची गॅस एजन्सी रद्द करण्याबाबत संबंधित विभागाला कळविण्यात येईल.

श्री. मधुकर सरपोतदार : हे प्रकरण सी.आय.डी.कडे देत आहात ही चांगली गोष्ट आहे. प्रश्न फार गंभीर आहे. या गॅस सिलेंडरच्या स्फोटामुळे आजूबाजूची घरे आणि दुकाने पेटली. काळुराम शेठ यांचा व्यवसाय किती वर्षापासून चाललेला आहे ? त्यांना गॅस सिलेंडर्स् कोठून मिळतात ? त्यांना गॅस सिलेंडर्स्चा पुरवठा करणा-यांचे नांव काय आहे ? अनधिकृतपणे गॅस सिलेंडर्सचा साठा करुन लोकांच्या जीवितास धोक निर्माण केल्या बद्दल संबंधितांवर कोणती कारवाई केलेली आहे ? अनधिकृतपणे गॅस सिलेंडर्स्चा साठा होत असताना देखील पोलीसांनी हप्ते घेऊन त्याकडे दुर्लक्ष केलेले आहे. अशा प्रकारे अनधिकृत गॅस सिलेंडर्स्चा साठा केला जात असेल, अनधिकृत दारुचे दुकान चालविले जात असेल तर त्याबाबतीत कारवाई करण्याचे पोलिसांना अधिकार आहेत. असे असताना अनधिकृतपणे गॅस सिलेंडर्स्चा साठा करणा-यांविरुध्द पोलिसांनी का कारवाई केली नाही ? ही कारवाई न करणा-या पोलीस अधिका-यांवर आपण कोणती कारवाई करणार आहात ? तसेच अशा प्रकारच्या घटना घडू नयेत म्हणून शासनाने कोणत्या योजना आखलेल्या आहेत ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : मी मघाशी सांगितले की, तपासामध्ये त्रुटी राहिलेल्या आहेत. ह्या त्रुटी जाणूनबुजून ठेवलेल्या आहेत का याचा तपास करण्यासाठी हे प्रकरण सी.आय.डी.कडे सोपविण्यात आलेले आहे. यामध्ये जे संबंधित अधिकारी असतील त्यांची विभागीय चौकशी करण्यात येईल आणि ते जर दोषी आढळले तर त्यांच्यावर निश्चितपणे कारवाई करण्यात येईल्.

..2..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. श्रीकांत जोशी : त्या ठिकाणी बेकायदेशीररित्या गॅस सिलेंडर्स्चा धंदा केला जात होता. यामध्ये संबंधित पोलीस स्टेशनच्या अधिका-यांवर जबाबदारी येते. गॅसचे अवैधरित्या फिलिंग आणि रिफिलिंग करणाच्या प्रकारामुळे लोकांच्या जीवितास धोका निर्माण झालेला आहे. ...

**उपसभापती** : हे प्रकरण सी.आय.डी.कडे सोपविलेले आहे. त्यामुळे सर्व चौकशी होईल.

श्री. मधुकर सरपोतदार : हे प्रकरण सी.आय.डी.कडे देण्यात येणार आहे. त्याबाबतीत टर्म्स ऑफ रेफरन्स काय आहेत ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : या घटनेशी ज्यांचा ज्यांचा संबंध येईल त्या सर्व अधिका-यांची सी.आय.डी.मार्फत चौकशी करण्यात येईल....

श्री. भास्कर जाधव : शासना तर्फे आपद्ग्रस्तांना 50 लाख रुपये मदत देण्यात येईल काय?

(उत्तर नाही.)

--

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : गोरेगाव येथील फिल्म सिटीची 22 एकर जमीन मुक्ता आर्टस् संस्थेला हस्तांतरण करण्याचा नियमबाह्य केलेला व्यवहार

**मु.शी.**: गोरेगाव येथील फिल्म सिटीची 22 एकर जमीन मुक्ता आर्टस संस्थेला हस्तांतरण करण्याचा नियमबाह्य केलेला व्यवहार यासंबंधी सर्वश्री मधुकर चव्हाण, विनोद तावडे व रामनाथे मोते, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री. मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे सन्माननीय सांस्कृतिक कार्य मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"गोरेगाव येथील फिल्म सिटी या सरकारी उपक्रमाच्या ५१४ एकर जमिनीपैकी २२ एकर जमीन मुक्ता आर्टस्च्या व्हिसलिंग वुडस् या प्रकल्पासाठी देण्यात आलेल्या जमिनी संदर्भातील करारावर सन २००३ सालच्या कँगच्या अहवालात अत्यंत कडक ताशेरे ओढण्यात येणे, मुलत: फिल्म सिटी शासनाच्या दुग्धविकास मंडळाच्या मालकीची असून, या जमिनीचे हस्तांतरण आजपर्यंत चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास मंडळाकडे झालेले नसतांनाही महामंडळाने मुक्ता आर्टस् या संस्थेवर जमीन हस्तांतराचा बेकायदेशीर व नियमबाह्य व्यवहार करणे, त्यावेळच्या बाजार भावानुसार या जमिनीची किंमत ६० ते ७० कोटी रुपये असणे व कँगच्या २००३ सालच्या अहवालानुसार या जमिनीची किमत २८.२० कोटी रुपये असतानाही केवळ तीन कोटी रुपयांच्या मातीमोल भावाने संशयास्पद दृष्टया मुक्ता आर्टस्च्या व्हिसलिंग प्रकल्पासाठी देणे, या २० एकर जागेच्याखेरीज आणखी दोन एकर जागेवर व्हिसलिंग वुडसची सदरहू जमीन पी.डी.आर.व्हीडी असणे, इलेक्ट्रॉनिक्सला १९७४ साली महामंडळाने दिलेली असतांना व जागेचे हस्तांतरण करण्यात येऊ नये असा न्यायालयाचा स्थगन आदेश असल्याचे पत्र व्हिसलिंग वुड्स कंपनीला देऊनही त्या ठिकाणी व्हिसलिंग वुड्सने बेकायदेशीररित्या बांधकाम चालू ठेवणे या सर्व गैरव्यवहाराकडे व

...3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. मधुकर चव्हाण...)

नियमबाह्य प्रकाराकडे शासनाने जाणूनबुजून दुर्लक्ष करणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

श्री. राणा जगजितसिंह पाटील (सांस्कृतिक कार्य राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे. )

....5 ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, आतापर्यन्त लक्षवेधी का लावली जात नव्हती याचे उत्तर मला या निवेदनातून मिळालेले आहे. मुळात ही जमीन दुग्धविकास मंडळाची म्हणजे शासनाची आहे. या जमिनीचे अभिहस्तांतरण झालेले आहे. हे अभिहस्तांतरण करु नये असे कोर्टाने आदेश दिलेले आहेत. ज्यावेळी ही जमीन सुभाष घईला दिली त्यावेळी तिचे बाजारमूल्य 80 कोटी रुपये होते. आता हे मूल्य आणखी किती तरी पटीने वाढलेले आहे. कॅगच्या अहवालानुसान या जमिनीची किंमत 28.20 कोटी रुपये असतानाही ती केवळ 3 कोटी रुपयास मुक्ता आर्टस्‌ला देण्यात आली. मुक्ता आर्टस्‌ला 20 एकर जमीन देताना जाईण्ट व्हेन्चर करण्याचे कारण काय होते ? दुसरे असे की, मुक्ता आर्टस्‌ यांनी अजून 17 कोटी रुपये दिलेले नाहीत. निवेदनाच्या दुस-या परिच्छेदामध्ये असे म्हटलेले आहे की, भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या वाणिज्यिक अहवालात सदरहू जमिनीचे कमी मूल्यांकन, खाजगी संस्थेला अदेय फायदा अशा प्रकारचा आक्षेप घेण्यात आलेला आहे. या आक्षेपाला अनुसरुन करावयाच्या पुढील कार्यवाहीसाठी महामंडळाने सविस्तर अहवाल सादर केलेला आहे. या अहवालानुसार तत्कालीन व्यवस्थापकीय संचालकांविरुध्द विभागीय चौकशी करण्यात आली असून ...

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्रमांक-2.......... श्री.मधुकर चव्हाण.....

चौकशीअंती त्यांच्या सेवानिवृत्ती वेतनात कपात करण्याचा प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठविला आहे. त्यांना सेवानिवृत्ती वेतन किती मिळणार आहे? ते 20 कोटी रुपये आहे का? त्यांच्या हयातीत त्यांना शासनाकडून मिळणारी सर्व देय रक्कम वसूल केली तरी ती रक्कम 20 कोटी रुपये होईल का? आयएएस अधिकाऱ्याला निवृत्तीनंतर किती रोख रक्कम मिळते? त्यावेळीच फौजदारी खटला का दाखल केला नाही? निवेदनाच्या परिच्छेद-4 मध्ये म्हटले आहे की, "चित्रनगरी येथील काही भूखंड दीर्घ मुदतीच्या भाडेपट्टीवर चित्रपट उद्योगाशी संबंधित असलेल्या व्यक्तींना, कंपनींना व सहकारी संस्थाना देण्याचे योजिले होते. त्यामध्ये पी.डी.आर.व्हिडीओ इलेक्ट्रॉनिक्स यांचा समावेश होता. तथापि शासनाने सदरहू योजना रद्द करुन भूखंडासाठी भरलेली अनामत रक्कम 10 टक्के व्याजासह परत करण्याचा निर्णय घेतला."

सभापती महोदय, मूळ व्यवहारच बेकायदेशीर आहे. त्यांनी अनामत रक्कम भरली. बेकायदेशीर व्यवहार लक्षात आल्यानंतर अनामत रक्कम 10 टक्के व्याजासह परत करणार आहात. त्यांना 10 टक्के व्याजासह रक्कम नको आहे. कराराप्रमाणे जमीन हवी आहे. या संदर्भात न्यायालयाची स्थगिती असताना या कंपनीला बांधकाम करण्यास परवानगी दिली का? 17 कोटी रुपये व्हिसलिंग कंपनीकडून आले का? सुभाष घई यांनी बेकायदेशीर व्यवहार केला, ती जमीन परत घेणार का? त्याचवेळी फौजदारी गुन्हा का दाखल केला नाही? या प्रकरणी जे जे दोषी आहेत त्यांच्यावर फौजदारी खटला दाखल करणार का?

श्री.राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, हा विषय बऱ्यापैकी गहन आहे. माहिती घेत असताना असे लक्षात आले की, 1974 साली शासनाने ही योजना जाहीर केली होती. या योजनेंतर्गत लोकांचे बिड बोलावले होते. काही लोकांना जमीन द्यायचे ठरविले होते. त्यासाठी त्यांच्याकडून डिपॉझिट घेतले होते. तद्नंतर शासनाने ठरविले की, ही योजना राबवावयाची नाही. डिपॉझिट परत करायचे ठरविले होते. ती जूनी बाब आहे. सध्या चर्चा वेगळ्या अनुषंगाने होत आहे. मुक्ता आर्टस्बाबत हायकोर्टाने दिलेल्या स्थगिती आदेशाचे पालन केले नाही का? या प्रश्नाबाबत माझ्याकडे उपलब्ध असलेल्या माहितीच्या आधारे मी स्पष्ट करु इच्छितो की, हायकोर्टाने शासनाला किंवा कॉर्पोरेशनला कोणताही आदेश दिलेला नाही. बिल्डिंग कन्स्ट्रक्शन

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

थांबवावे असा आदेश दिलेला नाही. 17 कोटी रुपये आलेले आहेत का? या प्रश्नाबाबत सांगू इच्छितो की, 17 कोटी रुपये ही इक्विटी आहे. त्याची माहिती पटलावर ठेवण्यात येईल.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, पी.डी.आर.इलेक्ट्रॉनिक्सला महामंडळाने जागा दिलेली असताना जागेचे हस्तांतरण करु नये असे हायकोर्टाने व्हिसलिंग कंपनीला पत्र दिले होते. व्यवहार झाला असला तरी बांधकाम करु नये असे म्हटले होते. व्हिसलिंग कंपनीने हे आदेश धाब्यावर बसवून बांधकाम सुरु केले हे खरे आहे का?

श्री.राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, पी.डी.आर.इलेक्ट्रॉनिक्स कंपनी आहे, त्यांना पत्र दिले होते. हायकोर्टाने शासनाला किंवा कॉर्पोरेशनला पत्र दिलेले नाही. त्यामुळे हायकोर्टाचे आदेश न पाळण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.मधुकर चव्हाण : जागेची किंमत 20.28 कोटी असल्याची माहिती कॅगने आपल्या अहवालात नमूद केली आहे. असे असताना 3 कोटी रुपयांना एकाच व्यक्तीला जमीन का देण्यात आली? निविदा का मागविल्या नाहीत?

श्री.राणा जगजितसिंह पाटील : 2000 साली जॉईंट व्हेन्चर ॲग्रीमेंट का करण्यात आले या विषयाची ए.सी.बी.कडे चौकशी सुरु आहे. चौकशीअंती याचा तपशील कळू शकेल. विभागीय चौकशी झालेली असून शासनाने केंद्र शासनाकडे सेवानिवृत्ती वेतनात कपात करण्याचा प्रस्ताव पाठविला आहे. जागेची किंमत 28 कोटी रुपये असताना 3 कोटी रुपयांना जागा का देण्यात आली हे आता सांगणे शक्य नाही. जागेची किंमत 28 कोटी रुपये आहे हे कॅगच्या रिपोर्टमुळे कळले. शासनाला जागेची किंमत माहित असताना 3 कोटी रुपयात व्यवहार होत आहे अशी माहिती उपलब्ध नाही.

(नंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. श्रीकांत जोशी : सभापती महोदय, मुळात या प्रकरणाच्या संदर्भात शासन गंभीर नाही. या ठिकाणची जमीन ही शासनाची आहे. मुलत: फिल्मसिटीची जमीन शासनाच्या दुग्धविकास मंडळाच्या मालकीची आहे ती जमीन फिल्मसिटीला लीजवर देण्यात आलेली आहे. फिल्मसिटीला ही जमीन सबलिजवर देण्याचा अधिकार नाही. यासंदर्भात आम्ही पीएसीच्या मिटींग मध्ये मुद्दा उपस्थित केला होता त्यावेळेस मॅनेजींग डायरेक्टरने समितीला सांगितले होते की, जमीन सबलिजवर देण्याच्या संदर्भात शासनाची कुठल्याही प्रकारची पूर्व परवानगी न घेता अधिका-यांनी परस्पर या जमिनीच्या संदर्भात मुक्ता आटर्सशी व्यवहार केलेला असून हा सर्व व्यवहार बेकायदेशीर आहे. असे असतांनाही शासन या ठिकाणचे बांधकाम थांबविण्यास परवानगी देत नाही किंवा ही जमीन शासन विथड्रा करीत नाही. त्यामुळे याबाबत शासनाचा काय हेतू आहे? ही जमीन सुभाषण घईला देण्यात येणार आहे काय? त्यामुळे माझा प्रश्न असा आहे की, फिल्म सिटीला ही जमीन सब लिजवर देण्याचा अधिकार आहे का ? जर असा अधिकार नाही तर जी जमीन सबलिजवर देण्यात आलेली आहे ती आपण रद्द करणार काय ?

श्री. राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, शासनाने जमिनीचे व्यवहार करण्याचे अधिकार फिल्मसिटीला दिलेले नव्हते. या ठिकाणचे व्यवहार रद्द करण्याच्या संदर्भात विधी व न्याय विभागाकडून ओपिनियन आल्यानंतर योग्य ती कारवाई केली जाईल.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, या ठिकाणचे व्यवहार करण्यास कायदेशीर अधिकार फिल्मसिटीला नव्हते. यामध्ये गोविंद स्वरुप दोषी आहेत हे सिध्द झालेले आहे. यासंदर्भात गोविंद स्वरुप यांच्याकडून जी रक्कम वसूल करावयाची आहे ती रक्कम त्यांच्या सेवानिवत्तीच्या वेतनातून वसूल केली जाणार आहे काय?यासंदर्भात एकूण किती रक्कम वसूल करावयाची होती व आता पर्यंत किती रक्कम वसूल करण्यात आलेली आहे व किती रक्कम वसूल करावयाची बाकी आहे?

श्री. राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, यासंदर्भातील माहिती आता माझ्याजवळ नाही ही माहिती मी पटलावर ठेवण्यास तयार आहे.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, या ठिकाणी बेकायदेशीर रित्या व्यवहार झालेला आहे हे आपण मान्य करीत असल्यामुळे आता आपण लिगल ओपिनियन कशासाठी मागवित आहात?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

...2

श्री. राणा जगजितसिंह पाटील : करार रद्द करण्याच्या संदर्भात लिगल ओपिनियन मागितलेला आहे.

श्री. मधुकर चव्हाण : आपण या ठिकाणचे बांधकाम थांबविणार आहात काय?

श्री. राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, मला यासंदर्भातील संपूर्ण माहिती देण्यासाठी थोडा अवधी दिला तर मी यासंदर्भातील सविस्तर निवेदन करीन.

**उपसभापती** : उद्या जर आपण यासंदर्भात सविस्तर निवेदन करणार असाल तर आपल्याला ही लक्षवेधी सूचना राखून ठेवावी लागेल त्यामुळे मी ही लक्षवेधी सूचना राखून ठेऊ का?

श्री. राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, यासंदर्भात आपण निर्णय घ्यावा परंतु या लक्षवेधी सूचनेच्या संदर्भातील सविस्तर निवेदन उद्या करण्यात येईल.

**उपसभापती** : सदर लक्षवेधी सूचना मी राखून ठेवत आहे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, निवेदनामध्ये क्रमांक चार मध्ये म्हटले आहे की, "रक्कम परत करण्यात आली" पण पुढे असेही म्हटले आहे की, त्यांनी ती रक्कम परत घेतली नाही. त्यामुळे याचा नेमका अर्थ आम्ही काय काढावयाचा?

श्री. राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, दोन्ही गोष्टी ख-या आहेत. उदाहरणार्थ मी समजा तुम्हाला चेक दिला आणि तो चेक तुम्ही वटविला नाही तर त्याचा अर्थ असा होतो की, मी पैसे दिले परंतु ते पैसे तुम्ही घेतले नाहीत.

---------

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**लक्षवेधी सूचना क्रमांक 3 बाबत**

**उपसभापती** : आता तिसरी लक्षवेधी सूचना सन्माननीय सदस्य श्री. गोविंदराव आदिक यांची आहे ती पुढे ढकलण्यात येत आहे. त्यानंतरची चौथी लक्षवेधी सूचना सन्माननीय सदस्य प्रा. शरद पाटील याची आहे ती त्यांनी मांडावी.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर व सन्माननीय सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी काल आपले लक्ष वेधले होते की, आमच्या लक्षवेधी सूचना, 93 अन्वये सूचना लागत नाही, तेव्हा त्या संदर्भात आपण चौकशी करण्याचे निदेश दिले होते. आपण काल निर्देश दिल्यामुळे आज येथे ही लक्षवेधी सूचना कामकाज पत्रिकेवर दाखविण्यात आलेली आहे. त्याबद्दल मी आपणास मनापासून धन्यवाद देतो.

----------

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : राज्यातील गटई चर्मकारांच्या स्टॉल्ससाठी राखून ठेवलेला निधी न वापरल्याबाबत

**मु. शी.** : राज्यातील गटई चर्मकारांच्या स्टॉल्ससाठी राखून ठेवलेला निधी न वापरल्याबाबत यासंबंधी सर्वश्री शरद पाटील, जयंत प्र. पाटील, कपिल पाटील, नितीन गडकरी, विनोद तावडे, पांडुरंग फुंडकर, सय्यद पाशा पटेल, संजय केळकर, श्रीकांत जोशी, जगदीश गुप्ता, रामनाथ मोते, सुरेश जेथलिया वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

प्रा.शरद पाटील ( पुणे विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सामाजिक न्याय मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्यातील गटई चर्मकारांना आपले स्वत:चे संरक्षण करुन उपजीविका करण्यासाठी सामाजिक न्याय विभागाने पत्र्यांचे स्टॉल देण्याची सन 1997 पासून सुरु केलेली योजना, सदर योजनेची प्रभावी अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने राज्याच्या समाजकल्याण विभागाच्या उदासिनतेमुळे गटई कामगारांना साठमारीमुळे गेली काही वर्ष निधी वापराविना शासनाच्या तिजोरीत पडून राहणे, सदर गटई कामगारांच्या स्टॉलसाठी राखून ठेवलेला निधी वापरला न गेल्यामुळे शासनाच्या तिजोरीतून परत जाणार असल्याचे दिनांक 3 मार्च, 2007 रोजी आढळून येणे, राज्यातील उपेक्षित गटई कामकगारांना स्टॉल निर्मिती कामांबाबत निविदांच्या प्रक्रियेवर सामाजिक न्याय विभागाने स्थगिती आणल्याने सदर मागणीनुसार चर्मकार बांधवांचे साडेपाचशे अर्ज, संत रोहिदास चर्मद्योग व चर्मकार विकास महामंडळांकडे प्रलंबित असल्याने दिनांक 26 नोव्हेंबर, 2006 मध्ये निर्णय घेऊनही अद्याप उपक्रम हाती न घेतल्यामुळे राज्यातील तमाम चर्मकार गटई कामगारांमध्ये पसरलेली निराशेची भावना व असंतोष याबाबत शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कार्यवाही उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया."

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धर्मरावबाबा आत्राम ( सामाजिक न्याय राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.शरद पाटील : सभापती महोदय, सन 1997 पासून राज्यातील गोरगरीब गटई चर्मकारांना पत्र्यांचे स्टॉल्स देण्याची योजना सुरु आहे. मागील तीन-चार वर्षापासून या कामगारांना पत्र्यांचे स्टॉल्स मिळालेले नाहीत. शासकीय यंत्रणेने या कामगारांना स्टॉल्स देण्याच्या प्रक्रिया व्यवस्थित पूर्ण न केल्यामुळे आता ही बाब न्यायप्रविष्ठ झालेली आहे असे दिसते. त्यामुळे शासनाने 15 कोटी रुपयांची तरतूद करुन देखील कामगारांना पत्र्याचे स्टॉल्स देता आले नाहीत. निवेदनात म्हटले आहे की, "मे.क्लासिक स्टील इंडस्ट्रीज, बीड या संस्थेने माननीय उच्च न्यायालयाच्या मुंबई खंडपीठामध्ये याचिका दाखल केलेली आहे. सदर प्रकरण सध्या न्यायप्रविष्ठ आहे." माझे मंत्रिमहोदयांना प्रश्न आहेत की, मे.क्लासिक स्टील इंडस्ट्रीज या निविदामध्ये होते काय ? त्यांना निविदा मंजूर झाली होती काय ? कोणत्या कारणासाठी हे प्रकरण न्यायालयात दाखल झाले ? या प्रकरणी न्यायालयाने स्थगिती दिली आहे का ? नसेल तर पुन: 15 कोटीं रकमेची फेर निविदा काढून शासन गटई कामगारांना पत्र्याचे स्टॉल्स देणार आहे का ?

श्री.धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, गटई चर्मकाऱ्यांना पत्र्याचे स्टॉल्स बांधून देण्याकरिता एकूण 16 निविदा आल्या होत्या. त्यामध्ये मे. क्लासिक स्टील इंडस्ट्रीज, बीड यांचे दखील नाव होते. या संस्थेने माननीय उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. मागील वर्षीसुध्दा या संस्थेने निविदा भरली होती. परंतु त्यांच्याकडून पूर्तता झाली नसल्यामुळे त्यांची निविदा रद्द करण्यात आली होती. त्यामुळे ते कोर्टात गेले होते. यावर्षी शासनाने गटई कामगारांना पत्र्याचे स्टॉल्स देण्याकरिता 15 कोटी रुपयांची तरतूद केली आहे. परंतु हे प्रकरण कोर्टात गेल्यामुळे तसेच काही तक्रारी आल्यामुळे त्याबाबत चौकशी करण्याचे आदेश देण्यात आलेले आहेत. पुढील आर्थिक वर्षात अधिकची तरतूद करुन जास्तीत जास्त लाभार्थ्यांना स्टॉल्स देण्याचा आम्ही प्रयत्न करु.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, या प्रकरणी न्यायालयात कोण गेले ? न्यायालयाने कोणते आदेश दिले ? या प्रकरणी न्यायालयाने स्थगिती दिली आहे काय ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धर्मराबाबा आत्राम : सभापती महोदय, निविदा प्रक्रिया व्यवस्थित झाली नाही या कारणास्तव मे.क्लासिक स्टील इंडस्ट्रीज,बीड या संस्थेने माननीय उच्च न्यायालयाच्या मुंबई खंडपीठामध्ये याचिका दाखल केलेली आहे. याप्रकरणी माननीय न्यायालयाने स्थगिती दिलेली नाही. निविदाप्रक्रियेबाबत शासनाकडे सहा-सात तक्रारी आल्या होत्या म्हणून शासनामार्फत तात्पुरती स्थगिती देण्यात आलेली आहे. या योजनेचा लाभ जास्तीत जास्त लाभार्थ्यांना मिळावा यासाठी पुढील वर्षात अधिकची तरतूद करण्यात येईल.

श्री.जगदीश गुप्ता : सभापती महोदय, तळागाळातील शेवटच्या माणसाला न्याय देण्याच्या दृष्टीने मागील 10 वर्षापूर्वी शासनाने ही योजना सुरु केली. या प्रकरणी न्यायालयाने स्थगिती दिलेली नाही वा योजना बंद करावी अशाप्रकारचे आदेश दिलेले नाहीत. तेव्हा माझा स्पेसिफीक प्रश्न आहे की, समाजातील शेवटच्या माणसाला न्याय देण्यासाठी ग्रामपंचायत, नगरपालिका, महानगरपालिकेला ही योजना सुरु करण्याच्या सूचना शासन देणार आहे काय ?

यानंतर श्री.पुरी.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSP/ MHM/ KGS/ पूर्वी श्री.अजित.. 14:35

श्री.धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, महापालिकेलाही देण्याचा निर्णय झालेला आहे, त्याचबरोबर आपण नगरपालिकेलाही तसेच ग्रामपंचायतीसही पैसा देणार आहोत. सामाजिक न्याय विभागाचे बजेट झाल्यानंतर ताबडतोबीने आपण गटई कामगारांना अधिकचे पैसे लागले तरी ते देणार आहोत. शेवटच्या माणसाला न्याय देण्याची शासनाची भूमिका आहे असे मी याठिकाणी सांगतो.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, लेखी उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, "रुपये 20,000/- प्रती स्टॉल याप्रमाणे स्टॉल पुरविण्याचे काम देण्यात यावे, असा खरेदी समितीने निर्णय घेतला. या निविदाप्रक्रियेबाबत विविध तक्रारी शासनाकडे प्राप्त झाल्या होत्या. त्यामुळे या निविदाप्रक्रियेस शासनामार्फत स्थगिती देण्यात आली" मग, ही स्थगिती कोणत्या तारखेस दिली ? स्थगिती देण्याची कारणे काय ? व स्थगिती उठविण्याच्या बाबतीत विलंबाची कारणे काय ?

श्री.धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय,आमच्याकडे जवळपास 7 तक्रारी आल्या होत्या. त्याबाबतीत ताबडतोबीने चौकशी करुन ताबडतोब....(अडथळा) तक्रारीची कारणे अशी आहेत की, निवड प्रक्रियेसंबंधी, आयएसआय मार्क आहे की नाही ? स्टॉलची किंमत काय ? अशा वेगवेगळया तक्रारी आलेल्या आहेत.

श्री.दिवाकर रावते : याठिकाणी आयएसआय मार्कचा कुठे प्रश्न येतो ?

श्री.धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, स्फेसिफिकेशन्स काय ? कॉस्ट काय ? आयएसआय मार्क आहे की नाही ? अशाप्रकारच्या एकूण 7 तक्रारी आलेल्या होत्या. याबाबतीत आपण दिनांक 6.3.2007 ला स्थगिती दिलेली आहे.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, कुठल्या कंत्राटदाराला टेंडर द्यावयाचे यामुळे हे सर्व भांडण चालू आहे. या भांडणापायीच गरीब माणसांचा हक्क डावला जात आहे. हा पैसा त्यांच्याकडून काढून घेतला जाईल, त्यामुळे याबाबतीत आपण त्यांना स्वातंत्र्य द्यावे व हा पैसा स्थानिक स्वराज्य संस्थांकडून दिला जावा. तसेच, कोणी योजना राबवावी याबाबत आपल्या विभागामध्ये व लिडकॉम कंपनीमध्ये वाद झाल्यामुळेच आज या गरीब माणसांचा हक्क डावलला जात आहे.

..2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, सन 1997-2002 पर्यंत जवळपास 17 हजार लाभार्थ्यांना स्टॉल देण्याचे काम सरकारने केलेले आहे. याठिकाणी सन्माननीय सदस्यांनी त्या लोकांना डायरेक्ट पैसा देण्याची सूचना केली. परंतु असे जर केलेतर यामध्ये आणखी अडचणी निर्माण होतील.

श्री.कपिल पाटील : परंतु आपल्या विभागामध्ये व लिडकॉममध्ये घोळ असल्यामुळेच गरीब लोकांचे हक्क डावलले जात आहेत.

श्री.धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, याबाबतचे आदेश समाजकल्याण विभागाच्या संचालकांना दिले होते. नंतर हे काम लिडकॉम कंपनीला देण्यात आले. त्यानंतर लिडकॉम कंपनीमार्फत निविदा मागविण्यात आल्या. त्यामध्ये 16 टेंडर आले होते व त्यातील 6 टेंडर रिजेक्ट झाले व 5 टेंडर ॲक्सेप्ट झाले. त्यामध्ये लोएस्ट टेंडर रुपये 21,085 हजारांचे होते. महापालिकेमार्फतही आपण अशाप्रकारचे स्टॉल बांधणार आहोत.

नंतर कु.गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की,युती सरकारच्या काळात ही योजना सुरु झाली त्यानंतर पुन्हा बंद झाली. गेल्या 4 वर्षापासून आपण बजेटमध्ये तरतूद करीत आहोत परंतु ती रक्कम लॅप्स होत आहे.महाराष्ट्र चर्मकारी संघाचे श्री बबनराव घोलप ,रमेश मेढकर आहेत ही सर्व मंडळी राज्यपालांना भेटली ,मुख्यमंत्र्यांना भेटली याबाबतीत राज्यपालांनी निदेश दिले होते. दर वेळी बजेटमध्ये पैसे दिले जातात पण शासनाच्या अकार्यक्षमतेमुळे ते पैसे लॅप्स होतात. 35000 कर्मचाऱ्यांना लाभ मिळत नाही.दुर्दैवाने समाजामध्ये अशी चर्चा आहे की, विशिष्ठ अधिकारी अधिकारावर असल्यामुळे या संघटनेस पैसे मिळत नाही. हे वास्तव नसले तरी अशी चर्चा समाजामध्ये होते आहे, चर्मकार समाजालासंधी मिळू नये असे प्रयत्न केले जातात, असे वातावरण पसरलेले आहे. हे वातावरण अजून गढूळ करावयाचे नसेल तर आपली कार्यक्षमता वाढवा. जे पैसे या संदर्भात लॅप्स होतात ते होऊ नये यासाठी पंधरा दिवसात महिन्याभरात या संदर्भात अंमलबजावणी केली तर संपूर्ण राज्यात चांगल्या प्रकारचा संदेश जाईल.

श्री .चंद्रकांत हंडोरे : सभापती महोदय, मी आपणास सांगू इच्छितो की, ही योजना 1997-98 पासून सुरु झालेली असून ही योजना सन 2003 पर्यंत कार्यान्वित होती. 2003-04, 2004-05 वर्षामध्ये ही योजना बंद झाली होती.मी ज्या वेळेस खात्याचा चार्ज घेतला तेव्हा मला कळून आले की, ही योजना बंद का पडलेली आहे. मधील काळात लाभार्थ्यांना बजेट प्रोव्हीजनमुळे स्टॉल देऊ शकले नाही म्हणून मी या खात्याचा कार्यभार स्वीकारल्यानंतर 5 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. या संदर्भात आम्ही संचालकांच्या मार्फत टेंडर मागविले. त्यानेतर क्लासिक कंपनीला हे टेंडर देण्यात आले. परंतू सिक्युरिटी डिपॉझिट न दिल्यामुळे त्यांचे टेंडर लॅप्स झाले. या नंतर मी पुन्हा विचार केला की, यामध्ये जे लाभार्थी आहेत त्यांच्यसाठी पुढच्या वर्षी प्रयत्न करु.मागचे आणि या वर्षीचे मिळून 15 कोटी रुपयाची तरतूद केली. ज्या लोकांनी टेंडर भरले.यामध्ये एकूण 16 टेंडर आले होते. त्यातील 6 टेंडर कायदेशीर बाबीमुळे लॅप्स झाले. उरलेले 10 टेंडर शिल्लक राहिले. त्या टेंडरच्या सर्व बाबी तपासण्यासाठी वेगवेगळया संस्थेकडे सॅंपल देण्यात आलेले आहेत. या स्टॉलची डयूरॅबिलिटी तपासण्यासाठी उद्योग विभाग कामगार विभाग , जनरल मॅनेजर, इंडियन रेल्वे टेक्निकल अँड इकॉनॉमिक सर्विसेस राईटस

2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत हंडोरे........

विभाग या संस्थेकडे पाठविले असता त्यांनी सांगितले की, हे काम आमची संस्था करीत नाही. त्यामुळे आम्ही स्मॉल इंडस्टिज सर्व्हिसेस इंन्सिटटयूट ,कुर्ला यांच्याकडे सँपल पाठविले. यामध्ये त्यांनी 5 टेंडर निश्चित करण्यात आले. याबाबतीमध्य वेगवेगळया विभागाची समिती केलेली आहे. यामध्ये व्यवस्थापकीय संचालक ,लिडकॉम उद्योग उपसंचालक , भांडार समिती प्राचार्य आय.डी.बी. प्रशिक्षण इ. आहेत. याच्यामध्ये हेतू एवढाच होता की गरीबांना व्यवस्थित स्टॉलचे वाटप केले पाहिजे व त्या प्रमाणे हे सर्व काम करण्यात आलेले आहे. या बाबतीमध्ये न्यायालयाने कोणताही स्टे दिलेला नाही. यासंदर्भात आमच्या डायरेकटरांन चौकशी करण्यासाठी पाठविलेले आहे परंतु ते उत्तर प्रदेशच्या निवडणुकीमध्ये व्यस्त असल्यामुळे ते आल्यावर तातडीने तीन महिन्याच्या आत चौकशी करण्यात येईल.

यानंतर श्री. रोझेकर....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.चंद्रकांत हंडोरे...........

सभापती महोदय, दोन महिन्याच्या आत स्टॉल देण्यात येतील.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, या ठिकाणी असे उत्तर देण्यात आले आहे की, प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. मग न्यायालयाचा निकाल लागेपर्यन्त लाभार्थ्यांना स्टॉल देण्यात येणार नाहीत का ?

श्री.धर्मराव बाबा आत्राम : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी सांगितल्याप्रमाणे दोन महिन्यात स्टॉल देण्यात येतील.

**उपसभापती** : आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल आणि दुपारी 3.15 वाजता पुन: भरेल.

(दुपारी 2.46 ते दुपारी 3.15 मध्यंतर)

---------------

यानंतर श्री.बोरले..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( मध्यंतरानंतर )**

**( सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सभागृहामध्ये कॅबिनेट मंत्री उपस्थित नाहीत. माझी आपल्याला अशी विनंती आहे की, आपण सभागृहाची बैठक दिवसभराकरिता स्थगित करावी.

**उपसभापती** : आपण शासनाला एक संधी देऊ. मी सभागृहाची बैठक 3 वाजून 30 मिनिटांपर्यंत स्थगित करीत आहे.

( सभागृहाची बैठक दुपारी 3.17 वाजता दुपारी 3.30 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

-------

(यानंतर श्री.गागरे ........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**विशेष उल्लेख**

**पृ.शी.**: मुंबईतील मफतलाल गिरणी बंद पडल्याने कामगारांवर होत असलेला अन्याय.

**मु.शी.**: मुंबईतील मफतलाल गिरणी बंद पडल्याने कामगारांवर होत असलेला अन्याय या विषयावर श्री.अरविंद सावंत, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत, वि.प.स. यांनी एक विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.अरविंद सावंत (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

" मुंबईतील मफतलाल मिल गेली अनेक वर्ष बंद पडल्याने तेथील शेकडो कामगार बेकार झ ाले आहेत. मफतलाल यांच्या माझगाव व लोअर परेल या दोन ठिकाणी मिल असून हया मिल दिनांक 13.6.2000 पासून बंद असल्यामुळे कामगारांना स्वेच्छानिवृत्ती देण्यात आलेली आहे. ज्यांनी स्वेच्छानिवृत्ती घेतलेली नाही ते रोज कामावर येऊन कंपनीने ठेवलेल्या हजेरीपुस्तकात उपस्थिती नोंदवून सहया करीत होते. ही मंडळी युनियनचे सदस्य नव्हते म्हणून त्यांची देणी आजपर्यंत देण्यात आलेली नाही. या सदस्य-कर्मचाऱ्यांमध्ये सर्वश्री प्र.स.गांगल, मो.अ.खोत, ए.सी.देसाई, चा.ना.ढवण यांचा समावेश आहे. या कर्मचाऱ्याची देणी आजपर्यंत देण्यात आलेली नाहीत. कंपनीने व्हीआरएस योजना जाहीर केली. कंपनीने जाहीर केलेल्या व्ही.आर.एस. योजनेनुसार त्यांना सदर योजनेचा फायदा मिळावा, याबाबत कामगार आयुक्तांकडे तक्रार करण्यात आली. शासनाच्या मॉनिटरींग एस्क्रो समितीकडेही दाद मागण्यासाठी त्यांना सांगण्यात आले. सदर समितीने व कामगार आयुक्तालयाने कामगारांना असे सांगितले की, मालक आमचे ऐकत नाही, तुम्ही कोर्टात जा. असा सल्ला देऊन आपली जबाबदारी झटकली आहे. आजही शेकडो गिरणी

.....2

श्री.अरविंद सावंत.....

कामगारांना त्यांची देणी मिळालेली नाहीत. शेकडो कामगारांचा तेथील युनियनमध्ये समावेश नसल्याने त्यांनी तेथे काम करुनही अशा कामगारांना व्हीआरएसचे फायदे व देय असलेली देणी मिळावीत म्हणून योग्य ती कार्यवाही शासनाने तात्काळ करावी व याबाबत शासनाने निवेदन करावे, सभापती महोदयांनी मंत्री महोदयांना निदेश द्यावेत याकरिता मी ही विशेष उल्लेखाची सूचना देत आहे".

श्री.बाळासाहेब थोरात (कृषी मंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनी मांडलेल्या विशेष उल्लेखाच्या सूचनेची मी नोंद घेतलेली आहे.

---------

.....3



PNG / KGS/ MHM/

**पृ.शी.**: सांगली जिल्हयातील मिरज ते माधवनगर या जुन्या रेल्वे लाईनवर उभारण्यात आलेल्या झोपडपट्टीधारकांचे करावयाचे पुनर्वसन.

**मु.शी.**: सांगली जिल्हयातील मिरज ते माधवनगर या जुन्या रेल्वे लाईनवर उभारण्यात आलेल्या झोपडपट्टीधारकांचे करावयाचे पुनर्वसन.
या विषयावर प्रा.शरद पाटील, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य प्रा.शरद पाटील, वि.प.स. यांनी एक विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

प्रा.शरद पाटील (पुणे विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

" सांगली जिल्हयातील मिरज ते माधवनगर या जुन्या रेल्वे लाईनवरील माधवनगर हद्दीत गेली 20 वर्षे गोरगरीब लोकांनी झोपडया बांधून तेथे वास्तव्य केलेले असून अलीकडे या जुन्या रेल्वे मार्गाचे राज्यमार्ग 142 असे नामकरण करुन रस्त्याच्या कामास शासनाच्या बांधकाम विभागाने सुरुवात केलेली असून झोपडया हटविण्याचे काम सुरु आहे. त्यामुळे वर्षानुवर्षे तेथे वास्तव्य करणाऱ्या मागासवर्गीय दारिद्रय रेषेखालील गरीब कुटुंबाचे जीवन उद्ध्वस्त होणार आहे. शासनाच्या 1995 पर्यतच्या झोपडयांना संरक्षण देण्याच्या धोरणानुसार या झोपडपट्टीवासियांचे पुनर्वसन करण्यात यावी अशी त्यांची मागणी असून शासनाने यात गांभीर्याने लक्ष घालून गरीब झोपडपट्टी धारकांना न्याय द्यावा अशी मागणी या विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे".

---------

....4



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: मजूर संस्था व बेरोजगार अभियंते यांना शासकीय कामाचे नियम डावलून केलेले वाटप.

**मु.शी.**: मजूर संस्था व बेरोजगार अभियंते यांना शासकीय कामाचे नियम डावलून केलेले वाटप या विषयावर श्री.सुरेश जेथलिया, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री.सुरेश जेथलिया, वि.प.स. यांनी एक विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.सुरेश जेथलिया (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

" शासनाच्या कामांचे वाटप करतांना मजूर संस्था व बेरोजगार अभियंते यांना प्रत्येकी 33 टक्के व खुल्या स्पर्धेतून कंत्राटदारांना 34 टक्के असे काम वाटपाचे सूत्र असणे, असे असतांना औरंगाबाद जिल्हयात 31 मार्च, 2007 रोजीपर्यत आर्थिक वर्ष संपत असल्याने शासनाच्या कामाचे मर्जीतील संस्थांना केलेले वाटप, यात लाखो रुपयांचा झालेला अर्थपूर्ण व्यवहार, एकापेक्षा अधिक कामे मिळविणाऱ्या संस्थांमध्ये भगवानबाबा, व्यंकटेश, चंद्रकला, अष्टविनायक, गजानन, नवजीवन, राजाराम पाटील, श्यामबाबा, कल्पतरु, संत ज्ञानेश्वर अशा निवडक संस्थांचा समावेश असणे, या शासनाच्या विविध कामांच्या वाटपामध्ये शासनाचे नियम डावलून केलेल्या वाटपाची सखोल चौकशी करुन त्यांचेवर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तात्काळ निवेदन करावे".

---------

नंतर श्री.सुंबरे.....

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

**पृ.शी.** : लक्षवेधी सूचनेवरील निवेदनात तत्कालीन गृह राज्यमंत्र्यांनी जाणीवपूर्वक असत्य व दिशाभूल करणारी दिलेली माहिती.

**मु.शी.** : लक्षवेधी सूचनेवरील निवेदनात तत्कालीन गृह राज्यमंत्र्यांनी दिलेल्या जाणीवपूर्वक असत्य व दिशाभूल करणाऱ्या माहितीने सन्माननीय सदस्यांच्या विशेष हक्क भंगाच्या आणि अवमानाच्या प्रकरणावरील विशेष हक्क समितीचा अहवाल विचारात घेणे व अहवालास अनुलक्षून प्रस्ताव.

---

श्री. सुधाकर गणगणे (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "लक्षवेधी सूचनेवरील निवेदनात तत्कालीन गृह राज्यमंत्र्यांनी जाणीवपूर्वक असत्य व दिशाभूल करणारी दिलेली माहिती" या विषयावरील विशेष हक्काच्या प्रश्नाबाबत विशेष हक्क समितीचा अहवाल विचारात घेण्यात यावा असा प्रस्ताव मांडतो.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, या विशेष हक्क समितीवर मी देखील एक सदस्य आहे आणि मी आपल्याला सांगू इच्छितो की, ज्या विषयावरील अहवाल आता सादर केला जात आहे त्या संबंधात काहीही बैठक झालेली नाही. तरीही त्यावरील अहवाल येथे आलेला आहे. हे कसे काय झाले ? हा काय प्रकार आहे ? माझ्यापूर्वी सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत हेही या समितीचे सदस्य होते. पण त्यांच्या कार्यकालात देखील हा विषय आलेला नव्हता. तेव्हा समितीवरील सन्माननीय सदस्यांनाच या विषयाची माहिती नाही तर अहवाल कसा काय सादर होतो आहे ? सभापती महोदय, आम्हाला समितीची बैठक आहे हे कळल्यानंतर त्या बैठकीला उपस्थित राहत नाही असे होत नाही. तेव्हा हा काय प्रकार आहे ? हे आपण आम्हास सांगितले तर बरे होईल.

**उपसभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, मी याबाबत माहिती घेण्याचा प्रयत्न केला. परंतु मला नीटशी माहिती मिळू शकलेली नाही. मात्र आता येथे अहवाल सादर केला गेलेला आहे. तेव्हा आपल्याला याबाबत काही म्हणणे मांडावयाचे असल्यास आपण ते मांडू शकता.

...... 2झेड 2 ...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, पण आम्हाला या विषयासंबंधातच विशेष काहीही माहिती नाही. येथे कसला अहवाल सादर केला आहे त्याचीही मला माहिती नाही. निदान आम्हाला अहवाल तरी माहीत असायला पाहिजे. आमच्याकडे त्याचे प्रारूप तरी आले पाहिजे होते. हा काय प्रकार चालला आहे ?

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, या प्रकरणी समितीच्या एकंदर किती बैठका झालेल्या आहेत ?

**उपसभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आता समितीचे समिती प्रमुख येथे उपस्थित नाहीत, कदाचित ते याबाबत खुलासा करू शकले असते. तरीही सन्माननीय सदस्य श्री.गणगणे यांना याबाबत काही माहिती असल्यास त्यांनी ती माहिती सभागृहाला द्यावी. म्हणजे या विषयासंदर्भात समितीच्या बैठका झाल्या आहेत काय ? असल्यास केव्हा व किती झाल्या आहेत आणि हा अहवाल केव्हा तयार झाला आहे ? यासंबंधात सन्माननीय सदस्य श्री.गणगणे हे काही माहिती देऊ शकतील का ?

श्री. सुधाकर गणगणे : सभापती महोदय, माझ्या माहितीप्रमाणे या संबंधात समितीची एक बैठक झालेली आहे. परंतु अन्य कामामुळे मी त्या बैठकीला गैरहजर होतो. त्यामुळे मला देखील याबाबत अधिक माहिती नाही.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, या अहवालातील परिशिष्ट 5 मध्ये समितीने केलेल्यो कामकाजाचे संक्षिप्त विवरण दिलेले आहे त्यामध्ये म्हटलेले आहे की, समितीची 10 मे 2005 रोजी बैठक झाली होती आणि समितीने प्रस्तावकर्ते सदस्य श्री.दिवाकर रावते यांच्याकडून लेखी खुलासा मागविण्याबाबत निर्णय घेतला. त्यानंतर 19 सप्टेंबर 2005 रोजीच्या समितीच्या बैठकीबाबत असे म्हटले आहे की, ....

( यानंतर श्री. सरफरे .... 3ए 1

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत...

"समितीने प्रस्तुत प्रकरणी श्री. दिवाकर रावते, वि.प.स. यांना लेखी निवेदन सादर करण्याबाबत दिनांक 10 ऑक्टोबर 2005 पर्यंत अंतिम संधी देण्यात यावी" . त्यानंतर 7 नोव्हेंबरला झालेली बैठक गणपूर्तीअभावी तहकूब करण्यात आली. त्यानंतर 2006 मध्ये हा निर्णय घेण्यात आला.

**उपसभापती** : विशेष हक्कभंग समितीचे समिती प्रमुख सभागृहामध्ये उपस्थित झाल्यानंतर हा अहवाल सोमवारी विचारात घेण्यात येईल.

श्री. दिवाकर रावते :सभापती महोदय, मी या संदर्भात गेल्या अधिवेशनामध्ये विशेष हक्कभंगाची सूचना दिली होती. त्यानंतर मी माननीय सभापतींना दोन वेळा विनंती केली होती. या अधिवेशनाच्या सुरुवातीला त्यांना पत्र दिले होते की, मी दिलेल्या विशेष हक्कभंगाच्या सूचनेसंदर्भात काहीही खुलासा किंवा उल्लेख झालेला नाही. त्या संदर्भात काय झाले हे मला कळत नाही.

**उपसभापती** : सोमवारी माननीय समितीप्रमुख, विशेष हक्क समिती सभागृहामध्ये आल्यानंतर हा विषय घेण्यात येईल.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, हा विषय हक्कभंग समितीकडे सुपूर्द केला आहे किंवा नाही याबाबत काहीही घोषणा झालेली नाही.

----

**<u>सन 2007 चे वि.स.वि. क्रमांक 11 बाबत</u>**

**उपसभापती** : विधानसभेमध्ये पुरवणी मागण्यांवरील चर्चेला उत्तर द्यावयाचे असल्यामुळे सन 2007 चे वि.स.वि. क्रमांक 11 नंतर घेण्यात यावे अशाप्रकारचे पत्र संबंधित मंत्रिमहोदयांकडून पाठविण्यात आले असल्यामुळे हे विधेयक नंतर घेण्यात येईल.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे विनियमन करण्याबाबत) विधेयक

L.A.BILL NO.LXXIII OF 2005

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA OWNERSHIP FLATS (REGULATION OF THE PROMOTION OF CONSTRUCTION, SALE, MANAGEMENT AND TRANSFER ) ACT, 1963.) AND MOTION FOR REFERRING THE BILL TO A JOINT COMMITTEE.)

ॲड. प्रीतमकुमार शेगांवकर (गृहनिर्माण राज्यमंत्री) : सभापती महोदय,विधा□सभे□ संमत □ल्याप्रमा□मी आपल्या अ□मती□सन 2005 चे वि.स.वि. क्रमांक 73 महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम, 1963 यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडतो.

**उपसभापती** : विधेय□ मांड□यात आले आहे.

ॲड. प्रीतमकुमार शेगांवकर : महोदय, मी आपल्या अ□मती□सन 2005 चे वि.स.वि. क्रामंक 73 महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम, 1963 यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घे□यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, गृहनिर्माण विभागाचे हे विधेयक आहे. हे विधेयक सभागृहापुढे कां आणावे लागले यामागील उद्देश काय आहे? या विधेयकाची पार्श्वभूमी काय आहे? हे विधेयक कां संमत केले पाहिजे? यासंबंधीची माहिती सभागृहाला देण्याची आवश्यकता आहे.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.प्रीतमकुमार शेगावकर : सभापती महोदय, राज्यात मालकी हक्काच्या तत्वावर सदनिका बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन आणि त्यांचे हस्तांतरण या गोष्टीचे नियमन करण्यासाठी, महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री,व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम,1963 हा अधिनियमित केला आहे. राज्याच्या अनेक क्षेत्रांमध्ये असलेल्या घरांच्या तीव्र टंचाईच्या परिणामी वाढत्या प्रमाणात उद्‌भवलेल्या अनिष्ट प्रथा व गैरव्यवहार यांना प्रभावीपणे आळा घालण्यासाठी उक्त अधिनियम करण्यात आला आहे.

शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, उक्त कायदा करण्यामागची उद्दिष्टे पूर्णत: साध्य झालेली नाहीत आणि प्रवर्तक व मालमत्तांचे विकासक यांच्याकडून केल्या जाणाऱ्या विवक्षित गैरव्यवहारांना व अनिष्ट प्रथांना पायबंद घालण्याच्या दृष्टीने त्याची परिणामकारकरित्या अंमलबजावणी करण्यात येत नाही. म्हणून, उक्त अधिनियमाच्या तरतुदी अधिक परिणामकारक करण्यासाठी व सदनिकांच्या खरेदीदारांचे हितसंबंध सुरक्षित राखण्यासाठी उक्त अधिनियमाच्या विद्यमान तरतुदींमध्ये विवक्षित सुधारणा करणे इष्ट आहे, असे महाराष्ट्र शासनास वाटते, म्हणून हे विधेयक आपल्यासमोर सादर केलेले आहे.

सभापती महोदय, मी या विधेयकातील ठळक वैशिष्ट्ये सांगतो. 1963 च्या मोफा अधिनियमातील कलम 2 मध्ये "सक्षम प्राधिकारी" ही व्याख्या नाही. मात्र, आता कलम 5 अ च्या तरतुदीनुसार नियुक्त केलेला अधिकारी म्हणजे "सक्षम प्राधिकारी" अशी व्याख्या समाविष्ट केली आहे. त्यानंतर कलम 2 (ख) मध्ये प्रवर्तकाची (प्रमोटर) व्याख्या आहे. त्यामध्ये आता सुधारणा करून नोंदणीकृत असलेल्या अथवा नसलेल्या भागीदारी संस्था, व्यक्तींचा निकाय (बॉडी) किंवा संघ (असोसिएशन) यांचा समावेश करण्यात आला आहे. कलम 5 मध्ये सुधारणा करून "राज्य शासनाने सामान्य किंवा विशेष आदेशाद्वारे नेमलेल्या अधिकाऱ्याने " ही तरतूद कमी करून त्या जागी "सक्षम प्राधिकारी" हा मजकूर दाखल करण्यात येईल. त्यानंतर सक्षम प्राधिकाऱ्याच्या नियुक्तीसाठी आता नवीन कलम 5 अ दाखल करण्यात येईल. मूळ विधेयकात निवासी उपजिल्हाधिकारी (आरडीसी) या अधिकाऱ्याची सक्षम प्राधिकारी म्हणून नियुक्ती करण्याची तरतूद होती. मात्र, ही तरतूद महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम,1966 च्या कलम 9 मधील तरतुदीशी सुसंगत नसल्यामुळे आता "जिल्हा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ SBT/ MHM/

ॲड.प्रीतमकुमार शेगावकर (पुढे सुरू....

उपनिबंधक सहकारी संस्था" या दर्जाच्या अधिकाऱ्याची "सक्षम प्राधिकारी" म्हणून नियुक्ती करण्याची तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे. त्यानंतर मोफा अधिनियमाच्या कलम 10 (1) मध्ये प्रवर्तकाने सहकारी गृहनिर्माण संस्थेची नोंदणी करून घेण्याबाबतची तरतूद आहे. मात्र, अनेक प्रवर्तक सहकारी गृहनिर्माण संस्थंची नोंदणी करून देत नाहीत, अशा तक्रारी आहेत. त्यामुळे आता कलमात अशी सुधारणा करण्यात आली आहे की, जर प्रवर्तकाने संस्थेची नोंदणी करण्यात कसूर केली असेल तर सदनिका विकत घेणाऱ्या व्यक्ती सक्षम प्राधिकाऱ्याकडे दाद मागू शकतील. सक्षम प्राधिकारी, अर्जदारांच्या विश्वसनियतेची पडताळणी करून घेऊन व प्रवर्तकास त्याची बाजू मांडण्याची संधी दिल्यानंतर, जिल्हा उपनिबंधक किंवा सहाय्यक निबंधकांना सहकारी गृहनिर्माण संस्थेची नोंदणी करण्याचे निदेश देतील. मोफा अधिनियमाच्या कलम 11 मध्ये प्रवर्तकाने इमारतीचे त्याखालील जमिनीसह विहित कालावधीत हस्तांतरण करून देण्याबाबत तरतूद आहे. मात्र त्यानंतर आजही राज्यात अनेक सहकारी गृहनिर्माण संस्थाकडे त्यांच्या इमारती अभिहस्तांतरित झालेल्या नसल्याची तक्रार आहे. याला आळा घालण्यासाठी कलम 11 मध्ये खालील सुधारणा करण्यासाठी नवीन पोट-कलम (2) ते (5) समाविष्ट करण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहेत. पोट कलम (2) अनुसार प्रवर्तकाने अभिहस्तांतरण पत्राची प्रत विहित मुदतीत सक्षम प्राधिकाऱ्याकडे दाखल करणे बंधनकारक ठरविण्यात आले आहे. पोट कलम (3) अनुसार जर प्रवर्तकाने अभिहस्तांतरण करण्यात कसूर केली असेल तर संबंधित सहकारी गृहनिर्माण संस्था मानीव अभिहस्तांतरणासाठी (Deemed Conveyance) जरूर त्या कागदपत्रांसह सक्षम प्राधिकाऱ्याकडे अर्ज करू शकेल.

यानंतर श्री.बरवड...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. प्रीमतकुमार शेगावकर ....

पोटकलम 4 नुसार अर्जदारांच्या कागदपत्रांच्या विश्वासार्हतेची खात्री करुन घेतल्यानंतर व प्रवर्तकास त्याची बाजू मांडण्याची संधी दिल्यानंतर मानीव अभिहस्तांतरण प्रमाणपत्र देण्याची आवश्यकता असल्याची खात्री पटल्यास सक्षम प्राधिकारी, दुय्यम निबंधकाने जास्तीतजास्त सहा महिन्यांच्या आत अभिहस्तांतरणाच्या दस्तऐवजाची नोंदणी करावी असे प्रमाणपत्र जारी करतील. पोटकलम (5) नुसार वरील प्रमाणपत्र सादर झाल्यानंतर त्याची नोंदणी का करु नये याची कारणे दाखविण्याची नोटीस नोंदणी अधिकारी प्रवर्तकास पाठवील. प्रवर्तकास बाजू मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर अभिहस्तांतरणाच्या दस्तऐवजाची नोंदणी करणे योग्य आहे अशी खात्री पटल्यास नोंदणी अधिकारी संबंधित दस्तऐवजाची "मानीव अभिहस्तांतरण पत्र" म्हणून नोंद करु शकेल. मोफा अधिनियम व त्याखालील नियम यांचे उल्लंघन करणाऱ्या प्रवर्तकास 1 वर्षेपर्यंत कारावास किंवा 10 हजार रुपयापर्यंत द्रव्यदंड किंवा दोन्ही शिक्षा देण्याची तरतूद अधिनियमाच्या कलम 13(3) मध्ये आहे. मूळ विधेयकात द्रव्यदंडाची कमाल रक्कम 10 हजार रुपयांवरुन 50 हजार रुपये इतकी करण्याची तरतूद होती. मात्र वरील कलमामध्ये दंडाची किमान रक्कम अथवा कारावासाचा किमान कालावधी किती असावा याची तरतूद नव्हती. ही त्रुटी दूर करण्यासाठी आता कारावासाचा किमान कालावधी 6 महिने व द्रव्यदंडाची किमान रक्कम रुपये 10 हजार इतकी विहित करण्याची सुधारणा प्रस्तावित करण्यात आली आहे. मोफा अधिनियमाच्या कलम 13 मध्ये पोटकलम (4) ते (6) दाखल करण्याचा प्रस्ताव आहे. पोटकलम (4) अनुसार दोषी ठरलेल्या प्रवर्तकास 5 वर्षासाठी बांधकाम करण्यासाठी अपात्र ठरविण्यात येईल. मात्र पूर्वी चालू असलेल्या बांधकामांना ही अपात्रता लागू होणार नाही. पोटकलम (5) नुसार सक्षम प्राधिकारी त्याच्या कार्यक्षेत्रातील स्थानिक प्राधिकरणाकडे दोषी ठरलेल्या प्रवर्तकाचे नाव पाठवील व सदर प्रवर्तकाच्या अपात्रतेच्या कालावधीत बांधकामाची परवानगी न देण्याचे निदेश देईल. पोटकलम (6) नुसार वरील सूचना मिळाल्यानंतर स्थानिक प्राधिकरण प्रवर्तकास त्याच्या अपात्रतेच्या कालावधीत बांधकामाची परवानगी देणार नाही.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदय जे सांगत आहेत त्याचा अर्थ काय आहे हे समजावून सांगणे आवश्यक आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. प्रीतमकुमार शेगावकर : सभापती महोदय, मी अर्थही सांगू शकेन. सक्षम प्राधिकाऱ्यास त्याची कर्तव्ये प्रभावीपणे पार पाडता यावीत यासाठी मोफा अधिनियमाच्या कलम 13 मध्ये पोटकलम (ख) ते (ङ) नव्याने दाखल करण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे. सक्षम प्राधिकाऱ्यास पोटकलम (ख) नुसार लोकसेवक मानण्यात येईल. पोटकलम (ग) नुसार सक्षम प्राधिकाऱ्यासमोरील कार्यवाही न्यायिक कार्यवाही मानण्यात येईल. पोटकलम (घ) नुसार दिवाणी न्यायालयाचे अधिकार देण्यात आले आहेत. पोटकलम (ङ) नुसार सक्षम प्राधिकाऱ्याने सद्भावनेने केलेल्या कारवाई संदर्भात त्याच्या विरुध्द कारवाई करता येणार नाही.

सभापती महोदय, मोफा अधिनियमातील मूळ तरतूद व आता विधेयक क्रमांक 73 अन्वये प्रस्तावित करण्यात आलेली सुधारणा दर्शविणारे विवरणपत्र सोबत जोडले आहे. सभापती महोदय, माझ्याकडे सर्व डिटेल्स आहेत ते मी वाचू शकतो. त्यामुळे सन्माननीय सदस्यांचे समाधान होईल असे मला वाटते. राज्याच्या नागरी भागात घरांची तीव्र टंचाई निर्माण असून विकासकांच्या मालकी तत्वावरील सदनिका विकत घेणाऱ्या लोकांना विकासकांच्या गैरप्रकारांना तोंड द्यावे लागते. उदा. विकासक सदनिका घेणाऱ्या व्यक्तींच्या सहकारी गृहनिर्माण संस्थेची नोंदणी करीत नाहीत. विकासक जमीन व त्यावरील जमिनीची मालकी सदनिका विकत घेणाऱ्यांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थेकडे हस्तांतरीत करीत नाहीत. शासनाने वरील गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी विधानसभेने मंजूर केलेल्या प्रस्तुत विधेयकामध्ये या तरतुदी आहेत. सन्माननीय सदस्यांनी या विधेयकाच्या संदर्भात सूचना कराव्यात आणि हे सुधारणा विधेयक मंजूर करावे अशी मी सभागृहाला विनंती करतो.

प्रश्न प्रस्तुत झाला.

यानंतर श्री. शिगम .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : विधेयक संयुक्त चिकित्सा समितीकडे पाठविण्याबाबत माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांचा प्रस्ताव आहे. तो त्यांनी मांडावा.

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी माझा प्रस्ताव मागे घेतो.

(सभागृहाच्या अनुमतीने प्रस्ताव मागे घेण्यात आला.)

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, 65 हजार गृहनिर्माण सोसाट्यांमधील मध्यमवर्गीय लोकांना दिलासा देणारे हे विधेयक आणल्याबद्दल मी शासनाचे मन:पूर्वक अभिनंदन करतो. दोन वर्षानंतर का होईना, कोणाच्याही दबावाला बळी न पडता शासनाने हे बिल येथे आणलेले आहे. हे बिल आणून शासनाने एक पुण्याचे काम केलेले आहे. या बिलाच्या संदर्भातील केवळ एक-दोन त्रुटी मी शासनाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो.या बिलाच्या संदर्भात मी माननीय मुख्यमंत्र्यांसमवेत आणि संबंधित अधिका-यांबरोबर चर्चा केली त्यावेळी सभागृहामध्ये योग्य ते उत्तर दिले जाईल असे मला सांगण्यात आले होते. ज्यावेळी हे लोक अभिहस्तांतरण करायला जातील त्यावेळी सोसायटीची कागदपत्रे मागितली जातील. या लोकांनी स्टॅम्प ड्युटी भरलेली आहे काय, हे पाहिले जाईल. स्टॅम्प ड्युटी भरलेल्या कागदपत्रांचा आग्रह त्यावेळी धरला जाईल. सभापती महोदय, या इमारती 25-30 वर्षापासूनच्या आहेत. त्यामुळे आताच्या बाजारभावाने घरांचे मूल्यांकन करणे योग्य होणार नाही. जवळपास 65 ते 70 हजार सोसायट्या आहेत. भविष्यामध्ये टीडीआर, एफएसआयचा फायदा मिळेल म्हणून विकासकांनी मध्यमवर्गीय लोकांच्या डोक्यावर ही टांगती तलवार ठवलेली होती. दुसरे असे की, मुंबईतील जमीन मालक आणि विकासक हे बिल्डिंग बांधतात आणि फ्लॅटस्ची विक्री करतात. परंतु जमिनीचे मूळ मालक आणि विकासक यांच्यामध्ये भांडण झाल्यानंतर त्यांना ओ.सी. मिळत नाही. त्याचा परिणाम असा होतो की, वॉटर टॅक्स, सिव्हरेज टॅक्स अशा विविध टॅक्ससाठी या मध्यमवर्गीयांना 83 टक्क्या ऐवजी 187 टक्के रक्कम भरावी लागते. म्हणून यासंदर्भात नियम करताना शासनाने काळजी घ्यावी अशी माझी सूचना आहे. त्याच प्रमाणे ही सर्व मंडळी जेव्हा रजिस्ट्रेशन करायला जातील त्यावेळी त्यांच्या कडून प्रचलित दराने स्टॅम्प डयुटी न घेता ती जास्तीत जास्त 5 हजार रु. पर्यन्त घ्यावी आणि यासंदर्भातील नियमावली काळजीपूर्वक तयार करावी एवढे बोलून आणि अशा प्रकारचे विधेयक शासनाने आणल्या बद्दल मी पुनश्च एकदा शासनाचे अभिनंदन करुन माझे दोन शब्द संपवितो. धन्यवाद.

---

...नंतर श्री. जुन्नरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. प्रीतमकुमार शेगावकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी ज्या सूचना केलेल्या आहेत त्या सूचनांचा निश्चितपणे विचार केला जाईल.

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते ( कोकण विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, विधेयक क्रमांक 73 या विधेयकाला समर्थन करण्यासाठी मी उभा आहे. या विधेयकाची मराठी आणि इंग्रजी प्रत मी वाचलेली आहे. इंग्रजी विधेयकामधील सेक्शन दोन मध्ये प्रवर्तकाची व्याख्या आहे. जेव्हा न्यायालयात प्रकरण जाते तेव्हा मराठी व्हर्जन ऐवजी इंग्रजी व्हर्जनचा आधार घेतला जातो. विधेयकाच्या इंगजीच्या प्रतीमध्ये प्रमोटर आणि विधेयकाच्या मराठी प्रतीमध्ये प्रवर्तक असा शब्द प्रयोग करण्यात आला आहे. या दोन शब्दामध्ये मोठा फरक आहे त्यामुळे यासंदर्भात माननीय मंत्रीमहोदयांनी खुलासा करावा अशी विनंती आहे.

-------------

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, महाराष्ट्र राज्य गृहनिर्माण मंडळाचे सन्माननीय राज्यमंत्री ॲड. प्रीतमकुमार शेगावकर यांनी या ठिकाणी महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबात ( त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत ) अधिनियम, 1963 यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडलेले आहे. या विधेयकातील तरतुदी तसेच उद्देश व कारणे काय आहेत हे त्यांनी येथे वाचून दाखविले त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. ज्यावेळी गृहनिर्माण राज्यमंत्री श्री. दयानंद मसके त्यावेळी मी नागपूरच्या अधिवेशनात एक अशासकीय विधेयक मांडले होते. त्या अशासकीय विधेयकात आणि या शासकीय विधेयकात काय फरक आहे तो तुम्हीच सांगा. मी मांडलेले अशासकीय विधेयक "महाराष्ट्र मालकी हक्काच्या फ्लॅट ( बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्था आणि हस्तांतरण याचे नियमन करण्यासंबंधी ) अधिनियम 63 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक" असे होते. हे 2005 चे विधेयक क्रमांक 10 होते. या अशासकीय विधेयकावर नागपूरच्या अधिवेशनात चर्चा झाली होती. त्यावेळचे सन्माननीय राज्यमंत्री श्री.दयानंद मसके यांनी आश्वासन दिले होते की, मुंबईमध्ये पुढच्य अधिवेशनात यासंदर्भात विधेयक आणू आणि ते मंजूर करुन घेऊ. त्यामुळे या विधेयकाच्या संदर्भात सगळे बिल्डर आणि विकासक मंत्रिमंडळाच्या सदस्यांच्या पाठीमागे लागले होते की, काहीही करा परंतु हे विधेयक आणू नका. सभापती महोदय, अभिहस्तांतरण हा शब्द बिल्डर लोकांना गैरसायीचा वाटतो.संपूर्ण महाराष्ट्रात एकूण 62 हजार सहकारी गृहनिर्माण सोसायटया असून मुंबईमध्ये 2730 सहकारी गृहनिर्माण सोसायटया आहेत. अभिहस्तांतरण कधी झाले याबद्दल आपण या ठिकाणी माहिती द्यावयास पाहिजे होती. आपल्याकडे गृहनिर्माण खाते असून म्हाडाही त्यातील वसाहत आहे. म्हाडाच्या महाराष्ट्रात आणि मुंबईत अनेक ठिकाणी वसाहती आहेत. वसाहतीतील अभिहस्तांतरणाच्या संदर्भात त्यावेळचे म्हाडाचे व्ही.पी. श्री. खोब्रागडे यांच्या बरोबर बैठक झाली होती.

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार.........

त्या बैठकीत सांगण्यात आले होते की, सहा महिन्यांच्या आत मुंबई शहरातील गृहनिर्माणच्या ज्या ज्या वस्त्या आहेत त्या वस्त्यांचे कन्व्हेयन्स पूर्ण करु, परंतु तसे झाले नाही तर आम्ही 25 टक्के आकारणी करु. त्या मिटींगचे मिनिटस् मंत्रिमहोदयांकडे उपलब्ध असतील. या गोष्टीला दीड-दोन वर्षे झाली. शासन बोलते एक आणि कृती करते दुसरी.

सभापती महोदय, मी दिलेल्या अशासकीय विधेयकाच्या पार्श्वभूमीवर आता राज्य शासनाने हे विधेयक आणलेले आहे. या विधयेकाच्या बाबतीत बाहेर अनेकप्रकारची चर्चा सुरु आहे. हाऊसिंग फेडरेशनमध्ये, सोसायटंच्यामध्ये या विधेकाच्या बाबतीत चर्चा सुरु आहे. हाऊसिंग फेडरेशनने या विधेकाच्या बाबतीत काही सूचना केलेल्या आहेत, काही दुरुस्त्या सुचविलेल्या आहेत त्या माझ्याकडे पाठविल्या आहेत. मंत्रिमहोदयांकडे आल्या किंवा कसे ते मला माहीत नाही. शासनाने त्या सूचनांचा अभ्यास केला की नाही याची मला माहिती नाही. आज मुंबई आणि महाराष्ट्रातील सोसायटयांना कन्व्हेयन्स हा विषय त्यांच्या दृष्टीने जिकिरीचा झालेला आहे.

सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी या विधेयकाचे स्वागत केलेले आहे. या विधेयकावर माझे संपूर्ण विचार व्यक्त केल्यानंतर या विधेकाचे स्वागत करावे किंवा कसे हे मी शेवटी ठरविणार आहे. जर अगोदरच स्वागत केले तर सरकारला वाटेल की, हे विधेयक मंजूर झाले आणि ते खूष होतील.

सभापती महोदय, दी मुंबई डिस्ट्रीक्ट को-ऑपरेटीव्ह हाऊसिंग फेडरेशन ही मुंबई जिल्हयासाठी एक संस्था आहे. या संस्थेकडे गाळेधारकांचे नियमन करणे, त्यांना मार्गदर्शन, व कायदेशीर मदत करणे इत्यादी कामे आहेत. या फेडरेशने काही सूचना केलेल्या आहेत. त्यांनी म्हटले आहे की, " महाराष्ट्र ओनरशीप फ्लॅट ॲक्ट अंमलात येऊन 43 वर्षे झालेली आहे. तरी देखील आजही 95 टक्के सोसायटयांना अभिहस्तांतरण मिळू शकलेले नाही." सोसायटयांना अभिहस्तांतरण देणे हे विकासकाचे काम आहे. शासन सोसायटयांना अभिहस्तांतरण देणार आहे काय ? या अभिहस्तांतरणासंबंधी अटी व शर्ती आहेत की, प्रथम गृहनिर्माण सोसायटीची नोंदणी

..2..

श्री.मधुकर सरपोतदार.........

करावी लागते. अशी नोंद झाल्यानंतरच इतर बाबींची पूर्तता करावी लागते. नोंदणी झालेल्या सोसायटयांची संख्या किती आहे, आतापर्यंत किती फ्लॅटधारकांना अभिहस्तांतरण प्रमाणपत्र दिलेले आहे ? विकासक बदमाषी करतात आणि शासन त्याकडे डोळेझाक करते. जर एखाद्या सोसायटीकडे जादा एफ.एस.आय. असेल, सभोवताली मोकळी जागा असेल तर त्यावर टी.डी.आर.मिळतो. परंतु या टी.डी.आर.चा गैरफायदा घेण्यात येतो. मग बिल्डर एक मजला, दोन मजले वाढविण्याचा विचार करतो. अशाप्रकारे मुंबईत टॉवर्स उभे राहिलेले आहेत आणि आजही ते काम सुरु आहे. यावर शासनाचे कोणत्याही प्रकारचे बंधन नाही. बिल्डरांना शासनाची भीती वाटत नाही. बिल्डर्स आणि दलाल याचा म्हाडामध्ये अड्डा आहे. मागे झालेल्या बैठकीत देखील मी हे बोललो होतो. अशाच प्रकारचा दुसरा अड्डा मंत्रालयात आहे. राज्य दलाल चालवितात की काय अशी आज परिस्थिती आहे.

यानंतर श्री.पुरी....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी : तालिका सभापती श्री.भास्कर जाधव)**

श्री.मधुकर सरपोतदार...

रोज येणाऱ्या तक्रारी नीट तपासून पाहिल्यातर हेच दृश्य दिसते की, सगळया कारभारात जो भ्रष्टाचार होत आहे त्याच्या मुळाशी हे दलाल लोक आहेत. आज या दलालांचे 25-25, 30-30 मजल्यांचे टॉवर्स उभे आहेत. त्यांनीच सर्वसामान्य माणसांना भूईसपाट केल्याचे चित्र महाराष्ट्रात दिसून येत आहे. अशाप्रकारचे चित्र राजरोजपणे मुंबई, पुणे, औरंगाबाद, नागपूरसह संपूर्ण राज्यामध्ये दिसून येते. पैशांच्या बळावर हे सर्व व्यवहार चालले आहेत. माननीय मंत्री महोदय, आपण गृहनिर्माण मंत्री असून आपण मुंबई शहरात फेरफटका मारुन पाहणी करावी. विशेषत: उपनगरात आपण फेरफटका मारावा. त्यांच्याच इमारती आज मुंबईत उभ्या आहेत. त्यामध्ये सगळयात वाईट गोष्ट अशी की, हे जे टॉवर्स उभे राहत आहेत त्यामध्ये ज्या हौसिंग बोर्डाच्या इमारती आहेत त्या इमारती बांधण्याचे अधिकार... जे कमी उत्पन्न गटातील आहेत, मध्यम उत्पन्न गटातील आहेत, उच्च गटातील आहेत, त्यांच्या सोयीसाठी ही व्यवस्था करण्यात आलेली आहे. परंतु तेथे काय व्यवव्हार चालू आहेत ? हे आपण तपासून पहावे. त्याठिकाणी एफएसआय कशा पध्दतीने वापरला जात आहे,याचीही माहिती घ्यावी. कमी उत्पन्न गटातील लोकांचा प्लॉट मध्यम व उच्चतम गटातील लोकांना विकला जात आहे, अशाप्रकारचे एकतर्फी निर्णय म्हाडातील आपले दलाल घेत आहेत. याठिकाणी आपल्या म्हाडाचे अधिकारी आलेले असतीलच. दलाली करण्याशिवाय त्यांना दुसरे कोणतेही काम नाही. अशा लोकांशी हातमिळवणी करुन आपला स्वार्थ साधण्याच्या उद्देशानेच हे सर्व चालले आहे. म्हाडाची जागा खाजगी बिल्डरांना विकण्यात येत असून त्याठिकाणी मोठमोठे टॉवर्स् उभे करण्याचे काम चालू आहे. म्हाडाच्या ॲक्टमध्ये अशी तरतूद आहे का ? हा प्रश्न माझा माननीय मंत्री महोदयांना आहे. म्हाडाच्या ॲक्टमध्ये अशी तरतूद नाही. म्हाडाची एक इंचही जमीन कुठल्याही व्यक्तिला विकता येत नाही. ती फक्त नोंदणीकृत गृहनिर्माण संस्थेलाच दिली जाते, अशाप्रकारची तरतूद म्हाडाच्या ॲक्टमध्ये आहे. परंतु याठिकाणी आपले अधिकारी आपल्याला कोणती माहिती देत आहेत, याची मला कल्पना नाही. अशाप्रकारचे उद्योग आमच्या बांद्रा (पूर्व) येथे मोठया प्रमाणात चालू आहेत. आमच्याकडे श्री.दिवाण नावाचे एक बिल्डर आहेत. आपल्या मंत्रिमंडळात त्यांचे दलाल आहेत. त्यांचे नांव मी घेणार नाही, कारण तशी रितसर नोटीस मी दिलेली नाही. आज याठिकाणी हे विधेयक चर्चेला

..2....

श्री.मधुकर सरपोतदार...

येईल याची मला कल्पना नव्हती, नाहीतर मी नोटीस दिली असती. आज खालच्या स्तरापासून ते वरच्या स्तरापर्यंत दलालांची संख्या वाढतच आहे. त्याचे परिणाम म्हणून सर्वसामान्य मनुष्य भरडला जात आहे. माननीय मंत्री महोदय आपण सर्वसामान्य नागरिकांचे प्रतिनिधीत्व करीत आहात, हे आपण विसरु नये. आज जो वर्ग संघर्ष करीत आहे, त्याच वर्गाला भरडले जात आहे. त्यामुळे या गोष्टीकडे लक्ष देण्याची आवश्यकता आहे. शेवटी आपण राज्य कोणासाठी चालवित आहात, हे आपण पाहण्याची आवश्यकता आहे. येथील जो गोरगरीब कर्मचारी आहे, भूमिपूत्र आहे, जो महाराष्ट्रात जन्माला आलेला आहे, ज्यांचे कुटुंब येथे आहे अशी सर्वसामान्य माणसे जर मुंबईत येत असतील तर त्यांना राहण्यासाठी जागा मिळाली नाहीतर त्यांना कशापध्दतीने पिडले जाते. त्याचे उत्कृष्ट उदाहरण म्हणजे "म्हाडा". गरिंबांकरिता इमारती बांधण्यासाठी म्हाडा निर्माण करण्यात आले. याठिकाणी म्हाडाचे अधिकारी आले असतील, त्यांचे मी स्वागत करतो. कारण त्यांनाही हे सर्व कळले पाहिजे. ते येथे आले असलेतरी ते अदृश्य असून त्यांची नावे घेता येणार नाहीत. त्यांची नांवेही मी घेत नाही. परंतु याठिकाणी विषय आल्यामुळे मी हा विषय मांडला आहे. मी सर्वसामान्य वर्गातून आलेलो आहे. त्यामुळे सर्वसामान्यांचे संरक्षण करणे, त्यांचे संगोपन करणे, त्यांच्या प्रश्नांना वाचा फोडणे हे महाराष्ट्र शासनाचे काम आहे, असे मी मानतो. येथे जे लोकप्रतिनिधी बसतात त्यांचेसुध्दा हे काम आहे. याठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण आणि श्री.विनोद तावडे यांनी सांगितले की, हे विधेयक येऊ नये यासाठी कालपासून बिल्डरांचे दलाल 25-25 लाख रुपयांची थैली घेऊन फिरत आहेत. मी कोणत्याही बिल्डराला पाठीशी घालणार नाही. कारण मी कोणाकडूनही लाच घेत नाही. बिल्डर लोकांना माहित आहे की, हे आमदार लाच घेत नाहीत. मला झोपेत जरी पैशांची ऑफर आलीतरी ती मी घेणार नाही. कारण ज्या कारणासाठी मी वाहून घेतले आहे, त्याच्याशी मी प्रामाणिक आहे. मी माझ्या आयुष्यात कधीही लाच घेतली नाही आणि मरेपर्यंतही लाच घेणार नाही, हे निर्विवाद सत्य आहे. We always work for the cause of the people. त्या कारणांसाठी मी काम करीत आहे.

नंतर कु.गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार .....

इमारत बांधून पूर्ण झाल्यानंतर तसा दाखला नगरपालिका, महानगरपालिका यांच्याकडून देण्यात येतो. त्यावेळी तसा दाखला बिल्डरला देण्यापूर्वी महानगरपालिकेने, नगरपालिकेने बिल्डरकडून अंडरटेकिंग घ्यावे की, तो ठराविक मुदतीत कन्व्हेयन्स करुन देईन. कुठलेही फ्लॅटसचे हस्तांतरण करताना ऑक्यूपन्सी सर्टिफिकिट देण्याबाबत महानगरपालिकेने या गोष्टीची खात्री केली पाहिजे की, दोन महिन्यात किंवा त्याच्या पूर्वी हे कन्वेयन्स दिले पाहिजे. माननीय मंत्रीमहोदयांनी कृपया या गोष्टीची नोंद घ्यावी. हा विषय गंभीर आहे. सामान्य न्याय जनतेला देण्याची तरतूद या कायद्यामध्ये आहे. सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी या कायद्यात सामान्य न्याय आहे म्हणूनच त्याचे स्वागत केले. अन्यथा त्यांनी या कायद्याचे स्वागत केले नसते. बिल्डर ज्यावेळी महानगरपालिकेकडे, नगरपालिकेकडे अन्य इमारत बांधकामासंबंधीच्या कामास सुरुवात करण्यास परवानगी मागतात त्यावेळी करण्यात येणाऱ्या अर्जास मागील पूर्ण झालेल्या इमारतीचे कन्व्हेयन्स दिलेले आहे का याबाबत आपण माहिती घ्यावी असा कॉलम अर्जात असावा. जोपर्यंत एखादया बिल्डींगचे प्रपोजल दिले जाऊन, ती बांधायला घेऊन, व ती पूर्ण करुन त्यास ऑक्यूपन्सी सर्टिफिकिट देऊन पूर्ण होत नाही तोपर्यंत महानगरपालिकेने सुध्दा त्या बिल्डरला इतर दुसऱ्या कामांस परवानगी देऊ नये अशी आमची मागणी आहे. ही मागणी केवळ आमचीच नसून सर्व सदनिकाधारकांची देखील तीच मागणी आहे . आपण हे विधेयक पास करुन ही मागणी कितपत पूर्ण करतो यास महत्व आहे. सभापती महोदय, बिल्डर ज्यावेळी आपला परवाना नूतनीकरणासाठी करण्यासाठी येतात त्यावेळी त्यांच्याकडून लायसन्स मागण्याच्या अर्जामध्ये ही माहिती एका तक्त्यामध्ये मागावी. या तक्त्याचा नमूना त्या अर्जासोबत द्यावा आणि त्या बिल्डरचा परफॉर्मन्स योग्य असेल तरच त्याच्या परवान्याचे नूतनीकरण करण्यात यावे अन्यथा परवान्याचे नूतनीकरण करु नये. या सूचना मी खूप काळजीपूर्वक करीत आहे आणि यातील काही सूचना सदनिकाधारकांकडून आलेल्या आहेत. यासूचना सदनिकाधारकांकडून गरज म्हणून आलेल्या आहेत, कोणतीही हौस किंवा चैन म्हणून आलेल्या नाहीत. तेव्हा या संदर्भात आपण काळजीपूर्वक लक्ष द्यावे. जर एखादा नवा बिल्डर या व्यवसायामध्ये येऊ पाहत असेल तर त्याच्याकडून याबाबतचे ॲग्रीमेंट करुन घ्यावे. ॲग्रीमेंटचा मसूदा परवाना मागण्याच्या अर्जासोबत असावा. ज्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार .....

हौसिंग सोसायटया रजिस्टर झालेल्या आहेत परंतु ज्यांच्या सभासदांना कन्व्हेयन्स मिळालेले नाही, त्या अभिहस्तांतरण झाले नाही अशा सोसयटयांचे सरकारी ऑडीट करतेवेळी अभिहस्तांतरणाबद्यल विशेष अहवाल संबंधित अधिकाऱ्याकडे पाठवून देणे बंधनकारक करावे. या सर्वांना सामाजिक न्याय आपणस द्यावयाचा असेलतर त्या दृष्टीने या सूचना मी येथे केलेल्या आहेत. आपण या सूचनांचा विधेयकामध्ये कसा समावेश करतात यावर या विधेयकाचे भवितव्य अवलंबून आहे. मोफा कायद्याच्या कलम 10 अन्वये विकासकाने संस्था नोंदणी झाल्यापासून चार महिन्यात संस्थेच्या ईमारतीसह संबंधित भूखंड संस्थेच्या नावे अभिहस्तांतरण करणे बंधनकारक आहे. हे हस्तांतरण 4 महिन्याच्या आत व्हावे अशी तरतूद मोफा कायद्यामध्ये आहे. विकासक भूखंड अभिहस्तांतरण करण्यासाठी टाळाटाळ करतो इतकेच नव्हे तर संस्थेची नोंदणी झ ााल्यानंतरही या भूखंडावर आणखी बांधकाम करतो किंवा मिळालेल्या जादा एफ.एस.आय. चा वापर इतर बांधकाम करण्यासाठी करतो. मी आता TDR म्हणजेच ट्रान्सफर आफ डेव्हलपमेंट बद्दल बोलतो . हा कायदा मी विधानसभेत असताना 1991 साली मंजूर झाला होता.

यानंतर श्री. रोझेकर....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार........

कायद्याला विरोध करतांना मी असे म्हटले होते की, टी.डी.आर.चा गैरवापर केला जाईल. तरी देखील विधेयक पास झाले. सत्ताधारी पक्षाचे संख्याबळ असते, होयचे बहुमत, होयचे बहुमत असे म्हणून कायदा पास होतो, विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य कितीही ओरडले तरी उपयोग होत नाही. त्याप्रमाणे हा कायदा देखील पास झाला. पण आज मुंबई शहरात जास्तीत जास्त काळाबाजार कशाचा होत असेल तर तो या टी.डी.आर.चा.होतो आहे. मोठया प्रमाणावर गैरवापर केला जात आहे आणि त्यावर कुणाचेही बंधन नाही. टी.डी.आर.चा अर्थ काय ? त्याचा अर्थ असा आहे की, एखादी जागा रस्त्यासाठी, शाळेसाठी, बगिचासाठी डेव्हलप करण्यासाठी घेतली असेल तर तेथील एफ.एस.आय.अन्यत्र वापरला जाऊ शकतो. मुंबई शहरातील टी.डी.आर.उपनगरात, उपनगरातील टी.डी.आर.मुंबई शहरात वापरला जाऊ शकतो का ? हा माझा प्रश्न आहे. हा टी.डी.आर.मुंबई शहरात वापरला जात नाही तर उपनगरात वापरला जातो. माझ्या भागात टोलेजंग टॉवर्स उभे राहिले आहेत. या टॉवर्सच्या विकासकांनी तळमजला+तीन मजले अशी परवानगी शासनाकडून घेतली आहे. परंतु त्या ठिकाणी तळमजला+सहा/सात मजले असे टॉवर्स उभे राहिले आहेत. त्या विकासकांची अपेक्षा अशी आहे की, आज-ना-उद्या माझ्याकडे असलेल्या संपत्तीच्या बळावर बाकीच्या मजल्यांना परवानगी घेऊ. त्या इमारतींमधील सदनिकांची विक्रीही झाली आहे. परंतु, आता कन्व्हेअन्सचे काय ? या गोष्टींकडे लक्ष देण्याची नितांत आवश्यकता आहे.

सभापती महोदय, मुंबईतील घरांचा प्रश्न सोडविण्यासाठी म्हाडाची निर्मिती झाली आणि या संस्थेचा मुलभूत उद्देश तोच होता. आज ज्या गृहनिर्माण संस्था उभ्या आहेत त्या सगळया म्हाडाने उभ्या केल्या आहेत. म्हाडाकडे 3000 कर्मचारीवर्ग आहे, परंतु या कर्मचा-यांकडे काम नाही. कारण म्हाडाने त्यांचे भूखंड विकासकाला विकासासाठी दिले आहेत आणि आपले कर्मचारी बसून आहेत तर विकासक चैन करतो आहे. हा काय प्रकार चालला आहे, याची मंत्री महोदयांनी काळजीपूर्वक चौकशी करावी.

सभापती महोदय, पुढची सूचना अशी आहे की, इमारत पूर्ण झाल्यानंतर इमारत व भूखंड संस्थेच्या नावे अभिहस्तांतरीत करण्यास विकासक टाळाटाळ करतो, संस्था नोंदणीकृत झाल्यानंतर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार.........

भूखंडावर आणखी बांधकाम करतो, त्यामुळे या कायद्यामध्ये दुरुस्ती करुन विकासकावर अभिहस्तांतरण सक्तीचे करण्यात यावे व त्याने दाद न दिल्यास त्याला शिक्षा देण्याची तरतूद करावी. आपण या कायद्यातील दुरुस्तीअन्वये जी तरतूद केली आहे, ती परिणामकारक नाही. खरे म्हणजे विकासकाने अभिहस्तांतरण न करुन दिल्यास त्याला अटक झाली पाहिजे, केवळ दंड करुन चालणार नाही. विकासकाने नियमाची अंमलबजावणी केली नाही म्हणून त्याला अटक करुन लॉकअपची हवा खाऊ द्या. कारण बिल्डर जर कशाला घाबरत असतील तर ते लॉकअपला घाबरतात. 5 हजार दंड झाला तर ते लगेच भरतील. या बिल्डर लॉबीकडे धन कुठून येते, याची चौकशी केली आहे का ? एवढया टोलेजंग इमारती उभ्या रहात आहेत, एवढे धन त्यांच्याकडे कुठून येते ? दाऊद इब्राहिमसारखे डॉन त्यांना पैसे देतात. ज्यावेळी मी लोकसभा सदस्य होतो त्यावेळी लोकसभेत एक विधेयक चर्चेसाठी आले होते. सन्माननीय श्री.पी.चिदंबरम हे त्यावेळी अर्थमंत्री होते. त्यांनी व्हीडीआयएस, व्हॉलेंटरी डिक्लेअर्ड इनकम स्किम नावाची योजना काढली होती, त्यावेळी मी त्यांना विचारले होते की, Mr.Chidambaram, are you representing the cause of black marketeers ? For Whom you are working as Finance Minister ? मी त्यांना विचारले होते की, 30 टक्के शासनाला भरा आणि 70 टक्के पैसे वापरा, ही जी योजना तुम्ही आणली आहे ती कुणासाठी आहे ? समजा महाराष्ट्र सरकारने जाहीर केले की, तुम्ही घरे बांधा, 30 टक्के आम्हाला द्या, 70 टक्के तुम्ही घ्या. काय मेसेज जाईल सर्वसामान्य जनतेमध्ये ? हा प्रश्न महत्वाचा आहे. या गोष्टीकडे काळजीपूर्वक लक्ष देण्याची आवश्यकता आहे.

महाराष्ट्रामध्ये सुमारे 63 हजार सहकारी गृहनिर्माण संस्था आहेत. मुंबई शहरात, उपनगरात 27 हजार गृहनिर्माण संस्था आहेत. या गृहनिर्माण संस्थेपैकी 50 ते 60 टक्के संस्थांना अभिहस्तांतरण करुन मिळालेले नाही. ही फार मोठी शोकांतिका आहे. परंतु, याकडे कुणाचेही लक्ष नाही. काय होते की, अभिहस्तांतरणाचा फटका कुणाला बसतो ? सर्वसामान्य माणूस घर विकत घेतो, घर विकतो त्यावेळी इमारतीचे अभिहस्तांतरण झालेले नसल्यामुळे त्याला फटका बसतो. सभापती महोदय, इमारतीचे व जमिनीचे अभिहस्तांतरण न झाल्यामुळे कोणत्या

..3.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार..........

अडचणी येऊ शकतात ? जमिनीचे मार्केटेबल टायटल संस्थेच्या नावे न झाल्याने अतिरिक्त एफ.एस.आय.वापरता येत नाही, कर्ज उभारता येत नाही, स्वत:च्या जमिनीबाबत कोणताही कायदेशीर हक्क बजावता येत नाही.

यानंतर कुमारी जयश्री........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार.....

जमिनीसंबंधातील कोणत्याही विवादामध्ये संस्थेला भाग घेता येत नाही. संस्थेची इमारत पाण्याच्या पंपावर संस्थेचा दोष नसतांना देखील जप्ती आणली जाते. बिगर शेती कर वेळेतच भरला गेला नाही तर संस्थेला अनेक पटीने कर व्याजासह व दंडासह भरावा लागतो. अभिहस्तांतरण न झाल्यामुळे दुरुस्ती किंवा नुतनीकरण करता येत नाही किंवा मोडकळीस आलेल्या किंवा पुनर्बांधणीसाठी इमारत ज्या जमिनीवर उभी आहे ती जमीन नजरगहाण ठेवून, त्यावर कर्जही उभारता येत नाही. माननीय मंत्रिमहोदय आता या अकृषिक कराबद्दल मी आपल्याला प्रश्न विचारतो. म्हाडाच्या 55 वर्षापूर्वीच्या इमारतीदेखील अद्याप मुंबईमध्ये आहेत. आमच्या वांद्रे ( पूर्व ) भागात भराव घालून जागा निर्माण केली गेली आहे. " Land was reclaimed " भराव घालून वांद्रे ( पूर्व ) हा भाग अस्तित्वात आलेला आहे, याकरिता त्या काळी सव्वा कोटी रुपये लागले होते. सुमारे 50 वर्षापासून राहणा-या तेथील रहिवाशांना यापूर्वी कधीही अकृषिक कर मागण्यात आला नाही आणि आता तेथील रहिवाशांना अकृषिक कर भरा अशा नोटीसा बजाविण्यात येत आहेत. वांद्रे ( पूर्व ) येथील रहिवाशांना अकृषिक कर हा भरावाच लागणार काय करणार ? कोणाला सांगणार ? महसूल खातेही त्यांच्या पाठी लागलेले आहे. इतकी वर्षे काय महसूल खाते आणि सरकारी यंत्रणा झोपली होती काय ? अकृषिक कर लावण्यात यावा, हे म्हणण्यापूर्वी तुम्ही एवढे सांगा की, त्या ठिकाणी कधी शेती केली जात होती का ? म्हणजे तेथे कृषि व्यवसाय चालत होता का ? कारण ती जागा भराव घालून तयार करण्यात आलेली आहे. म्हाडांच्या खोल्यांमध्ये मीही काही वर्षापूर्वी टेनंट म्हणून राहिलो होतो, मीही तेथील सर्वसामान्य कामगारांप्रमाणेच एक भाडेकरु म्हणून तेथे वास करत होतो. तेव्हाची माझी खोली 10 बाय 12 ची होती आणि त्यामध्येच बाथरुम आणि संडासची व्यवस्था होती एवढयाच जागेमध्येच कामगार आपला संसार आनंदाने सांभाळतात. मेहेरबानी म्हणून सरकारने कामगारांना ही म्हाडाची घरे बांधून दिली का ? पाऊस पडल्यानंतर तेथे झोपणे मुश्कील होते कारण छतावरुन पाणी गळत असते. पलंग हलवून जेथे पाणी गळत नसेल अशा जागी रात्रभर कशीतरी झोप काढावयाची, अशी त्या खोलीमधील वस्तुस्थिती मी देखील एकेकाळी कामगार असतांना स्वत: अनुभवलेली आहे. मी तर

3J - 2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार

एक व्हील कॉटच आणून ठेवला होता म्हणजे कुठेही पाणी गळावयाला सुरुवात झाली की, तेथून पलंग हलवून पाणी गळत नाही अशा ठिकाणी सरकवून झोपावयाचे, ही वस्तुस्थिती आहे. ही आमची व्यथा आम्ही त्याकाळी संबंधित खात्याकडे व आमदारांकडे मांडली होती. या सर्व गोष्टींकडे महाराष्ट्र शासनाचे लक्ष जावयाला पाहिजे. याचे कारण म्हणजे जो गृहनिर्माण मंत्री येतो, जो अधिकारी येतो तो काय सांगणार, लोक का ओरडत आहेत. या सर्व गृहनिर्माण मंडळाच्या सर्व वसाहती मालकी हक्काने देण्याबाबत सन 1967 साली असा मोर्चा काढला होता, त्या दिवशी आषाढी एकादशी होती. यशवंतराव मोहिते त्या वेळी गृहनिर्माण मंत्री होते. आमच्या आझाद मैदानाच्या येथे म्हाडाचे कार्यालय होते. ज्यावेळी आम्ही मोर्चा आणला होता त्यावेळी काळा घोडयाजवळ एस.आर.पी,प्लॅटून वगैरे लावून जनावरांना धोपटतात त्याप्रमाणे आम्हाला व त्या मोर्चामध्ये सहभागी झालेल्यांना धोपटण्यात आले होते. त्यावेळी डॉ.साहा हे आमच्या हाऊसिंग बोर्डाच्या फेडरेशनचे अध्यक्ष होते. परंतु आम्ही न भांडता शांततेने मोर्चा काढावयाचे ठरविलेले असतांना असे घडले परंतु आणि त्या ठिकाणी देखील प्रसिध्दीविनायक लागलीच धावून आले. येथे सुध्दा जरा कोणाला बोलावयाचे असेल तर ते लगेच इलेक्ट्रॉनिक मीडियाकडे धावतात. समोरच्या बाकावरील लोकही काही बोलावयाचे असल्यास मीडियाकडे धावा करतात.

श्री.दिवाकर रावते : आपल्याकडचेही लोक जरा काही बोलावयाचे झाल्यास हल्ली मीडियाकडे धाव घेतात.

श्री.मधुकर सरपोतदार : आपल्याकडचेही लोक यामध्ये आहेत, माझा असा दावा नाही की, यामध्ये आपल्याकडील लोक नाहीत. सिध्दीविनायक हा एकच आहे परंतु प्रसिध्दीविनायक अनेक आहेत, हे चित्र उभे राहिलेले आहे. आम्ही याकरिता फार पूर्वी संघर्ष केलेला आहे. शेवटी 1980 साली आम्हाला आमच्या मालकी हक्कांचे गाळे मिळाले. याकरिता अनेक आंदोलने करावी लागली. हे गाळे मालकी हक्काचे होण्यामागे फार मोठा इतिहास आहे. याबाबत आपल्याला काहीही माहित नाही कारण आपण आताच या खात्यावर मंत्री म्हणून आपण आलात त्याबद्दल आम्ही सर्व तुमचे स्वागतच करतो. जितकी सामान्य माणसे या प्रवाहात येतील तितका सामान्य माणसांना याबाबत न्याय मिळू शकेल.

यानंतर श्री.बोरले.....

अशुध्दित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार ..........

लक्ष्मी पुत्र फक्त लक्ष्मी दर्शनचीच अपेक्षा करतात. लक्ष्मी दर्शन झाले की सर्व समस्या सुटतात. नाही म्हटले तरी असा एक मेसेज लोकांमध्ये जातो आणि तो गरीब लोकांना त्रास देतो. बिल्डर लोकांची दादागिरी लक्ष्मी दर्शनच्या बळावर चालते. मला काही सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, लक्ष्मी दर्शनवाले येथे फे-या मारत आहेत, याबाबत काळजी घेण्याची आवश्यकता आहे. बिगर शेती कर वेळीच भरला गेला नाही तर संस्थेला अनेक पटीने कर व्याजासह व दंडासह भरावा लागतो. यासंदर्भात आपण कोणती उपयायोजना करणार आहात ? यासंदर्भात महसूल विभागाशी चर्चा करा. त्या गरीब लोकांना पिळू नका. त्यांचे रक्त पिऊ नका. रक्त प्यावयाचे असेल तर लक्ष्मी पुत्रांचे प्या. परंतु तुम्ही त्यांच्याकडे जाणार नाही. तुम्ही फक्त गरीबांचेच रक्त पिणार. हे शासनाचे काम नाही. माझ्या मतदार संघातील गरीब लोक झोपडयांमध्ये राहतात. झोपडपट्टीमध्ये 70 ते 80 टक्के मतदान होते. वाळकेश्वरसारख्या श्रीमंत वसतीमध्ये 10 टक्के सुध्दा मतदान होत नाही. त्यांना मतदानाची गरज नाही. तुम्ही निवडून या अथवा नको या, त्यांना काही गरज नाही. जो गरीब माणूस आहे त्याला फक्त मतदानाची किंमत कळते. तो फक्त मतदान करतो. म्हणून सर्वसामान्य गरीब लोकांचे आशीर्वाद घेणे आवश्यक आहेत. लक्ष्मी दर्शनवाल्यांचे आशीर्वाद घेऊ नका. अभिहस्तांतरण न झााल्यामुळे दुरुस्ती किंवा नुतनीकरण करता येत नाही किंवा मोडकळीस आलेल्या किंवा पुनर्बांधणीसाठी इमारत ज्या जमिनीवर उभी आहे ती जमीन नजरगहाण ठेऊन त्यावर कर्ज उभारता येत नाही. हा मुद्दा आपण लक्षात ठेवा. मी तो मुद्दा पुन्हा रिपीट करतो. अभिहस्तांतरण न झाल्यामुळे दुरुस्ती किंवा नुतनीकरण करता येत नाही किंवा मोडकळीस आलेल्या किंवा पुनर्बांधणीसाठी इमारत ज्या जमिनीवर उभी आहे ती जमीन नजर गहाण ठेऊन त्यावर कर्ज उभारता येत नाही. मुंबई शहरामध्ये हाऊसिंग बोर्डाच्या 19 हजार इमारती दुरुस्तीच्या प्रतिक्षेत आहेत. त्या इमारती दुरुस्त होऊ शकत नाहीत. कारण त्या इमारतीचे मालक दुरुस्ती करण्यास तयार नाहीत, अशी परिस्थिती आहे. मी हा एक भाग मांडलेला आहे. दुसरा भाग देखील मांडण्याची आवश्यकता आहे. त्यातील काही भाग इंग्रजीमध्ये आहे त्याचा मी येथे उल्लेख करणार आहे.

(यानंतर श्री.गागरे ........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार .....

There are five new sub-sections. The Bill has created two Authorities viz. (1) Competent Authority and (2) Sub-Registrar. The proposed section 11(2) enjoins the promoter to file with the Competent Authority, within the prescribed period a copy of the Conveyance executed by him Under Section 11 of the Act.

मंत्री महोदयांना हे मुद्दाम सांगण्यासाठी या विधेयकावर मी बोलत आहे. मंत्री महोदय विधेयक वाचून त्यावर बोलत होते.

Even if the promoter strictly complies with the provisions of Section 11 of the Ownership of Flats Act executes the conveyance within 4 months (or the prescribed period), it has to be under provisions of the proposed Section 11(2) of the Ownership of Flats Act filed with the Co0mpetent Authority. Which is an additional step which is redundant and, therefore, deletable.

It is obvious that there is no necessity of the Competent Authority coming into the picture, if the promoter strictly follows the provisions of Section 11 i.e. when the promoter does not fall to execute the conveyance. The promoter and the society can go to the Sub-Registrar directly and get the Deed of Conveyance (Instrument) executed by the Promoter registered as and when such Conveyance will, of course, be Regular Conveyance and not "Deemed Conveyance". The proposed Section 11(3) lays down that if the promoter fails to execute the Conveyance in favour of the Co0-operative Housing Society within the prescribed period, the Members of such Co-0perative Housing Society may make an application to the Competent

..3L-2



Shri Madhukar Sarpotdar contd......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

Authority, accompanied by the true copies of the registered agreements for sale, executed with the promoter by each individual member of the society and other relevant documents, for issuing a certificate that such a society is entitled to have a unilateral "Deemed Conveyance", executed in their favour and to have it registered.

The proposed Section 11(4) lays down that the Competent Authority, on receiving such an application and after making such enquiry as deemed necessary and after verifying the authenticity of the documents submitted and after giving the promoter a reasonable opportunity of being heard and on being satisfied that it is a fit case for issuing such certificate, shall issue a certificate to the Sub-Registrar, certifying that it is a fit case for enforcing unilateral execution of conveyance deed for conveyance of the right, title and interest of the promoter in the Land and building in the favour of the applicant as "Deemed Conveyance".

The proposed Section 11(5) lays down that on submission by such society to the Sub-Registrar, the certificate issued by the Competent Authority along with the unilateral instrument of the Conveyance, the Sub-Registrar shall issue summons to the promoter to show cause why such unilateral instrument should not be registered as "Deemed Conveyance" and, after giving the promoter and the applicants a seasonable opportunity of being heard, may, on being satisfied that it was a fit case for unilateral conveyance, register the instrument as "Deemed Conveyance".

...3M-1..
नंतर श्री.सुंबरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सरपोतदार .....

The proposed Section 11(5) of The Ownership of Flats Act, virtually ordains a Second enquiry which is certainly uncalled for. No time limit is provided for registration of "Deemed Conveyance" which is the operative step. The amending Act does not indicate any remedy of the Society, when the Sub-Register decides not to register the Instrument as "Deemed Conveyance".

This raises the following two basic questions.

1) What is the remedy of the members of the co-operative housing society if the Competent Authority fails/refuses to issue a certificate that is fit case for enforcing unilateral execution of conveyance to the Sub-Registrar?

2) Can the members of the Co-operative Housing Society aggrieved by the failure of the Competent Authority to issue such a certificate have a right to approach the Sub-Registrar? In other words, is the Sub-Registrar going to sit in judgment over the action or inaction of the Competent Authority? That is to say, is the Sub-Registrar an Appellate Authority? To us, it appears to be so."

Here, the Sub-Registrar is going to be the Appellate Authority. Whether the Sub-Registrar has got the powers to hear the grievances and take the decision? There is no provision in this regard.

Further it is said that "We suggest that since what the Sub-Registrar is required to do is already substantially done by the Competent Authority

....... 3एम 2 ...



Shri Sarpotdar ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

if something is wanting, let that too be entrusted to the Competent Authority and his certificate should be final i.e. the Sub-Registrar be bound by the Certificate issued by the Competent Authority."

There are, this type of other questions also. In fact, this Bill is boon to the builders and developers.

Further it is stated that "Believe me, the Competent Authority and the Sub-Registrar will prove to be the greatest hurdles in the way of securing "Deemed Conveyance" by the Co-operative Housing Societies and that there will hardly be any "Deemed Conveyance". The Government wants the co-operative housing societies to believe that it wants to help them through this Amendment. But, in practice, it is going to be a boon in disguise to the builders and developers."

सभापती महोदय, हे विधेयक चांगले आहे, कन्व्हेअन्स लगेच झाले पाहिजे, या सगळ्या गोष्टी मान्य आहेत. पण त्यांची अमलबजावणी कशी होणार आहे ? सहकारी सोसायटीमध्ये फ्लॅट असणे म्हणजे सर्वसामान्य मध्यमवर्गीयाच्या दृष्टीने केवढी तरी मोठी अचिवमेंट आहे याची आपण कल्पना करू शकणार नाही. असे असताना त्याला, त्याच्या सोसायटीला कन्व्हेअन्स मिळाले नाही, वेळेमध्ये मिळाले नाही तर त्याची किती तरी मोठी फसवणूक होणार आहे. आज काल शेतकरी आत्महत्या करीत आहेत पण भविष्यात यामुळे सामान्य मध्यमवर्गीयापुढे आत्महत्या करण्याखेरीज दुसरा उपाय राहणार नाही. तेव्हा माणूस जगविणे हे शासनाचे काम आहे की माणसाला मरण्यासाठी प्रोत्साहन देणे हे शासनाचे काम आहे ? हे आपण लक्षात घ्या. हे सारे आपल्या हातामध्ये आहे. आता येथे माननीय मुख्यमंत्री असते तर मी त्यांना देखील हेच सांगितले असते.

....... 3एम 3 ...



श्री. सरपोतदार .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

खरे तर गृहनिर्माण विभाग हा कॅबिनेट दर्जाच्या मंत्र्याकडे असला पाहिजे. पण कोणाला मंत्री म्हणून, कोणाला राज्यमंत्री म्हणून नेमले तर काय होईल, कोण बंड करील वगैरे सारे विचार करावे लागतात. त्यातून मग तडजोडी केल्या जातात. खंडणी घेणारे आणि खंडणीसाठी तोडणारी माणसे आता तुमच्या बाजूला आलेली आहेत., शासनाने अशी माणसे गोळा केलेली आहेत. त्यामुळे सर्वसामान्य जनांच्या मनात शासनाबद्दल जो विश्वास निर्माण झाला पाहिजे तो विश्वास निर्माण होत नाही हीच खरी शोकांतिका आहे आणि त्याकडे लक्ष देण्याची नितांत आवश्यकता आहे. ....

( यानंतर श्री. सरफरे ..... एनएन 1 ..

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार...

सभापती महोदय, मी मागे एकदा अशासकीय विधेयक आणले होते त्यावेळी शासनाकडून काही गोष्टींची अपेक्षा केली होती ती फुलफील झाली आहे. त्या विधेयकाच्या वेळी मी अपेक्षा व्यक्त केली होती ती आज सुध्दा करीत आहे की, बिल्डर्सना जमिनीचे अभिहस्तांतरण करण्यासाठी कालमर्यादा ठरवून दिली पाहिजे. त्यांनी वेळेमध्ये अभिहस्तांतरण न केल्यास त्यांच्याविरुध्द कडक शिस्तीची तरतूद करणारा कायदा करावा अशाप्रकारची तरतूद या विधेयकामध्ये केली आहे काय? त्याकरिता अत्यंत मुळमुळीत तरतूद केली असल्यामुळे बिल्डर्सना त्याची अजिबात भीती वाटणार नाही. या धनिकांवर जबरदस्त कंट्रोल आणावयाचा असेल आणि बिल्डर्सना लगाम घालावयाचा असेल, त्यांनी कायद्यातील तरतुदीचे पालन करण्यामध्ये जर कसूर केली असेल तर त्यांची सुटका नाही अशाप्रकारची तरतूद केली पाहिजे. लहान मुलांनी चोरी केली तर त्यांना पोलीस अटक करतो. परंतु मोठया माणसाने जर चोरी केली तर त्याला आपण सोडून देता. निवडणुकीच्या वेळी जर कुणी पिस्तूलाचा धाक दाखविला, तलवार दाखविली तर त्यांच्यावर सर्व कलमे लावल्याचे सांगता परंतु ते तुमच्या पक्षाचे लोक असले तरी त्यांना अटक करण्याचे धाडस तुम्ही दाखवत नाही. याची जशी जनतेला चिंता वाटते तशी चिंता बिल्डर लोकांच्या बाबतीत आपल्याला वाटते. याकरिता आपण योग्य पावले उचलली नाही तर अभिहस्तांतरण हा विषय अतिशय कठीण होईल. त्याचे परिणाम सर्वसामान्य लोकांना भोगावे लागतील हे आपण लक्षात ठेवा. एका सोसायटीमध्ये 30 ते 35 मध्यमवर्गीय लोक रहातात. मुंबईमधील लोकसंख्या 1 कोटींच्या पुढे गेली आहे. हे सर्व मतदार बांधव आहेत. त्यामध्ये कॉग्रेसचे असतील, राष्ट्रवादी कॉग्रेसचे असतील, शिवसेना-भाजपचे असतील. ही जनता अतिशय प्रामाणिक असून तुम्ही म्हणाल ती प्रत्येक गोष्ट करणारी आहे. या जनतेच्या ऊरावर बसण्याचे पातक आपण करु नका. अभिहस्तांतरण करीत असतांना कोणत्याही प्रकारची अडचण येता कामा नये, बिल्डर्ससाठी कोणत्याही प्रकारची पळवाट न ठेवता अतिशय सरळ मार्गाने तीन ते चार महिन्यामध्ये त्यांची अभिहस्तांतरणाची प्रक्रिया पूर्ण झाली पाहिजे. अशाप्रकारची तरतूद कायद्यामध्ये असणे आवश्यक आहे. त्याकरिता आपण ताबडतोब अमेंडमेंट आणावी. शासनामध्ये टेबलाखालून आणि टेबलावरुन व्यवहार करुन पोट भरणारे लोक आहेत. एस.आर.ए. सारखी घाणेरडी संस्था मुंबईमध्ये नाही. तुमच्या मंत्रालयाच्या पाचव्या माळयावर त्याचे कार्यालय आहे. मी त्याचे विस्ताराने विश्लेषण करणार नाही कारण तो माझा विषय नाही. ज्यावेळी तो विषय येईल त्यावेळी तुमचे अधिकारी काय करतात हे मी सांगेन. मुंबईमध्ये बिल्डर्स वर्गाकडून

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ MHM/

श्री. मधुकर सरपोतदार...

गरीब झोपडपट्टीमध्ये राहणाऱ्या लोकांवर जो अन्याय होत आहे तसा प्रकार या कायद्याच्या बाबतीत होऊ नये अशी माझी आपणास विनंती आहे. याकरिता आपण अभिहस्तांतरणाच्या आणलेल्या विधेयकाचे मी स्वागत करतो. या विधेयकामध्ये दाखविलेल्या त्रुटी आपण कशापध्दतीने दूर करणार आहात हे सांगितले पाहिजे.

माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण म्हणाले की, त्यांची माननीय मुख्यमंत्र्यांबरोबर बैठक झ ाली. त्यांनी स्टँप डयुटी ॲक्टबाबत सांगितले की, 5 ते 10 हजार रुपयांपेक्षा जास्त पैसे भरावे लागणार नाहीत अशाप्रकारची कायद्यामध्ये तरतूद करु.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार (पुढे सुरू...

स्टॅम्पडयुटीची तरतूद करायची झाली तर 40 वर्षाची इमारत असेल तर त्या ठिकाणच्या रहिवाशांना आताच्या दराने स्टॅम्प ड्युटी भरावी लागेल. ती त्यांना पेलणार नाही, त्यांना ती भरणे शक्य होणार नाही. निरनिराळ्या प्रकारचे टॅक्स आहेत, मेंटेनन्स टॅक्स आहे, पाण्याचा टॅक्स आहे, हे सगळे भरताना सामान्य माणूस त्या ओझ्याखाली दबून जातो. मुंबईमध्ये सामान्य माणूस जगला पाहिजे, त्याला मुंबई शहरात स्थान असले पाहिजे, नाही तर केवळ कोट्याधीश, काळाबाजारवाले, मटकावाले, दारूवाले हेच येथे रहातील. मला आठवते, त्यावेळेस माननीय शरद पवार हे मुख्यमंत्री असताना त्यांनी विधानसभेमध्ये सांगितले होते की, मुंबई सिंगापूर बनवू, कॅसिनो आणू. पण त्यावेळेस तसे करणे शक्य झाले नाही. तो मार्ग आता आपण अनुसरत आहात. मुंबई ही महाराष्ट्राची राजधानी होण्यासाठी 105 लोकांना आपले प्राण गमवावे लागले. त्यानंतर मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राचा जन्म झाला. कृपा करून या सगळ्या गोष्टी विसरून चालणार नाही. सर्वसामान्य माणूस मुंबईमध्ये जगावा या दृष्टीने पाहिले पाहिजे, तरच त्या मृतात्म्यांच्या आत्म्याला शांती मिळेल. तेव्हा कायदा पास करण्यापूर्वी या कायद्यातील तरतुदींची काळजीपूर्वक अंमलबजावणी करावी. गरिबांना न्याय देणाऱ्या तरतुदी असाव्यात, त्यामधील तरतुदी या केवळ विकासकाला न्याय देणाऱ्या नसाव्यात, एवढे सांगून माझे दोन शब्द संपवितो. धन्यवाद.

---

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मुझफ्फर हुसेन (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबतचे विधेयक सादर झालेले आहे, त्यावर माझे विचार मांडण्याचा मी प्रयत्न करणार आहे. बऱ्याच वर्षापासून गृहनिर्माण सहकारी संस्थां या रजिस्टर झालेल्या असतात परंतु त्यांना कन्हेयन्स मिळत नाही, म्हणून हे विधेयक आणलेले आहे. मला वाटते, कन्व्हेयन्स का होत नाही ? याची कारणे शोधली पाहिजेत आणि ती या विधेयकामध्ये समाविष्ट केली पाहिजेत. वेगवेगळ्या कंपन्यांच्या नावाने, वेगवेगळ्या लोकांच्या नावाने रजिस्टर करून त्या माध्यमातून विकासक विकासाची कामे करत अतात. कन्हेयन्स करण्याकरिता रजिस्ट्रारला ज्या कागदपत्रांची गरज लागते ती कागदपत्रे अत्यंत महत्वाची असतात. त्यामध्ये ॲक्युपेशन सर्टिफिकेट स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत इश्यु केले जाते. अक्युपेशन सर्टिफिकेटशिवाय कन्हेयन्स होणे अशक्य असते. अशा परिस्थितीमध्ये ॲक्युपेशन सर्टिफिकेट का दिले जात नाही ? याची कारणे काय आहेत, ती शोधून त्यांचा या विधेयकामध्ये समावेश होणे अत्यंत गरजेचे आहे, असे मला वाटते. आपण विकासकाच्या विरूध्द केस रजिस्टर करून त्याच्यावर कारवाई करण्याचे अधिकार डीडीआरला किंवा आरडीसीला दिलेले आहेत. विकासकर्ता वेगवेगळ्या कंपन्यांच्या नावाने, वेगवेगळ्या व्यक्तींच्या नावाने विकासाची कामे करत असतात.

यानंतर श्री.बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मुझफ्फर हुसेन .....

अशा परिस्थितीमध्ये आपल्याला त्या विकासकर्त्याला पुढची सोसायटी तयार करीत असताना किंवा पुढची इमारत तयार करीत असताना कोठेही आळा घालू शकणार नाही. त्याला आपण थांबवू शकणार नाही. म्हणून ऑक्युपंसी सर्टिफिकेट का प्राप्त झाले नाही याचा शोध घेतला पाहिजे. त्यासंबंधीचा उल्लेख या बिलामध्ये करणे आवश्यक आहे. जी इमारत तयार झालेली आहे त्याच्या आर्किटेक्टला सुध्दा जबाबदार धरले पाहिजे. त्या ठिकाणी एफ.एस.आय. चे उल्लंघन झाले असेल किंवा कायद्याचे उल्लंघन झाले असेल तर ऑक्युपंसी सर्टिफिकेट दिले जात नाही. म्हणून तेथील आर्किटेक्टला सुध्दा जबाबदार धरले पाहिजे जेणेकरुन आर्किटेक्ट सुध्दा अशा प्रकारच्या अनधिकृत बांधकामाला साथ देणार नाही आणि अशा प्रकारच्या अनधिकृत इमारतीसाठी तो आर्किटेक्ट म्हणून काम करणार नाही. त्याचप्रमाणे त्या ठिकाणी काम करणारे जे बिल्डिंग कॉन्ट्रॅक्टर असतात त्यांनाही काही प्रमाणात जबाबदार धरले पाहिजे. मुंबई शहरामध्ये खूप मोठमोठ्या कंपन्या आहेत. त्यांच्यावर काही प्रमाणात जबाबदारी टाकणे गरजेचे आहे. आर्किटेक्ट, आर.सी.सी. कंसल्टंट, बिल्डिंग कॉन्ट्रॅक्टर कंपनी यांना जबाबदार धरावे जेणेकरुन एफ.एस.आय.चे उल्लंघन होणार नाही आणि त्यांना ऑक्युपंसी सर्टिफिकेट मिळू शकेल. ऑक्युपंसी सर्टिफिकेट मिळाले तर विकासकर्त्याला कन्व्हेयंस करुन देणे भाग पडेल. यादृष्टीने माझ्या सूचनेचा विचार करावा अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, या विधेयकाच्या खंड 6 च्या पोट कलम 5 मध्ये असे म्हटले आहे की, "अशा संस्थेने किंवा यथास्थिती, कंपनीने अथवा वेश्म मालकांच्या संघाने, उप निबंधकाला किंवा नोंदणी अधिनियम, 1908 अन्वये नियुक्त केलेल्या संबंधित समुचित नोंदणी अधिकाऱ्याला, एकपक्षीय अभिहस्तांतरण विलेखासह सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले प्रमाणपत्र सादर केल्यावर, उप निबंधक किंवा संबंधित समुचित नोंदणी अधिकारी, नोंदणी अधिनियम, 1908 मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, असा एकपक्षीय विलेख "मानीव अभिहस्तांतरणपत्र" म्हणून का नोंदण्यात येऊ नये याचे कारण दर्शविण्यासाठी प्रवर्तकाला समन्स पाठवील आणि प्रवर्तकाला व अर्जदारांना आपली बाजू मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर,..." सभापती महोदय, हा अत्यंत महत्वाचा मुद्दा आहे. प्रत्येक

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मुझफ्फर हुसेन .....

नियमामध्ये, प्रत्येक कायद्यामध्ये आपण नेहमी "वाजवी संधी" असा उल्लेख करतो. वाजवी संधी म्हणजे हिअरींग देण्यासाठी भरपूर वेळ देणे. त्याला वेळेची मर्यादा नाही. वाजवी संधी म्हणजे ती 6 महिन्याची, 6 वर्षाची किंवा 60 वर्षाची सुध्दा असू शकते. त्यामुळे हे विधेयक आणण्यामागचा जो मूळ उद्देश आहे तो सफल होणार नाही. वाजवी संधी म्हणजे ॲप्रोप्रिएट अपॉर्च्युनिटी, व्हॅलिड अपॉर्च्युनिटी देण्याचा जो उल्लेख या विधेयकामध्ये केलेला आहे त्याबाबतीत कालमर्यादा घातलेली नाही. त्यामुळे हे विधेयक आणण्यामागचा जो उद्देश आहे तो 101 टक्के विफल होणार आहे. त्यामुळे यासंदर्भात या बिलामध्ये कालमर्यादा घालणे आवश्यक आहे. या पोटकलमामध्ये पुढे असे म्हटले आहे की, "प्रवर्तकाला व अर्जदारांना आपली बाजू मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, एकपक्षीय अभिहस्तांतरणपत्रासाठी हे योग्य प्रकरण होते याची खात्री पटल्यावर त्या विलेखाची "मानीव अभिहस्तांतरणपत्र" म्हणून नोंदणी करु शकेल." यामध्ये कालमर्यादा असणे आवश्यक आहे. यामध्ये दोन महिने, तीन महिने अशी कालमर्यादा नसेल तर या बिलाचा उद्देश डिफीट होणार आहे. त्यादृष्टीने माझ्या सूचनेचा शासनाने विचार करावा अशी मी विनंती करतो. सभापती महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपल्याला धन्यवाद देऊन मी माझे भाषण संपवितो.

---

यानंतर श्री. भोगले ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2005 चे वि.स.वि.क्रमांक-73, महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे विनियमन करण्याबाबत) (सुधारणा) विधेयकावर माझे विचार मांडण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी या बिलाबद्दल शासनाचे अभिनंदन केले. ते ऐकून मला आठवले, एखाद्या ऑटोरिक्षामध्ये प्रवासी त्याची बॅग विसरला, त्या बॅगेत पैसे असतील, त्या पैशासहित ती बॅग रिक्षाचालकाने पोलीस स्टेशनमध्ये नेऊन जमा केली तर त्या रिक्षाचालकाला त्याच्या प्रामाणिकपणाबद्दल बक्षिस दिले जाते. आपले पैसे नसताना ते जर पोलिसांकडे जमा केले तर जमा करणाऱ्या माणसाला बक्षिस दिले पाहिजे का? सध्याच्या काळात प्रामाणिकपणा कमी दिसतो. म्हणून मग एखाद्या प्रामाणिक माणसाचे अभिनंदन करावेसे वाटते तसे बहुधा सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांना वाटले, कारण या शासनाकडे प्रामाणिकपणा उरलेला नाही. परंतु हे बिल आणून जो प्रामाणिकपणा शासनाने दाखविला यामुळेच त्यांनी शासनाचे अभिनंदन केले असावे असे मला वाटते.

सभापती महोदय, कन्व्हेयन्स होत नव्हते तोपर्यंत असे होत होते की, जमिनीवर मालकी हक्क तत्वावर घरे बांधली, फ्लॅट बांधले. परंतु कन्व्हेयन्स न झाल्यामुळे मालकी हक्काचे घर असताना सदनिकाधारक हे आजही भाडेकरु ठरले आहेत, अशी स्थिती मुंबई, पुणे, ठाण्यामध्ये निर्माण झालेली आहे. या कन्व्हेयन्सच्या बिलामुळे ख-या अर्थाने सदनिका मालकी हक्काच्या होतील. कोणत्याही बिल्डर किंवा जमीन मालकाने अडविण्याचा प्रयत्न केला तरी त्यांच्या प्रयत्नाला यश येणार नाही. आम्ही या बिलाचे स्वागत करीत आहोत. या बिलाला विलंब होण्याची अनेक कारणे आहेत. मागील वेळी सक्षम प्राधिकारी म्हणून उपजिल्हाधिकाऱ्यांची नेमणूक केली होती. परंतु सहकार खात्याने आक्षेप घेऊन हा विषय सहकार खात्याच्या अखत्यारित असल्याचे सांगितले. या विषयाची नस्ती सहकार खात्याशी संबंधित विषय असल्यामुळे त्या खात्याकडे जाणार असल्यामुळे त्या संदर्भातील निर्णय होण्यास दोन वर्षे विलंब लागला. सभापती महोदय, मी दोन-तीन महत्वाचे मुद्दे मंत्रीमहोदयांसमोर मांडू इच्छितो. इमारतीचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर बिल्डिंग कम्प्लिशन सर्टिफिकेट मिळते. त्यानंतर ऑक्युपेशन सर्टिफिकेट मिळते. अनेक बिल्डर ओ.सी.न घेता बिल्डिंग सी.सी. घेतात. बांधकाम करण्यासाठी तात्पुरत्या स्वरुपात वीज, पाणी कनेक्शन

श्री.विनोद तावडे................

मिळालेले असते. त्यातूनच इमारतीतील सदनिकांना वीज व पाण्याचा पुरवठा करुन बिल्डर निघून जातो. मग सदनिकाधारक आपल्या घरात राहण्यास आल्यानंतर ओ.सी.नाही म्हणून कन्व्हेयन्स करता येत नाही अशी स्थिती निर्माण होते. बिल्डरने बिल्डिंग सी.सी.घेतले आहे, पण ओ.सी.घेतलेले नाही. त्यामुळे ओ.सी.च्या खर्चाचा बोजा सदनिकाधारक व त्यांच्या सोसायटीच्या माथी मारला जातो. असे होऊ नये म्हणून शासन काय धोरण स्वीकारणार आहे ते सभागृहाला स्पष्ट केले पाहिजे. त्याची स्पष्टता होणे आवश्यक आहे. जमीनमालक जमिनीचा विकास करतो. अशा जमिनीवर उभारलेल्या इमारतींमध्ये सदनिका विकत घेतल्या जातात. परंतु जमीनमालक व विकासक यांच्यामध्ये वाद निर्माण झाल्यानंतर प्रकरण कोर्टापुढे दाखल होते. प्रकरण कोर्टात दाखल झाल्यामुळे कन्व्हेयन्स होणार नाही अशी अडचण निर्माण होता कामा नये. यादृष्टीने शासन कोणती काळजी घेणार आहे, काय धोरण राबविणार आहे याचेही उत्तर मंत्रीमहोदयांनी सभागृहाला दिले पाहिजे. 1 लाख चौरस फुटाचा प्लॉट विकासकाने विकास करण्यासाठी घेतला. त्यापैकी 40 हजार चौरस फूट जागेचा विकास केला. विकसित केलेल्या जागेतून जो पैसा उभा राहील त्यातून उर्वरित जागेचा तो विकास करणार असेल, हा विकास एका वर्षाने होईल, दोन वर्षानंतर होईल. मुंबईमध्ये अशी अनेक प्रकरणे उदाहरणासाठी देता येतील. मोठमोठ्या गृहसंकुलामध्ये चार इमारती आता बांधल्या, चार इमारती चार-सहा महिन्यानंतर, दोन वर्षानंतर बांधल्या असे झाले आहे. अशा पूर्ण होणाऱ्या इमारतींच्या सोसायट्यांचे कन्व्हेयन्स करताना जी अविकसित जमीन आहे त्या जमिनीवरील एफएसआय त्या सोसायटीच्या नावे करावा लागेल का? याचीही स्पष्टता झाली पाहिजे.

(नंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे .....

त्याच्या सबडिव्हीजनला परवानगी आपण कशी देणार आहात याची सुध्दा माहिती या ठिकाणी मिळण्याची आवश्यकता आहे. 1 लाख चौ.फूटातून 60 हजार चौ.फूट जागा बिल्डरकडे शिल्लक राहिलेली होती त्यांसदर्भात बिल्डर कोर्टात जाईल आणि कोर्ट नॅचरल जस्टीस प्रमाणे बिल्डरच्या बाजूने स्टे देईल. असे झाले तर त्यामुळे अडचणी निर्माण होतील. त्यामुळे यातून कोणता मार्ग काढला जाईल, याबाबत सुस्पष्टता माननीय मंत्री महोदयांनी करण्याची आवश्यकता आहे. या विधेयकात ज्या त्रुटी आहेत त्या दूर केल्या तर महाराष्ट्रातील संपूर्ण जनतेपर्यंत चांगल्या प्रकारचा मेसेज जाईल असे मला वाटते.

---------

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, पुरोगामी महाराष्ट्राच्या निर्मितीच्यावेळी माननीय यशवंतराव चव्हाण यांनी मुलभूत स्वरुपाचा आणि घटनादत्त अधिकाराचा एक सुंदर निर्णय जाहीर केला आणि तो म्हणजे, "कसेल त्याची जमीन." सभापती महोदय, कूळ कायद्यामुळे महाराष्ट्राचे चित्र पालटले. अगोदर जे मजूर गुलामगिरीमध्ये आपले जीवन जगत होते ते कूळ कायद्यामुळे जमिनीचे मालक झाले. महाराष्ट्राच्या निर्मितीच्या 40-45 वर्षानंतर शिवसेना प्रमुख माननीय बाळासाहेब ठाकरे यांनी "राहील त्याचे घर" असे चित्र निर्माण केले. मुंबईमध्ये झ ोपडपट्टीत राहत असलेल्या गरीब लोकांना घर मिळवून देण्याचे काम माननीय शिवसेना प्रमुख श्री.बाळासाहेब ठाकरे यांनी केलेले आहे. त्यांनी गरीब जनतेला कायमस्वरुपी घर दिलेले आहे. मुंबईचा बकालपणा जावा, मुंबईत नव्याने झोपडया होऊ नयेत यासाठी त्यांनी शिवशाही प्रकल्पाची निर्मिती केली. हा विषय जेव्हा निघतो तेव्हा सत्ताधारी पक्षाचे सन्माननीय सदस्य खुणावत असतात. परंतु मी आपल्याला सांगू इच्छितो की, 'घर पहावे बांधून' असे जे म्हटलेले आहे ते चुकीचे नाही. स्वत:चे घर असणे ही संकल्पना जीवनामध्ये अतिशय गोंडस आहे. मग ते घर श्रीमंत व्यक्ती बांधत असेल किंवा गरीब व्यक्ती बांधत असेल, त्यांना स्वत:चे घर झाल्यानंतर जीवनात कृतकृत्य झ ाल्यासारखे वाटत असते. माननीय शिवसेना प्रमुखांनी गरीब जनतेला "माझ घर" देण्याचा निर्णय घेतला आणि त्या प्रमाणे त्यांनी गरिबांना शिवशाही प्रकल्पातून घरे मिळवून दिली. शिवसेनेने या प्रकल्पांअतर्गत 5 हजार घरांच्या चाव्याचे वाटप केलेले आहे. आता 1.57 लक्ष सदनिकाचे काम या प्रकल्पातून पूर्ण झालेले आहे. सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी सुध्दा सूचना मांडलेली आहे. कायदा असेल तरच तो वापरता येतो नाही तर वापरता येत नाही.

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते......

सभापती महोदय, मी बिल्डर म्हणून काम केलेले आहे. माननीय शिवसेना प्रमुख श्री.बाळासाहेब ठाकरे यांच्या आशीर्वादाने मी 1985 मध्ये नगरसेवक झालो. मी महापौर पदही भूषविलेले आहे. मी नगरसेवक असल्यामुळे महानगरपालिका आणि बिल्डर यांच्यामध्ये कोणते काम चालते याची मला पूर्ण कल्पना आली. त्यामुळे 1985 नंतर माझा बिल्डर व्यवसाय बंद केला. मी यापूर्वी बिल्डर म्हणून काम केलेले असल्यामुळे या क्षेत्रात कोणत्या त्रुटी-उणिवा आहेत याची मला चांगलीच माहिती आहे. तेव्हा या ठिकाणी हे जे विधेयक आणलेले आहे ते अपूर्ण आहे.

सभापती महोदय, मी मंत्री महोदयांना आपल्यामार्फत सांगू इच्छितो की, उपनगरामध्ये टी.डी.आर.देता येतो, मुंबई शहरात टी.डी.आर. देता येत नाही. टी.डी.आर. संदर्भात माझ्याकडे कोर्टाच्या अनेक जजमेटस् आहेत. त्या वाचून दाखविल्या तर भरपूर वेळ जाईल. घटनेच्या कलम 15 आणि 21 अन्वये उच्च न्यायालयाने निर्णय दिलेले आहेत. घर बांधणी आणि घर उपलब्धी यामध्ये फरक आहे. घटनेच्या कलम 15 आणि 21 अन्वये आपल्याला अधिकार आहेत.

सभापती महोदय, या विधेयकातून सरकारला काय अभिप्रेत आहे ते मला समजलेले नाही. को-ऑप.सोसायट्या याचा अर्थ घर नाही. को-ऑप. सोसायट्या आहेत, को-ऑप.बँका आहेत, लेबर को-ऑप.सोसायटी आहे. 1902 पर्यंत ज्या गृहनिर्माण सोसायट्या कायद्याप्रमाणे रजिस्टर्ड झालेल्या आहेत त्याची आकडेवारी मी सांगतो. मुंबई- 19702, ठाणे-14296,पुणे-7711, नाशिक-3836, नागपूर-857 एकूण 54111. सरकारी नोंदणी प्रमाणे इतक्या सोसायट्या रजिस्टर्ड आहेत. यामध्ये आणखी दहा टक्क्यांनी वाढ झालेली असेल. यात दुसरी कॅटेगरी आहे. काही गृहनिर्माण सोसायट्या रजिस्टर्ड झालेल्याच नाहीत. त्या सोसायट्या रजिस्टर्ड का झाल्या नाहीत, याची अनेक कारणे आहेत. ज्यांनी सदनिका घेतल्या ते एकत्र आले पाहिजेत. त्यांनी एकत्र येऊन सोसायटी रजिस्टर्ड करण्यासाठी अर्ज केला पाहिजे. त्यासाठी त्यांना डॉक्युमेंटस द्यावे लागतात.

सभापती महोदय, मुंबई शहरामध्ये गेल्या 30-40 वर्षापूर्वी ज्या इमारती बांधल्या गेल्या त्यांची मालकी कायद्याप्रमाणे सोसायटीकडे आली नाही, असा माझा समज आहे. सन 1991-92 मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री श्री.शरद पवार यांच्या राजवटीत टी.डी.आर. पध्दत आली.

यानंतर श्री.पुरी....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

या सोसायटयांच्या नावावर जागा झाली नाहीतर बिल्डरांचा फायदा, अशाप्रकारचे समीकरण मांडले गेले. कायद्यात तरतुदी स्पष्ट आहेत. मला अजून कळले नाही की, कोणत्या सालातील इमारतींकरिता आपण हे बिल याठिकाणी आणले आहे ? हे आपण सांगावयास पाहिजे, त्यामुळेच मी याठिकाणी सूचना दिली होती. माननीय मंत्री महोदयांना, यामध्ये काय चालले आहे ते हळूहळू त्यांच्या लक्षात येईल. या विधेयकातील त्रुटीमुळे अत्यंत विचित्र अवस्था निर्माण झाली असून ती मांडण्याचा मी प्रयत्न करणार आहे. याबाबतीतील माझी चिंता व काळजी वेगळी आहे. हे विधेयक त्याकरिताच आणले आहे का ? माननीय मंत्री महोदयांनी याठिकाणी या विधेयकाची संकल्पना वाचून दाखवली. परंतु त्यांची संकल्पनाच मला कळली नाही. विधेयकाच्या उद्देश व कारणांमध्ये असे म्हटले आहे की, "राज्यात मालकी हक्काच्या तत्त्वावर सदनिका बांधण्यास प्रोत्साहन देणे," द्या, प्रोत्साहन देताना ॲक्ट करा. पुढें असे म्हटले आहे की, "त्यांची विक्री, व्यवस्थापन आणि त्यांचे हस्तांतरण या गोष्टींचे नियमन करण्यासाठी," म्हणजे, भविष्यासाठी. पुढे असेही म्हटले आहे की, "महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम,1963 हा अधिनियमित केला आहे." भविष्यात बांधल्या जाणाऱ्या इमारतींसाठी महाराष्ट्र को-ऑप.ॲक्ट 1963 प्रमाणे हे बिल आणले आहे, असे प्रस्तावनेत म्हटले आहे. त्या मालकांस जागेचे हस्तांतरण केले पाहिजे, असे यातून आपल्याला अपेक्षित आहे. यामध्ये पुढे असेही म्हटले पाहिजे की, "राज्याच्या अनेक क्षेत्रांमध्ये असलेल्या घरांच्या तीव्र टंचाईच्या परिणामी वाढत्या प्रमाणात उद्‌भवलेल्या अनिष्ट प्रथा व गैरव्यवहार यांना प्रभावीपणे आळा घालण्यासाठी उक्त अधिनियम करण्यात आला आहे." भविष्यातील घरबांधणीच्या संदर्भात हे विधेयक सादर करीत असताना माझे मित्र श्री.मधुकर चव्हाण यांनी म्हटले की, लाखो उद्‌ध्वस्त कुटुंबाचे काय होणार ? ही चिंता त्यांना लागलेली आहे. हे विधेयक आपण कशासाठी आणले आहे, तेच मला समजत नाही. माझा समज असा झाला होता की, लोक इतके वर्षे मुंबईत राहूनही त्यांच्या नावावर घरे होत नाहीत. मी सध्या राहत असलेल्या सोसायटीचाही तोच प्रश्न आहे. त्यामुळे हे विधेयक आणण्याचा उद्देश काय आहे, तेच मला समजला नाही. यासंदर्भातील उद्देश माननीय मंत्री महोदयांना सांगावा लागेल. अनेक सन्माननीय सदस्यांनी याठिकाणी भाषणे केली. त्यांचे म्हणणे मी शांतपणे ऐकून घेतले. त्यावरुन माझी या

..2.....

श्री.दिवाकर रावते.....

बिलाच्या बाबतीतील समजूत चुकीची होती का ? याबाबतची माहिती घेतली. परंतु माझ्यासमोर अशाप्रकारचे विधेयक आलेले आहे. बिलामध्ये पुढे असेही म्हटले आहे की, "शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, उक्त कायदा करण्यामागची उद्दिष्टे पूर्णत: साध्य झालेली नाहीत आणि प्रवर्तक व मालमत्तांचे विकासक यांच्याकडून केल्या जाणाऱ्या विवक्षित गैरव्यवहारांना व अनिष्ट प्रथांना पायबंद घालण्याच्या दृष्टीने त्याची परिणामकारकरीत्या अंमलबजावणी करण्यात येत नाही." यामध्ये नक्कीच गैरव्यवहार म्हणजे काय अभिप्रेत आहे व अनिष्ट प्रथा म्हणजे काय ? आपले प्रिअँबल सांगते की, भविष्यामध्ये घरांची टंचाई होणार आहे. मला वाटते की, सभागृहातील सर्वच सन्माननीय सदस्यांनी हे विधेयक वाचावे. यातील अनिष्ट प्रथा म्हणजे काय ? याची व्याख्या आपण दिलेली नाही. एखादा कायदा होत असताना, त्याचा अर्थ सांगितला पाहिजे. कोर्टामध्ये कायद्याच्या व्याख्येवरच बोलले जाते. परंतु याठिकाणी अनिष्ट प्रथांच्या, गैरव्यवहारांच्या अर्थाचा उल्लेखच नाही. आपण याठिकाणी "पायबंद घालण्याच्या दृष्टीने" म्हटले आहे, म्हणजे नेमके काय करावयाचे ?

नंतर कु.गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

हा प्रश्न येथे निर्माण झालेला आहे. आपण बिलाची मांडणी जी केलेली आहे ती सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांना अपेक्षित नाही, असे माझे मत आहे.याबाबतीत माझे आणि आपले मत सारखेच आहे. सदनिका खरेदी करणाऱ्यांचे हितसंबंध सुरक्षित करण्यासाठी स्टॅम्प ॲक्ट आणि रेग्युलेशन ॲक्ट करण्यात आला आहे. जी बाब रजिस्टर झाली ती फक्त कायद्यामध्ये टिकू शकते अन्यथा नाही. अगदी भाडेपट्टीचे ॲग्रीमेंट सुध्दा कायदेशीरपणे रजिस्टर केलेले असेल तर ते कोर्टामध्ये ग्राहय धरले जाते अन्यथा नाही. टेनेन्सी ॲग्रीमेंटचा कायदा असा आहे की, त्याची व्हॅलीडीटी फक्त 3 वर्षच असते. After 3 years there will be no litigation. पंधरा दिवसापूर्वी हाय कोर्टाने इतका गंभीर निर्णय दिलेला आहे की, मालकाला आपल्या भाडेकरुला विचारता येत नाही की, तुम्हाला घर का खाली करावयाचे आहे . मालकाला असे अधिकार आहेत की, मालकाने जर भाडेकरुला घर खाली करावयास सांगितले तर तो विचारु शकणार नाही की, तुला किती मुले आहेत, तुला खरेच कुटुंब आहे की नाही असे कडक निर्णय न्यायालयाने दिलेले आहेत. आता भाडेकरुस न्यायालयाचे असलेले संरक्षण संपलेले आहे. शिक्षकाचे आणि विद्यार्थीनीचे प्रेम असू शकते की नाही या संदर्भात सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिला की, शिक्षक आणि विद्यार्थीनीचे प्रेम असू शकते. मला काही कळतच नाही. आपला देश हा जगाच्या पाठीवर संस्कृतीमुळेच टिकलेला आहे. राम हा देव नाही तर राम ही संस्कृती आहे. पण कोर्टाचे असे निर्णय येतात. आपण लिव्ह ॲंड लायसन्सच्या संदर्भात कायदा केला. पूर्वी या कायद्याप्रमाणे एकदा करार केला की, भाडेकरुला बाहेर काढणे म्हणजे डोक्याला फार ताप होता. परंतु त्यानंतर महाराष्ट्र सरकारने कायदा केला आणि त्यानुसार अकरा महिन्याचे ॲग्रीमेंट संपले की भाडेकरुला बाहेर निघावेच लागते. कायद्याने त्या भाडेकरुस लढताच येत नाही त्यामुळे मालकास संरक्षण मिळालेले आहे. सभापती महोदय, अनेक वर्षापासून मी एका सहकारी सोसायटीमध्ये राहतो आहे परंतु त्या घराच्या खालची जी जमीन आहे ती माझी नाही असा हा विषय आहे. आपल्या अधिकाऱ्यांनी हे बिल जे केलेले आहे तसेच नवीन गृह निर्माण धोरण जे आणले आहे त्याची अर्थसंकल्पाचारल चर्चेत भाग घेतला असताना मी थोडीशी चिरफाड केलेली आहे. नवीन गृह निर्माण धोरण लक्षात घेऊन, हा कायदा तयार करण्यात आलेला आहे .



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ......

प्रिअँबल व हा कायदा यांची काही सुसंगती आहे का याचा आपण विचार करु. या कायदयाच्या संदर्भात महसूल अधिकारी निवासी उपजिल्हाधिकारी कार्यकारी प्रमुख यांना अधिकार देण्यात आलेले आहेत. माझी यासंदर्भात अशी सूचना आहे की, या संदर्भातील जे अधिकार आहेत ते डेप्युटी रजिस्ट्रार यांस देण्यात यावे. व महसूलीसंबंधी जे अधिकार असतील ते महसूल अधिकारी यांच्याकडेच असावेत.

सभापती महोदय, आपल्या निवेदनामध्ये असे म्हटले आहे की, ज्याने प्रवर्तकाकडून सदनिका खरेदी केल्या असतील अशा खरेदीदाराकडून अर्ज मिळाल्यावर अशा व्यक्तीस सहकार संस्था स्थापन करता येईल हे बंधन आहे. अशा सदनिका मालकाच्या सहकारी संस्थेची नोंदणी करण्याबाबत जिल्हा उपनिबंधक ,उपनिबंधक किं यथास्थित सहाय्यक निबंधक यांना निदेश देण्यात येईल. सहकारी संस्थेमध्ये बाराच्यावर सदस्य असतील तर त्यांना संस्थेचे रजिस्ट्रेशन करता येंते आपल्याकडे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

तशी तरतूद आहे. त्यासाठी आपल्याला सदनिका घेतली पाहिजे, त्यात राहिले पाहिजे आणि मग सहकारी गृहनिर्माण संस्था निर्माण केली पाहिजे, असे नाही. सदनिका नसतांना सहकारी गृहनिर्माण संस्था निर्माण करता येते. त्यासाठी कुठलाही विकासक अडवू शकत नाही. या विधेयकामध्ये कोणकोणते ॲक्ट इन्व्हॅाल्व्ह झाले आहेत ? स्टॅम्पडयुटी ॲक्ट, रजिस्ट्रेशन ॲक्ट, महाराष्ट्र रेंट कंट्रोल ॲक्ट, महाराष्ट्र ओनरशिप फ्लॅट रेग्युलेशन ॲक्ट, 1963, ट्रान्स्फर ऑफ प्रॉपर्टी ॲक्ट, 1982 या ॲक्टचा संबंध आहे. या कायद्यांमध्ये सगळया तरतुदी आहेत, कोणत्याही पळवाटा नाहीत. मग नवीन कायदा का आणला ? या बिलामध्ये बिल्डर ही सज्ञाच नाही. 'विकासक' असा शब्द आहे. बिलाच्या इंग्रजी कॅापीमध्ये 'प्रमोटर ॲण्ड डेव्हलपर' असा शब्द आहे. बिल्डर हा विषयच नाही. नागपूर खंडपीठाचा गेल्या महिन्यात निकाल आला आहे, त्यांनी 'बिल्डर' ही सज्ञा काय आहे, याची व्याख्याच केली आहे. त्यानुसार He is a trustee. मी जर तुमच्याकडून एखादी सदनिका विकत घेतली तर ती बांधण्याकरिता जो नियोजन करतो, रेती, खडी, विटा ही सामुग्री आणतो किंवा इंजिनिअर्स, आर्किटेक्ट नेमून घरबांधणी करतो तो तुमचा ट्रस्टी. अशा प्रकारचा निर्णय गेल्या महिन्यामध्ये नागपूर खंडपीठाने दिला आहे. माझ्याकडे या निर्णयाची प्रत आहे, ती वाचून दाखवून मी सभागृहाचा वेळ घेणार नाही. यामध्ये तुम्ही डयुटी ॲण्ड पॉवर्स दिलेल्या आहेत. कसे परफॉर्म केले पाहिजे, सांभाळले पाहिजे, वापरले पाहिजे, याचा उल्लेख आहे. आर्किटेक्टने काय करावे, डेव्हलपरने काय करावे, सोसायटीने काय करावे, हे सगळे दिलेले आहे. मी हे सर्व बघत असतांना त्यामध्ये हिअरिंगची तरतूद बघितली. यामधील वादासंबंधी डी.डी.आर.यांच्याकडे हिअरिंग होणार आहे. या विधेयकाचा उद्देश सांगतांना मंत्री महोदयांनी प्रिॲम्बल वाचून दाखविले. या विधेयकातील उद्देश व कारणे या निवेदनातील परिच्छेद 2 (दोन) मध्ये असे म्हटले आहे की, "सदनिका मालकांच्या सहकारी संस्थेच्या सदस्यांकडून अर्ज मिळाल्यावर, कलम 11 मध्ये तरतूद केल्याप्रमाणे, विहित कालावधीत अभिहस्तांतरणपत्र करुन देईल आणि अशा संस्थेला, ती अभिहस्तांतरणपत्राची नोंदणी करुन घेण्यास हक्कदार असल्याचे व ती संस्था उक्त संस्थेच्या नावे मानीव अभिहस्तांतरणपत्र म्हणून नोंदणी अधिनियम, 1908 अन्वये एकपक्षीय अभिहस्तांतरणपत्र करण्यास पात्र असल्याचे प्रमाणित करणारे प्रमाणपत्र देईल."

..2.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...........

केंव्हा ? हिअरिंग झाल्यानंतर. सन्माननीय सदस्य, श्री.विनोद तावडे यांनी यासंदर्भात जो मुद्दा मांडला आहे त्याचे उत्तर माननीय मंत्री महोदयांना द्यावे लागेल. त्यांनी असे सांगितले की, एखाद्या बिल्डरकडे 1 लाख एफ.एस.आय.असे आणि त्याने 40 हजार एफ.एस.आय.वापरुन इमारत बांधली, उर्वरित एफ.एस.आय.तो दोन वर्षानंतर, 4 वर्षानंतर उपयोगात आणतो. हा उर्वरित एफ.एस.आय.सोसायटीला मिळणार का ?

यानंतर कुमारी जयश्री..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.......

याच्याबरोबर त्यातील पाच - सहा जण गेले, डी.डी.आर.कडे असे अर्ज केले की ही आमची सदनिका आहे, आम्ही यावरील सर्व स्टॅम्प डयूटी भरलेली आहे तेव्हा आमचा यावर पूर्ण मालकी हक्क आहे . आमच्या मालकी हक्काची ती जागा आहे त्यामुळे या जागेचे कन्व्हेयन्स सुध्दा आमचेच आहे. अशा प्रकारचे मॉडेल ॲग्रीमेंटच सरकारने केलेले आहे. सभापती महोदय, या मॉडेल ॲग्रीमेंटमध्ये असे म्हटलेले आहे की, ज्याच्या मालकीच्या जमिनीवर सदनिका उभी राहते त्या जमीन मालकाजवळच त्याचे कन्व्हेयन्स डीड किंवा मालकी हक्क असेल व त्याचे अभिहस्तांतरण देखील त्यालाच केले जाईल. मी ज्यावेळेला एखादी सदनिका घेतो त्यावेळेला त्या सदनिकेमध्ये जी काही जागा असते ती पूर्णत: माझीच असते त्याच्या मर्यादेमधील पूर्ण जागेवर माझाच पूर्ण हक्क असतो आणि तो हक्क मला मी स्टॅम्प डयूटी भरल्यावर प्राप्त झालेला असतो, तो कोणीही हलवू शकत नाही, हिरावून घेऊ शकत नाही. अशा प्रकारे जर 15 जणांनी एखाद्या जागेवर हाऊसिंग सोसायटी स्थापन करुन इमारत बांधावयाचे ठरविले तर त्या जागेला असलेल्या चटईक्षेत्राचा पूर्ण वापर करुन ती इमारत बांधण्यात येईल किंवा उपलब्ध पूर्ण एफ.एस.आय.चा वापर करुन ते इमारत बांधू शकतील. सन्माननीय सदस्य श्री.तावडे यांनी जो मुद्दा या ठिकाणी उपस्थित केला त्याचे उत्तर या कायद्यामध्ये आपण कसे बसविणार आहात ? या कायद्याला जर तशी अमेंडमेंट नसेल तर ते होऊ शकत नाही. उदाहरणच द्यावयाचे झाले तर एखाद्या 15 जणांच्या हाऊसिंग सोसायटीमधून जर पाच जण सदनिका सोडून गेले तर त्याचे अभिहस्तांतरण जमीन मालकाला किंवा कुणा एका व्यक्तीला देता येईल का ? कायदेशीर गोष्टी एवढया विक्षिप्त असतात व त्यामध्ये दिलेली प्रॉपर्टीची डेफिनिशन देखील विक्षिप्त अशाच प्रकारची आहे. सभापती महोदय, खरे पाहिले तर प्रॉपर्टी या शब्दाची डेफिनिशन जगातील कुठल्याही डिक्शनरीमध्ये दिलेली नाही. " What is property " दोन प्रेमी युगूलांमध्ये जेव्हा ते दोघे जण बोलत असतात की, " she is my property " or " He is my property ". अशा प्रकारच्या प्रॉपर्टीचा येथे विषय नाही पण अशीही प्रॉपर्टीची एक व्याख्या होऊ शकते. आता मी हे बोललेले गुरुजींना बरे वाटले असेल.

डॉ.दीपक सावंत : सन्माननीय सदस्य श्री.जी.एल ऐनापूरे येथे बसलेले आहेत.

3W - 2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : नाही, नाही ते तसे नाहीत, असो, तर What is exactly mean by property it has some value, काही ठिकाणी हे बघितले जाते तर काही ठिकाणी बघितले जात नाही.

( माननीय मंत्रिमहोदय डॉ.सुनील देशमुख सभागृहामध्ये येतात )

माननीय मंत्रिमहोदय डॉ.सुनील देशमुख आपण आलात या ! कधीतरी आपण या अर्थसंकल्पाशी प्रामाणिक राहा ना ! मंत्री झाल्यापासून तुम्ही कधी शिक्षा भोगली नाही, कधीतरी शिक्षा भोगून दाखवा. आमच्या गुडविलवर तुम्ही नेहमीच सुटता. सभापती महोदय, हे जे मी आता माईकवर बोलत आहे ती सुध्दा एक ईलेक्ट्रॉनिक प्रॉपर्टीच आहे. It is also technical property एवढा विस्तीर्ण अर्थ हा प्रॉपर्टीचा आहे व या पलीकडेही होऊ शकतो. आता हा माझा मोबाईल आहे ती सुध्दा एक प्रॉपर्टीच आहे, it's my property. but it is a movable property. जमीन ही इम्मुव्हेबल प्रॉपर्टी आहे. अशा प्रकारे प्रॉपर्टीमध्ये देखील अनेक प्रकार असतात. जसे की, कार,मोबाईल,टी.व्ही.,इतर मौल्यवान वस्तू ज्या आपल्याला एका ठिकाणाहून दुस-या ठिकाणी सहज नेता येतात त्यांना मुव्हेबल प्रॉपर्टी असे म्हणतात. सदनिका अथवा जमीन ही प्रॉपर्टी इम्मुव्हेबल असते ती आपल्याला एका ठिकाणाहून दुस-या ठिकाणी हलविता येत नाही. या प्रॉपर्टीच्या ट्रान्सफरच्या संदर्भात हे विधेयक या सभागृहात चर्चेकरिता मांडण्यात आलेले आहे. This is bill for transfer of property or conveynce of property. कन्व्हेयन्सच्या संदर्भातील जो मुद्दा सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी या ठिकाणी मांडलेला आहे तो या कायद्यात कशा रितीने बसविणार आहात ? या कायद्याप्रमाणे अधिकृतरित्या समजा कोण्या एका व्यक्तीसमुहाने एखादी हाऊसिंग सोसायटी बांधावयाचे ठरले तर ती सोसायटी कोठे बांधावयाची असे जर म्हटले तर अनेक अडचणी उभ्या राहतात उदा. त्यासाठी एन.ओ.सी. लवकर मिळत नाही. अमुक मिळत नाही, तमूक मिळत नाही अशा अनेक अडचणी उभ्या राहतात. एखाद्या 15 जणांच्या सोसायटीमधील 15 पैकी 5 जण जर सदनिका सोडून गेले तर उर्वरित जणांना तुम्ही या कायद्याप्रमाणे कोणती सूट देणार आहात ? समजा एखाद्या बिल्डींगमध्ये जर 25 सदनिका बांधण्यात आल्या तर आणि 25 पैकी फक्त 20 सदनिका विकल्या गेल्या आणि पाच शिल्लक राहिल्या तर त्या विकासकाकडेच राहतील का , वा

....3

श्री. दिवाकर रावते .....

त्यालाच त्या सदनिका विकण्याचा अधिकार असेल का ? उर्वरित एफ.एस.आय.चा किंवा चटई क्षेत्राच्या बांधकामाबाबतचा हा प्रश्न आहे. या विधेयकामध्ये चटईक्षेत्राचा हक्कही ठेवलेला आहे.

यानंतर श्री.बोरले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते ........

20 वर्षापूर्वी कॉम्प्लेक्स बांधले जात नव्हते. फक्त विलेपार्ले येथे परांजपे कॉम्प्लेक्स होता. परांजपे यांनी लोकांचा विश्वास संपादन केलेला आहे. लोक डोळे झाकून पैसे देत होते. लोकांचा त्यांच्यावर विश्वास होता. लोक त्यांच्याकडून पावती सुध्दा घेत नव्हते. मराठी माणूस कायम प्रामाणिक असतो. गैरव्यवहार आणि अनिष्ठ प्रथा कोणी आणल्या ? हे बोललो तर नको ती परिस्थिती निर्माण होते. बाबूराव परांजपे यांच्यासारखे जे बिल्डर होते, बिल्डर म्हणण्यापेक्षा विकासक होते त्यांच्यावर लोकांचा विश्वास होता. आता अशी परिस्थिती आहे की, भूखंड विकत घ्यायचा. त्यावर इमारत बांधयची आणि त्या इमारतीतील फ्लॅट्स लोकांना विकून मोकळे व्हायचे. फ्लॅट्स विकले की विषय संपला. जमीन त्यांच्या नावावर आहे. परंतु आता ते टी.डी.आर.च्या मागे आहेत. हा विषय आहे. जे विधेयक मांडण्यात आले आहे ते भविष्यात निर्माण होणा-या इमारतींच्या संदर्भात मांडलेले आहे, असे यामध्ये सरळ सरळ लिहिलेले आहे. यातून अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. दोन वर्षापूर्वी वर्तक हॉलमध्ये फ्लॅट्स ओनर असोशिएशनची बैठक झाली होती. त्या बैठकीला सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण, सन्माननीय सदस्या श्रीमती सुधा जोशी आणि मी उपस्थित होतो. त्यावेळी आम्ही आग्रही भूमिका मांडली होती. स्टॅम्प ॲक्टचा विषय सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी मांडला, तो विषय मी नंतर मांडणार आहे. टी.डी.आर.चा विषय मांडण्यात आला. टी.डी.आर. काय आहे ? मुंबई शहरातील विकासाच्या अंतर्गत येणा-या ज्या जमिनी आहेत, मी आणि सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण मुंबई महानगरपालिकेमध्ये होतो. त्यावेळी श्री.अमरनाथ पाटील आणि श्री.शरद आचार्य यांच्या नेतृत्वाखाली अहवाल तयार झाला होता. दर 20 वर्षांनी प्रत्येक शहराचा विकास आराखडा तयार होतो. त्यामध्ये स्मशान भूमी, शाळा, रस्ते, उद्यान, मोठे स्टेडियम अशा सार्वजनिक सुविधांकरिता जागा राखून ठेवली जाते. आता तसे होते की नाही, हा नंतरचा भाग आहे. यामध्ये किती गळती झाली ? हा चर्चेचा विषय नाही. यासंदर्भात दुसरे एक विधेयक आलेले आहे. त्यावेळी आपण ही सर्व चर्चा करु शकतो. शासनाने 26 नंबरचे विधेयक आणले आहे. त्या विधेयकावर चर्चा करतांना आम्ही ही सर्व चर्चा करु. माननीय गृहनिर्माण राज्यमंत्री ॲड.प्रीतमकुमार शेगावकर, तुम्ही मराठवाडयातील संभाजीनगरमध्ये

श्री.दिवाकर रावते ........

राहता. मुंबईमध्ये काय चालते, हे तुम्हाला माहीत नाही. गोरगरिबांची सेवा करुन तुम्ही येथे आलेला आहात. माननीय मंत्री महोदयांचा उत्कर्ष मी तिकडे बघितलेला आहे. तुम्ही येथे आलात आणि राज्यमंत्री झालात, याचा मला आनंद आहे. मुंबई महानगरपालिकेमध्ये मी स्थायी समितीचा अध्यक्ष असतांना टी.डी.आर.चा विषय घेतला नव्हता. त्यावेळी लोक माझ्याकडे येऊन मला सांगत होते की, साहेब आमचा रस्ता घेतलेला आहे, आमचे उद्यान आहे. एक तर आमची जमीन तरी सोडवावयास सांगा किंवा आमचे उद्यान तरी ताब्यात घ्या, नाही तर आमचे पैसे तरी द्या. महानगरपालिकेने पैसे दिले पाहिजेत, हा विषय होता. मग आम्ही आयुक्तांची बैठक घेऊन सांगायचो की, आमच्याकडे द्यावयास पैसे नाहीत. पैसे नाहीत तर काय करावयाचे ? त्यावेळी श्री.बाटलीवाला हे डायरेक्टर होते.

(यानंतर श्री.गागरे ........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

15 वर्षापूर्वी टी.डी.आर. कन्सेप्ट आली होती. त्याची काय गंमत आहे ती पहा. कारण याबाबत मी अधिकृतपणे बोलत आहे. त्यावेळी तीन महिन्याकरिता टी.डी.आर. मध्ये बदल करण्यात आला होता. तीन महिन्यानंतर तो कायदा रद्द झाला होता. कारण या तीन महिन्यामध्ये मुंबईतील एका मोठया बिल्डरला रस्त्याचा व इतर मोठया कामांचा एफ.एस.आय. द्यावयाचा होता. लाखो रुपयांचा फायदा होण्यासाठी या बिल्डरला एस.एस.आय. दिला गेला. त्यांच्यासाठी भराभरा सर्व बाबी मंजूर केल्या गेल्या. तीन महिन्यानंतर हा कायदा मागे घेतला गेला. परंतु यामुळे त्या बिल्डरला प्रचंड फायदा मिळाला, दुसऱ्यांना काही मिळाले नाही. त्यावेळेस दुरुस्ती केली नसती तर टी.डी.आर.ची रक्कम सरकारकडेही आली असती. ही बाब सरकारच्या लक्षात आल्यानंतर 1991-92 मध्ये टी.डी.आर. ची नवीन संकल्पना निर्माण केली गेली. त्यामुळे हा टी.डी.आर. आता मुंबई शहराच्या उपनगरात जाईल. याबाबत मी सभागृहात हा प्रश्न विचारला होता, त्याचे उत्तर मंत्री महोदयांनी दिलेले नाही. मी मंत्री महोदयांना जाहिरपणे सांगू इच्छितो की, मुंबई शहराबाबत पुढील अधिवेशनात एक श्वेतपत्रिका शासनाने सभागृहात आणावी. श्वेतपत्रिका आणली तर शासनाचे पितळ उघडे पडेल. लोक म्हणतील की, हा माझा भूखंड आहे, तो माझा भूखंड आहे. त्यांना जमिनीचे पैसे मिळत नसतील तर ट्रान्सफर ऑफ राईट दिले जात आहेत. मी उदाहरण देऊ इच्छितो की, समजा 2000 स्क्वे.मीटरची जागा उद्यानासाठी दिलेली आहे, त्या जागेवर उद्यान बनवायचे असेल तर उद्यान बनवा, असे होऊ शकते.

सभापती महोदय, शासनाने ज्यांना टी.डी.आर. दिला त्यांच्या जमिनीच्या हस्तांतरणाच्या संदर्भात श्वेतपत्रिका काढून आम्हाला द्यावी. गार्डनचे टी.डी.आर. तुम्हाला डेव्हलप करुन द्यावयाचे आहेत. डेव्हलप केल्यानंतर तुम्हाला टी.डी.आर. पास करता येईल. रस्त्याचा टी.डी.आर. असेल तर रस्ता पूर्ण बांधून द्यावयाचा, दिव्याची व्यवस्था करावयाची, शहरामध्ये जर रस्ता असेल तर रस्त्याच्या खाली गटाराची व्यवस्था करावयाची. हे सर्व झाल्यानंतर तेथील विभागीय अधिकाऱ्यांनी हे काम योग्य झाले आहे असे म्हटले तर तरच तो टी.डी.आर. मंजूर होईल. याचा अर्थ काम इ ाल्यावरच टीडीआर मिळतो. या शहरामध्ये लाखो चौरस मीटरचा टी.डी.आर. अशा प्रकारे दिला गेलेला आहे. त्यामुळे या संदर्भात श्वेतपत्रिका सभागृहात सादर करण्याची आवश्यकता आहे.

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PNG/ MHM/ SBT/

श्री.दिवाकर रावते.....

सभापती महोदय, आतापर्यंत किती टीडीआर दिले गेले ? या संदर्भात माहितीचा अधिकार वापरला तर त्याची संपूर्ण माहिती आम्हाला मिळू शकेल. समजा माझ्या उद्यानाचा टीडीआर वापरल्यानंतर त्या ठिकाणी मी उद्यान केले का ? हे पाहिले पाहिजे. त्या ठिकाणी जर परत झोपडया उभ्या राहील्या असतील तर आपण काय करणार आहात ? भ्रष्टाचार जर कोठे असेल तर तो येथे दिसत आहे. माझ्या उद्यानाचा टी.डी.आर. वापरुन मी मोकळा झालो आणि ती मोकळी जागा सरकारच्या ताब्यात आली. त्या मोकळया जागेवर झोपडया झाल्या. लाखो चौरस मीटरचा टी.डी.आर. झाला असेल तर तो मोकळा प्लॉट घेण्याकरिता या शहरातील नागरिकांना घटनेने काही अधिकार दिलेले आहेत, हे जनतेला अधिकार मिळाले पाहिजेत. त्यांना उद्यान, रस्ते, शाळा, दवाखाने या सोयीसुविधा मिळाल्या पाहिजेत. टी.डी.आर. मध्ये हा भूखंड मला नको, तो द्या असे होत नसते. टी.डी.आर. फार मोठा घोळ होत होता. या संदर्भात पब्लिक इंटरेस्ट लेटीकेशन झालले आहे. या प्रकरणामध्ये कोर्टाने निर्णय दिलेला आहे. कोर्टाच्या असे लक्षात आले की, गिरगावमध्ये एवढीसी चाळ होती, त्या ठिकाणी 15 किंवा 25 मजल्याची बिल्डींग कशी काय दिसते ? त्या ठिकाणी अतिरिक्त चटईक्षेत्र 2 किंवा 2.5 इतके दिलेले असते. सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी म्हाडाचे अध्यक्ष म्हणून काम केलेले आहे, ते ज्या वेळेस अध्यक्ष होते त्यावेळेस म्हाडामध्ये घोटाळे झाले नव्हते.

नंतर श्री.सुंबरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रावते .....

हा विषयच इतका गंभीर आहे की, त्यावर बोलल्याशिवाय मला राहवत नाही. सभापती महोदय, म्हाडाच्या अधिकाऱ्यांशी संगनमत करून, माझ्या इमारतीत 25 भाडेकरू असतील तर त्यांची संख्या 50 दाखविली जाते आणि मग तुमचा जो चटईक्षेत्र निर्देशांक आहे तो 2.5 नसेल, त्याच्या पलिकडे असेल तर जेवढे भाडेकरूंना दिले आहे त्याच्या 50 टक्के आणखी मिळणार. हे सारे न्यायालयाच्या लक्षात आल्यानंतर न्यायालयाने याबाबत निर्णय दिला. त्यात न्यायालयाने म्हटले आहे की, "For the foregoing reasons, we are of the opinion that in cases where constitutionality and/or interpretation of any legislation, be it made by Parliament or an executive authority by way of delegated legislation, is in question, it would be idle to contend that a Court of superior jurisdiction cannot exercise the power of judicial review." शेवटी टीडीआर संबंधात मोठे जजमेंट न्यायालयाने दिलेले आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे की, "Relief was also sought in the form of Prayer Clause (j) which was re-numbered as (ji) which reads as under: A Committee of experts comprising architects, social activists, lawyers, bureaucrats and retired State and BMC Officers be appointed by this Hon. Court to review the TDR policy in the larger interest in view of the submissions made in this petition and to frame norms and guidelines for future implementation and submit its report within two months for the consideration of this Hon. Court." अशा प्रकारचे विविध मुद्यांवर जजमेंट दिलेले आहे. त्याचे सरकारने काय केले मला माहीत नाही. सार्वजनिक हिताच्यासंबंधातील ही याचिका असल्याने कोर्टाने याची अशा प्रकारे नोंद घेतली. त्यामुळे याबाबतीत आपण श्वेतपत्रिका आम्हाला द्यावी. त्यात मुंबईमध्ये एकूण टीडीआर किती दिला गेला, त्यात 1991 नंतर किती टीडीआर वापरला, ज्यासाठी टीडीआर दिला आहे ते प्रत्यक्षात निर्माण केले गेले आहे काय ? वगैरे सगळी माहिती आपण त्या श्वेतपत्रिकेत द्यावी. नाही तरी आम्ही पुढे त्याचा पर्दाफाश करणारच आहोत.

सभापती महोदय, यामध्ये 'प्रवर्तक' हा जो विषय आहे त्याबाबतही मला सांगावयाचे आहे. त्याबाबतीत येथे 'कंपनी' टाकलेली नाही. कंपनी असते तेव्हा त्यात संचालक असतात. म्हणून

..... 3झेड 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यातून 'कंपनी' काढून टाकली आहे. या विधेयकामध्ये 'प्रवर्तक' याचा अर्थ असा सांगितला आहे की, ".... जी वेश्मिका, सदनिकांची इमारत किंवा वेश्म यापैकी काहींची किंवा सर्वांची इतर व्यक्तींना, किंवा एखादी कंपनी, सहकारी संस्था किंवा व्यक्तींचा अन्य संघ यांना विक्री करण्याच्या प्रयोजनार्थ, त्यांचे बांधकाम करील अथवा त्या बांधण्याची व्यवस्था करीत अशी व्यक्ती असा असून त्यात भागीदारी संस्था किंवा व्यक्तींचा निकाय किंवा संघ, मग तो नोंदणीकृत असो वा नसो, यांचा, तसेच तिच्या.." सभापती महोदय, या मालकी हक्काच्या सदनिकांच्या बाबतीत जो मुलभूत प्रश्न आहे त्यासंदर्भात मी माझी उपसूचना टाकली होती. परंतु सन्माननीय सदस्य श्री.मधू चव्हाण यांना माननीय मुख्यमंत्र्यांनी शब्द दिलेला आहे, त्यामुळे मी ती उपसूचना मागे घेतली आहे.

सभापती महोदय, या सगळ्यांमध्ये मुद्रांक शुल्क कायदा देखील यात समाविष्ट आहे. मी मुद्दाम या डायरेक्टरना भेटून आलो आहे. त्या ठिकाणी केवढा गोंधळ आहे ते मी आपल्याला सांगतो. आता येथे महसूल विभागाचे मंत्री, राज्यमंत्री असायला पाहिजे होते. नोंदणीच्या बाबतीत परिस्थिती एवढी गंभीर आहे ती आपल्या लक्षात आणून द्यावीशी वाटते. आता तेथे फोनवर नोंदणी करण्यासाठी नवीन योजना सुरू केली आहे. सभापती महोदय, मी आता जे काही सांगतो आहे ते महसूल खात्याच्या मंत्र्यांपर्यंत पोहोचावे अशी मी अपेक्षा करतो. कारण शेवटी आपल्या या कन्व्हेअन्सची नोंदणी होणार आहे. त्यातूनच सगळा घोळ निर्माण होणार आहे. त्यासाठी मी प्रामुख्याने येथे बोलतो आहे. तेव्हा भविष्यात काय होणार आहे याबाबत माननीय मंत्री महोदय आपल्या उत्तराच्या भाषणात काही सांगतीलच. ...

( यानंतर श्री. सरफरे ..... 4ए 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

सभापती महोदय, 1 जानेवारी 2007 पासून फोनवरुन रजिस्ट्रेशन करण्याची पध्दत सुरु झाली आहे. तुम्हाला नोंदणी कार्यालयामध्ये रांग लावण्यासाठी जाण्याची गरज नाही. तुम्ही फोन केला तर तुम्हाला फोनवर नंबर दिला जातो. फोनवर तुमचे नाव विचारले जाते. तुम्ही कोणत्या नंबरवर बोलत आहात ते विचारले जाते. तुम्हाला कोणते डॉक्युमेंट रजिस्टर करावयाचे आहे हे विचारले जाते. तुमची जमीन आहे की सदनिका आहे, ती कमर्शिअल आहे की रेसिडेन्शिअल आहे हे विचारले जाते. तुमच्याकडील माहिती फोनवर लिहून घेतली जाते. त्यानंतर तुम्हाला नंबर दिला जातो व अमूक दिवशी या असे सांगितले जाते. त्या दिवशी गेल्यानंतर तुमच्या डॉक्युमेंटचे रजिस्ट्रेशन केले जाते. एका दिवसामध्ये 5 ते 7 माणसांचे रजिस्ट्रेशन व्हावयास पाहिजे त्याठिकाणी 25 ते 30 जणांचे रजिस्ट्रेशन केले जाते. हे कशासाठी? त्याठिकाणी फोनवर बसणारा माणूस विजय कदम हा दुय्यम निबंधक आहे. माझ्या डॉक्युमेंटचे गेल्या आठवडयामध्ये रजिस्ट्रेशन झाले म्हणून मला सर्व माहिती मिळाली आहे. या निबंधकाला आलेले दोन-चार फोन विजयकुमार शोभा शहापूर अँड कंपनी, अशोक टॉवर त्याला बापू म्हणून ओळखले जाते याच्या नावाने घेतले जातात. या माणसाला रोज नंबर मिळतो, आणि बाकीच्या आलेल्या लोकांना परत जावे लागते. याची माहिती घेण्याकरिता मी त्या कार्यालयामध्ये एक ते दीड तास बसलो होतो. त्याठिकाणी विजय कदमचा जो भाडेकरु आहे त्याला प्रॉयॉरिटी दिली जाते. गेल्या 12 वर्षापासून तो त्याठिकाणी आहे. अशाप्रकारे रजिस्ट्रेशन होत असतांना मुंबई शहरामध्ये आज रजिस्ट्रेशनच्या कार्यालयामध्ये प्रचंड गर्दी असते. जवळ जवळ रोज 12 हजार आणि दोन प्रतिंमध्ये 24 हजार ऐवज नोंदले जातात. आणि यामधून वर्षाला अडीचशे ते तीनशे कोटी रुपये शासनाला उपलब्ध होतात.

सभापती महोदय, या निबंधकाचे तिसरे कार्यालय तयार आहे.परंतु महाराष्ट्र सरकारला अवदसा आठवते. जोपर्यंत यांच्याकडे पैसा येत नाही तोपर्यंत हे काम करीत नाही. तिसरे कार्यालय बांधून तयार असतांना माननीय महसूल मंत्र्यांना वेळ नसल्यामुळे त्या कार्यालयाचे उद्‌घाटन होत नाही. ते नंबर वन असल्यामुळे सर्व ठिकाणी तलवारी फिरवीत असल्यामुळे त्यांना वेळ नाही. त्या कार्यालयाचे उद्‌घाटन न झाल्यामुळे रोजची 5 लाखाची नोंदणी फी शासनाच्या तिजोरीत जमा होत नाही. यामुळे रोजचे 20 ते 30 ॲग्रिमेंट रजिस्टर होण्याचे थांबले आहे, रोजचे 10 हजार कन्वियंस डीड रजिस्टर व्हावयाचे थांबले आहे. बाकीच्या गोष्टी सुध्दा होत नसल्यामुळे रोजचा 7

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

ते 8 लाखाचा फटका बसत आहे. तेव्हा आपण हा कायदा लागू केल्यानंतर रजिस्ट्रेशन करण्यासाठी मोठया प्रमाणावर लोंढा येईल. आपण मुद्रांक शुल्क कायदा बदलला आहे. यामुळे इतर कायद्यामधून निर्माण होणारी परिस्थिती याठिकाणी मांडीत आहे. याबाबत आपण निर्णय कसा करणार आहात ते सांगितले तर बरे होईल. 1985 मध्ये या कायद्यामध्ये मूलभूत बदल करण्यात आला.पूर्वी अशी पध्दत होती की, तुम्ही एखादी सदनिका घेतल्यानंतर 10 रुपयांच्या स्टँप पेपरवर ॲग्रिमेंट केले जायचे. आणि त्यानंतर 700 ते 1200 रुपये भरुन त्या डॉक्युमेंटचे रजिस्ट्रेशन केले जायचे. अशाप्रकारे नोंदणी केलेल्या दस्तावेजाला कोर्ट-कचेरीमध्ये फार मोठी किंमत होती.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते (पुढे सुरू..

पण नोंदणी केलेले दस्तऐवज उद्या कोर्टामध्ये सादर करता येतात. आज बिल्डरकडून फसवणूक होऊ नष्ये म्हणून लोक नोंदणी करत होते. त्यावेळेला 10 रुपयाच्या स्टॅम्पवर 700-800 रुपयाची नोंदणी होत होती. आता मुद्रांक शुल्कबाबत कायदा करण्यात आला. सन्माननीय राज्यमंत्री श्री.टोपे साहेब येथे हजर नाहीत. तरी देखील मला सांगायचे आहे की,या कायद्याचे नाव काय आहे, हे समजणे महत्वाचे आहे. माझ्याकडे 29 डिसेंबर 2006 चे राजपत्र आहे. सन्माननीय सदस्य श्री.उल्हासदादा पवार यांच्या माहितीसाठी सांगू इच्छितो की, शासकीय कामकाजामध्ये मराठी भाषेचा वापर बंधनकारक केलेला आहे. या कायद्याच्या बाहेर "मुद्रांक शुल्क अधिनियम 1958 "असे लिहिलेले आहे आणि आतमध्ये "Bombay stamp Act 1958" असे इंग्रजीमध्ये लिहिलेले आहे. यासंबंधात आपण कोणती कारवाई करणार आहात ? जेव्हाजेव्हा मला संधी मिळेल तेव्हा मराठी विषयाच्या संबंधाने मी चिमटे काढत रहाणार आहे, त्याशिवाय हे काम होणार नाही. तबलेवाला नाद येण्यासाठी तबल्यावर हातोडयाने ठोकत असतो, त्याप्रमाणे मराठी विषयावर मी बोलत रहाणार. सभापती महोदय, 10 रुपयाच्या स्टॅम्पवर आपण 700-800 रुपयाची नोंदणी करत होतो. त्यानंतर 1985 साली मुद्रांक शुल्क कायदा करण्यात आला त्यामध्ये रेडी रेकनर तयार करण्यात आला. पुण्यामध्ये, ठाण्यामध्ये, नासिकमध्ये सदनिकांचे किती दर असतील याबाबत रेडी रेकनर तयार करण्यात आलेला आहे.. त्याचे कोष्टक तयार करण्यात आले. मुंबई शहरामध्ये कुलाब्याला किती दर आहे, समुद्राच्या जवळ, मंत्रालयाच्या जवळ फ्लॅटचा दर किती असेल,याबाबतचे कोष्टक तयार करण्यात आले. मुद्रांक शुल्क कायदा केल्यामुळे विष निर्माण व्हायला लागलेले आहे. लाखो रुपयामध्ये सदनिका घेतली जाते आणि सरकारला काही त्यापासून उत्पन्न मिळत नाही म्हणून सरकारने याबाबतीतील कायदा आणला. आता सरकारला मुद्रांक शुल्कच्या माध्यमातून 700-800 कोटी रुपये मिळतात. सन्मानीय उपमुख्यमंत्री म्हणतात की, गावठी दारू बंद केल्यामुळे मुद्रांक शुल्कच्या माध्यमातून 300 कोटी रूपयाचे उत्पन्न मिळाले. प्रश्न असा आहे की, 1985 साली कायदा करून सुधारणा केली. पण यामुळे सामान्य माणसाला किती यातना देणारी बाब आहे, हे समजू शकत नाही. त्यामध्ये रिट्रॉस्पेक्टीव्ह इफेक्ट सामान्य माणसाला लागू केला. म्हणजे सदनिका ज्यांनी 25 वर्षापूर्वी घेतली असेल तर त्याला आताच्या दराने मुद्रांक शुल्क भरावे लागणार आहे. सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी जो विषय मांडला तोच विषय

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ SBT/ MHM/

श्री.दिवाकर रावते (पुढे सुरु...

आहे. मला आठवते, 1976-77 साली 70-80 रुपये स्क्वे.फूट भावाने मी सदनिका विकलेल्या आहेत. आता जमिनीचे भाव गगनाला भिडलेले आहेत, त्याची कल्पना करवत नाही अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. ज्यांनी 25-30 हजार रुपयाला जमिनी नावावर केलेल्या आहेत, त्याचे आताच्या भावाने मुद्रांक शुल्क भरणे नाकी नऊ येत आहे. मी संचालकांना भेटून विचारले असता त्यांनी आताच्या दराने मुद्रांक शुल्क आकारू असे सांगितले.

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

सभापती महोदय, मी 25 हजार रुपयांमध्ये ब्लॉक घेतला. मी तीस वर्षे त्या ठिकाणी राहतो. मुंबईमध्ये अनेक मध्यमवर्गीयांची हीच स्थिती आहे. मी स्वत: महानगरपालिकेमध्ये नोकरी करीत होतो. त्यावेळी 1965 मध्ये माझा पगार 236 रुपये होता. आता त्याच पदावर काम करणाऱ्याला 20 हजार रुपये पगार मिळतो. सभापती महोदय, हा विषय गंभीर आहे. याबाबत शासन काय उत्तर देणार आहे हा प्रश्न आहे ? सांगण्यासारखे खूप आहे. मी महत्वाच्या गाभ्यावर बोलतो. त्यासंबंधी शासनाने उत्तर द्यावे. याकरिताच मी हे विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीचा प्रस्ताव दिला होता. तो प्रस्ताव योग्य होता हे आपल्याला पटेल. परंतु तो मार्ग आता राहिलेला नाही. ताडाच्या झाडाखाली बसून ताक प्यालो तरी लोक ताडी पितो असेच म्हणणार. आमच्या मित्रांना बिल्डर लोक 25 लाख रुपये घेऊन फिरताना दिसत होते. मला ते दिसत नाहीत. त्यांना मात्र ते दिसत होते. म्हणजे 20 लाख रुपये किंवा 30 लाख रुपये नव्हे तर नेमके 25 लाख रुपये घेऊन फिरत होते. त्यांनाच याबाबत माहिती असेल. हा अत्यंत महत्वाचा आणि गंभीर विषय आहे. या महाराष्ट्रामध्ये अधिक गंभीर परिस्थिती निर्माण होणार आहे. मला माझ्या पत्रकार बांधवाच्या माध्यमातून या महाराष्ट्राला मेसेज द्यावयाचा आहे. हा कायदा पास झाल्यावर यासंदर्भात काय निराकरण होणार आहे याचे उत्तर शासनाने दिले तर आनंद होईल. सामान्य गरीब माणसांनी आपले जे घरकुल घेतले ते हप्त्यातून घेतलेले आहे. त्यासाठी त्यांनी बँकेतून कर्ज काढले. सोसायटीचे कर्ज काढले. एल.आय.सी. चे कर्ज काढले. दागिने गहाण ठेवून कर्ज काढलेले आहे. मुंबई शहरात घर घेण्यासाठी लोकांनी काय काय केले हे आपल्याला माहीत आहे. तो माणूस जेव्हा कन्व्हेयंस घेण्याकरिता जाईल तेव्हा सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी मांडलेला मुद्दा उपस्थित होणार आहे. मुद्रांक संचालकांनी मला सांगितले की, कायद्याप्रमाणे आम्हाला ते शुल्क बसवावे लागेल. पुढची जी गंभीर परिस्थिती आहे ती मी सांगतो. या कायद्यामध्ये सांगितल्याप्रमाणे निवासी उपजिल्हाधिकारी ज्यावेळी हा निर्णय देतील की, खालील अटींप्रमाणे डिम्ड कन्व्हेयंस करुन देण्यात यावे तेव्हा हा प्रश्न निर्माण होईल. पूर्वी 600 किंवा 650 रुपये भरले की, रजिस्ट्रेशन होत होते. आता मुद्रांक शुल्क कमीतकमी 30 हजार रुपये केलेले आहे. एवढी प्रचंड प्रमाणात

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MHM/

श्री. दिवाकर रावते ....

रक्कम महाराष्ट्र शासन नोंदणीसाठी मुद्रांक शुल्काच्या माध्यमातून घेत आहे. मी माझे उदाहरण देतो. 25-30 वर्षापूर्वी मी ज्या इमारतीमध्ये सदनिका घेतली त्या इमारतीचे कन्व्हेयंस होणे बाकी आहे. त्यासाठी गेल्यानंतर मला रजिस्ट्रेशन दाखवा असे सांगण्यात आले. रजिस्ट्रेशन दाखवा म्हटल्यानंतर माझ्याकडे फक्त रजिस्ट्रेशन केल्याची पावती होती. मुंबई शहरात त्या काळात ज्यांनी सदनिका घेतल्या त्या सर्वांचा हा प्रश्न आहे. आता अशी परिस्थिती आहे की, त्या ठिकाणी गेल्यावर संगणकावर फोटो घेतात व संध्याकाळपर्यंत डॉक्युमेंट्स देतात. परंतु त्या काळामध्ये इकडे रजिस्ट्रेशन केले की, ती कागदपत्रे पुण्याला जात असत. माझे डाक्युमेंट अजून आले नाही. गेल्या वर्षी मला त्याची गरज होती. जर मला माझ्या स्वत:च्या सदनिकेवर कर्ज काढावयाचे असेल तर ते डॉक्युमेंट पाहिजे. माझ्याकडे फक्त पावती होती. रजिस्ट्रेशनची प्रत माझ्याकडे यावयाची आहे. जी मूळ प्रत यावयास पाहिजे ती आलेली नाही. पूर्वी जी परिस्थिती होती त्यानंतर दहा वर्षानंतर झेरॉक्स देण्यास सुरुवात केली. आता लगेच संध्याकाळी डॉक्युमेंट मिळते. परंतु त्या काळामध्ये मुंबई शहरामध्ये ज्या मध्यमवर्गीयांनी कर्ज काढून, दागिने गहाण ठेवून घरे घेतलेली आहेत त्यांच्या दृष्टीने हा अत्यंत महत्वाचा विषय आहे. इमारत दुरुस्तीचा विषय, गृहनिर्माण संस्थेचा विषय हे वेगळे विषय आहेत. मी रजिस्ट्रेशनला गेलो तर मी फक्त रिसीट दाखवू शकतो. गेल्यावर्षी या क्षेत्रामध्ये काम करणारा एक माणूस खास या कामासाठी पुण्याला पाठविला होता. त्याला सांगितले होते की, लागेल तो खर्च कर परंतु हे डॉक्युमेंट घेऊन ये. आज त्या ठिकाणी कोणाचेही डॉक्युमेंट्स उपलब्ध नाहीत.

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते..........

मिळतच नाहीत. हजारो सदनिकांची मूळ प्रत त्यांच्याकडे उपलब्ध नाही. परंतु सदनिकाधारकांची ओनरशिप आहे. सोसायटीचे शेअर सर्टिफिकेट हे ओनरशिप डॉक्यूमेंट आहे. काही बँकेकडून आपल्याला कर्ज मिळावे म्हणून प्रयत्न केला तर सदनिकाधारकाला शेअर सर्टिफिकेटच्या आधारे कर्ज दिले जाते. शेअर सर्टिफिकेट हीच त्याची व्हॅलिडिटी आहे. ही व्हॅलिडिटी कर्ज देण्यासाठी उपयोगी पडते. परंतु जमीन हस्तांतरण करण्यासाठी गेल्यानंतर डॉक्यूमेंट मागितले जाईल त्यावेळी कोणते डॉक्यूमेंट द्यायचे? हा प्रश्न हजारो लोकांपुढे उभा राहणार आहे. पुण्याच्या कार्यालयात 10-15 वर्षे होऊनही डॉक्यूमेंट मिळत नाहीत. 1985 पूर्वी ॲग्रीमेंट 5-10 रुपयाच्या स्टॅम्प पेपरवर लिहून ते रजिस्टर केले जायचे. आता कन्व्हेयन्स करण्यासाठी सदनिकाधारकांना मुद्रांक शुल्क कायद्यातील नवीन सुधारणेप्रमाणे शासनाने जे कोष्टक तयार केले आहे त्यानुसार बाजारभावाप्रमाणे मुद्रांक शुल्क भरावे लागणार आहे. मात्र याबाबत शासनाने एक सवलत दिली आहे. इमारत जेवढी जूनी असेल त्या प्रमाणात मुद्रांक शुल्काची रक्कम कमी होणार आहे. असे असले तरी बाजारभावापेक्षा जास्तीत जास्त 30 टक्के सूट दिली जाईल. म्हणजे 70 टक्के रक्कम ही भरावीच लागणार आहे. सभापती महोदय, मी त्या इमारतीत कधी राहायला आलो? त्या आधारे मुद्रांक शुल्क आकारले जाणार आहे. त्या आधारे कन्व्हेयन्स केले जाणार आहे. मला शासनाच्या अधिकाऱ्यांना प्रश्न विचारायचा आहे, बिल बनविताना ते कसे तयार केले? मंत्रालयातील विधी व न्याय विभागाने मसूदा कसा मंजूर केला? त्या विभागाचे अधिकारी इतके अनभिज्ञ आहेत का? सरकारमध्ये काय चालले आहे? सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी, प्रा.बी.टी.देशमुख यांनी मला बोलण्याची विनंती केली. मी मनात म्हटले, कोणाच्या मागे लागायचे?

**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)**

सभापती महोदय, आपण मराठवाडा आणि विदर्भावर मेहेरबानी केली. ॲडव्होकेट जनरलना या सदनामध्ये बोलावण्याचे निर्देश दिले, त्याप्रमाणे ते याठिकाणी आले. श्री.वहानवटी यांनी काय मत दिले ते सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी वाचून दाखविले. माजी ॲडव्होकेट जनरल श्री.रवि कदम यांचेही मत काय होते ते वाचून दाखविले. सभापती महोदय, या शासनाच्या विधी व न्याय विभागातील अधिकारी कायद्याचे पदवीधर आहेत की नाही हे विचारावे लागेल. हे अधिकारी कायद्याचे शिक्षित असतील तर असे बेकायदेशीर मत दिल्याबद्दल त्यांची





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते..........

सनद का काढून घेऊ नये असा प्रश्न या सभागृहात निर्माण झाला आहे. हे विधेयक बनविताना ते जून्या लोकांच्या हिताचे आहे का हे पाहिले की नाही? सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी प्रामाणिकपणे त्यांचे मत मांडले. चांगले बिल असल्यामुळे मी स्वागत करतो असे ते म्हणाले. या बिलाचा गाभा स्वागतार्ह आहे. सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी सांगितल्याप्रमाणे अनेक जुन्या लोकांवर या बिलाचा आघात होणार आहे. हा आघात कसा निस्तरणार आहात? ज्यावेळी ही मंडळी कन्व्हेयन्स करुन घेण्यासाठी जातील त्यावेळी निवासी उपजिल्हाधिका-यांचे आदेश असतील, हस्तांतरण करा. मग अटीप्रमाणे मुद्रांक शुल्क भरावे लागेल. रजिस्ट्रेशन फी भरावी लागेल. हे प्रकरण जाणार कुणाकडे? मुद्रांक शुल्क आयुक्तांकडे जाणार. ते व्हॅल्यूएशन करणार. सभापती महोदय, श्री.शशी प्रभू हे किर्ती कॉलेजसमोरील अमेय सोसायटीमध्ये राहतात. मी त्यांच्याकडे मार्गदर्शन घेण्यासाठी गेलो होतो. फ्लॅट ओनर्स असोसिएशनचे प्रमुख ॲड.महाबळेश्वर मोरजे यांच्याकडून बरेच मार्गदर्शन घेण्याचा प्रयत्न केला आहे.

(नंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

जे सरकारला सल्ला देण्याचे काम करतात. हे बील पास करु नका असे मला शशी प्रभू यांनी सांगितलेले आहे परंतु याचे कारण असे आहे की, त्यांची इमारत ही 1974 मध्ये बांधण्यात आली असून मी ज्या इमारतीत राहतो ती 1976 साली बांधण्यात आलेली आहे. यामध्ये जे बारकावे आहेत ते आपण समजून घ्या. ज्यावेळेस शशी प्रभू हस्तांतर करावयास गेले तेव्हा त्यांना 1.25 कोटी रुपये स्टॅम्प डयूटीसाठी खर्च आला. त्यावेळेस त्यांनी कपाळाला हात मारुन घेतला. त्यांच्या इमारतीत फार कमी लोक राहतात. कारण या इमारतीतील बरेच लोक परदेशात राहत आहेत. या फ्लॅटची किंमत त्यावेळी 30-32 हजार रुपये होती. त्यामुळे आता जी परिस्थिती निर्माण झालेली आहे त्यावर आपण काय निर्णय घेणार आहात याची माहिती या ठिकाणी मिळण्याची आवश्यकता आहे. नाही तर हा कायदा नको अशी म्हणण्याची वेळ जनतेवर आल्याशिवाय राहणार नाही. इमारतीचे ऑक्यूपेशन सर्टीफिकेट हे फार महत्वाचे आहे. कन्व्हेअन्स झाले तर इमारतीस ऑक्यूपेशन सर्टीफिकेट मिळते असे काही नाही. ऑक्यूपेशन सर्टीफिकेट नसतांनाही 25-25,30-30 वर्षापासून लोक इमारतीत राहत आहेत. या लोकांना मुद्रांक शुल्क आजच्या बाजारभावानेच या लोकांना भरावा लागणार आहे. मुद्रांक शुल्क मध्ये तुम्हाला काहीही सवलत मिळणार नाही. कारण मी स्वत: मुद्रांक शुल्क भरलेले आहे. मध्यमवर्गीय एवढा मोठा भार सहन करुच शकणार नाही. यामध्ये मध्यमवर्गीयाची काय चूक आहे? जोपर्यंत ऑक्यूपेशन सर्टीफिकेट मिळत नाही तोपर्यंत त्या इमारतीला पाणी, वीज दिली जात नाही. आता हे पैसे भरण्यामध्ये मध्यमवर्गीयांचे कंबरडे मोडणार आहे. ऑक्यूपेशन सर्टीफिकेट नसेल तर आपण काय करणार आहात? सभापती महोदय, या विषयाच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण हे माननीय मुख्यमंत्र्यांकडे गेले व त्यांनी यासंदर्भात सर्व माहिती सांगितली त्यावेळेस माननीय मुख्यमंत्री महोदयांनी सांगितले की, तुम्ही काही चिंता करु नका. 10-15 हजार रुपये फी भरली तरी काम होईल. सभापती महोदय, कायदा हा कायद्याने बदलतो हे सिध्द होते. माननीय मुख्यमंत्रीच जर अशा प्रकारचे वक्तव्य करीत असतील तर महाराष्ट्रात अनेक गोष्टी घडू शकतील. 1985 पूर्वी जे जे ॲग्रीमेंट रजिस्टर्ड झाले त्यांच्याकडून एक पैसा देखील न घेता त्यांना तुम्ही ऑक्यूपेशन सर्टीफिकेट दिले पाहिजे. अशा

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

प्रकारे जर लोकांना ऑक्यूपेशन सर्टीफिकेट मिळाले नाही तर जसे आज शेतकरी आत्महत्या करीत आहेत तशा आत्महत्या ऑक्यूपेशन सर्टीफिकेटचे पैसे भरणा-यांना कराव्या लागतील. ऑक्यूपेशन सर्टीफिकेट मिळत नाही तोपर्यन्त घर मालकाला आपले घर सेल करता येणार नाही. त्यामुळे या संदर्भात शासनाने गांभीर्याने विचार करावा अशी माझी विनंती आहे. नाही तर हे विधेयक पास करुन त्याचा काही एक उपयोग होणार नाही. आम्ही सामान्य माणसांसाठी अमूक अमूक करीत आहोत असे आपण सांगता परंतु सामान्य माणसांना त्याचा फायदा पोहचतच नाही. सभापती महोदय, यासंदर्भातील सर्व परिस्थिती या सदनाचे सन्माननीय सदस्य श्री. संजय दत्त हे नेहमी सांगत असतात. सन्माननीय सदस्य श्री. संजय दत्त हे या सदनाचे एक नवरत्न आहे.

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते..........

ते रोज सरकारचे वाभाडे काढणारे विषय येथे मांडत असतात. आम्हाला समाधान वाटते की ते सत्ताधारी पक्षात असून देखील अशाप्रकारचे विषय येथे मांडत आहेत. कधी कधी ते आमच्याकडे सल्ला सुध्दा मागतात. मागील सात वर्षात या सरकारने सर्वसामान्य जनतेला काहीही दिलेले नाही हे सिध्द झालेले आहे. पुरवणी मागण्या चर्चेला आल्या असताना 12 कोटी रुपयांचे शक्तीवर्धक अर्क प्रकरण गाजले, ते आपणा सर्वांना माहीत आहे. या विधेयकावर बोलण्यासारखे खूप मुद्दे आहेत. मुद्रांक शुल्क हा अतिशय गंभीर विषय आहे. उर्वरित एफ.एस.आय.चा मुद्दा महत्वाचा आहे.सदनिकेचा मुद्दा महत्वाचा आहे. जर पाच सदनिका विकायच्या राहिल्या असतील तर त्याची मालकी विकासकाकडे राहील परंतु आपण जमिनीच्या मालकीचा विषय कसा सोडविणार आहात ? जर एक लाख एफ.एस.आय.पैकी 25 हजार एफ.एस.आय. वापरला गेला तर उरलेल्या एफ.एस.आय.चे काय ? यासंबंधीची तरतूद या विधेयकात नाही असे अनेक विषय आहेत. आज मुंबई शहरातील 25-30 हजार गृहनिर्माण संस्थांच्या नावावर भूखंड झालेला नाही. याबाबतीत कायद्याप्रमाणे अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. 24 वर्षानंतर डीमड टू बी ट्रान्सफर हे आदेश दिल्यावर सुध्दा आपला उद्देश साध्य होईल. तीन वर्षामध्ये तो भूखंड दिला पाहिजे, असे विकासकावर बंधन आहे. विकासकाने भूखंड नावावर केला नाही तर त्यास तीन वर्षाची शिक्षा तसेच दंडाची तरतूद आहे. आपण कायदा करतो परंतु तो अमलात आणला जात नाही. गुंडावर गुन्हा रजिस्टर केला जात नाही. वकिलांनी नोटीस दिल्यानंतर गुन्हा रजिस्टर केला जातो, परंतु त्याला कोणतीही शिक्षा होत नाही. सदनिका संदर्भातील तक्रार उपजिल्हा अधिकारी (निवासी) यांचेकडे करता येईल. त्यांच्याकडे एकदा तक्रार गेल्यानंतर त्यासंबंधातील हिअरींग केव्हा होईल ते सांगता येणार नाही. या हिअरींगमधून मार्ग काढण्यासाठी विकासक नोटांचा उपयोग करणार आणि त्याप्रमाणे काम होणार आहे. त्यामुळे येथे भ्रष्टाचारास वाव आहे. तेव्हा विकासकाचे हक्क, उर्वरित एफ.एस.आय. आणि अन्य मुद्यांच्या संदर्भात सविस्तर चर्चा होण्यासाठी हे विधेयक संयुक्त समितीकडे पाठवावे असा मी प्रस्ताव दिला होता. हे विधेयक संयुक्त समितीकडे गेले असते तर



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते..........

त्यावर सखोल सविस्तर चर्चा झाली असती आणि एक परिपूर्ण विधेयक सरकारला आणता आले असते. परंतु माननीय मुख्यमंत्र्यांनी सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांना शब्द दिल्यामुळे मी प्रस्ताव मागे घेतला. त्यांनी सांगितले की, या विधेयकात ज्या त्रुटी आहेत त्याबाबत अध्यादेश काढण्यात येईल. परंतु असे झाले नाही तर यातून जी परिस्थिती निर्माण होईल त्यास पापाचे धनी सरकार राहील. आम्ही सुधारणा सुचविण्याचे काम केलेले आहे. तेव्हा या विधेयकावरील चर्चेला उत्तर माननीय मुख्यमंत्र्यांनी दिले तर बरे होईल, असे मला वाटते.

सभापती महोदय, प्रत्येक अधिकाऱ्याला त्याचा पगार मिळत आहे, त्याचे नियमानुसार प्रमोशन होत आहे. त्या अधिकाऱ्याने चूक केली तर त्यास शिक्षा नसते, मग आपण ही जबाबदारी कोणावर टाकणार आहोत ? ही जबाबदारी सरकारची असते, परंतु सरकार म्हणजे कोण ? ते तुम्हाला ठरवावे लागेल.

यानंतर श्री.पुरी.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

कन्व्हेन्स का झाला नाही ? पाच लोकांनी स्टॅम्पडयूटी भरलेली नसते व बाकीच्या लोकांनी भरलेली असते, सोसायटीचीही ताकद नसते. मग, कन्व्हेन्स होणारच नाही. याबाबतचा खुलासा माननीय मंत्री महोदयांनी करावा. त्यांच्या प्रश्नांस उत्तर कोण देणार आहे ? यावर इलाज काय आहे ? सोसायटीमध्ये 10 लोक नालायक असतात, ते पैसे भरत नाहीत, 12 लोक भरतात. अशाप्रकारचा सगळा विचित्र विषय यामध्ये आहे. ही सर्व जबाबदारी घेऊन यातून विचित्र प्रश्न निर्माण होणार आहेत. एखादी प्रॉपर्टी म्हटली की, प्रश्न हे निर्माण होणारच. आज येथे तिसरी पिढी राहत आहे. त्यांच्या आई-वडिलांनी जागेचे ॲग्रीमेंट कुठे ठेवले आहे, याची त्यांच्या मुलांना माहिती नाही. जमिनीचा व्यवहार करावयाचा असेल तर महाराष्ट्र को-ऑप.ॲक्टप्रमाणे जागा नावावर असली पाहिजे, हे सिध्द करण्यासाठी ॲग्रीमेंट दाखवावे लागते. परंतु ॲग्रीमेंट कुठे आहे, याची माहिती त्यांच्या मुलांना नाही. तेव्हा हे सर्व गडबडीचे मामले असून याबाबत आपण कोणती भूमिका घेणार आहात, ते माननीय मंत्री महोदयांनी सांगावे. माननीय मंत्री महोदयांना आमचे मुद्दे योग्य वाटत असतील तर त्यांनी याबाबतीत अध्यादेश काढावा अथवा या विधेयकात सुधारणा आणावी व मुंबईतील मध्यमवर्गीय माणूस उद्ध्वस्त होणार नाही, याची काळजी घ्यावी, एवढी विनंती करुन मी माझे विचार येथेच थांबवितो.

धन्यवाद !

---------

**उपसभापती** : आता आपण महाराष्ट्र विधानसभेने संमत केलेले महाराष्ट्र विनियोजन विधेयक घेऊ.

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: विनियोजन विधेयक.

**L. A. BILL NO. XXVII OF 2007.**

**(A BILL TO AUTHORISE PAYMENT AND APPROPRIATION OF CERTAIN SUMS FROM AND OUT OF THE CONSOLIDATED FUND OF THE STATE FOR THE SERVICES OF THE YEAR ENDING ON THE THIRTY FIRST DAY OF MARCH 2008.)**

डॉ.सुनील देशमुख (वित्त राज्यमंत्री) : महोदय, मी महाराष्ट्र विधानसभेने संमत केल्याप्रमाणे सन 2007 चे वि.स.वि.क्रमांक 27-दिनांक 31 मार्च, 2008 रोजी संपणाऱ्या वर्षाच्या कामांसाठी राज्याच्या एकत्रित निधीतून विवक्षित रकमा देणे व त्यांचे विनियोजन करणे यांस अधिकृत मंजुरी देण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे, असा आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

असे करीत असताना मी सभागृहाच्या निदर्शनास आणू इच्छितो की, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 207, खंड (1) द्वारे महाराष्ट्राचे राज्यपाल त्यांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करुन त्यांनी हे विधेयक महाराष्ट्र विधान परिषदेसमोर मांडण्यासाठी शिफारस केली आहे.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उपसभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता मी विधेयक खंडश: सभागृहाला सादर करतो. शिफारशी करावयाच्या असल्यास सदस्यांनी मांडाव्यात.

(खंड 2 ते 3, अनुसूची खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य हे एका पाठीमागून एक याप्रमाणे विचारात घेण्यात आले. त्यांच्या बाबतीत कोणतीही शिफारस करण्यात आली नाही.)

**उपसभापती** : ज्याअर्थी, परिषदेस कोणतीही शिफारस करावयाची नाही, त्याअर्थी, परिषदेला कोणतीही शिफारस करावयाची नाही अशा शिफारशींसह हे विधेयक विधानसभेकडे परत पाठविण्यात येईल.

----------

नंतर कु.गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.: कामकाज सल्लागार समितीचा अहवाल सभागृहाला सादर करणे व संमत करुन घेणे.**

डॉ. सुनील देशमुख (संसदीय कार्य राज्यमंत्री ) : अध्यक्ष महोदय, मी आपल्या अनुमतीने कामकाज समितीचे प्रतिवृत्त सभागृहाला सादर करतो. कामकाज सल्लागार समितीच्या गुरुवार दिनांक 12 एप्रिल, 2007 रोजी भरलेल्या बैठकीत शुक्रवार दिनांक 13 एप्रिल, 2007 ते मंगळवार दिनांक 17 एप्रिल, 2007 पर्यंतचा विधान परिषदेच्या कामकाजाचा कार्यक्रम पुढील प्रमाणे ठरविण्यात आला आहे.

शुक्रवार, दिनांक 13 : (1) विरोधी पक्षातर्फे सुचविण्यात आलेल्या प्रस्तावावर चर्चा
(2) सत्ताधारी पक्षातर्फे सुचविण्यात आलेल्या प्रस्तावावर चर्चा
(3) अशासकीय कामकाज (ठराव)

शनिवार, दिनांक 14 : सुट्टी (डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती)

रविवार, दिनांक 15 : सुट्टी

सोमवार, दिनांक 16 : शासकीय विधेयके

मंगळवार, दिनांक 17 : (1) शासकीय विधेयके
(2) अंतिम आठवडा प्रस्ताव

**उपसभापती :** कामकाज सल्लागार समितीच्या प्रतिवृत्त सभागृहाला सादर झाले आहे.

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, कामकाज सल्लागार समितीचे प्रतिवृत्त सभागृहाला संमत आहे असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

( प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.)

----





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**SEZ च्या सुनावणीस देण्यात आलेल्या स्थगितीबाबत**

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, परवा येथे मंत्रीमहोदयांनी S.E.Z.चर्चेच्या वेळी सांगितले होते की, शेतकऱ्यांच्या जमिनी संपादन करण्याचे काम थांबविले आहे. राज्यसरकारच्या संपादन अधिकाऱ्यांनी 14 एप्रिल रोजी सुनावणी लावली आहे. परंतु हे भूखंड संपादन करण्याच्या संदर्भात शेतकऱ्यांना नोटीसेस मिळालेल्या आहेत. आपण S.E.Z.च्या सुनावणीस स्थगिती दिलेली होती तरीही शेतकऱ्यांना नोटीसेस कशा काया मिळालेल्या आहेत ?

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, हे आदेश जुने दिलेले असतील

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, काल माझा जो प्रश्न होता त्या संदर्भात आपण असे निदेश दिले होते की, त्या प्रश्नाचे रुपांतर अडीच तासाच्या प्रस्तावात करु. तेव्हा तीन दिवसामध्ये S.E.Z च्या बाबतीत ही चर्चा ठेवता येईल असा आपण प्रयत्न करावा.

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: मालकी हक्काच्या सदनिकांबाबत ( त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे विनियमन करण्याबाबत) (सुधारणा) विधेयक.

**L. A. BILL NO. LXXIII OF 2005.**

**(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA OWNERSHIP FLATS (REGULATION OF THE PROMOTION OF CONSTRUCTION, SALE, MANAGEMENT AND TRANSFER) ACT, 1963.)**

(चर्चा पुढे सुरु.....

ॲड. प्रितमकुमार शेगावकर (गृहनिर्माण राज्यमंत्री) : सभापती महोदय, या ठिकाणी अनेक सन्माननीय सदस्यांनी आपापली मते मांडलेली आहेत. सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी स्टँम्प डयूटीच्या संदर्भात काही सूचना केलेल्या आहेत त्या सूचनांच्या संदर्भात शासनाकडून जरुर विचार केला जाईल.

यानंतर श्री. रोझेकर.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.प्रीतमकुमार शेगावकर.....

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य, श्री.मधुकर सरपोतदार यांनी अतिशय मौलिक सूचना केलेल्या आहेत. ज्या सोसायटयांचे अभिहस्तांतरण झालेले नाही अशा सोसायटयांच्या बिल्डरला भोगवटा पत्र देण्यापूर्वी किंवा नवीन बांधकामास परवानगी देण्यापूर्वी अभिहस्तांतरण करुन घेण्याचे हमीपत्र घ्यावे, विकासकाकडून ही माहिती घेण्यासाठी अर्जाचा नमुना विहित करावा, लेखा परीक्षण करतांना अभिहस्तांतरणाबाबत वेगळा अहवाल द्यावा, अशा चांगल्या सूचना त्यांनी केलेल्या आहेत. याबाबत शासन निश्चित विचार करणार आहे. विकासकाला द्यावयाच्या शिक्षेची तरतूद अपुरी आहे, असेही त्यांनी सांगितले आहे. आमचे म्हणणे आहे की, सुरुवातीला शिक्षेची तरतुदच नव्हती, आता दंड आणि शिक्षा अशी तरतूद करण्यात आली आहे. त्यामुळे विकासकावर त्याचा पुरेसा परिणाम होईल. बांद्रा (पूर्व) येथील अनेक इमारतींना अकृषिक कर भरण्याबाबतच्या नोटिसा आलेल्या आहेत, असे सन्माननीय सदस्य, श्री.मधुकर सरपोतदार त्यांनी निदर्शनास आणून दिले आहे. याबाबत महसूल विभागाबरोबर चर्चा करुन निर्णय घेण्यात येईल. दुय्यम निबंधकांनी किती दिवसात नोंदणी करावी, याबाबतची तरतूद नाही, असेही सन्माननीय सदस्यांचे म्हणणे होते. परंतु, दुय्यम निबंधक लवकरात लवकर नोंदणी करतील अशी आम्हाला अपेक्षा आहे व त्याप्रमाणे निश्चित कोणती तरतूद करता येईल, ते पाहता येईल. ही बाब निश्चित तपासून पाहू व आवश्यक असेल तर सुधारणा करु. दुय्यम निबंधक अपिलेट ॲथॉरिटी असणार आहे का ? असा प्रश्नही सन्माननीय सदस्य, श्री.मधुकर सरपोतदार यांनी विचारला आहे. त्याबाबत मी सांगू इच्छितो की, दुय्यम निबंधक अपिलेट ॲथॉरिटी असणार नाही. तसेच, प्रवर्तकाची व्याख्या कलम 2 मध्ये देण्यात आली असून त्यामध्ये कंपनीचा समावेश करण्यात आला आहे.

सभापती महोदय, आपल्या मार्फत सन्माननीय सदस्यांना माझी विनंती आहे की, हे बिल सभागृहाने मंजूर करावे.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

..2.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 व 3 विधेयकाचे भाग झाले.

**खंड 1963 चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक 45 मध्ये कलम 5 क समाविष्ट करणे**.

**उपसभापती** : खंड 4 ला माननीय सदस्य सर्वश्री उल्हास पवार व सुधाकर गणगणे यांनी सुधारणा सुचविलेली आहे. त्यांच्यापैकी कोणाही एकाने ती मांडावी.

श्री.उल्हास पवार (महाराष्ट्र विधानसभा सदस्याव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील सुधारणा मांडतो :-

खंड 4 - पृष्ठ क्रमांक 2 वर ओळ क्रमांक 28 व 29 ऐवजी पुढील मजकूर दाखल करण्यात यावा :-

"आणि कर्तव्य पार पाडण्याच्या प्रयोजनासाठी राज्य शासनास, राजपत्रातील अधिसूचनेव्दारे, सहकारी संस्थेच्या जिल्हा उपनिबंधकांच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसेल अशा अधिका-याची, अशा अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट करावयाच्या क्षेत्राकरिता किंवा क्षेत्रांकरिता सक्षम प्राधिकारी म्हणून नियुक्ती करता येईल आणि निरनिराळया स्थानिक क्षेत्रांसाठी, निरनिराळया अधिका-यांची सक्षम प्राधिकारी म्हणून नियक्ती करता येईल."

सुधारणा प्रस्तुत झाली.

यानंतर कुमारी जयश्री.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

JPK/ KGS/ MHM/ प्रथम श्री.रोझेकर..... 18:35

श्री.मधुकर चव्हाण : उपसूचनेमध्ये हे जे दोन मुद्दे आपण मांडलेले आहेत, ते..

श्री.दिवाकर रावते : उपसूचनेलाच आपला विरोध असेल तर तसे सांगा जमीन हस्तांतरण हा विषयच मूळात महसूल विभागाचा आहे. ट्रान्सफर ऑफ प्रॉपर्टी ॲक्ट या कायद्याखाली हा विषय येतो. त्याबाबत मी तुम्ही म्हणाल तर सर्व तरतूदी वाचावयास सुरुवात करतो. जमीन हस्तांतरणासंबंधीचे नियम महसूल विभागाच्या ट्रान्स्फर ऑफ प्रॉपर्टी या ॲक्टखाली येतात आणि डी.डी.आर. हा फक्त निवासी सोसायटयांकरिता किंवा त्यांच्या कामकाजाकरिता मांडलेला विषय आहे. या ठिकाणी आता येथे माननीय राज्यमंत्री श्री.दांडेगावकर उपस्थित आहेत. अशा प्रकारचे जमीन हस्तांतरणाचे अनेक अधिकार त्यांच्या या सहकार विभागाच्या कुठल्या कायद्यामध्ये येतात किंवा कोणते अधिकार त्यांना या कायद्यांतर्गत प्राप्त होतात ते त्यांनी आता या सभागृहामध्ये सांगावे किंवा त्याबाबतचे एक्स्प्लॅनेशन त्यांनी द्यावे. महसूलाचे हस्तांतरणाविषयीचे जे अधिकार आहेत ते सोसायटयांचे नियोजन व देखभाल करणारे आहेत व सदनिका धारकांना संरक्षण देणारे आहेत, को-ऑपरेटिव्ह मुव्हमेंटकरिता आहेत. या महाराष्ट्र राज्यामध्ये कोणी काय करावे अगर करु नये कोणत्या विभागाचे कोणते अधिकारक्षेत्र आहे किंवा नाही हे सर्व ठरलेले आहे. सन्माननीय सदस्यांनी ही जी उपसूचना या ठिकाणी केलेली आहे ती समर्थनीय वाटत नाही. त्याला आमचा विरोध आहे. खोलात जावयाचे म्हटले तर यासाठी बराच वेळ लागेल म्हणून ढोबळमानाने याला आम्ही आमचा विरोध दर्शवून ही उपसूचना योग्य नाही असे माझे मत मांडतो.

श्री.मधुकर चव्हाण : या सभागृहामध्ये या बिलाबाबत ज्या दिशेने पावले टाकण्यात आलेली आहेत ती दिशा चूकीची आहे. ही जर अमेंडमेंट मांडली गेली तर हे विधेयक पुन्हा विधानसभेमध्ये जाईल. आपल्याला या विधेयकाबाबत एकीकडे विरोध दाखवावयाचा आहे का ? हे मला कळत नाही. ही उपसूचना मान्य केली गेली किंवा ही अमेंडमेंट मान्य केली तर हे विधेयक खालच्या सभागृहामध्ये जाऊन ते पास होण्यासाठी सबंध वर्ष एवढा कालावधी लागेल. सन्माननीय सदस्य सर्वश्री.मधुकर सरपोतदार ,विनोद तावडे,दिवाकर रावते आणि मी या ठिकाणी ज्या सूचना केल्या या सर्व सूचनांचा विचार करुन व त्याविषयीची एक अमेंडमेंट तयार करुन ऑक्यूपेशन सर्टिफिकेट आणि रजिस्ट्रेशन फीज याबाबत आमच्या सूचनांचा विचार सरकार करणार आहे का ? सन्माननीय सदस्य श्री. उल्हास पवार यांनी मांडलेली ही सुधारणा म्हणजे भिक नको पण कुत्रा आवर अशा

4J -2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण..

प्रकारची आहे. याबाबतीतील आमच्या सूचना या अमेंडमेंट म्हणून मंजूर करुन आमची सुधारणा स्वीकार करावी व ती सभागृहामध्ये चर्चेकरिता मांडून आपण रिफाईंड बिल मांडणार की आपण वाममार्गाने ही सुधारणा मान्य करणार ?

श्री.विनोद तावडे : सन्माननीय सदस्य सर्वश्री.मधुकर सरपोतदार,मधुकर चव्हाण यांनी या बिलामध्ये सुधारणा होण्याकरिता ज्या सूचना केल्या त्याप्रमाणे जर आम्ही अमेंडमेंट सुचविली तर ते बिल प्रलंबितच राहील. आणि या बिल्डर लॉबीला जे पाहिजे तेच होईल. या बिलाबाबत या सरकारचे नेमके काय मत आहे याविषयीचा खुलासा या ठिकाणी होणे महत्वाचे आहे. सन्माननीय सदस्य श्री.उल्हास पवार यांना माझी अशी विनंती आहे की, जनतेच्या हिताच्या दृष्टीकोनातून आपल्याला जे काही म्हणावयाचे आहे ते आपण माननीय मुख्यमंत्र्यांना सांगावे ते आपल्या अतिशय जवळचे आहेत त्यांना जे आपण म्हणाल ते अध्यादेशातही येऊ शकते. आपण कृपया मुंबईतील मध्यमवर्गीयांच्या डोक्यावरील जी टांगती तलवार आहे ती वाढविण्याचे पाप आपल्या माथी घेऊ नका. आपली इच्छा अतिशय प्रामाणिक आहे, हे मला माहित आहे. जनतेच्या हिताकरिता ज्याप्रमाणे सन्माननीय सदस्य श्री.दिवाकररावजी रावते यांनी आपली सुधारणा मागे घेतली त्याप्रमाणे आपणही मागे घ्यावी, अशी मी आपल्याला विनंती करतो. याबाबत आपण एकदा सगळे माननीय मुख्यमंत्र्यांकडे यांच्याकडे जाऊ आणि आपले मत त्यांच्यासमोर मांडू, त्यांना जर वाटल तर अध्यादेशाच्या माध्यमातून हे करता येईल.

श्री.उल्हास पवार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे म्हणतात त्याप्रमाणे करावयाला काहीही हरकत नाही.

श्री.मधुकर सरपोतदार : ज्या उद्देशाने सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी दिलेली अमेंडमेंट मागे घेतली आणि ज्या उद्देशाने आम्ही हा संपूर्ण विषय मांडला या विधेयकाबाबत म्हणजे स्टँम्प डयूटी,रजिस्ट्रेशन फीज याबाबत मुद्दे मांडले तो विषय या सुधारणेमध्ये साध्य होत नाही. हे सर्व विषय मांडतांना डी.डी.आर.कडे सर्व अधिकार देण्याबाबतची व सहकारी संस्थेच्या जिल्हा उपनिबंधकांच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसेल अशा अधिका-याची अशा अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट करावयाच्या क्षेत्राकरिता किंवा क्षेत्रांकरिता सक्षम प्राधिकारी म्हणून नियुक्ती करता येईल आणि

4J -3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार.....

निरनिराळया स्थानिक क्षेत्रांसाठी,निरनिराळया अधिका-यांची सक्षम प्राधिकारी म्हणून नियुक्ती करता येईल. जी आपण सूचना मांडली त्यावर मला असे म्हणावयाचे आहे की, प्रत्येक खात्याचे निरनिराळे असे फंक्शन्स असतात म्हणजे महसूल, सहकार या खात्यांचे निरनिराळे फंक्शन्स असतात.

यानंतर श्री.बोरले..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार .........

ही छेद देणारी भूमिका विभागाविभागामध्ये असू नये. डेप्युटी रजिस्ट्रार, डेप्युटी कलेक्टर यांच्याकडे ते अधिकार द्यावेत, अशा प्रकारचे हे संपूर्ण विधेयक आहे. हे विधेयक खालच्या सभागृहामध्ये परत जाणार असते तर आम्ही आमच्या सुधारणा मांडल्या असत्या.

श्री.उल्हास पवार : सभापती महोदय, माननीय राज्यमंत्र्यांनी सांगितलेले आहे की, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते, सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार, सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण, सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी ज्या सूचना केलेल्या आहेत त्यावर विचार करण्यात येईल. स्टॅम्प डयुटी संदर्भात बोलतांना माननीय राज्यमंत्री असे म्हणाले की, स्टॅम्प डयुटी कमी करण्याबाबत सकारात्मक विचार केला जाईल. माननीय राज्यमंत्र्यांनी असे आश्वासन दिलेले आहे. माझी दुसरी सुधारणा शिक्षेच्या संदर्भात आहे. या विधेयकामध्ये जी शिक्षेची तरतूद करण्यात आलेली आहे ती व्हेग आहे. त्यामुळे मी त्यासंदर्भात सुधारणा सूचविलेली आहे. विधेयकामध्ये अशी तरतूद करण्यात आली आहे की, एक वर्षापर्यंत शिक्षा व दंडाची रक्कम 50 हजार रुपये राहील. परंतु 50 हजार रुपयापर्यंत म्हणजे ती दंडाची रक्कम 10 रुपये सुध्दा असू शकते व शिक्षा एका वर्षापेक्षा कमी सुध्दा असू शकते. म्हणून मी याबाबत अशी सुधारणा दिलेली आहे की, "सहा महिन्यापेक्षा कमी नसेल परंतु एका वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची किंवा दहा हजार रुपयांपेक्षा कमी नसेल परंतु 50 हजार रुपयापर्यंत असू शकेल."

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माझी अशी सूचना आहे की, दिनांक 1.10.1985 च्या अगोदर ज्या सोसायटयांचे रजिस्ट्रेशन झालेले आहेत त्यांच्याकडून स्टॅम्प डयुटी घेऊ नये.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी असे सांगितले आहे की, आम्ही ज्या सूचना केलेल्या आहेत त्यांचा विचार केला जाईल. त्याच प्रमाणे सन्माननीय सदस्य श्री.उल्हास पवार यांच्या सुधारणांचाही विचार केला जाईल. त्यामुळे त्यांनी सुधारणा मांडू नये, अशी आमची विनंती आहे. आम्हालाही सुधारणा मांडता आली असती. परंतु माननीय मुख्यमंत्र्यांनी आम्हाला शब्द दिल्यामुळे आम्ही सुधारणा मांडलेल्या नाहीत. म्हणून माझी अशी विनंती आहे की, सन्माननीय सदस्य श्री.उल्हास पवार यांनी आपली सुधारणा मागे घ्यावी. त्यांनी ही सुधारणा मांडणे म्हणजे विधेयकाला सुरुंग लावण्याचा प्रकार आहे.

..2......



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, लोकांच्या हिताच्या दृष्टीने आम्ही आमचे काम केलेले आहे.

श्री.उल्हास पवार : सभापती महोदय, बिल्डरला योग्य शिक्षा व्हावी, यासंदर्भातच मी आणखी दुसरी सुधारणा दिलेली आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.उल्हास पवार यांनी सुधारणा मांडली तर लोक असे म्हणतील की, काँग्रेस का हाथ बिल्डर के साथ.

श्री.उल्हास पवार : सभापती महोदय, माझ्याबद्दल लोक असे म्हणणार नाहीत.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्य श्री.उल्हास पवार यांच्याबद्दल बोलत नाही. मी काँग्रेस पक्षाबद्दल बोलत आहे.

**उपसभापती** : माननीय राज्यमंत्री महोदयांनी खुलासा करावा.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय सहकार राज्यमंत्री श्री.जयप्रकाश दांडेगावकर सभागृहामध्ये उपस्थित आहेत. त्यांच्या विभागाशी याचा संबंध आहे. त्यांनी याबाबत खुलासा करावा.

श्री.जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, हे सुधारणा विधेयक आहे. सुधारणा पास झाल्यानंतरही इश्यू क्लोज होत नाही. एखादी गोष्ट कमी जास्त झाली तर अध्यादेश काढता येईल किंवा पुढच्या अधिवेशनात विधेयकामध्ये पुन्हा सुधारणा करता येईल. म्हणून माझे असे म्हणणे आहे की, हे मंजूर करण्यास काही हरकत नाही.

**उपसभापती** : सुधारणा मताला टाकावयाची आहे काय ?

श्री.उल्हास पवार : सभापती महोदय, माझे पूर्ण ऐकून घ्या. पुढची सुधारणा मी अशी सूचविलेली आहे की, बिल्डरला सहा महिन्यांपेक्षा कमी शिक्षा नसावी व दंडाची रक्कम 10 हजार रुपयांपेक्षा कमी नसावी.

(यानंतर श्री.गागरे ........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण : सन्माननीय सदस्य श्री.उल्हास पवार यांना मी सांगू इच्छितो की, त्यांच्यापेक्षा सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी महत्वाचे मुद्दे मांडले आहेत. त्यांनी कन्व्हेयन्सचा मुद्दा मांडला. तसेच अक्युपन्सी सर्टीफिकेट मिळण्याचा महत्वाचा मुद्दा मांडला आहे, असे अनेक महत्वाचे मुद्दे त्यांनी मांडले. माननीय मुख्यमंत्र्यांच्या शब्दावर विश्वास ठेऊन आम्ही विधेयकातील सुधारणा मागे घेतली आहे. तुम्ही आता शासनातर्फे सुधारणा करीत आहात, ही बाब बरोबर नाही. हे विधेयक लवकर मंजूर झाले नाही तर लोक काय म्हणतील. तुम्ही मारल्यासारखे करता व आम्ही रडल्यासारखे करतो, असे या विधेयकाच्या बाबतीत होईल. त्यामुळे आपणसुध्दा सन्माननीय मंत्र्यांच्या शब्दावर विश्वास ठेवला पाहिजे व कोणतीही सुधारणा न मांडता विधेयक मंजूर करावे, अशी मी विनंती करतो.

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, मी आताच खालच्या सभागृहात जाऊन आलो. वरच्या सभागृहात आज हया सुधारणा मंजूर केल्यानंतर उद्या हे विधेयक पुन्हा खालच्या सभागृहात नेऊन मंजूर होईल व उद्याच वरच्या सभागृहात मंजूरीसाठी मांडण्यात येईल.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, त्यासाठी अध्यादेश काढू शकता. आम्ही स्टॅम्पडयूटीबाबतची माननीय मुख्यमंत्र्यांची विनंती मान्य केली आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, या विषयावर बऱ्याच वर्षापासून चर्चा सुरु असून आता विधेयक मंजूर करण्याची आवश्यकता आहे. आपण मांडलेली सुधारणा योग्य वाटत असेल तर अध्यादेश काढा. परंतु ही सुधारणा मागे घ्यावी.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, आज हे विधेयक मंजूर करावे, या मध्ये काही सुधारणा करावयाच्या असतील तर नंतर शासन अध्यादेश काढून सुधारणा करु शकते. विरोधी पक्षाने सत्ताधारी पक्षाचे म्हणणे ऐकूण सुधारणा मागे घेतल्या आहेत. आता सत्ताधारी पक्षाने आमचे म्हणे ऐकून त्यांच्याकडील प्रस्तावित सुधारणा मागे घेऊन त्वरीत विधेयक मंजूर करणे आवश्यक आहे.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

.....2

PNG/ KGS/ MHM/

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मी मंत्री महोदयांना विनंती करतो की, हया विधेयकातील सुधारणा रोखाव्यात. हे विधेयक मंजूर होणार आहे, म्हणून मुंबईतील लोक आनंदी आहेत. परंतु तसे घडणार नाही असे मला दिसत आहे. सभागृहाबाहेर चुकीचा मेसेज जाऊ नये, असे आमचे म्हणणे आहे. शासनाला सुधारणा करावयाच्या असतील तर नंतर अध्यादेश काढावा. नाही तर हे विधेयक मागे घेण्यात यावे.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, यामध्ये एक मुद्दा आहे की, सन्माननीय मंत्री महोदय श्री.राजेश टोपे यांनी व्हॅलीड मुद्दा काढला आहे. उदा. माझा 1000 स्क्वे.फुटाचा प्लॉट आहे, त्यातील काही भाग वापरुन उर्वरित दुस-याला देता येतो. शासन आमच्यावर विश्वास ठेवील, अध्यादेश काढून नंतर सुधारणा करील, अशी आशा आहे. सन्माननीय सदस्य श्री.उल्हास पवार यांनी मांडलेली सुधारणा मागे घ्यावी. याबाबत मी सांगू इच्छितो की, हे विधेयक लवकर मंजूर व्हावे म्हणून सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी दोन तास पोटतिडकीने भाषण केले आहे.

डॉ.सुनील देशमुख : विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी शासनावर विश्वास ठेवावा व या सुधारणा स्वीकाराव्यात. मी सांगू इच्छितो की, हे विधेयक लवकरच मंजूर होईल.

श्री.विनोद तावडे : आम्ही विधेयकामधील सुधारणा परत घेतल्या आहेत, त्याप्रमाणे शासनानेही आता सुधारणाबाबत आग्रह धरु नये. त्यांना सुधारणा पाहिजे असतील तर नंतर अध्यादेश काढावा.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, विरोधी पक्षाच्या वतीने मी शासनाला विनंती करतो की, आज हे विधेयक मंजूर करावे, त्यात आवश्यकता असल्यास शासनाने नंतर अध्यादेश काढून सुधारणा कराव्यात.

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, मी खालच्या सभागृहात जाऊन येतो व माननीय मंत्री महोदयांचा सल्ला घेऊन येतो, त्यानंतर उद्या हे विधेयक मंजूर करता येईल.

प्रा.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, या विधेयकावर वरच्या सभागृहात चर्चा सुरु असताना मंत्री महोदय खालच्या सभागृहात जाऊन येतो व माननीय मंत्री महोदयांचा सल्ला घेऊन येतो, अशाप्रकारचे निवेदन या सभागृहात करीत आहेत, अशाप्रकारची पध्दत सभागृहाच्या नियमात बसत नाही. याठिकाणी अशाप्रकारचे चुकीचे पायंडे पाडले जात आहेत.

नंतर श्री.सुंबरे.....

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, मी या प्रश्नाची सोडवणूक करण्यासाठीच हा उपाय सांगितला आहे. ...

श्री. जयंत प्र.पाटील : हा जो काही प्रकार चालला आहे तो बरोबर नाही. ...

डॉ. सुनील देशमुख : मी या प्रश्नातून मार्ग निघावा म्हणूनच केवळ हा मार्ग सांगितला आहे....

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मी आपल्याला एक मार्ग सुचवितो. मी या विधेयकावर 'ऑन लेग' आहे असे दाखवून आपण हे विधेयक उद्या पुढे चालू करावे.

**उपसभापती** : सर्व सन्माननीय सदस्यांनी शांत व्हावे. मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आपण सगळ्यांनी दीड दोन तास या विधेयकावर चांगल्या प्रकारे चर्चा केलेली आहे. विरोधी पक्षातील सर्वच सदस्यांनी यावर आपल्या भावना व्यक्त केलेल्या आहेत. मला खरोखरी या गोष्टीचा उलगडा होत नाही की, एकदा विरोधी पक्ष सदस्यांनी त्यांच्या सुधारणा मागे घेतल्यानंतर आता या महत्त्वपूर्ण विधेयकावर चर्चा करीत असताना संपूर्ण सभागृहाला बरोबर घेऊन आपण जायचे असताना, सत्तारूढ पक्षाकडून अशा प्रकारे वेळ मागणे कितपत योग्य आहे ? तरीही मी सर्व सदस्यांची तयारी असेल तर यासाठी राज्यमंत्र्यांना 10 मिनिटांचा अवधी देतो ....

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, त्यापेक्षा या विधेयकावर मी 'ऑन लेग' असल्याचे आपण दाखवावे आणि उद्या हे विधेयक पुढे सुरू करावे. म्हणजे सरकारला यावर जो काही विचार करावयाचा असेल तो ते करू शकतात.

**उपसभापती** : ठीक आहे. सन्माननीय सदस्य श्री.रावते हे या विधेयकावर 'ऑन लेग' आहेत. तेव्हा या विधेयकावरील चर्चा मी येथे थांबवितो आणि हे विधेयक उद्या पुन्हा येथून पुढे चर्चेला घेण्यात येईल.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, धन्यवाद.

****

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

....... 4एम 2 ...

**पृ.शी.** : शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध (सुधारणा) विधेयक, 2007.

**L. A. BILL NO. XI OF 2007.**

**(A BILL TO AMEND THE MAHARASHTRA GOVERNMENT SERVANTS REGULATION OF TRANSFERS AND PREVENTION OF DELAY IN DISCHARGE OF OFFICIAL DUTIES ACT, 2005.)**

श्री. राजेश टोपे (सामान्य प्रशासन राज्यमंत्री) : सभापती महोदय, विधानसभेने संमत केल्याप्रमाणे, मी आपल्या अनुमतीने सन 2007 चे वि.स.वि. क्रमांक 11 - महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, 2005 यात सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडतो.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आपण आता हे विधेयक चर्चेला न घेता अर्धा तास चर्चा घ्याव्यात. आज सकाळ पासून आपण येथे बसलो आहोत. ...

**उपसभापती** : मला वाटते आपण आताच या विधेयकावर चर्चा करून हे विधेयक संमत करावे.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदये, आम्ही सरकारला सगळे सहकार्य करण्यास तयार असताना सरकार पक्ष असे का वागत आहे हे मला समजत नाही. ...

**उपसभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, या अगोदरच्या विधेयकावरील चर्चा आपण सांगितल्याप्रमाणे अर्धवट थांबविली आहे. म्हणजे मी आपले म्हणणे ऐकले आहे. तेव्हा आपणही थोडे माझे ऐकावे. आपणा सर्वांना या विधेयकावर चर्चा करावयाची आहे काय ?

विरोधी पक्ष सदस्य : होय, आम्हाला यावर चर्चा करावयाची आहे.

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, मला या विधेयकासंदर्भात एवढेच सांगावयाचे आहे की, शासकीय कर्मचारी आणि अधिकारी यामध्ये या विधेयकात यापूर्वी आयएएस अधिकारी यांना



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. टोपे .....

घेतले नव्हते. पण आता या विधेयकात आयएएस अधिकाऱ्यांना देखील आपण समाविष्ट करून घेतले आहे. अगदी एका ओळीचे हे विधेयक आहे. या विधेयकावर यापूर्वी संयुक्त समितीमध्ये विस्ताराने चर्चा झालेली आहे आणि त्या समितीमध्ये या सभागृहाचेही सदस्य होते. केवळ एका ओळीचे हे विधेयक आहे. त्यामुळे यावर चर्चा करून ते संमत करण्यास कोणाची हरकत नसावी. अत्यंत किरकोळ असे हे विधेयक आहे. तरी माझी सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, त्यांनी हे विधेयक कृपया आजच चर्चा करून संमत करावे.

**उपसभापती** : मी येथे सर्वांनाच सांगू इच्छितो की, मी येथे तुम्हा सर्वांची काळजी घेतो तेव्हा मला वाटले होते की, तुम्ही माझी देखील काळजी घ्याल, माझे ऐकाल. आपण सर्वांनी हे विधेयक आज चर्चा करून संमत केले असते तर उद्या तेवढेच काम कमी झाले असते.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, संयुक्त समितीकडे जे विधेयक गेले होते त्यात शासकीय कर्मचारी आणि अधिकारी होते. त्यात आयएएस अधिकारी असा उल्लेख नव्हता. मी देखील त्या समितीमध्ये एक सदस्य म्हणून होतो. त्यावेळेस आम्ही यासाठी आपल्याला आग्रह करीत होतो पण आपण ऐकले नाहीत. तेव्हा तुमची बुद्धी कोठे गेली होती ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, मी आपल्यामार्फत सर्व सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, तेवढी एकच ओळ जी या विधेयकात, कायद्यात टाकायची राहिली होती तीच आता यामध्ये समाविष्ट केलेली आहे. केवळ तेवढाच बदल यामध्ये करण्यात आलेला आहे.

( यानंतर श्री. सरफरे ..... 4एन 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, आमचे एकच म्हणणे आहे की, आपण हे विधेयक मान्य करण्यास घेतले आहे. आमचा विरोध असतांनाही आपण सर्वानुमते ठरविले. मध्यमवर्गीय माणसांच्या दृष्टीने सोईचे विधेयक असल्यामुळे आमचा विरोध असतांना सुध्दा आम्ही त्याला पाठिंबा दिला. असे असतांना सत्ताधारी पक्षाकडून त्याला विरोध करण्यासाठी अमेंडमेंट दिली जाते व हे विधेयक संमत केले जात नाही. माझे असे म्हणणे आहे की, आपल्याला हे विधेयक ऑन लेग ठेवावयाचे नसेल तर आपण ते मताला टाकावे. त्याबाबत बाहेर मेसेज जाऊ द्या. आणि हा विषय जर आता संपला असेल तर आपण आता अर्धा तास चर्चा घ्यावी.

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, मी विधेयक मांडले आहे...

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, विधेयकाकरिता शासनाने त्यांना पाहिजे त्या पध्दतीने आम्हाला वेठीस धरणे योग्य नाही.

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, मी विधेयकावरील भाषण दोन मिनिटामध्ये संपवितो...

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, विधेयकाच्या उद्देश व कारणे यामध्ये वेगळा शब्द आहे. आपण यामध्ये आय.ए.एस. अधिकाऱ्यांना घेतले आहे की नाही हे सांगावे?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, शिस्तभंगाची कारवाई करण्याकरिता आय.ए.एस. अधिकाऱ्यांना सोडलेले नाही. त्यांनाही या विधेयकामध्ये घेतले आहे. आजच्या कार्यक्रम पत्रिकेमध्ये दाखविलेले हे विधेयक आहे...

श्री. मुझफ्फर हुसेन : सभापती महोदय, मी नियम 260 अन्वये मांडलेल्या अडीच तासाच्या प्रस्तावाची काल व आज सकाळी चर्चा झाली. त्या चर्चेला मंत्रिमहोदयांचे उत्तर झालेले नाही...

**उपसभापती** : ती चर्चा आता घेण्यात येणार नाही. अडीच तासाची चर्चा आजकाल तीन-तीन दिवस चालू असते. हा चर्चेचा अतिरेक झाला आहे. कालच्या चर्चेमध्ये कुत्र्याच्या समस्येवर जास्त बोलले गेले. कुत्र्यांची समस्या परवडली परंतु ती भाषणे नको. आता आपण अर्धा तास चर्चेला सुरुवात करु या.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती मंदा म्हात्रे : सभापती महोदय, आम्ही सकाळी लवकर आलेलो आहोत. त्यामुळे आता सभागृहाचे कामकाज थांबवावे. बाकीचे राहिलेले कामकाज उद्या घेण्यात यावे. सभागृहापुढील कामकाज उद्या घेण्यात यावे, अशी विनंती आहे.

(अनेक सन्माननीय सदस्य राहिलेले कामकाज उद्या घेण्यात यावे अशी विनंती करतात.)

**उपसभापती** : ठीक आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या, शुक्रवार, दिनांक 13 एप्रिल 2007 रोजी सकाळी 11-00 वाजता पुन: भरेल.

(सभागृहाची बैठक सायंकाळी 7 वाजून 1 मिनिटांनी, शुक्रवार, दिनांक 13 एप्रिल 2007 च्या सकाळी 11-00 वाजेपर्यन्त स्थगित झाली.)

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही